# DAMAGE BOOK

UNIVERSAL LIBRARY
OU_192175
UNIVERSAL LIBRARY

# चार धामांची यात्रा

( गंगोत्री, जम्नोत्री, केदारनाथ व बद्रिनाथ,
या चार धामांच्या प्रवासाची दैनंदिनी )


लेखक

श्रीमंत माधवराव भवानराव पंत प्रतिनिधि, B. Sc.

औंध ( जि. सातारा )



एकमेव विक्रेते

ह. के. गोखले .र, बुक-सेलर्स,

११० अ, सदाशिव, पुणें २

१९४७

[redacted]

मूल्य १॥ रुपये

प्रकाशक:—
श्रीमंत माधवराव भवानराव
पंत प्रतिनिधि, B. Sc.
औंध ( जि. सातारा )

CHECKED 1951

Checked 1963

CHECKED 1958

—:*:—

Checked 1969

मुद्रक:—
व० श्री० सातवळेकर, बी. ए.
भारत मुद्रणालय,
औंध ( जि. सातारा )

# प्रस्तावना.

हें प्रवास-वर्णन वाचून कांहीं महाराष्ट्रीय तरुणांना तरी हिमालय पहा-ण्याची इच्छा होवो, एवढीच हिमालयाच्या प्रयथ्याशी प्रार्थना आहे.

या पुस्तकांत एकदोन महत्त्वाच्या गोष्टी सांगावयाच्या राहून गेल्या, त्या येथें सांगतों-( १ ) गंगोत्रीस जातांना ७८ पृष्ठावर ज्या प्रचंड कड्यांचें वर्णन केलें आहे, त्या दोन भिंतींमध्यें फक्त २००–३०० फूट गंगेचें पात्रच आहे, आणि अशी दोहों बाजूस भिंत निदान १–१॥ फर्लांग तरी आहे. यावरून त्या कड्यांचा अजस्रपणा वाचकांच्या लक्षांत येईल. ( २ ) केदारनाथ–बद्रीनारायणास जातां जातां मी मनांतल्या मनांत म्हणत असे, ‘ जय श्री केदारबद्री, जय जय श्री नारायण बद्री. ’

—लेखक.

# अनुक्रमणिका



| | पृष्ठांक |
|---|---|
| पुणें | १ |
| आगगाडींत | ५ |
| हरिद्वार | ७ |
| ऋषिकेश | १४ |
| नरेंद्रनगर | १५ |
| तेहरी | १८ |
| बुलढाणा चट्टी | २२ |
| धरासू | २५ |
| सिलक्यारा | २९ |
| गंगाणी | ३२ |
| जमुनाचट्टी | ३६ |
| हनुमानचट्टी | ३७ |
| जम्नोत्री | ४२ |
| हनुमानचट्टी | ५० |
| जमुनाचट्टी | ५१ |
| गंगाणी | ५३ |
| शिंदोटी | ५७ |
| उत्तरकाशी | ६० |
| मणेरी | ६३ |
| भटवाडी | ६५ |
| गंगणानी | ७० |
| हर्सिल | ७६ |
| गंगोत्री | ८१ |
| हर्सिल | ८९ |

| | |
|---|---|
| गंगणानी | ९३ |
| भटवाडी | ९५ |
| फल्याल्ल | ९६ |
| झालाचट्टी | १०० |
| भैरवचट्टी | १०५ |
| रायपूरचट्टी | ११० |
| पवाली | ११२ |
| त्रिजुगीनारायण | ११५ |
| केदारनाथ | ११८ |
| फाटाचट्टी | १३० |
| देहेडा | १३२ |
| जंगलचट्टी | १३६ |
| तुंगनाथ | ३८ |
| चमोली | १४१ |
| गुलाबकोटी | १४२ |
| लामबगड | १४६ |
| बद्रिनारायण | १४७ |


# शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ९ | २१–२२ | स्फटिकापेक्षा | स्फटिकाप्रमाणें |
| १३ | ४ | मध्येंच एक एक दोन तीन | मध्येच एक, दोन, तीन |
| २२ | ८ | यायचे | द्यायचे |
| २३ | ५ | २५०० | ३१०० |
| २४ | ४ | आल्या यावर | आल्यावर |
| २७ | १८ | ९–९॥ ज्या | ९–९॥ च्या |
| ३१ | १७ | एका ठिकाणीं | कांहीं ठिकाणीं |
| ३२ | ४ | जाणतात | आणतात |
| ४७ | ३ | फुटापर्यंत | फुटावर |
| ४९ | १४–१५ | उंचीवरून घासून पुढें | उंचीवरून व पुढें |
| ४९ | १८ | जातील | जाईल |
| ४९ | २१ | अधोरेसित | अधोरेखित |
| ५६ | १० | बदरीनाथ | केदारनाथ |
| ५८ | १८ | आम्हाला | आम्हां |
| ७३ | १ | ती | मी |
| ७७ | २ | वेळां | वेळ |
| ७७ | ३ | कीं हा कदाचित् तिकडून | कीं तिकडून |
| ८१ | २ | आकुंचि | रुंद |
| ८१ | २० | त्याच्या तेजामुळें | त्याचें तेज |
| ८२ | २४ | दिसते | दिसतात |
| ८३ | २ ३ | गंगोत्रीवरील | गंगेवरील |
| ९३ | १७ | अशी होती कीं | अशी आहे कीं |
| ९४ | २ | आम्ही | ( हा शब्द नको ) |
| ९५ | २५ | अशी दंडी येणार | अशी अशी दंडी येणार |
| ९८ | ५ | गेलों | जायचे |
| १०० | ७ | फके | फेक |

| | | | |
|---|---|---|---|
| १०४ | १२ | पोरींचीही | पोरांचीही |
| १०५ | १८ | विषय, वादविवाद | विषय व वादविवाद |
| १०७ | २५ | सांगितले | सांगेन |
| १०८ | ९–१० | विनोदांची | विनोदांनीं |
| १११ | १८ | व धरासूहून उत्तरकाशीस जातांना | ( हे शब्द नकोत ) |
| ११२ | १९ | टप्प | टप्पा |
| १२८ | १५ | ओर | और |
| १३१ | २७ | नयेसेंच वाटू लागले | नयेशीच वाटूं लागली |
| १३२ | १७ | त्यांचा | त्या पंख्याचा |
| १३५ | १७ | मोटा | मोठा |
| १३८ | ११ | बाबूसाहेब प्रो. विनोदांनीं | बाबूसाहेब ( प्रो. विनोद ) |
| १३९ | १३ | पुढें पुढें | पुढें |
| १४१ | १८ | पाऊन | पाऊण |
| १४१ | १९ | आणि | ( हा शब्द नको ) |
| १४३ | २० | म्हणून | ( हा शब्द नको ) |
| १४५ | १७ | पात्रही | पात्र |
| १४७ | १९ | लाडू, चिवडा व | लाडू चिवडा घेण्यास सांगितलें व |
| १४८ | २३ | व त्यामुळें | त्यामुळें |
| १४९ | १५ | जण आहोंत. त्यांच्यात | जण बरोबर आहेत, त्यांना |
| १५२ | ४ | आणि | पण |
| १५३ | १३ | गंगेचें पाणी | गंगेचा उगम |
| १५५ | ७–८ | टाकल्याचा भास होत होता | टाकीत आहे |
| १५५ | १८ | कोणी हेवा करूं नये | कोण हेवा करणार नाहीं |
| १५६ | २५ | Crank | CRANK |
| १६० | १३ | जर निघाले तर | तयार करावयाचे व |
| १६२ | ५ | गंगोत्रीस | जम्नोत्रीस |



चित्र सं. १
मोहिनी देवीचे डोंगरावरून दिसणारा गंगेचा देखावा. (हरिद्वार) (पृ. सं. १२)



चित्र सं. २
तेहरी येथील गंगेचा सुंदर देखावा. ( पृ. सं. १९ )



चित्र सं. ३
सिलक्याराकडे जातांना चिडांच्या झाडांचा देखावा. ( पृ. सं. ३० )



चित्र सं. ४
गंगाणीहून चंद्रप्रकाशांत घेतलेलें दृश्य. ( पृ. सं. ३६ )

# माझी

# चार धामांची यात्रा

## [ गंगोत्री, जम्नोत्री, केदारनाथ व बद्रिनारायण या धामांच्या प्रवासाची दैनंदिनी ]

अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराजः ॥

( कालिदास )

### पुणें.

तारीख २०-४-१९४१

आतां मात्र मी गंगोत्री-जम्नोत्रीला जायचा, हें नक्की ठरलें हं ! कारण मी आतांच महाबळेश्वरहून येथें येऊन पोहोंचलों. आतां रात्रीचे ९॥ वाजून गेले आहेत आणि आतां उद्यां गंगोत्री-जम्नोत्रीसाठीं सगळा बाजार करायचा आहे ! कांहींबाहीं घ्यायचें आहे !

ता. २१-४-४१

हं ! आतां मात्र गंगोत्री-जम्नोत्रीच्या प्रवासाच्या पूर्व तयारीस सुरवात झाली हं ! तेव्हां आतां डायरी लिहायचा बेत केला आहे.

ता. २२-४-१९४१

तिकडे पाऊस फार पडतो, म्हणून आज एक रेनकोट घेतला. आज सकाळीं एक फौंटनपेन खरेदी केलें व प्रवासास लागणारें कापड व एक बॅटरीही खरेदी केली.

ता. २३-४-१९४१

आतां आधीं गंगोत्री-जम्नोत्रींचा प्रवास व मग अभ्यास असें ठरविलें आहे.

ता. २४-४-१९४१

आज रोजीं प्रवासांत अत्यंत जरुरीची अशी एक हॅट घेतली.

## औंध.

ता. २५-४-१९४१

आज रोजीं मोजे घेतले.

ता. २७-४-१९४१

ती० बाबांच्या ( श्रीमंत राजेसाहेब, सं. औंध ) मतेंही मी बद्रिनाथ–बद्रि-केदार करून यावें, असें आहे आणि येऊनजाऊन आठ दहा दिवसांचा प्रश्न आहे. तेव्हां मीही जायचा बेत केलाच आहे. ते म्हणतात, 'तीस फिल्म्स् पुरतील म्हणून.' पण ती० सौ० आई (श्री० सौ० राणीसाहेब) म्हणतात, 'तेवढ्या पुरावयाच्या नाहींत.' पुण्यास गेल्यावर मिळाल्यास आणखीन् एकदीड डझन घेईन म्हणतों. नाहींतर घेणारच नाहीं. दुसऱ्या ठिकाणीं तपास करून बघतों. कॅम्पमध्ये इकडे-तिकडे

चि० आबासाहेब, तात्यासाहेब वगैरे मंडळी दक्षिण हिंदुस्थानांत जाणार आहेत. मी सांगणार आहे मास्तरांना– ' पाहूं कुणाची डायरी अधिक वाचनीय ठरते तें. ' पाहूं तर खरी गम्मत !

ता० २९-४-१९४१

तेव्हां आतां परवांचे दिवशीं पुण्याला जायचें नक्की ठरलें. आज डॉक्टर व कमल ( माझी मावस बहीण ) दोघे जण पुण्याला गेले. हम् भी जायेंगे.

उदईक सकाळीं सात वाजतां जायचें नक्की ठरलें. हो, लगेज् वगैरे पुष्कळ आहे. तेव्हां तेवढा वेळ आधीं गेलेंच पाहिजे.

माझ्या सगळ्या बॅगचें वजन पुण्यालाच केलें पाहिजे आणि मगच त्या मानानें पुस्तकें घेतलीं पाहिजेत.

## पुणें.

ता. ३०-४-१९४१

आज एक्स्प्रेसनें आम्ही २१ जण येथें येऊन पोंचलों. सामान पुष्कळच होतें. इतकें कीं आम्हाला प्रत्येकीं २५ शेर जाऊन शिवाय आणखी लगेज़साठीं

दर मणाला रु. १-७-० प्रमाणें दहा रुपयांपेक्षां अधिक चार्ज पडला. असो. आम्हीं पावणेदोन वाजतां सुखरूप पुण्यास येऊन पोहोंचलों.

पण निघण्याआधीं एक मोठी गम्मत झाली. इतकें सामान लगेज् करावयाचें होतें, म्हणून लवकर निघणें भाग होतें. ती० बाबांनीं सांगितलें होतें कीं, ' सात वाजतां निघा. ' पण माझी मूळपीठ व दूध पिणें होईपर्यन्तच सव्वा सात वाजून गेले. तेव्हां ती० बाबा भयंकर रागावले. तरी बरं, मी साडेचारचे आधीं उठलों होतों. पण त्याआधीं आटपणेंच शक्य नव्हतें, त्याला मी तरी काय करूं ? ती० बाबा लॉरी केव्हां निघते, हें पहायला अंबाबाईची पूजा करून येऊन उभे राहिले, तरी माझें दूध पिणें चाललेंच होतें. शेवटीं ती० बाबा रागावून दूध प्यायला थटींत निघून गेले. आणि मी जेव्हां नमस्कार करावयास गेलों, तेव्हां " कां आतां उभे राहिलाय् ? जा आतां लवकर " असें अगदीं रागावून म्हणाले. ताबडतोब मी पळ काढला. पण ते बरेच रागावले होते. पण माझा तरी काय इलाज होता ? असो. पुढचा प्रवास अगदीं ठीक झाला. लगेज् वगैरेचें काम अगदीं बिनबोभाट व सावकाश पार पडलें.

आगगाडींत आम्हाला दोन डबे रिझर्व्ह करून अगदीं स्वतंत्र मिळाले होते. पण लोणंद स्टेशनवर कुणीतरी माणूस व एक बाई आमच्या डब्यांत चढून बसलेच. इतक्यांत आमचे मास्तर आले व ते त्या दोघांवर तणाणले. अखेरीस त्यांनीं त्या बाईला घालवून दिलें व तो माणूस ' नीरेलाच उतरायच आहे साहेब, एक स्टेशन आहे साहेब, मागें फार गर्दी आहे साहेब ' वगैरे वगैरे गयावया करूं लागला. तरीदेखील मास्तर तणाणतच होते. अखेरीस गाडी हालली. तो बिचारा अगदीं घाबरून गेला होता.

माझें म्हणणें असे होतें कीं, मास्तरनीं थोडें सौम्य शब्दांत सांगितलें असतें तर अधिक चागलें झालें असतें. तोही प्रवासीच होता ना ? मला येथें एक गोष्ट आठवते आहे. मी एकदां कोल्हापूरला चाललों होतों. त्या वेळेस कोणी मोठा गप्पीदास त्या डब्यांत होता. कोणीही असो, त्याची आपली कांहीं ना कांहीं गप्पा मारण्यास सुरवात. त्याचें म्हणणें असें कीं, ' बाकीचेही आपल्या

सारखेंच तिकीट घेऊन प्रवास करायला आले आहेत, तेव्हां त्यांचा गाडीवर आपल्याइतकाच हक्क आहे. आणि समजा, आपण आज एखाद्याला जागा दिली नाहीं व उद्यां ह्याच प्रसंग स्वतःचे बाबतींत आला तर ? स्वतःचे बाबतींत जर असें वाटतें कीं ' लोकांनीं थोडीशी अडचण सोसून आपणास जागा करून द्यावी' तर आपणही दुसऱ्याच्या बाबतींत स्वतः अडचणी सोसून बसायला नको का ? ' त्यानें हें व्याख्यान गाडींत येतां येतां दिलें होतें. एवढेंच नव्हे तर त्या वेळेस एक गम्मत झाली. पंढरीनाथ तात्या गेले चहा प्यायला दुसऱ्या डब्यांत व मला म्हणाले कीं, ' जागा धरून बसा. ' इतक्यांत एक गृहस्थ आला, तेव्हां मी त्याला सरळच सांगितलें कीं, ' येथे पूर्वीची एक सीट आहे. ' तेव्हां तो उभा राहिला. त्यामुळें त्या गृहस्थानें वरील भाषण केलें व शिवाय म्हणाला की, ' पुढच्या स्टेशनवर तुमचा पॅसेंजर आल्यावर फार झालें तर हा गृहस्थ उठेल. पण एखाद्याला जागा असतांना ताटकळत ठेवणें हें योग्य नव्हे. ' मीही मुकाट्या-नें बाजूस सरलों व त्यांना म्हटलें, ' बसा बुवा ! '

पण हा आमचा रिझर्व्ह डबा होता व उदईक सबंध दीड दिवस रिझर्व्ह डब्यांतच मुक्काम आहे. तेव्हां जर प्रत्येकाबरोबर मऊ वागायला लागलों तर आमचा रिझर्व्ह डबा नुसता गजबजून जाईल. तेव्हां कांहीं कांहीं बाबतींत आपण चांगलाच रुद्रावतार धारण केला पाहिजे. कारण कांहीं कांहीं बाबतींत विशेषतः उत्तर हिंदुस्थानांत लोक भयंकर लोचट, लुच्चे व जळू चिकटल्याप्रमाणें चिकट असतात.

मास्तरांनीं प्रवास पुष्कळ केला आहे. त्यांना त्या लोकांबद्दल अनुभवही पुष्कळ असेल. तेव्हां त्या दृष्टीनें विचार केला असतां झालें तें योग्यच झालें, असें मला वाटतें. पण ती बाई व तो बुवा अगदींच गरिब दिसली. किंवा आम्ही १०-१२ जण पाहिल्यावर त्याला सगळा अपमान गिळून मुकाट्यानें तरी बसावें लागलें. अर्थात् लगेज् करण्यासाठीं जितका वेळ रहिमतपूरला लागला तितकाच जवळ जवळ वेळ पुण्यासही लागला. ब्रेकमध्यें टाकलेलें सामान मुंबईस परस्पर लगेज् करून टाकलें.

आज कँपमध्यें जाऊन आणखी दोन डझन फिल्म्स् विकत घेऊन आलों.

## आगगाडींत

ता. १-५-४१

सामानाची बांधाबांध करीत करीत रात्रीं झोंपायला साडेअकरा वाजून गेले आणि शिवाय आज पहाटे ३ वाजतां जागा झालों व ४ मोटारी ठरवून त्यांत सर्व सामान भरून आम्ही बारा जण बस्‌मधून स्टेशनवर आलों. आणखी पुष्कळशा भानगडी झाल्या. आम्ही आधीं स्टेशनवर गेलों. बाकीचे लोक वाट पहात उभे राहिले. मग गाडींत आल्यावर सामानाची गर्दागर्दी वगैरे वगैरे बऱ्याच भानगडी झाल्या व शेवटीं १०॥ वाजतां व्ही. टी. वर येऊन पोहोंचलों. लागलींच, शेटजींचे जावई किसनदास आले होते, त्यांनीं आम्हांला एकदम आमच्या रिझर्व्ह डब्याकडे आणलें. त्यामुळें सामानाची कांहींच पंचाईत झाली नाहीं.

जेवण झाल्यानंतर आम्हीं थोडेसे बाजारासाठीं बाहेर पडलों, तों सहज कोपर्डे यांच्याकडे गेलों. तेथें विचारतां विचारतां लक्षांत आलें कीं, लांबचा फोटो मोठा करून मिळण्याकरतां लेन्स असतो, तें विचारून पहावें. तों त्याची किंमत त्यांनीं सांगितली रु. १०५, तेव्हां विचार केला कीं, आपण आपल्या जबाबदारीवर इतक्या रुपयांचा जिन्नस घेणें म्हणजे it is dangerous. तेव्हां आम्हीं परत आलेवर मीं गोळिवडेकर मास्तरांना सल्ला विचारला. तेव्हां त्यांचेंही मत पडलें कीं, 'लेन्स विकत घ्यावेंच' असें. मी त्या वेळीं त्यांना सांगितलें कीं, 'ह्या वेळीं कांहीं मला रु. १०५ देतां येणें शक्य नाहीं, पण औंधास गेलेवर जरूर देईन.' पण मास्तरांचें म्हणणें असें पडलें कीं, मी लेन्स घेतलेमुळें तीं० बाबा उलट खूषच होतील आणि ते त्यांना त्याबद्दलच पैसे द्यायला सांगतील. मी म्हटलें बरेंच झालें. त्यांत काय बिघडलें? तेव्हां मी, कवी (श्री. कुलकर्णी) वगैरे कोपर्डे यांस टेलिफोन करावयास गेलों, पण शिरस्त्याबरहुकूम not in order ही त्या ठिकाणीं पाटी असल्याकारणानें आम्हीं अखेरीस ट्रॅमनें तेथें गेलों, पण जातांना बरोबर कॅमेरा मात्र घेऊन जाण्यास विसरलों. तेथें

त्यांना तें Telescopic lens पंजाब मेलला आणायला सांगून आम्हीं परत आलों.

मुंबईस ता० बाबांना Autochrome films न मिळाल्यामुळें आम्हीं पुण्यास वसंतासाठीं black & white फिल्म्स् घेतल्या होत्या; पण येथें कोपर्डे म्हणाला कीं, '१५ फिल्म्स् देतों' म्हणून. तेव्हां त्या आणून द्यायला सांगून आम्हीं आलों होतों.

स्टेशनवर आल्याबरोबर ४॥-४॥। चे सुमारास आम्हाला कळलें कीं, कदाचित् आमचा डबा पंजाब मेलला लागण्याऐवजीं रात्रीच्या गाडीला लागेल. जर पंजाब मेलला दोन एंजिनें लागलीं तर म्हणे आमचा डबा पंजाब मेलला लागणार. तेव्हां कवी गडबडीनें खालीं उतरून स्टेशनवर गेले. थोडी टिप् द्यायचा बेत दुसरें काय? पण थोड्याच वेळांत एक एंजिन येऊन आमच्या डब्याला घेऊन गेलें. अर्थात् आमच्या गाडीला दोन एंजिनें आहेत व त्या दोन एंजिनांच्या पाठोपाठ आमचा डबा आहे आणि आमच्या डब्यापासून प्लॅटफॉर्म बराच दूर आहे.

ठरल्याप्रमाणें कोपर्डेकडून सामान आले. पण तें lens कांहीं आमच्या कॅमेऱ्याला बसलें नाहीं, तेव्हां तें आम्हीं तात्काळ परत करून टाकलें. हो, जर आपल्या कॅमेऱ्याला तें बसलेंच नाहीं तर एकशेंपांच रुपये फुकट घालवण्यापैकींच नाहीं का? इगतपुरीपर्यंत ठीक आहे. परंतु पुढें मात्र सपाटून धूर खावा लागणार आहे.

इगतपुरी सोडल्यापासून जो भयंकर धूर सुरू झाला आहे, तो कांहीं विचारतां सोय नाहीं. झोंपण्याची सर्वांची सोयही उत्तम झाली आहे. सायंकाळीं आम्हीं चौघे जण ब्रिज् खेळत बसलों होतों आणि मग झब्बू खेळलों. एकंदरींत वेळ मजेंत गेला.

**ता. २-५-१९४१**

रात्रीं दारें मोकळीं टाकून झोंपलों होतों. रात्रीं भयंकर धूर येऊं लागला. आधींच मी थोडा खोकत होतों, किंवा मला थोडेसें पडसें आलें होतें. दोन तीन

वाजायच्या सुमारास धूर नाकांत जाऊन थोडासा खोकला आला, तेव्हां पुन्हां झोपतांना दार लाऊन झोपलों. बाकी सर्व ठीक झालें. आज सर्व प्रवास आगगाडींतच झाला.

माझें असें म्हणणें आहे कीं, दिल्लीला तें टेलिस्कोपिक लेन्स मिळूं शकेल आणि त्याप्रमाणें हरिभाऊ मोडकांचेंही म्हणणें पडलें. तेव्हां मी कॅमेरा वसंत चितारी यास दिला. त्याला टेलिस्कोपिक लेन्स कसें घालायचें वगैरे सर्व माहीत आहे. पण प्रश्न एवढाच कीं उद्यांचा एक दिवस फोटो काढायला मिळणार नाहीं. परंतु परवांचे दिवशीं हरिद्वारला मुक्काम आहे, त्यावेळीं फोटो घेऊं. यांत कांहींच विशेष नाहीं.

आज सकाळीं कमल म्हणत होती कीं, ' कपडे बदलावेत म्हणून.' पण विचारांतीं असें ठरविलें कीं, आहे तेच कपडे अधिक काळे झाले, तरी चालण्यासारखें आहे. उगीच भट्टीचे कपडे काढून ते अधिक काळे करण्यांत काय विशेष आहे ? पण रात्रीं झोपण्याच्या वेळीं एकंदरींत कपडे फारच काळे झाले.

## हरिद्वार

ता. ३-५-४१

आज सकाळीं तर कपडे और काळे झाले आहेत. मी कालच दादांना म्हटलें कीं, ' अगदीं एंजीन-ड्रायव्हरइतके आपले कपडे काळे झाले आहेत. नव्हे, आपल्याला पुष्कळ लोक एंजीन-ड्रायव्हर म्हणूनच ओळखतील.' आणि त्यांतच आगगाडींत दूध पितांना सांडलें. त्यामुळें ती विजार उलटी करून घालावी असें मला वाटायला लागलें होतें. शिवाय आज गाडीला जवळ जवळ तासभर उशीर झाला होता.

पण मला अजून आठवतें कीं, मागील खेपेस ज्या वेळीं आम्हीं याच गाडीनें हरिद्वारला आलों, त्या वेळीं प्रथम डोक्याच्या बाजूनें चालणारी गाडी नंतर पायाच्या बाजूनें चालूं लागली व नंतर पुन्हां डोक्याच्या बाजूनें चालूं लागली आणि परत जातांनादेखील मी ही गोष्ट मुद्दाम म्हणून मार्क करून

ठेवली होती. या खेपेलादेखील प्रथम डोक्याच्या बाजूनें चालणारी गाडी वर सांगितल्याप्रमाणें पायाच्या बाजूनें चालूं लागली, पण दुसरें रिव्हर्सिंग ( रिव्हर्सिंग म्हणजे पुन्हां दुसऱ्या बाजूला एंजीन लागून त्या बाजूला चालूं लागणें बरं का! ) कोणत्या स्टेशनवर होतें, हें पहायला गेलों तर त्याचा पत्ता लागला नाहीं. कारण दुसऱ्या खेपेला गाडीनें रिव्हर्सिंग केलेंच नाहीं. मग काय शार्प कर्व्हदेखील सावकाश चालवून तिनें घेतलें कीं आणखी काय झालें, कोणास ठाऊक !

दिल्लीहून हरिद्वारला किंवा हरिद्वारहून दिल्लीला थ्रू (through) जाणाऱ्या गाड्या रात्रींच्या सुटतात व पहाटे आपल्या ठाण्यावर येतात. तेव्हां कुठल्या स्टेशन-वर रिव्हर्सिंग होतें, हें कळणें म्हणजे तेवढ्यासाठीं मुद्दाम जाग्रण करणें होतें. आज आयती गाडी लेट होती, शिवाय पूर्वी आम्ही हिवाळ्यांत गेलों होतों, त्यामुळें दिवस उशीरां उगवायचा. उलट या वेळेस उन्हाळा आहे म्हणून पांच वाजल्या-पासून सुंदर दिसायला लागलें होतें. त्यामुळें मला फार आशा होती की, या वेळीं गाडी रुळावरून कशी बदलते, हें पहायला सांपडेल म्हणून. पण कुठलं काय अन् कुठलं काय? मी आगगाडींतल्या माणसांना सांगत होतों कीं, ‘ गाडी पुन्हां उलट चालायला लागणार म्हणून. ’ तर माझीच फजिती झाली.

साडेसात वाजतां आम्हीं ठीक हरिद्वारला येऊन पोहोंचलों. मग आपलें नेहमींच्याप्रमाणें हमालांचा गोंधळ वगैरे झाला व शेवटीं तांग्यांतून कांहीं मंडळी व आम्ही कांहीं पायीं चालत चालत अहिल्याबाई होळकरांच्या धर्मशाळेंत येऊन पोहोंचलों. ती० बाबा म्हणे नेहमीं इथेंच उतरतात.

आम्ही मागील खेपेस ज्या वेळीं इथें आलों होतों, तेव्हां ‘ या धर्मशाळेंत उतरायला सोय आहे काय?’ म्हणून आम्हीं विचारलें होतें. पण त्यांनीं त्याबद्दल पांच रुपये भाडें मागितलें होतें. याबद्दल बोलतां बोलतां मी ती० बाबांना हें सहज सांगितलें होतें. तेव्हां ते म्हणाले कीं, ‘ ती इंदूरच्या महाराजांची प्रायव्हेट प्रॉपर्टी आहे आणि तेथें जायचें असलें तर प्रथम त्याबद्दल इंदूरच्या महाराजांची परवानगी काढावी लागते. ज्याप्रमाणे बिन्दुमाधवाला आपल्याकडून

परवानगी घ्यावी लागते त्याप्रमाणें.'

बाकी ही धर्मशाळा मोठी छान आहे बुवा! गोलिवडेकर मास्तरांनीं येथल्या वहिवाटदारांना माझ्याबद्दल सांगितल्यावर, त्यानें प्रायव्हेट म्हणून पाटी असलेली, उत्तरेकडे दारें असलेली व त्यालाच पॅरलल गंगानदी वहात असल्या-कारणानें अत्यंत आल्हाददायक अशी खोली उघडून दिली. नदी येथून सुमारें १५-२० पावलांवर आहे आणि दुपारीं इतर ठिकाणीं जरी भरपूर उकडत असलें तरी गंगानदी फारच जवळ असल्यामुळें, दरवाजांतून वारा येतो आहे, त्यामुळें ही खोली किंचित् गार आहे.

पण येथें उकाडा काय भयंकर आहे! सर्व नमस्कार, आंघोळ, संपवून सकाळीं १० वाजायचे सुमारास सदरा घालीतोंपर्यंत अवकाश कीं सपाटून घामाच्या धारांना सुरवात! आणि नमस्कारांच्या वेळींतर काय भयंकर उकडलें! तेव्हां सबंध दुपारभर मी सदरा काढूनच पत्ते खेळत बसलों होतों, तेव्हां कोठें त्या झुळकीनें थोडेंबहुत बरें वाटत होतें.

नंतर आज दुपारीं गंगेचा मूळ प्रवाह पहावयास गेलों होतों. हरिद्वारला मूळच्या गंगेपासून प्रवाह ( कालवा ) काढून गांवाच्या जवळून नेला आहे व तोच पुन्हां पुढें मूळ गंगेला मिळवून दिला आहे! केवढें मोठें पात्र आहे!!

पण पाणी नाहीं बुवा चांगलें! गांवांतील गंगेचें पाणी जितकें स्वच्छ ( चागलें ) वाटतें, तितकेंसुद्धां मूळ गंगेचें स्वच्छ वाटत नाहीं! तरी बरें, गांवचें पाणीदेखील मी पूर्वीं ऑक्टोबरमध्यें हरिद्वारला आलों असतां दिसलेल्या पाण्यापेक्षां कितीतरी खराब आणि कितीतरी गढूळ!!

आम्हीं ऑक्टोबरमध्यें येथे आलों होतों, त्या वेळीं पाणी कसें स्फटिका-पेक्षां स्वच्छ होते, तें पाणी पाहूनच मनाला मोठा आल्हाद वाटत असे. किती स्वच्छ, आणि किती गार! जणू नुकतेंच वितळलेल्या बर्फाचें पाणीच! आणि त्या वेळीं आकाश अत्यंत स्वच्छ होतें. त्यामुळें एका पाठोपाठ एक, अशा पर्वतां-च्या चार पांच रांगा दिसत! त्यांतील शेवटच्या रांगेवर पांढरें बर्फ दिसत असे. त्या शिखराची उंची निदान १९ ते २१ हजार फूट तरी असावी! तें

डोंगरांचें सौंदर्य आणि सर्वांवर तें हिमाच्छादित शिखर आणि खालीं स्फटिका-सारख्या स्वच्छ पाण्यानें वहात असलेली ती गंगानदी आठवली म्हणजे अजून-ही मनाला आल्हाद वाटतो.

नाहींतर आतांची गंगा! पाणी तर गढूळ आहेच आहे. पण शिवाय वातावरणही स्वच्छ नाहीं. त्यामुळें सबंध दिवसांत डोंगरांची पहिली रांग दिसणें म्हणजेसुद्धां फार मुष्किलीचें झालें आहे. मग एकावर एक चार पांच रांगा कोठल्या! त्यामुळें सृष्टिसौंदर्य कांहींच नाहीं असें वाटतें.

पण पाणी मात्र पूर्वीइतकेंच गार आहे हं! बाहेरच्या उकाड्यातून नदीच्या गार पाण्यांत उतरल्यावर मनाला इतका आनंद होतो आणि शरिराला ज्या एका तऱ्हेच्या गुदगुल्या होतात, त्याची मजा ह्या उकाड्यांत राहून, गंगेच्या पाण्यात स्नान केल्याशिवाय इतरांना बिलकूल समजावयाची नाहीं. नाहीं-तर त्या वेळेस! ( म्हणजे ऑक्टोबर महिन्यात ). आधींच बाहेर कोण भयंकर थंडी आणि त्यांत पाणी बर्फासारखें गार. जो पाण्यांत उतरतो तो म्हणतो, " बापरे, काय हें भयंकर गार पाणी! आणि काय ही भयंकर ओढ!" त्या वेळेस मला तर काय करावे हें सुचेना! पायरी–पायरीनें पाण्यांत उतरावें म्हटलें तर तें पाणी इतकें गार कीं, कळा येत! आणि एकदम पाण्यांत उडी मारावी म्हटलें तर ओढ इतकी भयंकर कीं, केव्हा वाहून जाऊं याचा नेम नाहीं! पायरीवर पाय मुळीं ठरतच नव्हता, इतकी भयंकर ओढ! आजसुद्धां इतकी ओढ नव्हती पाण्याला! आमचे जी. के. मास्तर तर त्यावेळीं आंघोळ-सुद्धां न करण्याचे बेतांत होते. त्या वेळीं एक बुडी मारल्यावर दुसरी बुडी मारण्याची मुळींच इच्छा करीत नव्हते. एक बुडी मारली कीं बाहेर छूः!! उलट आज पाण्यांत फारच गम्मत व आल्हाद वाटत आहे.

गंगेचें पाणी या दिवसांत म्हणे गढूळच असतें. कारण हिमालयावरील बर्फ वितळतांना, पर्वतावरून ढेपसेसुद्धां पडतात, त्यामुळें पाणी गढूळ होतें आणि असें म्हणतात कीं, याच दिवसांत पावसाळ्यापेक्षां अधिक पाणी चढतें.

आज संध्याकाळीं साडेचार वाजतां आम्ही बाहेर पडलों व (१) कनखल

तीर्थ, ( २ ) राजाजीचा घाट, ( ३ ) दक्षप्रजापतीचा घाट, ( ४ ) राधाकृष्णाचें देऊळ व ( ५ ) एक धर्मशाळा व त्यांतील नरसिंहलक्ष्मीचें देऊळ इतक्या गोष्टी पाहिल्या.

आम्हांला हिरेमठनीं सांगितलें होतें कीं, वरील ट्रिपला प्रत्येकीं दोन आणे पडतात. परंतु आम्ही एकदम अठरा-वीस जण गेल्याकारणानें तो मोटार-वाला शेफारला आणि चार रुपयांखालीं मुळीं येईचना ! आणि आम्ही टांग्या-बद्दल विचारावयास गेलों, तर तो मुंबईपासून आमच्याबरोबर आलेला पंड्या होता ना. प्रत्येकीं अडीच आण्याप्रमाणें आमच्याकडील माणसें टांगा ठरवायाला लागलीं, तर यानें तो तीन आण्यांस ठरवायाला त्यांना सूचना दिली. पण या बायकामंडळींची त्याच्यावर मोठी भक्ति हं ! कारण देवदर्शन त्याच्यावांचून व्हावयाचेंच नाहीं, अशी कल्पना ना !! बाकी हे पंडे लोक फारच लोचट हं ! नेहमीं कांहीं ना कांहींतरी लोचटपणा करायचा ! परवां दादा पारधी म्हणत होते कीं, ' त्यास हांकलून कां देत नाहीं ? ' मी तर त्याला कांहींएक काम सांगितलें नाहीं. परंतु या बायका आहेत ना ! त्यामुळें गोलिवडेकर मास्तरांना-देखील त्याला ' जा ' म्हणून सांगतां येत नाहीं ! असो. पुढें हा पंड्या काय काय गमती करतो कीं तीं० बाबा त्याला बरोबर येऊंच देत नाहींत, हें उद्या कळेलच.

राजाजींच्या घाटावर देवळावरील नकशी-काम मोठें छान आहे, यांत शंका नाहीं. आतां उद्यां माझा कॅमेरा आल्यावर वेळ झाल्यास पायीं चालत जाऊन एखादा फोटो काढीन म्हणतों ! कनखल तीर्थावरील पाणी हरिद्वार घाटांतील पाण्यापेक्षांही वाईट आहे. मला नाहीं आवडलें पाणी !!

आज दादा म्हणत होते, बद्रिनाथ, बद्रिकेदार, या यात्रेचें काय करायचें म्हणून ! पण त्याबद्दल विशेष गोष्टी उद्यां तीं० बाबा आल्यावर होतीलच. मग आतांच त्याबद्दल लिहिण्यांत काय विशेष !

**ता. ४-५-४१**

काल रात्रीं पत्ते खेळत प्रथम नॉट् ॲट् होम् आणि नंतर झब्बू खेळतां

खेळतां झोपायला साडे अकरा वाजले. तरी आज पहाटे सव्वा चार वाजतां उठलों आणि शौचमुखमार्जन झालेनंतर प्रथम नमस्कार घातले. आज हवेंत गारवा असलेकारणानें घाम वगैरे आला नाहीं आणि तेवढ्याचकरितां प्रथम नमस्कार घातले. नंतर आंघोळ करण्याची इच्छा होती; पण बरोबर कोणीही नव्हतें. हवेंत थोडा गारवा होता व ती० बाबांची गाडी सव्वा सहाला येणार होती.

पण आजदेखील गाडी कालच्यासारखीच तास दीड तास लेट होती. तोंपर्यंत मी नुसता हिंडत होतों. गंगेला पिंड वगैरे कसे देतात, पंडे लोक काय संस्कृत बोलतात वगैरे पहात! ती. बाबा आल्यानंतर आंघोळ संध्या होईपर्यंत ९ वाजले. नंतर ती० बाबांच्या फौंटनपेनमधून शाई फार येत होती, म्हणून तें स्वच्छ केलें व ९॥ वाजण्याचे सुमारास मी, आबा व कमल जवळ असलेल्या डोंगरावर फिरायला गेलों.

आणि आज पुष्कळ दिवसांपासून असलेली इच्छा पूर्ण झाली कीं, हिमालयाच्या कोठल्यातरी शिखरावर जाऊन यायचें! आम्हीं पूर्वी जेव्हां आलों होतों, त्या वेळींदेखील लक्ष्मण झुल्याजवळ असलेली एक टेकडी चढून जाण्याचा मी प्रयत्न केला होता. पण ती मला वाटली दोनतीनशें फूट आणि प्रत्यक्ष होती सात आठशें फूट; खेरीज आम्हाला वेळ फार थोडा शिल्लक होता, त्यामुळें आम्हांला मधूनच परत फिरावें लागलें. शिखर फक्त शंभर दीडशें फूटच उरलें होतें आणि त्या वेळेपासून हिमालयाची एखादी टेकडी तरी चढावी ही असलेली इच्छा, अखेरीस आज पूर्ण झाली. मी तेथें जवळ जवळ सहा सात फोटो घेतले. एकंदरींत फारच मजा आली.

आम्हांला टेकडीवर चढायला सुमारें वीस मिनिटें व परत यायला सुमारें पंधरा मिनिटें लागलीं. वरच्या देवळावर नकशी-काम आहे. तेथून गंगेचा कालवा कसा काय काढला आहे व तो पुढें पुन्हां गंगेला कसा मिळतो, हें अगदीं स्पष्ट दिसत होतें. त्याचप्रमाणें कनखल तीर्थ, काल कमलनें राजाजींच्या घाटावरून लकडी पूल पाहून त्या पुलावरून नदी ओलांडण्याची इच्छा केली होती, तो

लकडी पूल, गांवांतील सर्व महत्त्वाचीं देवळें वगैरे सर्व देखावा फार चांगला दिसत होता. पश्चिमेच्या बाजूला डोंगर आहे आणि तोच डोंगर आम्ही चढून गेलों होतों, त्यामुळें आणखी पश्चिमेला काय आहे, तें दिसेल अशी आशा होती. त्या बाबतींत मात्र थोडीशी निराशा झाली; कारण मध्येंच एक एक दोन तीन फर्लांगांवर लहानशी टेकडी होती. त्यावर जाण्याची इच्छा होती, पण म्हटलं साडे दहा वाजायच्या आंत परत जायचें आहे, तेव्हां उगीच उशीर झाला तर तीं० बाबा रागवायचे! मला भीति वाटत होती कीं, कदाचित् चढण्यापेक्षां उतरण्यास अधिक वेळ लागेल म्हणून, पण उतरावयास कमी वेळ लागला. त्यामुळें आम्हीं १०। वाजतांच परत आलों. वरून एक लांबलचक रस्ता दिसत होता, त्यावरून जाण्याचा बेत होता, परंतु तेथें खालीं जाऊन पुन्हां चढ दिसत होता, तेव्हां तो बेत रहित केला. पण परत फिरतां फिरतां मात्र एक फोटो घेतला! या सकाळच्या ट्रिपची एकंदरींत मोठीच मजा वाटली.

आज तीं० बाबा आल्याकारणानें १०॥ वाजतांच जेवायला बसलों. मग ते गप्पा मारीत बसले होते, तेथें बसलों. नंतर कुली ठरवत होते, तेथें हिन्दी ऐकत बसलों व शेवटीं पत्ते!

अखेरीस कॉलेऱ्याचें इनॉक्युलेशन् करून डॉक्टरनीं आपलें म्हणणें खरें केलेंच! त्यामुळें आतां हात मात्र चांगलाच दुखतो आहे.

इनॉक्युलेशननंतर आमचा बाजारबिजार झाला व मग सातचे सुमारास गंगेच्या कांठीं येऊन माशांची गंमत पहात बसलों. काय तऱ्हतऱ्हेचे मासे आहेत! पिवळ्या तांबड्या ठिपक्याठिपक्याचे, फार काय पण हिरव्या रंगाचेही मासे आहेत. कमल त्यांना वर उचलून घेण्याचा प्रयत्न करीत होती, तर ते गुळगुळीत बेटे सुट्किनी हातांतून निसटून पाण्यांत पडत होते. पण एकंदरींत गम्मत आहे बरं का! नंतर आम्ही तीं० सौ० आईनादेखील ते मासे दाखवावयास घेऊन गेलों होतों.

ता. ५-५-१९४१

काल सामान वगैरे बांधून झोपायला १० वाजले. पण पुनश्च आज चार

वाजतां उठावें लागलें. आतां इतक्या दिवसांतून शिल्लक राहिलेली झोप भरून केव्हां काढतां येईल, हें पाहिलें पाहिजे. बाकी सर्व वर्षभर जरुरीपेक्षां अधिक झोप काढली आहे म्हणा ! तेव्हां आतां थोडींबहुत जाग्रणें झालीं तरी बिलकूल हरकत नाहीं. पण याचा आफ्टर इफेक्ट म्हणून अभ्यास सुरू झाल्यावर मात्र झोपा येतां कामा नयेत. पाहूं काय होतें तें !

सकाळीं नमस्काराचे वेळीं हात बराच दुखत होता, तरी नमस्कार वगैरे गडबडीनें संपवून लागलींच होल्ड ऑल् वगैरे बांधून टाकून मी पावणेसात वाजतां तयार झालों. ( साडे सहा वाजतां माझे नमस्कार झाले व मग अवघ्या पंधरा मिनिटांत मी तयार झालों. मग आहे कीं नाहीं आश्चर्याची गोष्ट ! ) आणि बरोबर सात वाजतां तेहरीच्या राजानें पाठविलेल्या मोटारींतून आम्ही हरिद्वार सोडलें.

आम्ही काल चांगली डोक्याइतक्या उंचीची काठी घेतली होती. ती हातात घेऊन मी निघालों होतों. पण ती० बाबांच्या मोटारींत म्हणजेच टूरिंग-मध्येंच बसायचें आहे म्हटल्यावर मी ती कर्वीना संभाळून आणण्यास सांगितलें.

## ऋषिकेश

आम्हीं साडेसातच्या सुमारास ऋषीकेशला पोचलों. तेथें जातांना नेहमीं-प्रमाणेंच तीनदां रेल्वे रूळ क्रॉस करावा लागला. या खेपेला बाबा काळी कंबळीवाले यांस भेटावयास गेले, पण ते डेहराडूनला गेले होते.

आम्हीं भारत-मंदिर, कालिका-मंदिर, वगैरे मंदिरें पाहून पुनश्च ती० बाबा काळी कंबळीवाल्यांच्या मठांत जाऊन बसले होते, तेथें जाऊन बसलों. सुमारें साडे आठच्या सुमारास ती० बाबा म्हणाले, "जा, आपल्या लॉऱ्या आल्या आहेत कीं नाहींत व कुलींचें रजिस्ट्रेशन झालें कीं नाहीं, तें पाहून या." मी व आबा तेथें उगीच बसून राहिलों होतों आणि अगदीं कंटाळून गेलों होतों. ती० बाबांनीं आबाला सांगितलें होतें. पण पडल्या फळाची आज्ञा म्हणून मीही आबाबरोबर बाहेर पडलों आणि मग गंगानदीच्या वाळवंटांतून थोडेंसें हिंडून आलों.

आम्हांला जातांना फक्त एकच लॉरी आलेली दिसली. त्यांत वसंत चितारी वगैरे मंडळी होती. पण दुसरी तेहरीच्या महाराजांनीं पाठविलेली टूरिंग आमच्या पाठोपाठ निघूं दे म्हणून ती० सौ० आईनीं सांगितलें असतांदेखील तिचा मात्र पत्ता लागला नाहीं. मी वसंताला विचारलें कीं, 'अजून टूरिंग कशी काय आली नाहीं?' तर त्याने उत्तर दिलें कीं, 'आम्हांला पुढें मोटार आली आहे कीं नाहीं, याचा पत्ताच नाहीं.'

ती० बाबा साडे नऊ वाजतां कंबळीवाल्यांचा अन्नदान-विधि पाहून मग निघणार होते आणि त्या मानानें साडे नऊ वाजतां आम्ही परत आमचें सामान वगैरे काढून ठेवलें होतें, तेथें आलों. ऋषीकेशपर्यंत ब्रिटिश हद्द आहे व पुढें तेहरीच्या महाराजांची हद्द आहे. ब्रिटिश हद्दींतील मोटार तेहरीच्या हद्दींत चालूं देत नाहींत ॲन्ड व्हाइस व्हर्सा. तेव्हा ऋषीकेशला मोटार बदलावीच लागते. आमच्या सर्व मोटारींतून लगेज् काढून बाहेर ठेवलें होतें व गोलिवडेकर मास्तर वगैरे कुली रजिस्टर करावयाला गेले होते. इतक्यांत तिकडून ती० बाबांची मोटार आली. थोडा जर कां उशीर झाला असता तर मग मात्र ते रागावले असते. माझी कल्पना होती कीं, साडे नऊ वाजल्यानंतर कंबळीवाल्यांचें अन्नदान पाहून ( तेथें म्हणे पंधराशें माणूस दररोज जेवतें ! ) मग निघतील. तर उलट ती. बाबा साडे नऊ वाजतां मोटारींतून कुली ठरवीत होते, तेथें वळणावर यायला व आम्ही हिंडून परत यायला एकच गांठ पडली. लागलींच आम्हीं मोटारींत बसलों. ऋषीकेशला मी एकंदर तीन फोटो घेतले. ऋषीकेशहून घाटाला ( चढ ) सुरवात झाली. तेथून थेट नरेन्द्रनगरला गेलों.

## नरेंद्रनगर

हल्लींच्या राजानें म्हणे हें नगर वसविलें आहे व तेहरी ही पूर्वीची राजधानी सोडून या नवीन वसविलेल्या नगरांत ( नगर कसलें म्हणा, एक लहानसें खेडें आहे. ) हल्लीं राजेसाहेब राहतात. येथें सुद्धां फारसें पाणी नाहीं. पण वरून झऱ्यांतून पाणी घेऊन त्याचे नळ नरेंद्रनगरांत फिरविले आहेत. अर्थात् सर्व नगर डोंगर-कपारीकपारीनें वसविलें आहे. नरेन्द्रनगराची उंची ३,३०० फूट

आहे. आम्हीं नरेंद्रनगरावर थोडेंसें पाणी प्यालों. तेहरीचे महाराज सुमारें तासभर ती० बाबांच्याशीं बोलत बसले होते. तेथून पुढें घाटानें चढत चढत आम्ही हिमालयाच्या अगदीं एका टोंकावर आलों आणि टोंकावर आम्ही जात आहोंत, हें आम्हांला अगदीं स्पष्ट दिसत होतें. दुसरी मोटार नरेन्द्रनगरांत आल्यावर मी बंकटकडून बॅरोमिटर मागून घेतलें होतें. त्यामुळें आपण किती उंच आलों, हें आम्हाला कळत होतें.

नरेन्द्रनगर येथील वहिवाटदारानें सांगितलें होतें कीं, ' यापुढें चढता घाट आहे, नंतर घाट उतरायचा आहे. पुढें थोडी सपाटी आहे. पुन्हां चढण आहे व शेवटीं थेट तेहरीपर्यन्त घाट उतरायचा आहे.'

आम्ही पहिल्या घाटाच्या डोक्यावर बॅरोमिटर पाहिलें. त्याची उंची ४७०० फूट होती. तेथून जे घाटाघाटानें उतरलों ते २७५० फुटांपर्यन्त.

वहावा रे वाहवा ! काय एकएक हिमालयाचे उत्तुंग डोंगर दिसत होते. एकदम सरळच्या सरळ चार चार हजार, पांच पांच हजार फूट उंचीचे डोंगर दिसत होते. नाहींतर आमच्याकडचे डोंगर. चारशें पांचशें फूट म्हणजे फार झाले. पण येथें डोंगरच मुळीं चार पांच हजार फुटांच्या खालीं नाहीं आणि त्या डोंगरावर कोठे उतरणीवर शेती केली आहे, तर कोठें नुसता खडक आहे– कांहीं पिवळा, कांहीं खपरीखपरीचा. मला तर वाटतें कीं तो पिवळा दगड म्हणजे सल्फर असावा. एके ठिकाणीं तर शेंदरापेक्षां तांबडालाल दगड दिसला, तर एका ठिकाणीं उंचच्या उंच अगदीं सरळ एक तांबूस काळा फत्तर दिसला. मोटारींतून त्या फत्तराचा शेवटही दिसत नव्हता.


येथे मोठीं-मोठीं रानें आहेत. त्यांत निरनिराळ्या तऱ्हेचीं झाडें आहेत. त्यांत एक तर एखाद्या काठीवर साहेबाची हॅट ठेवावी, असें दिसणारें झाड आहे. त्या झाडाचें नांव म्हणे चीडाचें झाड. एकंदर सीनरी फार उत्तम आहे.

पण रस्ता किती भयंकर ! एकच मोटार जेमतेम जाऊं शकेल इतका अरुंद रस्ता आणि त्यावरून आपल्याकडील एखादा ड्रायव्हर जायला लागला तर घेरी येऊन मोटार कड्यावरून खालीं नेईल, इतक्या खोल खोल दऱ्या! दुसरीकडच्या



चित्र सं. ५

जमुनाचट्टीकडे जातांना दिसणाऱ्या एका झाडाचें दृश्य ( पृ. सं. ३७ )




चित्र सं. ६

जम्नोत्रीचा दुरून देखावा ( पृ. सं. ४८ )



चित्र सं. ७

हनुमान चट्टीकडे जातांना दिसणारा बर्फाचा पहाड ( पृ. सं. ४० )



चित्र सं. ८

जम्नोत्रीच्या बाजूचा पहाड ( पृ. सं. ४८ )

बाजूनें जर मोटार आली, तर ती मोटार जाणें केवळ अशक्य. नव्हे एका मोटारीनें कड्यावरून उडी घेतल्याशिवाय गत्यंतरच नाहीं, इतका अरुंद रस्ता. त्यांत तें भव्य सृष्टिसौन्दर्य !

नरेन्द्रनगराहून निघतांना तेथील महाराजांनीं तेहरीहून चार मोटारी सुटल्या आहेत म्हणून सांगितलें होतें. पण बाबांनीं सर्व रिस्पॉन्सिबिलिटी आपल्यावर घेतल्याकारणानें आम्ही तेथून साडे अकरा वाजतां निघूं शकलों आणि खरोखरीच आम्हांला तीन चार लॉऱ्या भेटल्या. पहिल्या लॉरीच्या वेळीं तर आम्ही रस्त्याच्या इतक्या कडेला गेलों कीं, कडा चाकांपासून फक्त चार सहा इंच लांब राहिला असेल. आणि काय भयंकर नागमोडी वळणें तरी ! कित्येक ठिकाणीं Z च्या नुसत्या आकाराचींच वळणें नव्हतीं तर तीं भयंकर शार्प होतीं. शिवाय डोंगर इतका ठिसूळ आहे कीं, अधिक रुंद रस्ताच करतां येत नाहीं म्हणे ! आणि दर वर्षी तेथें १००–१५० इंच पाऊस पडत असल्याकारणानें दरवर्षी दुरुस्ती करावी लागते. इतक्या भयंकर, इतक्या डेन्जरस्, इतक्या अरुंद व इतक्या लांब घाटाची मी कधीं स्वप्नांतदेखील कल्पना केली नसती. ऋषीकेशपासून जी घाटाला सुरवात झाली, ती थेट तेहरीपर्यन्त. सगळा असला घाट सुमारें ५०–५५ मैल तरी नुसता घाट आहे.

आम्ही ४७०० फूट उंचीचें ठिकाण गांठल्यावर मला वाटायला लागलें कीं, आज आलों हेच आपलें अत्युच्च ठिकाण. परंतु २७५० फुटांवर थोडीशी सपाटी झाल्यानंतर आम्ही जे चढायला लागलों, ते आमच्या न कळत उंच उंच चढायला लागलों. पहिल्या घाटाच्या वेळीं आपण वर किती चढलों व आणखी किती वर चढायचें, हें स्पष्ट दिसत होतें. ह्या दुसऱ्या खेपेस वर चढायचा डोंगर किती आहे, याची कल्पनाच नसल्याकारणानें, मला वारंवार बॅरोमिटर बघावें लागत होतें. मी मार्क केलेलीं रीडिंग्ज् खालीलप्रमाणें आहेत– ३२००, ३९९०, ४३००, ४५००, ४९०० व शेवटचें टोंक ५२०० फूट उंच होतें. म्हणजे मी आजन्मांत प्रथम ५२०० फूट वरतीं गेलों. आतां बारावर दीड वाजण्याचा सुमार झाला होता तरी ( उत्तर हिंदुस्थानांत, महाराष्ट्रापेक्षां सरासरीनेंच १०–१५ डिग्री

उष्णतामान अधिक असल्याकारणानें ) ५२०० फुटांवरदेखील आम्हांला गारवा भासला नाहीं.

## तेहरी

आम्ही तेथून जे थेट उतरलों, ते थेट तेहरीपर्यन्त. तेहरीची उंची फक्त २२०० फूट आहे व आम्ही ज्या बद्रिनाथाच्या देवळांत उतरलों आहोंत, तेथें उकडतें आहेही पुष्कळ.

दीड वाजतां नरेन्द्रनगराहून निघालों ते आम्ही पावणे तीन वाजतां येथें येऊन पोहोंचलों व शिवाय येथपर्यन्त म्हणजे सुमारें १-१॥ मैल आम्हांला चालत यावे लागलें.

येथें आल्यावर झाडण्यापासून सुरवात होती ! नंतर वहिनींनीं बाजार केला व स्वयंपाकाला सुरवात झाली ! आमच्या मोटारीमागून सुमारें एक तासानें दुसरी टूरिंग आली व त्यांतसुद्धां स्वयंपाकाचें सामान अगर आचारी वगैरे कोणी नव्हतें. तेव्हां ती. सौ. आईनीं व वहिनींनीं आमच्या चाळीस पंचेचाळीस जणांचा बाजार व स्वयंपाक केला !

सकाळीं ती. सौ. आईनीं जो तांदळाच्या पिठाचा लाडू दिला होता, तेवढा खाऊन जो निजलों होतों, तो आठ वाजेपर्यन्त कांहींएक खायला मिळालें नव्हतें. येतांना वाटेंत गार पाण्याचे पुष्कळसे झरे असल्याकारणानें प्यायला पाणी मात्र मिळालें ! पण येथें तीन वाजता आल्यापासून मात्र, जवळ गंगेचें पाणी असूनदेखील, तें प्यायला मिळाले नाहीं.

येथून सुमारें १४० पायऱ्या उतरल्यानंतर गंगानदी लागते. चढतांना मात्र खात्री होते हं ! पण तिचें गढूळ पाणी प्यायची सोय नाहीं. कारण एखाद्याला त्यापासून ढाळ होण्याचा संभव असतो. बरें, पाणी शुद्ध करण्याचे यंत्र डॉक्टरांच्या जवळ, ते मुळीं आलेच साडे सात वाजतां व शिवाय हमालांकरवीं येथपर्यंत सामान आणावयाचें होतें, त्यांत त्यांचें सामान आलें नव्हतें. तेव्हां जेवायच्या वेळीं, म्हणजे आठ वाजतां आम्हाला भरपूर पाणी प्यायला मिळालें.

येथें आल्यावर कांहीं थोडे बदाम, मनुका व कलिंगडें खाल्लीं म्हणा, पण त्यानें भूक थोडीच राहते ? तेव्हां 'आलिया भोगासि असावें सादर !' प्रवासांत अशा कांहींतरी भानगडी व्हायच्याच ! एकंदरींत भूक व तहान भरपूर लागल्याकारणानें, जेवण व पाणी अगदीं सपाटून गेलें.

दुपारीं येथें आल्यावर, पाण्यांतील वाळू खालीं बसते काय, अगर जाड फडक्यांतून गाळलीं असतां गाळली जाते काय, वगैरे थोडेथोडे प्रयोग झाले, पण ती. सौ. आईचें म्हणणें एक कीं, 'पाणी प्यायला माझी हरकत नाही. पण ढाळ व्हायला लागले तर त्याची जबाबदारी मात्र माझ्यावर नाहीं.' अर्थात् आम्हांला जेवणाची वेळ होईतों थांबणें भागच होतें.

संध्याकाळीं मी व आबा नदीवर संध्या करायला गेलों. अहाहा ! काय सुंदर पाणीं येथें वहात आहे ! एकामागून एक गंगेच्या पाण्याच्या लाटा येत होत्या व मध्यंतरींच थोडा खोलगटपणा होता. पुन्हां पुढें चढ असल्याकारणानें, मी असें म्हणूं शकेन कीं, "दि वॉटर स्विंग्ज् इट्सेल्फ् फ्रॉम् वन् पॉइंट टु अनदर." आणि अशा तऱ्हेचा झोका बसत असतांना तें पाणी तेथील खडकांच्या रचनेमुळें मुरड घालतें ! कांहीं पाणी पुढील खडकांस आपटून रिफ्लेक्ट होऊन त्या ओघळांत जाऊन जों मिसळतें, तोंच त्या पाण्याच्या जोरामुळें त्याचे अनेक तुषार हवेंत उडतात. तें दृश्य पाहून मनाला अत्यंत आल्हाद वाटला आणि वाटलें संध्याकाळ दररोजचीच आहे; पण असा सुंदर देखावा मात्र पुन्हां पाहण्यास मिळणार नाहीं ! काय तेथील दगडांची रचना असेल कोणास ठाऊक, पण प्रत्यक्ष दृश्य मात्र कमालीचें अद्भुतरम्य दिसतें.

त्या वेळेस वाटलें की, एखादा प्राणी जर या भयंकर जोराचे प्रवाहात सांपडला तर त्याचे शतशः तुकडे होऊन तेही या पाण्याच्या तुषारांसारखे हवेंत उडतील ! इतकी तेथील दगडांची रचना चमत्कारिक आहे व इतकी त्या पाण्याला भयंकर ओढ आहे. त्या स्विंगिंग पाण्याकडे जर सारखें पाहिलें आणि एकदम पुढें असलेल्या वाळूच्या बेटाकडे पाहिलें तर ते वाळूचें बेटच मागें मागें सरकतें आहे, असें वाटतें. डोळे त्या दृश्यात इतके रंगून जातात. त्या

दृश्याची गम्मत अशी आहे कीं, त्याचा स्विंग कायमच राहतो; पण त्या पाण्यांतील मुरड आणि आसपास असलेल्या दगडांमुळें त्याचे उडणारे तुषार यांत मात्र क्षणाक्षणाला बदल होत असल्याकारणानें त्या ठिकाणीं तें दृश्य तासन्तास बघत बसावेंसें वाटतें. एकंदरींत हिमालय हा प्रत्येक बाबतींत राज-राजेश्वर आहे, ह्यांत कांहींच शंका नाहीं.

संध्याकाळीं जेवण झाल्यानंतर सामानाची गडबड सुरू झाली; कारण साडे सात वाजतां मोटारी आल्यानंतर मैल दीड मैल कुलींकडून सामान आणलें होतें. आमचें सामान भरपूर व कुली मात्र चार पांचच. त्यामुळें त्याच त्याच कुलीला बाऱ्या कराव्या लागत असत. त्यामुळें कित्येकांचें सामान अद्याप लॉरीज्मध्येंच होतें आणि त्यांतच जेवण झाल्याबरोबर भीति दाखविण्यापुरता पाऊस आला. कंदील फार थोडे होते व सगळयांच्याच वळकट्या, बॅगा व स्वयंपाकाचें सामान यावयाचें होतें, यामुळें एकच गोंधळ झाला होता. माझें सामान, होल्डॉल व दोन बॅगा मी गाढ झोपेपर्यन्त आल्या नव्हत्या. मी माझी सर्वांत लहान बॅग माझे-बरोबरच घेतली होती आणि मोठ्या बॅगेंत तर माझा टॉर्च राहिला होता. त्यामुळे माझी फारच चमत्कारिक स्थिति झाली होती. अखेरीस तेथें असलेल्या एका मोठ्या गादीवर मी पांघरूण न घेतां झोपलों! आणि महत्त्वाची गोष्ट ही कीं, मी उघडा झोपूनदेखील येथें डांस, ढेकूण, पिसू अगर कोणताही कृमि कीटक चावला नाहीं.

ता. ६-५-१९४१

त्यामुळें साडेचार वाजेपर्यन्त झोप अगदीं उत्तम झाली आणि विशेष महत्त्वाची गोष्ट ही कीं, आज मी स्वतः सगळीं धुणीं धुतलीं, त्यामुळें नमस्कार आटोपेपर्यन्त साडे नऊ वाजले. पण कांहींच उद्योग नसल्यामुळें त्यांत कांहींच विशेष वाटलें नाहीं.

आजही मी तें पाण्याचें दृश्य पहात कितीतरी वेळ बसलों होतों. तेथें मी तीन फोटोदेखील घेतले. त्या वेळीं वाटलें, मला जर ड्रॉईंग आलें असतें तर काय बहार झाली असती! आयतें ४–५ तास त्या दृश्याकडे पहात बसतां आलें

असतें. पण आतां तसें बसतां येत नाहीं; कारण मग दुसरें अधिक कांहीं बघण्यासारखें असलें तर तें पाहून घ्यावें असें वाटतें. हो, नाहींतर फुकट चान्स जायचा!

८॥ वाजल्यापासून कमल म्हणत होती,'बाहेर फिरायला चला' म्हणून; पण मी तिला सांगितलें कीं,' नमस्कार घालून येतों' आणि शेवटीं ९॥ वाजतां आम्हीं बाहेर पडलों. तेथून पश्चिमेच्या बाजूला सुमारें दीड हजार फूट उंच एक डोंगर दिसतो, त्या डोंगरावर चढण्याच्या उद्देशानें मी निघालों. कमल म्हणत होती कीं,' झुलत्या पुलावरून दिसणाऱ्या पलीकडच्या लकडी पुलावर जाऊं.' पण तो पूल एकंदरींत जुनाट दिसला. शिवाय तिकडे जायला मला तर रस्ता दिसत नव्हता. अखेरीस मी डोंगर चढायला सुरवात केली, पण कमल व आबा खालीच राहिले. अर्थात् बऱ्याच उंचावर गेल्यावर मी खालीं पाहिलें तर ते मला पुलाजवळच दिसले, म्हणून हें माझ्या लक्षांत आलें. मी सुमारें ५००–६०० फूट चढलों.

तेथून गंगा नदीचें नागमोडी वळण, त्याला दुसरी नदी येऊन मिळते तिचें उगमस्थान, अर्थात् त्याजवळचा पर्वत, त्या नदीचीं नागमोडी वळणें, तेहरी आणि आजूबाजूचे बरेचसे डोंगर उत्तम दिसत होते. तेथून मी एक फोटोदेखील घेतला. मी जितकें चढलों त्याच्या दुप्पट तरी निदान वर डोंगर होता आणि नेहमींप्रमाणें उशिरां निघाल्यामुळें मी मधूनच परतलों. आम्हीं १०॥। वाजतां परत आलों. एकंदरींत गंमत झाली.

आज मंगळवार असल्याकारणानें जेवण वगैरे कांहीं नव्हतेच. कमल, आबा यांना थोडासा उशीर झाला. सकाळीं बाबा म्हणाले होते कीं,'सहा वाजतां जेवणें आहेत म्हणून कैऱ्या आणा.'त्याकरितां आम्हीं चार वाजतां बाहेर पडलों, तों तेथें जो बदाबदा पाऊस पडायला लागला, तो कांहीं विचारूं नका. सगळ्या रस्त्यावरून नडगीइतकें पाणी वहायला लागलें, अर्थात् आम्हीं तिघांनीं एका दुकानाचा आश्रय घेतला. पाऊस बराचसा कमी झाल्यावर एका दुकानाच्या कट्टयावरून दुसऱ्या दुकानच्या कट्टयावर, अशा रीतीनें बरेंचसें अंतर तोडलें, पण रस्ता

ओलांडायचा कसा ? तेवढ्यासाठीं पुन्हां थांबावें लागलें.

एका दुकानांत जरूर तितक्या आंवट गोळ्या मिळत नव्हत्या, तर दुसऱ्या दुकानांत पौंडभर गोळ्या एकदम विकण्याची परवानगी नव्हती. आणि राजधानीचें गांव बरं! पण राजे थोडेच इथें येत असतील.

शेवटीं आम्ही ५॥। वाजतां घरीं पोचलों, तर बाबा जेवायला देखील बसले होते.

जेवल्याबरोबर कळले कीं, कुली अजून यायचे आहेत. त्यामुळें कोणत्य कुलीजवळ काय द्यायचें आहे व कोणाकोणाचें यायचें आहे, हा एक प्रश्नच होता. बरें, ती० बाबा तर पहाटे पांच वाजतां निघणारच. दंडी कंडीवालेदेखील आले नव्हते. म्हणून कांहीं लोकांनीं व ऑफिसर्सनीं पुढें ती० बाबांच्याबरोबर जावें व कांहीं जणांनीं मागें राहून कुलींबरोबर सामानासह यावें असें ठरलें

## बुलढाणाचट्टी.

ता. ७-५-१९४१

उठल्याबरोबर कळलें कीं, कंडीदंडीवाले आले आहेत. लागलीच कंडी दंडींत बसणाऱ्या लोकांची गडबड सुरू झाली.

ती० बाबा बरोबर पांच वाजतां बाहेर पडले. त्या वेळीं अगदीं लक्ख उजाडलें होतें. मी आंघोळीखेरीज सर्व आटोपून एका बाजूला कॅमेरा, दुसऱ्या बाजूस बॅरोमिटर व मोकळी वॉटर बॅग! हो! ( डॉक्टरांनीं शुद्ध केलेलें पाणी आम्हास मिळालें नाहीं ना! मग करितां कसं! आपली रिकामीच वॉटर बॅग घेतली झालं! ) खिशांत आठ फिल्म्स्, इतकें सामान घेऊन निघालों व बाहेर पडल्याबरोबर आबा अगदींच मोकळा होता म्हणून वॉटर बॅग त्याच्याजवळ दिली. अर्थात् मी माझी उंच काठी बरोबर घेतलीच होती.

बरोबर पांच वाजतां आमचा पायीं प्रवास सुरू झाला. प्रवासांत नाना-

तऱ्हेचे उंच उंच डोंगर दृष्टीस पडले आणि जातां जातां जी कांहीं सीनसीनरी दृष्टोत्पत्तीस आली, ती अवर्णनीय आहे. एका पाठोपाठ एक अशा दोन तरी रांगा सहज दिसत होत्या व पहिल्या रांगेच्या खालीं सदा सर्व काळ गंगानदी वाहतांना दिसत होती.

मी खालीलप्रमाणे उंची घेतली–२२००, २७००; निम्मा रस्ता २५००, २७५०, २८५०, २९००, ३०००, ३१००, ३३००; बुलढाणाचट्टी २९००. त्यांत ३१०० पासून २७५० पर्यन्त असलेला उतारही अगदीं खडा आहे व २७५० पासून ३३०० पर्यंत असलेला चढही फार आहे. आणि मला तर तो चढ फार आवडला. माझी फार फार इच्छा होती कीं जातां जातां बर्फाचे डोंगर दिसावेत म्हणून आणि त्या दृष्टीने मी सगळीकडे पहात होतों. पाहतां पाहतां नानातऱ्हेचीं झाडें असलेल्या १०००, १५०० फुटापर्यन्तच्या टेकड्या व त्यांच्या पाठीमागें नानातऱ्हेचीं चित्रविचित्र आकारांचीं शिखरें असलेले डोंगर पुष्कळ दृष्टीस पडले; पण बर्फाचा डोंगर एकही दृष्टीस पडला नाहीं ! सर्व रस्ताभर गंगानदी सारखी उजव्या हाताला दिसत होती.

आम्ही ३३०० फुटांच्या टोंकापर्यन्त आल्यानंतर जवळच्या माणसानें एक चट्टी दाखविली व आम्हालाही ती फार जवळ वाटली. परंतु वांकडेतिकडे रस्ते, यामुळें ती हळूहळू लांबतच चालली ! शेवटचें वळण तर इतकें फसविणारें आहे कीं, १०० पावलांवर दिसणारी चट्टी त्यामुळें एकदम २–३ फर्लांगांवर जाते ! या हिमालयाच्या कड्यांची व रस्त्यांची गम्मत आहे झालें !

त्या चट्टीला मुळीं पाणीच नाहीं. खालीं गंगानदी, २००–३०० फूट खोलीवर वाहते आणि तिकडे जायचा रस्ता तर असा भीतिदायक, अरुंद व घाटासारखा आहे कीं, आम्ही आंघोळीला जातांना अगदीं सावकाश व काळजीपूर्वक जात होतों. पण कांहीं म्हणा, चढायच्या वेळीं मात्र कांहीं वाटलें नाहीं ! सरळच आहे, उतरायच्या वेळीं दृष्टि ठरत नाहीं, इतकी खोली दिसते, तर चढायच्या वेळीं नुसता पुढचा चढच दिसतो. त्यामुळें उतरायच्या वेळी डोळे फिरतात तर चढायचे वेळीं कांहींदेखील वाटत नाहीं.

चट्टीवर गेल्यावर पाणी आणायचें एक महत्त्वाचें काम आमच्याकडे आलें. तेथून सुमारें अर्ध्या मैलावर, बारीक पाणी पडलेलें आम्हाला दिसलें होतें. तें येतांना आम्ही पिऊनही घेतलें होतें व तांबेही भरून आणले होते. परंतु ते फार वेळ टिकले नाहींत; कारण एवढें १२–१३ मैल चालून आल्या यावर पाण्याची फारच जरुरी भासत होती ! तेथून दोन फर्लांगांवरही एक झरा होता, पण तें पाणी नाहीं आवडलें आपल्याला ! आणि तें इतकें गारही नव्हतें. पण इतरे जनांना पाणी आणायला सांगितल्यावर त्यांनीं मात्र जवळच्या झऱ्यांतूनच पाणी आणलें ! शेवटीं आम्ही चार जण जाऊन १२–१३ भांडीं भरून आणलीं. हा सगळा प्रोग्रॅम झाला तासाभरचा, पण पाणी कसें मधुर व गार होतें !

आजही सोमवारसारखा खणखणीत उपास घडला. आज म्हणे एकादशी घडली. एवढेंच कीं, ती. सौ. आईंनीं बरोबर लाडू, बदाम, पिस्ते आणले असल्या-कारणानें प्रत्येक जण आल्याबरोबर प्रत्येकाला कांहींतरी खाऊन पाणी प्यायला मिळालें. आणि 'चलाहो, चलाहो' म्हणतां म्हणतां आंघोळीला जायला ३-३॥ वाजले. ते ५ च्या सुमारास परत आलो. आल्याबरोबर खूप झुणका, भात, चपाती खायला मिळाली आणि अगदीं समाधान झालें.

पण सात वाजेपर्यन्तदेखील कुलींचा पत्ता नव्हता. तेव्हां आम्हीं झोपायच्या-ऐवजीं नुसतेंच तरंगत होतों. तरी ती० बाबांचा पलंग व आंथरूण, चार कुली आमच्याबरोबरच निघाले असल्यामुळें, आमच्याबरोबरच होतें आणि त्यामुळें रागवारागवी विशेष झाली नाहीं. मी ८-९ वाजेपर्यन्त प्रो. विनोदांच्या बरोबर गप्पा मारीत रस्त्यावर बसलों. काय भयंकर चावत होतें त्या चट्टींत ! मी जेवण झाल्यावर थोडेंसें झोपण्याचा प्रयत्न केला, पण डोळा लागेपर्यन्त अवकाश, मला जें चुट्टचुट्ट चावायला लागलें, त्यमुळें बाहेर जाणेंच अधिक श्रेयस्कर वाटलें !

माझा होल्डॉल आला १॥ वाजल्यानंतर आणि बॅगचें एक लगेज् केलें होतें, त्याचा पत्ताच नव्हता. इतक्यांत असें कळलें कीं, कांहीं कुलींनीं १॥-२ मणांपेक्षां अधिक वजन घेतल्याकारणानें ते कंटाळून पांच मैलांवर असलेल्या चट्टींतच बसले आहेत व ते उद्यां सकाळीं ९ वाजल्याशिवाय येणेंही शक्य नाहीं. मग

पुन्हां वजन करून अधिक कुली करायचे असें ठरवून व ती० बाबा व कांहीं मंडळी पुढें जावीत व बाकीच्यांनीं जेवण करून चलावें असें ठरून निजानीज झाली. अर्थात् त्याच ठिकाणीं उद्यां आपले कुली ठरवून घ्यावेत, असे नक्की ठरलें आहे.

## धरासू

ता. ८-५-१९४१

आज नेहमींप्रमाणें लवकर उठून, फक्त नमस्कार घालून निघण्याची तयारी केली. कारण ती० सौ० आई म्हणाल्या कीं, मी बाबांच्या पाठोपाठ रहावें.

त्याप्रमाणें कोपऱ्यांतील एक उंच काठी घेऊन, कमलची बॅग व माझी बॅग आमच्या होल्डॉलवर ठेऊन दोघेही बाहेर पडलों, ते थेट ती० सौ० आईना गाठलें व थोडें पुढें गेलों आणि मग माझ्या लक्षांत मी दुसऱ्याची काठी आणली आहे, हें आलें. मग ती० सौ० आईना विचारून सगळा जामानिमा उतरला व पळत सुमारें अर्धा पाऊण मैल चट्टींत गेलों व मी व वसंत चितारी एकदम तेथून आलों.

आजचा रस्ता अगदीं सपाट होता ! चढउतार मुळीं फारसे नव्हतेच. एवढेंच कीं अंतर मात्र बरेंच होतें, सुमारें १५ मैल. कारण कालच आम्हाला कळलें होतें कीं, मध्यंतरींची चट्टी जळून गेली आहे म्हणून. आजच्या रस्त्याची कल्पना मी घेतलेल्या बॅरोमेट्रिक रीडिंग्जवरून सहज येईल. २८००, २४५०, २७००, सुमारें ४-५ फर्लांग सपाटी २६००, तेथील विश्रांतिस्थान अर्थात् २६००, २५००, २६५०, २८००, धरासू २७५०.

ही गम्मत बघितलीत का ? काल दुपारीं बुलडाण्याची उंची होती २९०० आणि आज सकाळीं ती झाली २८०० ! आणि सरळच आहे. बॅरोमिटर हें हवेचें प्रेशर मोजण्याचें यंत्र आहे. दुपारीं उन्हामुळें हवा, सकाळपेक्षां विरळ असणारच ! आणि 'हायर युई गो, लोअर इज् दि प्रेशर' म्हणून ज्यावेळीं हवा विरळ असेल, त्यावेळीं प्रेशर कमी असल्याकारणानें उंची अधिक दाखविली

जाणारच !

आजच्या रस्त्यानें जातांना, गंगानदी सारखी आमच्या उजव्या बाजूस होती. तिचा खळखळाट नेहमींच ऐकूं येत असे, पण एकही धबधबा दृष्टीस पडला नाही.

धरासूला आल्यानंतर जों पाहिलें तों गंगानदी अगदीं जवळ, केवळ पंचवीस तीस पावलांवर ! आणि खळखळाट तरी किती ! पण एकंदरींत पाण्याला ओढ कमी दिसत होती. पण तेहरी येथील पाण्याची गम्मत आणि सौन्दर्य ह्या ठिकाणी दिसलें नाहीं ! येथे गंगेला असलेले स्वाभाविक वळणच फार सुंदर आहे !

सर्वच कुली ठरवायचे असल्याकारणानें ती० बाबाच्या बरोबर येणारे चार कुलींदेखील आले नव्हते. त्यामुळें आमच्या सामानाप्रमाणेंच ती० बाबांचें सामानही आलें नव्हतें. त्यामुळें जेवण झाल्यावर बाबांना झोपायला कॉट अगर अंथरूण नव्हतेंच. त्यामुळें ते फार रागावले.

माझे सर्वच कपडे बॅगमध्यें असल्याकारणानें तीन दिवस सदराविजार बदलायलाच झालें नाहीं; कारण आज सकाळीं बॅग यायच्या आधींच आम्ही बुलढाण्यावरून निघालों होतों. त्यामुळें माझी विजार तर इतकी मळली होती कीं, ती केव्हां एकदां मी बदलतों, असें मला होऊन गेलें होते आणि जेव्हा चार वाजेपर्यन्तदेखील कुली आले नाहींत, तेव्हां मी आंघोळीला गेल्यावर प्रथम विजार धुऊन वाळत टाकली. मग आंघोळ केली व विजार वाळल्यानंतर परत आलों.

अर्थात् आंघोळीसाठीं, आणि सकाळीं जेव्हां आम्ही पाणी आणायला गेलों होतों, त्या वेळीं आम्ही होईल तितक्या वर नदीवर गेलों होतों. ( नेहमींप्रमाणें नदीच्या कांठीं शौचास बसून घाण करण्याची संवय येथेंही होतीच. ) गंगेला स्वच्छ पाण्याचा एक ओढा जवळच मिळतो. त्या ओढ्याचें काळें पाणी व गंगेचें गढूळ पाणी यांचा संगम फारच गमतीदार दिसतो. पण त्या ओढ्याचें पाणी गंगेच्या पाण्याइतकें गार मुळींच नाहीं. नव्हे, तें गंगेच्या पाण्याइतकें शुद्धही नाहीं. मी प्रथम माझी विजार त्या ओढ्यांतील पाण्यानें धुतली तर

त्यावर निदान ५–१० तरी मेलेले किडे मला दिसले. तेव्हां मी गंगेच्या पाण्यानेंच कपडे धुतले ! काय आश्चर्य पहा, इतके ओढे गंगेच्या पाण्यांत येऊन मिळत असतील, त्यांत नाना तऱ्हेचे कृमिकीटक असतील, पण जगांत पहिल्या नंबरचें शुद्ध पाणी गंगेचेंच आहे, हें शास्त्रीय दृष्ट्या सिद्ध झालें आहे ! आणि इतकें शुद्ध असलेलें पाणी आम्ही आणखी शुद्ध करून पिण्याचा प्रयत्न करीत होतों !!

५–५॥ वाजले तरीदेखील जेव्हां ती० बाबांचें अगर आमचे सामान आले नाहीं, तेव्हां ते फारच रागावले ( त्यांनीं आपल्याबरोबर शौचासाठीं व आंघोळीसाठीं असे दोन तंबू आणले आहेत, पण तेदेखील आले नव्हते; त्यामुळें त्यांची शौचाची फारच गैरसोय झाली आणि म्हणूनच ते फार रागावले ) आणि आमच्या कुलींचा तर पत्ताच नव्हता. तरी हे चार कुली प्रथम पाठविले गेले होते बरं का !

५॥ वाजल्यानंतर उशिरां निघणाऱ्यांपैकीं एकेक जण यायला लागला ! सामानाचा पत्ता नव्हता ! कुलींचा गोंधळ होता, त्यामुळें उद्यां निघण्याऐवजीं परवां दिवशींच येथून निघावें असें वाटूं लागलें व अखेरीस परवाचे दिवशींच जायचें असें पक्कें ठरलें

६॥–७ च्या सुमारास सगळी पार्टी आली, २–३ पंक्ति करण्यांत आल्या व शेवटीं ९–९॥ ज्या सुमारास कुली आले आणि आज सुमारें दोन दिवसांनीं माझ्या बॅग्ज माझ्या दृष्टीस पडल्या ( आणि त्यात माझी डायरी अडकून पडल्यामुळें मी दोन दिवसांनंतर ही डायरी लिहीत आहें. )

**ता. ९–५–१९४१**

आज प्रथम उठल्याबरोबर स्नान उरकून टाकलें आणि जेवायच्या अगोदर नमस्कार घालायचे असें ठरविलें.

काल रात्रीं व परवां रात्रींदेखील, मी व प्रो. विनोद, केदारनाथ बदरीनारायणाला कोणी कोणी कसकसें जावें, याबद्दल बोलत बसत असूं ! आणि त्या यात्रेचें

नक्की करण्याचें आज ठरलें होतें. (पण अखेरीस प्रो. विनोदांचें तेवढें नक्की ठरलें, पण बाकीच्यांचें मात्र जायचें कीं न जायचें, याचा विचार करण्याचें ठरलें ! तो विचार आज चार दिवस चालू आहे !)

आज उशीर झाला होता. खाणें वगैरे होईतोंपर्यन्त साडे आठ वाजले व मग मी व कमल फिरायला बाहेर पडलों. ( नमस्कार फिरून आल्यावर घालायचे असें ठरलें ! ) आधीं एका बाजूला गेलों व एका टेकडीवर एका पाऊल–रस्त्यानें चढण्याचा प्रयत्न केला. तो पाऊल रस्ता इतका कठीण व इतका खडा होता कीं, आम्ही शेवटीं २०–२५ फूट चढून खालींच उतरलों आणि खालींसुद्धां फार जपून यावें लागलें ! तेथून आम्ही परत फिरलों, तोंच कमलला आठवण झाली कीं वसंतानें तिला बरोबर येतों म्हणून सांगितल्याची ! म्हणून ती वसंतास घेऊन आली व आम्ही तसेंच पुढें निघालों (ज्या रस्त्यानें आलों त्या रस्यानें ). तेथून एका खड्या पाऊल रस्त्यानें वर चढलों आणि त्याच वेळीं ठरविलें कीं, परत या पाऊल रस्त्यानें उतरणें नको. कारण त्या पाऊल रस्त्यानें चिडांच्या वाळलेल्या काड्या हजारों पडल्या होत्या आणि त्या इतक्या गुळगुळीत होत्या कीं त्यांवरून मोकळ्या पायानेंदेखील चालणें शक्य नव्हतें. ज्याप्रमाणें पाण्यांतील हिरव्या शेवाळ्यावरून सटासट् पाय निसरतात, त्याप्रमाणें आमचे पाय निसरत होते. तें एक जमिनीवरील, केळाच्या सालीशिवाय असलेलें निसरडेंच म्हणायचें अर्थात् हा शॉर्ट कट् होता.

मोठा रस्ता लागल्यावर, आम्ही पुन्हां मोठ्या रस्त्यानें चढायला लागलों. तेथें बॅरोमिटरची रीडिंग्ज घेतलीं तीं– २६५० ( धरासू ), २८००, ३२०० तेथून आम्ही सरळ रस्त्यानें परत आलों.

३२०० फुटांपर्यन्त मी एकटाच गेलों होतों. तेथें गेल्यानंतर मला वाटायला लागलें कीं, हा तर जम्नोत्रीचा रस्ता. ह्या रस्त्यानें आपण उद्यां येणारच आहोंत, तर मग आणखी वर कशाला चढा ? आणि मी जों जों अधिक विचार करायला लागलों तों तों, तें मला अधिक अधिकच पटायला लागलें आणि शेवटीं मी सुमारें २०० फूट चढण असतांनाच आणि वेळही भरपूर असतांनाच मागें फिरलों ! आणि मग

कळलें कीं, जम्नोत्रीचा रस्ता तो नव्हे. तेव्हां मात्र शेवटपर्यन्त जाऊन आलों असतों तर फार बरें झालें असतें, असें वाटूं लागलें !

परत आल्यावर जेवण, नमस्कार, गप्पा, आणि कोण कोण केदारनाथ व बदरी-नारायणाला येणार ह्याबद्दल वाद झाला आणि नक्की ठरलें कीं, आम्ही आपली पार्टी निराळी काढावी. पंडितराव फार सावकाश येणार आहेत. प्रो० विनोदांनीं यायचें नक्की ठरविलें. वहिनी म्हणाल्या पुढें पाहूं वगैरे.

खरोखरच, ह्या चिडांच्या झाडांची मोठी गम्मत आहे. त्या सुळसुळीत काड्या पाहिल्याबरोबर मी वसंत चितान्याला सांगितलें कीं, ' ह्याच्या जर चटया केल्या तर अत्यंत मऊ आणि उत्तम होतील ! ' त्या काडया सुमारें वीत दीड वीत लांब असून बऱ्याच चिवटही आहेत, तेव्हां माझी ही कल्पना वसंतालादेखील पटली.

मी जेव्हां असें पाहूं लागलों कीं, मी आतां नक्कीच केदारनाथ बदरीनारायणाला जाणार, तेव्हांपासूनच माझा विचार सुरू झाला होता कीं, आपण आपली ट्रिप स्वतंत्र काढावी ! आणि त्याला कारण एकच कीं, पंडितराव माझ्याइतकें अंतर तोडतील, अगर माझ्याबरोबर येऊं शकतील, ही कल्पनाच मला पटेना. कारण पंडितराव सावकाश मिड्ल् ऑफ् जुलईपर्यन्त आले तरी त्यांना फारसें कांहींच वाटण्यासारखें नव्हतें. परंतु मला मात्र हा दीड महिना व पहिलें वर्ष फुकट घालविल्यावर आणखी एखादा महिना फुकट घालावयाचा म्हणजे त्यापेक्षां हा प्रोग्राम रद्द करावा, असें वाटूं लागलें होतें. परंतु ज्या वेळीं बरीच मंडळी उशीर होईल यामुळेंच केदारनाथ व बदरीनारायणाची यात्रा सोडून देतात, हें पाहिल्याबरोबर माझी पार्टी स्वतंत्र असावी, ह्याला अधिक अधिकच मूर्त स्वरूप येत आहे.

# सिलक्यारा.

**ता. १०।५।१९४१**

रात्रीं प्रोफेसर विनोदांच्या बरोबर सुमारें १० वाजेपर्यन्त गप्पा मारीत बसलों. तरी आज पहाटे उठलों आणि नेहमींप्रमाणें आंघोळीखेरीज सर्व आटोपून मी तयार झालों आणि खरोखरीच जेव्हां माझी बॅग एक कुली उचलायला लागला, तेव्हां मी

त्याला ती बॅग उचलूं दिली नाहीं. मी त्याला सरळ विचारलें कीं, ' तुम् ५ धामको आनेवाला कुली हैं क्या ?' आणि त्यानें ' नहीं साब ' म्हणून उत्तर दिल्यावर, मी त्याला ही बॅग पांचही धामांना जाणारी आहे वगैरे वगैरे पुष्कळ हिंदींतून बोललों आणि त्या आधींच मी गोलिवडेकर मास्तरांना सांगून स्वतंत्र कुलीची योजना करायला लावली होती. अखेर बऱ्याच भानगडी करून, माझ्या व कमलच्या बॅग्ज एकत्र बांधून मी बाबाच्याबरोबर बाहेर पडलों.

जातांना खालीलप्रमाणें उंच्या मी घेतल्या- धरासू २६५०, ३०२०; ३३५०; ३४५०; ३२५०; ३४००, ३५००; ३६००; ३८००; ३९५०; ४०१०; ४१२०; ३८४०; ३८००; सिलक्यारा ५०८०. ह्यावरूनच लक्षांत येईल कीं पहिला चढ अगदीं खडा होता, नंतर थोडा उतार मग अगदीं ग्रॅज्युअल असा ४११० पर्यंत चढ होता. पुन्हां थोडा उतार असून नंतर मात्र थेट सिलक्याऱ्यापर्यंत चढच चढ होता. बाकी ५०८० फूट उंचीवर रहायला येण्याची ही माझी पहिलीच वेळ आहे आणि येथें हवासुद्धा पुष्कळच थंड आहे. ( ह्यापूर्वी मोटारींतूनच फक्त ५२०० फुटांपर्यंत चढल्याचें वाचकांच्या लक्षात असेलच . )

आम्हीं धरासूहून जेव्हां बाहेर पडायच्या तयारीस लागलों त्यावेळेस आकाशांत थोडींथोडीं अभ्रें येत होतीं, तरी पाऊस येईल ही कल्पना नसल्यामुळें पुष्कळांनीं आपापले रेनकोट पेटयात ठेवले होते; परंतु आम्ही निघायच्या आधीं एक १० मिनिटें एकाकी पावसाला सुरवात झाली. तेव्हा मी छत्री उघडून बाहेर पडलों.

इतके दिवसानंतर आज हिमालयानें आपलें सौंदर्य प्रगट करण्यास सुरवात केली आहेसें दिसतें. मी सागितलेल्या चिडांच्या झाडांनीं समोरील डोंगर तांबडेलाल झालेले दिसत होते आणि त्यावर तीं हिरवीं झाडें एखाद्या तांबडया गालिच्यावर हिरव्या ठिपक्यांची वेलबुट्टी केली असल्याप्रमाणें दिसत होतीं. आणि मला मोठें आश्चर्य वाटतें कीं प्रो. विनोद, नानासाहेब चाफेकर वगैरे बडया लोकांनादेखील, तो डोंगर तांबडया मातीचा आहे असें वाटावें; आणि त्याना आश्चर्य वाटलें कीं, इकडील डोंगरावर माती पांढरी कां व पलीकडील डोंगरावर माती तांबडी कां ! ! मी जरी एखाद्या गालिच्याची उपमा दिली तरीदेखील निसर्गानें तो तांबडा व तो हिरवा इतका सौम्य

तऱ्हेनें मिसळून टाकला होता कीं एखाद्या कुशल चित्रकारानें जरी तें चित्र काढलें असतें तरी त्या सौंदर्यापुढें मानवी सौंदर्य मारवाडी सौंदर्यासारखें भासलें असतें. काय तो हिमालयाचा ग्रॅज्युअल स्लोप, आणि त्यावर पसरलेल्या तांबुस काड्या. अहाहा ! मला तर वाटलें कीं त्या देखाव्याचे पुष्कळसे फोटो घ्यावेत. पण मग लक्षांत आलें कीं एकाच देखाव्याचे १०० फोटो घतले काय आणि एकच फोटो घेतला काय, त्यांत फोटो पाहणारास काय फरक दिसणार आहे? म्हणून मी एक दोनच फोटो घेतले झालं !

इतके दिवसांनंतर आज गंगानदीनें आम्हाला सोडलें व हिमालयानें आपलीं चित्रविचित्र उंचउंच शिखरें दाखविण्यास सुरवात केली. पण अजुनी बर्फाच्छादित शिखर मात्र एकही नाहीं हं ! आमची कमल तर सारखी माझ्या-पाठीमागें लागली आहे कीं, हरिद्वार सोडून इतके दिवस झाले, परंतु अजून एकदाही बर्फाच्छादित शिखर कसें लागलें नाहीं म्हणून. ( अर्थात् कमलच्या कुरकुरण्याला, पाठिमागें लागणें हा उपसर्ग आहे बरं का ! वाचकांनीं हा शब्द जरूर लक्षांत ठेवावा. )

मला तर बर्फाचा पहाड पाहण्याची इतकी उत्कंठा लागली आहे कीं धरासूला येतांना, तसेंच आजही, मी ढगांच्याऐवजीं बर्फाच्छादित शिखरें तर पहात नाहीं ना, अशी शंका मला एकदां आली. तेवढ्यासाठीं मी ५-१० मिनिटें एका ठिकाणीं, त्या कल्पित बर्फाच्छादित शिखरांकडे दुर्बिणींतून पहात असे. परंतु खरी गोष्ट काय आहे त्याची कल्पना त्या वेळीं मला येऊं शकली नाहीं व अजूनही माझी खात्री नाहीं. हीं शिखरें आहेत कीं ढग आहेत, हें न कळण्याचें कारण एकच कीं आज आभाळ आलें असल्याकारणानें क्षितिजावर सतत ढग दिसत होते आणि त्यांत काळ्या व पांढऱ्या ढगांनीं असें कांहीं संमिश्रण केलें होतें कीं, ते ढग पर्वतांच्या शिखरांप्रमाणेंच दिसत होते; मग मला पर्वत कीं ढग ही शंका येणें साहाजिकच आहे कीं नाहीं ?

आज सिलक्याराला आल्याबरोबर जेवण तयार होतें. फोटो घेत घेत व दुर्बिणींतून पहात पहात आल्याकारणानें मी बराच उशिरां म्हणजे जेवायच्या वेळींच तेथें आलों. दुपारीं स्नान करण्याचा बेत होता; परंतु पावसासच सुर-

वात झाल्याकारणानें माझा अगदीं नाइलाज होता. पावसामुळें गारवाही खूप सुटला व टेंपरेचर जवळ जवळ ६० डिग्रीपर्यन्त उतरलें. शेवटीं मी संध्याकाळीं ६॥ वाजतां बादलीभर पाण्यानें स्नान करून टाकलें आणि त्या पावसामुळेंच पाणी कोठून जाणतात, हें पहावयाचें माझें राहिलें.

आजपासून प्रवचनास सुरवात झाली. आज पुण्यातिथि असल्याकारणानें प्रथम बाबासाहेब देशपांड्यांनीं प्रवचनास सुरवात केली. परंतु मला इतकी झोंप आली होती कीं, बाबासाहेबांचें व्याख्यान सुरू झाल्याबरोबर जी मला गाढ झोंप लागली ती प्रो. विनोद समारोप करीत होते, त्या वेळीं म्हणजे सुमारें ६ वाजतां मी जागा झालों आणि नंतर माझी आंघोळ झाली.


आज पाऊसही होता, वांबळ पडली होती, तेव्हा सायंकाळचें जेवण बंद होतें. पण थोडा लाडू खाल्ला.

## गंगाणी.

ता. ११-५-१९४१.

काल रात्रीं भयंकर पिसवा चावल्या. इतक्या कीं मी दोन वेळां अंथरुणावरून उठून बाहेर आलों, परंतु झोंपही तशीच आल्याकारणानें थोडेंसें अमृतांजन जेथें फोड आले होते तेथें चोळून झोपलों. पण पहाटे दोन वाजतां उठलों, तेव्हां पाठ अगदीं गांधींनीं फुलून गेली होती. बाकी माझ्यावर पिसवांचें फार प्रेम बरं का! कोठेंही पिसूं असूं दे, ती मला हटकून येऊन चावायचीच ! हा अनुभव मला आजचाच नाहीं, पांच सहा वर्षांचा आहे !

आज सिलक्याराहून निघण्यास थोडासा उशीर झाला, पण पावसानें मदत केल्याकारणानें उकाडा तर नव्हताच नव्हता, पण ऊनही नव्हतें. आज मात्र रेनकोट अंगावर चढवून बाहेर पडलों. आजची उंची मात्र अगदीं मार्क करण्यासारखी आहे हं ! सिलक्यारा ४९२०; ५५९०; ५८२०, ६७१०; ७३१०, ५८५०; ४६००; ४५२०; गंगाणी ४२००. आम्हीं सिलक्याराहून चढायला सुरवात केली, ते चढतां चढतां थेट ७३१० फुटांपर्यंत चढलों. म्हणजे आज अगदीं अत्युच्च टोंक गांठलें. मी ५८२० फुटांपासून जी एकठोक चढायला




चित्र सं. ९

यमुना जेथून उगम पावते, तो बर्फाचा पहाड ( पृ. सं. ४८ )




चित्र सं. १०

विंचवाचें झाड ( पृ. सं. ५६ .



( चित्र सं. ११ ) हनुमान चट्टीकडे जातांना दिसणाऱ्या डोंगराचा एक देखावा ( पृ. सं. ५१ )



चित्र सं. १२
उत्तरकाशीचें अकरा रुद्रांचें देऊळ. ( पृ. सं. ६१ )

सुरवात केली, ते चढतां चढतां ६७१० फुटांवरच दम टाकला आणि या थंड हवेतदेखील घाम आला. मला वाटत होतें कीं, ६७१० हाच अगदीं उच्चतम बिंदु असेल म्हणून. पण आम्ही आणखीही उंच चढलों.

७३१० फुटांवर गारवा मात्र अगदीं भयंकर होता. बोटें काकडून गेलीं होतीं आणि टेम्परेचर ६० वर होतें आणि त्या गारठ्यामुळेंच आपण खूप उंच गेलों असूं असें वाटत होतें. तेथून जी उतरणीला सुरवात झाली, ती थेट गंगाणीपर्यंत. वाचकांना वाटत असेल कीं, आम्हीं चढलों कमी आणि उतरलों जास्ती! आणि आजच्या बाबतींत ते खरेंही आहे! परंतु आम्ही कालच ३८४० पासून सिलक्याराला चढलों होतों, हें लक्षांत घेतलें तर आम्ही ३५०० फूट डोंगर चढलों असे होतें आणि उतरलों मात्र फक्त ३१०० फूट!

आम्ही ७३०० फूट उंच गेल्यावर काय काय गंमत दिसली म्हणून सांगूं? त्या सौंदर्याची कल्पना येणें अशक्य आहे. एकामागें एक ७–८ डोंगरांच्या रांगा दिसत होत्या. त्यांतील कांहीं दऱ्यांमधून हळूहळू धुकें वर येत होतें. खूप खोलीवर एक नदी जातांना दृष्टोत्पत्तीस येत होती. आम्ही ज्या बाजूला उतरणार होतों, त्या रस्त्याच्या कडेला मात्र झाडें असल्याकारणानें पलीकडील बाजू कांहींच दिसत नव्हती. तेथें एक ५–१० फूट उंच टेकडी होती. त्यावरून एखादा बर्फाचा डोंगर दिसतो कीं काय, हें पाहण्याचा मी प्रयत्न केला. पण पुढें झाडच आल्याकारणानें माझा नाइलाज झाला. आणि आज ह्या उच्चतम बिंदूला आल्यानंतरच आम्ही फराळ केला. तेथून ती. सौ. आईनीं दुर्बिणीनें सर्व प्रदेश पाहीपर्यंत ती. बाबा दूर गेले, म्हणून त्या पळत गेल्या. आम्ही मात्र खूप दूर राहिलों.

मी रस्ता उतरतां उतरतांनाच एखादा बर्फाचा डोंगर दिसतो काय, हें पहातच होतों आणि खरोखरींच सुमारें फर्लांग उतरायच्या आंतच एका रांगेच्या मागील शिखरावर बर्फ असल्याचें मला दृष्टीस पडलें. त्याच वेळीं डाव्या बाजूला डोंगराखालून ढग जात होते. त्या सर्वांचेच मी २–३ फोटो घेतले. तें बर्फ मी कमलला दाखविलें खरे. परंतु तेवढ्या डोंगरानें तिचें समाधान

झालें नाहीं आणि कोणाचेंही झालें नसतें.

आम्ही सारखे खालीं खालीं उतरत होतों, सावकाश सावकाश चालत होतों, फोटो घेत होतों, दुर्बिणीनें पहात होतों. ढगाचे पुंजके कांहीं हळूहळू वर येत होते, कांहीं इतस्ततः भटकत होते, तर कांहीं हळूहळू हवेंतच मिळून जात होते. आम्ही दोन वेळां डोंगरांतील दरडींतून जोरानें धुकें येत असतांना पाहिलें. पण तें थोडें पुढील झाडीपर्यंत येईतोंपर्यंत अवकाश, कीं तें धुकें विरून जात असें! जणू तीं झाडेंच धुकें खाऊन टाकीत होतीं.

उतरतां उतरतां आम्हांला एकदम एक बर्फाचा डोंगर दिसूं लागला. त्याबरोबर मी कमलला म्हटलें कीं, 'बघ बाई, बर्फाचा डोंगर! झालं समाधान!' खरोखरीच तो डोंगर म्हणजे एक कापसाचा पुंजकाच दिसत होता. आम्हीं आणखी थोडे खालीं उतरलों, तों दोन तीन बर्फाच्छादित डोंगर दिसूं लागले आणि ती पांढऱ्या शुभ्र बर्फाची लकाकी पाहिल्याबरोबर मनाचें समाधान झालें. आम्ही कितीतरी वेळ ते बर्फाचे डोंगर पहात उभे होतों. इतक्यांत त्यांतील एका पर्वतावरील ढग बाजूस सरला. त्याबरोबर सूर्यप्रकाशानें तें बर्फ लखलख लखलख तळपूं लागलें. जणू चांदीचा तप्त रसच त्या डोंगरावर टाकला आहे! इतकें तेज त्या बर्फाचें दिसत होतें. ते कापसासारखेही दिसत. कापसांतील काळ्या बियांप्रमाणें त्यांमधील काळे पत्थर दिसत होते. दरीमध्यें बर्फ होतें, वर बर्फ होतें, खालीं बर्फ होतें; पण ज्या ठिकाणीं खरोखरींच बर्फ होतें, तें मात्र आळूवरील पाण्याप्रमाणें निर्लेप राहिलें होतें. त्यांतील एका डोंगरावर तर बर्फाचे मोठमोठे धोंडे असावेत, असें वाटत होतें आणि त्या बर्फाच्या डोंगरावरून येणारें गार वारें अंगाला सुयांप्रमाणें बोंचत होतें. जसजसें आम्ही गंगाणीकडे जाऊं लागलों, तसतसें गार वारें अधिकच भासूं लागलें.

गंगाणीची धर्मशाळा दिसली जवळ, परंतु जवळील पंड्यानें सांगितलें कीं 'अजूनि दोन मैल आहे' म्हणून. आणि खरोखरीच केवढें वळण आहे! गंगाणीस जातांना दोही बाजूंनीं झाडी होती. वाटत होतें कीं पाऊस वगैरे पडायचा नाहीं म्हणून, पण थोडासा पाऊस आलाच! सिलक्यारापेक्षां गंगाणी

पुष्कळच खालीं असल्यानें सिलक्यारापेक्षां येथें थंडी कमी आहे.

गांवाचें नांव गंगाणी, पण जवळून वाहते यमुना. आहे कीं नाहीं गम्मत! पण गंगाणीहून गंगोत्रीस जाण्याचा रस्ता फुटतो व गंगा हीच पवित्र नदी आहे, हें लक्षांत घेतल्यास गंगाणी नांव कदाचित् शोभण्यासारखें आहे.

आज न्यायरत्न विनोदांचें प्रवचन झालें. त्यांनीं सांगितलें कीं, ' गंगा हें क्षात्रधर्माचें प्रतीक आहे, तर यमुना हें शूद्रधर्माचें प्रतीक आहे. ज्यानें गंगा पृथ्वीतलावर आणली, तो भगीरथ क्षत्रिय व शूर होता, हें सर्वांना माहीत आहे व यमुनेच्या तीरावरच कृष्णानें गोधन पाळून शूद्रधर्माचें महत्त्व सिद्ध केलें. सगळीकडे दूधदुभत्याची समृद्धि केली. '

मी जेव्हां गंगाणीस आलों, तेव्हां पानें वाढून तयार होतीं. कारण आम्हांला बर्फ पाहतां पाहतां बराच उशीर झाला. पण लागलींच ती० बाबांच्यासाठीं यमुनेचें पाणी आणण्यास जाण्याचा योग आला. मी यमुनेचें पाणी पाहिल्याबरोबर मला आठवण झाली. " यमुनेचं पाणी सगळं किती बाई काळं काळं! " तिकडे गंगेचें पाणी पांढरें तर इकडे यमुनेचें पाणी अगदीं स्वच्छ! त्यांत पांढरेपणा फक्त दगडांना थटून उडत असलेल्या पांढऱ्या फेसामुळेंच उत्पन्न होत होता; पण गंगाणीचें यमुनेचें पाणी, गंगेच्या पाण्याइतकें गार मुळींच वाटलें नाहीं, तरी तें पाणी बरेंच गार होतें.

तेहरीहून निघाल्यापासून, धरासूचा मुक्कामाचा दिवस सोडून दररोज तेरा पंधरा मैलांचा आमचा प्रवास होत असे. त्यामुळें ४॥-५ ला जरी निघालों तरी मुक्कामास जाऊन जेवण वगैरे होईपर्यंत दीड दोन सहज होत असत. त्याप्रमाणें आजही जेवायला उशीर झाला. नंतर बारकीशी डुलकी घेऊन प्रो. विनोदांचें भाषण होतें, तें ऐकत बसलों. आज खरें म्हणाल तर दुपारींच आंघोळ करण्याची इच्छा होती, परंतु ती० बाबांचें अंग वगैरे रगडणें होईपर्यंत झोप आली व मग पाऊस पडायला सुरवात झाल्यामुळें शेवटीं व्याख्यान झाल्यावर सहा वाजल्यानंतर गारव्यांत जाऊन यमुनेच्या पाण्यानें स्नान केलें.

Slowly silently now the Moon
Walks the night in her silver shoon.

*

आज मी रात्रीं हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरांचे मूनलाइटमध्यें फोटो घेतले, कारण सायंकाळ झाल्याबरोबर पाऊस थांबला व चंद्र उगवेपर्यंत आकाश अगदीं स्वच्छ झालें. त्यामुळें मी तात्काळ दोन फोटो घेऊन टाकलें. हो, समजा, उद्या अधिकच पाऊस पडून ढगांनीं व्यापिलें तर, किंवा उद्यां चट्टीमधून बर्फाचा डोंगर दिसलाच नाहीं तर?

## जमुनाचट्टी

ता. १२-५-१९४१.

आज फक्त सातच मैलांचा प्रवास असल्याकारणाने आम्हीं थोडे उशीरां निघालों तरी लवकर जाऊन पोहोचलों.

अगदीं मीदेखील दहा सव्वा दहा वाजतांच येथें येऊन पोहोचलो, तरी कित्येक फोटो घेतले, कित्येक वेळां दुरबिर्णीतून पाहिले. आज यमुनानदी सतत आमच्या डाव्या बाजूला होती. पर्वताचा मूळ चढ येईतोंपर्यंत आम्हीं यमुनेच्या काठानेंच जात होतो, तरीदेखील आम्ही एक दीड मैलांत दोनशें फूट चढलों. आज घेतलेल्या उंच्या–गंगाणी ४१००; डोंगरपायथा ५०२०; ५१२०; ५०७०, जमुनाचट्टी ४८७०.

आम्हीं गंगाणीहून चढ चढून गेल्याबरोबर जी पावसाला सुरवात झाली, तो आज सायंकाळपर्यंत सारखा पावसाळी पाऊन पडत होता, त्यामुळें ऊन बिलकूल नव्हतें, पण ठिकठिकाणीं धुक्याचे पुंजके असल्याकारणानें त्या सौंदर्याचे फोटो घ्यावेत असें सारखे वाटत होते आणि मी व वसंत चितान्यानें 'दडपून देतों ऐसाजे' म्हणून कित्येक फोटो घेतले.

आज हिमालयाने आपलें निराळेंच सौन्दर्य दाखवायला सुरवात केली. आज त्या चिडाच्या तांबड्या तांबड्या काड्या फारच क्वचित् दिसल्या, पण गगनचुंबित अशीं हिमालयाचीं उतुंग शिखरें मात्र फार दिसलीं. कालच्यापैकीं कांहीं हिमाच्छादित शिखरांचा देखावा जवळून दिसत होता, तर कांहींवर ढग आल्यानें जवळच्या डोंगरांचींदखील शिखरें दिसत नव्हतीं

आज रस्त्यानें जातांना जमुनाचट्टीजवळच एक फार मोठा ओघळ दिसला, तो जवळ जवळ चार पांच ठिकाणांहून वहात होता. त्याचा फोटो घ्यायची इच्छा होती, परंतु पाऊस पडत असल्याकारणानें मी तो नाद सोडून दिला. पण थोडासा धबधबा असलेल्या एका ओघळाचे मात्र दोन तीन फोटो घेतले.

आज जेवण लवकर झालें. पण पाऊस पडत असल्याकारणानें आंघोळ मात्र बिलकूल केली नाहीं आणि डायरी लिहायची असल्यानें बरोबर व्याख्यानाला सुरवात झाल्याबरोबर मी झोपीं गेलों. मग डॉ. श्रीखंडे याचे काव्यगायनदेखील मी ऐकलें नाहीं. मी थेट जेवायच्या वेळेला उठलों.

आज पावसाची तयारी करून लांडी विजार घालून गंगाणीहून निघालों होतों. पण पाऊस पडत असल्यानें जमुनाचट्टींत इतकी थंडी वाजत होती कीं, बोलतां सोय नाहीं. ते हिमशिखरांवरून येणारें गार वारें अंगाला नुसतें झोंबत होतें आणि त्यांत साधा कोट, गरम कपडा कांही नाहीं व लांडी विजार असल्या-मुळें हात पाय गारठून गेले होते. त्यामुळें सकाळीं जेवतांना कोट घालूनच बसलों होतों आणि दुपारीं गरम कोट, विजार आल्यानंतर ती चढवून मी झोपीं गेलों. आणि संध्याकाळीं गरम कोट, विजार घालूनच जेवण केलें. आज सोमवार असल्याने ती. बाबांचा उपवास होता, त्यामुळें वांबाळी हवा होती तरीदेखील आज संध्याकाळीं थोडी भाजी-भाकरी खाल्ली. पण आज आंघोळ मात्र अजिबात बंद. यमुनानदी जवळच दिसत असल्याने बादलींतून पाणी आणून मग आंघोळ करण्याची इच्छा होईना व मग पाऊस पडत असल्यामुळें यमुनेवर जाण्याची इच्छा होईना !

# हनुमानचट्टी

ता. १३-५-१९४१

आज पहाटे जागा झालों, तों पाऊस वगैरे संपून चन्द्रप्रकाश अगदीं लक्ख पडला होता. त्या वेळीं जवळील डोंगरावर चन्द्रप्रकाश इतका सुंदर पडला होता कीं, मला फोटो घ्यावासा वाटत होतें. परंतु मी कंटाळा केला. कारण डोंगर

काय आपल्या इकडे नाहींत आहेत? कीं त्यांच्यावर चन्द्रप्रकाश पडत नाहीं? आणि खरोखरीच मी सांगितल्याप्रमाणें येथून एकही बर्फाचा डोंगर दिसत नाहीं. मग विनाकारण फोटो घेण्यांत काय विशेष?

मी काल येथें जमुनाचट्टीला समोर यमुना दिसत असूनदेखील खालीं गेलों नव्हतों. पण आज नमस्कार वगैरे सर्व झाल्यावर खालीं जाऊन त्या गार पाण्यानें हात पाय तोंड धुऊन आलों.

आज खालीलप्रमाणें उंची मोजली—जमुनाचट्टी ४९००, ५३००, ५२१०, ५७७०, ५५७०, ५७२०, ५६००, ५८००, ५७२०, ६४००, ६५५०, ६६००, हनुमानचट्टी ६६३०. आज प्रथम आम्ही यमुनेवरील पूल ओलांडून गेलों व यमुना उजव्या बाजूनें वाहूं लागली. आम्ही जो पहिला चढ चढायला लागलों, तोंच सुमारें १००० फूट उंचीचा कडा मला एकदम उजव्या बाजूला दिसूं लागला. आतां कोणी शंका घेईल कीं, खालून कडा १००० फूट उंच आहे, हें तुम्ही ओळखलें कसें? तर ५७७० फुटांपर्यन्त चढल्यानंतर त्या डोंगराचें टोंक वर दिसत होतें. त्याअर्थी कडा हजार फूट उंच असावा, असा अदमास करायला कांहीं हरकत नाहीं!! त्या अजस्र कड्याचा एक फोटो घ्यावा, असें फार फार माझ्या मनांत होतें. परंतु नदी इतकी अरुंद कीं तो सबंध कडा कॅमेऱ्यांत मावणेंच शक्य नव्हतें. एक कांहींतरी फोटो घेतला म्हणा, पण त्यामुळें मनाचें समाधान झालें नाहीं.

मघांशी सांगितल्याप्रमाणें आकाश अगदीं स्वच्छ असल्यानें कोवळीं कोवळीं सूर्याचीं किरणें डोंगराच्या शिखरांवर पडून पर्वतशिखरेंच फक्त तप्त सुवर्णाप्रमाणें भासत होतीं. आम्ही आणखी वर आलों तों डाव्या बाजूला हिमाच्छादित बर्फाचें शिखर दिसूं लागलें. मी यमुनेचा फोटो काढीत मागें राहिलों होतों. म्हणून ती. सौ. आई बर्फाचा डोंगर दुर्बिणींतून पाहण्यासाठीं मध्येंच थांबल्या होत्या. आम्ही आणखी पुढें गेलों तों उजव्या बाजूला नुकताच पडलेला बर्फच बर्फ दिसूं लागला. कालच पाऊस पडला होता. त्यामुळें आज हवेंत सपाटून गारठा होता. तेव्हां आम्ही उभे होतों, तेथून दोन हजार

फुटांवर बर्फ तयार व्हायला कांहींच हरकत नव्हती. पण इतकें जवळ बर्फ पाहून मनाला मोठें समाधान वाटलें. हळूहळू त्या बर्फावर ऊन पडूं लागलें तों तें तेजस्वी होऊन तळपूं लागलें. वर निर्दिष्ट केलेला बर्फाचा पर्वतही हळूहळू तळपूं लागला. जसजसें आम्ही पुढें पुढें जाऊं लागलों तसतसा सूर्य वर वर चढूं लागला आणि त्यामुळें डोंगरावरील बर्फ अधिकाधिक तळपूं लागलें. ह्या सीनचे आम्ही कित्येक फोटो घेतले.

आम्हांला वाटत होतें कीं, चढ चढल्यावर आम्ही डोंगर खूप उतरत आहों म्हणून. पण आमच्याबरोबर यमुनाही झपाट्यानें वर वर चढत होती. जमुनाचट्टीला यमुना ४९०० फुटांवर होती. मध्यावर ती वर खूण केल्याप्रमाणें ५६०० व ५७२० फुटापर्यन्त चढली. आतां येथेंही ६६३० फुटांवर जवळच यमुना नदी आहे. म्हणजे सुमारें आठ नऊ मैलांचे अंतरांत ( जमुनाचट्टी ते हनुमानचट्टी अंतर नऊ मैल ) यमुना नदी सतरा अठराशें फूट वर चढली. त्यामुळें आम्ही ग्रॅजुअल स्लोपमधून वर चढत असतांना आमच्या लक्षांत येत नव्हतें. उलट उतरलें म्हणजे मात्र वाटायचें कीं आपण उतरतों आहों म्हणून. आजच पहा ना ! दादांनीं मला दुपारीं विचारलेंच कीं, येथें उंची किती व आपण अधिकाधिक वर किती चढलों ? ५७२० फुटांपासून ६४०० फुटांपर्यन्त एकदम खडा चढ आहे व पुढें वर वर्णन केल्याप्रमाणें चढउतार आहे. त्यामुळें ६४०० फुटांपर्यन्त जी खडी चढण चढलों, तेंच अत्युच्च टोंक अशी कल्पना होणें अगदीं शक्य आहे.

५७२० फुटांवर आम्ही पुन्हां यमुना पुलावरून ओलांडली. त्यामुळें यमुना पुनश्च डाव्या बाजूला आली. कमल म्हणालीदेखील, " इश्श, यमुना कशी एक-सारखी बदलती आहे पहा. जमुनाचट्टीपर्यन्त डाव्या बाजूला, तेथून उजव्या बाजूला व पुन्हा डाव्या बाजूला ! गंगा पहा बरं, ती हरिद्वारपासून जी एकदां उजव्या बाजूला होती ती थेट धरासूपर्यन्त आमच्या उजव्या बाजूसच होती."

पण ५७२० फुटांवर यमुना नदी ओलांडायचा पूल इतका घातकी आहे कीं, त्यावरून जायचें म्हणजे जीव मुठींत धरूनच जावें लागत असे. माझ्या-

समक्ष एका घोड्याचा पाय एका फळीच्या फटींतून निसटला, तर आई डाव्या बाजूनें जात असतां एकाएकीं एक फळी उचलली गेली. मग आमच्या लक्षांत आलें कीं ज्यांवर फळ्या टाकायच्या त्या दोन तुळ्यांपैकीं डाव्या हातची तुळई मोडून खालीं पडली होती आणि त्यामुळें तो मोडका पूल फक्त उजव्या हातच्या तुळईवर तोलून उभा होता. पहा किती प्राणघातक पूल होता तो ! मी उजव्या बाजूनें आल्यानें माझ्या कांहीं विशेष लक्षांत आलें नाहीं. परंतु ती. सौ. आई डाव्या बाजूनें जात असतां तें चटकन् लक्षांत आले आणि तेवढ्यासाठींच एक पंड्याही त्या पुलाच्या अलीकडे उभा होता व एका झाडावर एक फळीही अडकविली होती कीं, हा पूल फार कुजका आहे. तेव्हां दोन माणसांपेक्षां अधिक माणसांनीं त्यावरून जाऊं नये. अर्थात् हें हिंदींतच लिहिलें होतें.

तो पूल जितका डेन्जरस् होता, तितकीच तेथून वहात असलेली यमुनानदी सुंदर दिसत होती. काय तो खळखळाट ·आणि काय ते त्यामधील नाना तऱ्हेच्या आकाराचे धोंडे. पण त्या पुलाखालींही असेच धोंडे व पाण्याचा खळखळाट होता, हें विसरता कामा नये. तेथून जो चढ होता, तो ६४०० फुटांपर्यन्त आणि जों आम्ही एक दोन वळणे घेऊन येतों तों जम्नोत्री ज्या बर्फाच्या डोंगराच्या पायथ्याशीं आहे, त्या डोंगरावरील बर्फ लखलखूं लागलें. पण शिखरावर ढग असल्यानें खरोखरीच त्या पर्वताचें अत्युच्च शिखर किती उंच असावें हें लक्षांत येत नव्हतें. ती. सौ. आईनीं मला सांगून ठेवलें होतें कीं, प्रेक्षणीय देखावा असल्यास मला पहायचा आहे म्हणून. तेव्हां मी तेथें वीस पंचवीस मिनिटें थांबलों; आणि पुढें प्रत्येक ठिकाणीं दुर्बिणींतून तो पर्वत पहात होतों व मी होईल तितके फोटो घेत होतों.– हो, पुढचं काय समजा ! पुढें जर ढग आले तर पुन्हां असले लखलखीत पर्वताचे डोंगर दिसायचे नाहींत. आणि म्हणून मी जमतील तितके फोटो घेत होतों. त्यामुळें आम्ही ती. बाबांच्या मागून सवा दीड तासानें आलों.

काय त्या बर्फाच्या चकाकीचें वर्णन सांगावें! जणू एखाद्या पर्वताच्या शिखराएवढाच चन्द्रच प्रकाशतो आहे, असा भास होत होता. ज्याप्रमाणें

चन्द्रावर डाग आहे, त्याप्रमाणें त्या पर्वताच्या कड्यांवर मुळीं बर्फाचा लवलेशही नव्हता, तर सर्व दऱ्यांमध्यें बर्फ ओतप्रोत भरलेलें दिसत होतें. अर्थात् त्या डोंगरावर एकही झाड अगर झुडूप दिसत नव्हतें. चन्द्रांत व ह्यांत फरक एवढाच कीं, चन्द्रावर हवा नाहीं व ती ह्याच्यावर मात्र मुबलक प्रमाणात आहे. ह्याबदल कोणत्याही वाचकाला शंकादेखील येणार नाहीं. आपल्याकडे एखाद्या लहान प्रमाणांत हे कसे दिसत असतील, ह्याची कल्पना हवी असेल तर त्यानें एखाद्या धोंड्यावर घट्ट दही टाकून तो उन्हांत ठेवावा आणि तो एखाद्या मुंगीला जसा दिसत असेल, त्याप्रमाणें आम्हाला हे हिमपर्वत दिसत होते. आम्ही त्या हिमपर्वतांच्या जवळ जवळ येत होतों. ढग बाजूला झाल्यावर त्यावरील एक टेकडी आम्ही पाहिलेल्या इतर टेकड्यांपेक्षांही उंच दिसूं लागली. आम्ही पर्वताच्या शिखरावर ज्या टेकड्या पाहिल्या, त्यापेक्षां ही नवीन दिसूं लागलेली टेकडी सुमारे १००० फूट तरी उंच होती. मी असें ठरविलें आहे की, हिमालयाच्या बाबतींत बोलायचे म्हणजे नेहमीं हजारांच्या भाषेंत बोलायचें. कारण मी येथें ज्या कांहीं टेकड्या पाहिल्या, त्या हजार फुटांपेक्षां कमी कधीं नव्हत्याच. मग येथे तरी ही टेकडी इतर टेकड्यांपेक्षां हजार फूट उंच होतीच, असें म्हणायला काय हरकत आहे?

असे फोटो काढीत काढीत आम्ही सुमारे साडे बारा वाजता येथें येऊन पोहोंचलो. लागलींच डॉक्टर स्नानाला निघाले होते, त्यांच्याबरोबर मी पण नदीवर स्नानाला गेलो. अहाहा! काय भयंकर गार पाणी हें! पाण्यांत जर मिनिटभर हात अगर पाय ठेवले तर ते बधिर होत असत! खरोखरी बर्फाचेच पाणी तें! इतकें गार पाणी हरिद्वारला ऑक्टोबरमध्येंदेखील मी पाहिलें नव्हतें. मी एक बुचकळी मारली तर मला अगदीं 'ब्रम्हानंदी टाळी' लागल्यासारखा भासा झाला, इतकें गार पाणी! दुसऱ्या बुचकळीला तर इतकी हुडहुडी भरली कीं, बाहेर आल्यानंतरदेखील मिनिटभर मी पाण्यांतच उभा आहे, असा मला भास होत होता. त्या पाण्याला ओढ आहे कीं नाहीं, हें पाहण्याची सोयच नव्हती. पण गंगेसारखी अगदीं तीरापर्यन्त तर ओढ नव्हतीच नव्हती.

दुपारीं जेवण झाल्यावर जो डायरी लिहायला बसलों ते मध्यंतरीं बाबा-

साहेबांचें व्याख्यानदेखील झालें. त्यांचा विषय होता, ' हिंदुस्थानची उत्क्रान्ति व अपक्रान्ति.' पण ह्या डायरीच्या नादांत बाकीचा विषय मी ऐकलाय कधीं! नुसते शब्द कानांवरून जात होते. But I was nearly deaf to every thing he said.

आज विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे आज प्रातःसंध्या व सायंसन्ध्या दोन्ही झाल्या. हवा चांगली होती. दुपारीं पावसानें चार शिंतोडे टाकून भीति दाखविली, पण त्यांत कांहींच विशेष नव्हतें.

आज येथील एका हरिजन स्त्रीला नाच करतांना मी पाहिलें आणि वैशिष्ट्य हें कीं ती नाचतां नाचतां एका बोटावर थाळी फिरवीत होती !

जम्नोत्रीचा चढ एकदम खडा आहे म्हणे! तेव्हां इतकें ओझें नेणें कुलींना जवळ जवळ अशक्य आहे, असें कुली काल सांगत होते. तेव्हां सर्व सामान वर न नेतां जरुरीपुरतें लागणारें सामान, आपआपलीं गरम पांघरुणें व सर्व गरम कपडे एवढें मात्र घेऊन जावें, असें ठरलें होतें. आणि त्याप्रमाणें कित्येक लोकांनी तयारीही करून ठेविली आहे. मी मात्र सर्व पहाटे उठूनच बांधणार. बरोबर होल्डॉल व लहान बॅगच घ्यावी म्हणतों.

## जम्नोत्री.

ता १४-५-१९४१

आज पहाटे उठून प्रथम कोणती बॅग बरोबर घ्यावी, हें नक्की ठरविलें. बरोबर रेन-कोट व गरम कोट असणें जरूर होतें, बऱ्याच गोष्टी जरुरीच्या होत्या. तेव्हां चार फिल्म्स् मध्यम बॅगेंत टाकून तीच घ्यायचें ठरविलें.

आज माझ्या फौन्टनपेनची मोठीच गम्मत झाली. काल डायरी लिहितां लिहितां डायरींत फौन्टनपेन एके ठिकाणीं ठेऊन झोपलों. पहाटे गडबडीनें डायरी गोलिवडेकर मास्तरांच्या जवळ दिली. विचार केला मास्तरांची दंडी येणार लवकर, कुली येणार मागाहून, तर डायरी लिहायला जेवढा अधिक वेळ मिळेल तेवढा चांगला ! आणि आमचीं ३ लोढणीं- कॅमेरा, बॅरोमिटर आणि दुर्बिण गळ्यांत अडकवून मी सुसज्ज झालों. तरी बॅगेंत हें भर, होल्डॉलमध्यें तें भर, असें माझें

चाललेंच होतें. ती. बाबा पुढें निघून गेले. ती. सौ. आईही पुढें निघून गेल्या. मी,कमल व आबा-आम्ही एकदम बाहेर पडलों. आज निघायच्या वेळीं कॅमेऱ्याचा-स्टॅन्ड एका हातांत जादा होता. मी एक फोटो काढला, फिल्म संपली, कॅमेरा अन्लोड केला व वर कोठून कोठपर्यन्तचे फोटो काढले, तें लिहिण्यासाठीं फौन्टनपेनला हात घातला. तर फौन्टनपेन कुठाय्? चारी खिसे चाचपले, विजारी-चे खिसे धुंडाळले. कदाचित् शर्टला लावलें असेल, अशी कल्पना येऊन तो-सुद्धां हुडकला. पण छट्, फौन्टनपेनचें नांव नाहीं. मग मात्र मी घाबरलों. आणि विचार करूं लागलों कीं, गेलं कुठं फौन्टनपेन ?

कमल म्हणाली कीं, ' तिनें पहाटेपर्यन्त जवळ पडलेलें पाहिलें. ' आम्ही हनुमानचट्टीहून सुमारें दीड फर्लांग आलों होतों, म्हणून कॅमेरा लोड करायचा तसाच ठेऊन, सगळीं लोढणीं कमलजवळ ठेऊन मी हनुमानचट्टींत पळालों. किती लांबचा वाटला मला रस्ता. जातांना किती लांब आलों, त्याची कल्पना-देखील आली नव्हती. खोलींत बंकट व परशुराम यांना पेट्या इकडे तिकडे करण्यास लावल्या. जेथें होल्डॉल व डायरी ठेवली अशी कल्पना होती, तेथील सर्व जागा हुडकली. सर्व जणांचें सामान एकाच खोलींत भरून ठेवायचें असल्यानें तेथे बऱ्याच बॅग्ज् जमल्या होत्या. पण फौन्टनपेनचा पत्ता नाहीं. बंकटकडून किल्ली घेऊन हनुमानचट्टींतच जी बॅग मी ठेविली होती, तीदेखील मी हुडकली. पण फौन्टनपेनचा पत्ता लागला नाहीं. तेव्हां कल्पना आली कीं, कदाचित् आईनीं बाबांचें समजून ठेवलें असेल म्हणून. कांहीं का म्हणानात, थोडा निराश मनानें मी तेथून निघालों, व कमल बसली होती, तेथें आलों. तेथें कॅमेरा लोड केला, एक फोटो घेतला व आम्ही पुढें निघालों.

बंकटनेंच माझ्या बॅग्जची उचलाउचल केली ( मी नमस्कार घालीत असतांना ) असें समजून मी रागें भरलों व कमललाही तिनें फौन्टनपेन कां उचललें नाहीं, म्हणून थोडा बोललों. बाकी कमलनें केलें तेंही योग्यच होतें. कारण माझ्या सामानाला उगीच हात लावलास, म्हणूनही मी तिला बोललों असतों. पण असो. थोडक्यांत सकाळची गोष्ट अशी कीं, फौन्टनपेन गेलें. कमल

म्हणतच होती कीं, " तुमचें फौन्टनपेन नक्की सांपडेल. एवढें किंमतवान् फौन्टनपेन सांपडल्याशिवाय कसें राहील ?" वगैरे. पण मला जेव्हां तिच्याकडूनच कळलें कीं, कवींचेंही फौन्टनपेन गेलें, नानासाहेब चापेकरांचेंही फौन्टनपेन हरवलें. तेव्हां मला फौन्टनपेनबद्दल काळजीच वाटायला लागली. मधू पाठीमागेंच आहे, असें समल्यावर मी पुन्हां परत जाऊन त्याला देखील विचारायचा बेत केला होता. परंतु तो येणारच आहे, हें माहीत असल्यामुळें जम्नोत्रीस गेल्यानंतरच त्याला विचारावें, असे ठरविलें. जातां जाता तौ. सौ. आईना फौन्टनपेनबद्दल विचारलें. तर त्यांनी आपल्याला माहीत नाहीं बुवा, म्हणून सागितलें व कवींचें व चापेकरांचें फौन्टनपेन गेल्याचे सांगून माझें फौन्टनपेन सांपडण्याची शक्यता कमी आहे, असें सूचीत केले. जम्नोत्रीस पोंचल्यावर मधूजवळ मी त्याची चौकशी केली, तेव्हां त्यानेही त्याला सांपडलें नसल्याबद्दल सांगितलें.

मोठी आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे ! कदाचित् थोडासा दानधर्म केल्यामुळें माझें फौन्टनपेन सांपडूं शकेल, या कल्पनेनें एका पोऱ्याने ' दे दो पैसा सेठजी ' म्हणून पाठीमागें टुमणा लावला, म्हणून मी एक पैसा दिला. आजपर्यन्त कित्येक पोऱ्यांनीं मला ' पैसा, दे दो सेठजी, दे दो महाराज ' म्हणून पीडिले होते ! परंतु आजपर्यन्त मीं एकालाही दाद दिली नव्हती. पण आज फौन्टनपेन गेल्यावर मात्र, मला पैसा द्यावा असें सुचूं लागलें ! विचार केला तेवढीच गुड वुइश् ! शिवाय मनांतल्या मनांत ठरविलें, फौन्टनपेन सांपडेल तर जम्नोत्रीमाईस रुपया ठेवीन. आणि जेव्हां फौन्टनपेन गेलें असें हनुमानचट्टींत नक्की वाटायला लागलें तेव्हां विचार आला, तें न सांपडल्यास यमुनार्पणमस्तु ! तेव्हां एकच आशा उत्पन्न झाली की कदाचित् पुन्हां खोली धुंडाळल्यास सर्व जण आपापलें सामान घ्यायला लागले म्हणजे आपलें पेन सांपडेल. इतक्यांत परशराम, बंकट व कवींनीं सांगितलें कीं, आम्ही पुन्हां खोली पाहिली, पण फौन्टनपेन सांपडलें नाहीं ! परंतु कवींनीं आश्वासन दिले कीं, हनुमानचट्टीवर गेल्यानंतर पेन नक्की हुडकून देतों म्हणून. मी त्यांना माझ्या पेनच्या सर्व खाणाखुणांसुद्धां सांगितल्या.

आम्ही निघतांना अगदीं लक्ख सूर्यप्रकाश पडला होता. विशेषतः फौन्टन-

पेन हुडकण्यांत बराच वेळ गेल्याकारणानें उंच उंच शिखरांवर सूर्यकिरणें पडलीं होतीं. मी व कमल चाललों होतों. मी माझा कॅमेरा, स्टॅन्ड व काठी आबाजवळ ठेविली होती ! तेव्हां मी फोटो वगैरे काढून आम्ही दोघेच पुढें निघालों. मी येईपर्यन्त शास्त्रीबुवा, नानासाहेब चापेकरांचा मुलगा भाऊ, कमलहीं जवळ होतीं. मी चढावर जोरांत चढत असे व थांबत असें ! मी कमल आल्यावर पुढें जात असें. असें करितां करितां आम्ही, शास्त्रीबुवा व भाऊ यांना गाठलें. तेव्हां कमल विश्रांतीला म्हणून बसली व मी सपाट्यानें पुढें निघून गेलों.

आज मोजलेल्या बॅरोमेट्रिक हाइट्स्:– हनुमानचट्टी ६७२०, ६७५०, ७०८०, ७१७०, यमुनानदीच्या जवळून थोडीशी चढण ७२००, खड्या चढणीस सुरवात ८४९०, पहिला टप्पा ८७००, दुसरा टप्पा ९२००, यमुनानदीपर्यन्त उतरण ९१००, ९३००, चौथा टप्पा ९४००. पाचवा टप्पा ९५६०, सहावा टप्पा ९७००, ९९००, १०००० यापुढील उंची मोजण्यास आमचें बॅरोमिटर असमर्थ असल्यानें मी उंची मोजणें बंद केलें.

आज हनुमानचट्टीहून निघाल्यापासून यमुना सारखी आमच्या डाव्या हाताला होती. मला एक शंका आली कीं, हनुमानचट्टीवरून उलट दिशेनें चालू लागलों तरी ७२०० फुटांपर्यन्त यमुना आमच्या डावीकडेच ! तेव्हां मला वाटलें कीं, यमुना व दुसरी एखादी नदी यांचा संगम कोठेंतरी जवळपास असावा ! पण ही शंका आतां मी उद्यां फेडून घेणार आहें.

आजचा रस्ता इतका अवघड व अरुंद होता कीं, 'न भूतो न भविष्यति ।' आम्ही सारखे यमुनेच्या कांठानें चाललों होतों. कांहीं कांहीं ठिकाणीं तर एक माणूस मोठ्या कष्टानें जाऊं शकेल इतका कडा ढासळला आहे, ही गोष्ट मला व कमलला तेथील माणसांनीं सांगितली होती व वरील दुसऱ्या रस्त्यानें जावें अशी इच्छा प्रदर्शित केली होती. परंतु आम्ही अवघड रस्त्यानेंच गेलों. ७२०० फुटांपर्यन्त अशीं अरुंद रस्त्याचीं व खालीं यमुना वाहते आहे, अशीं ठिकाणें कित्येक आहेत. तेथून पुढें जणू संगमरवरी दगडांची खाणच असा एक पाऊल रस्ता मला लागला. येथें मी कमलला त्या दोघांजवळ सोडून एकटाच पुढें निघालों

खरोखर किती डेन्जरस होता तो रस्ता! आणि चढउतार तरी किती खोल! मला खड्या चढाबद्दल कांहींच वाटत नाहीं म्हणून मी जोरांत चाललों होतों. जातां जातां दोन्ही बाजूला उंच उंच खडक अशी खिंड मला लागली. तेथें कित्येक लोक दगडाच्या आश्रयानें बसले होते. मी पुढें निघालों. मी खरसाळींचे पुढें गेलों तों तेथें सर्व घोडे केलेले लोक बसले होते. मी विचारलें त्यांना तुम्ही येथें कां बसलांत म्हणून. तर त्यांनीं सांगितलें कीं, 'पुढें घोडीं जात नसल्यानें पुढें चालतच गेलें पाहिजे.' आणि खरोखरींच पुढें यमुना नदी लागेपर्यन्त म्हणजे ८४९० फुटांपर्यन्त वाटेनें इतके दगडधोंडे आहेत कीं तेथून घोडीं जाणें शक्य नाहीं. खरसाळीपर्यन्तच घोडीं कशी येऊं शकलीं, याचें मला आश्चर्य वाटलें. डाव्या बाजूला उंच उंच शिखरें, समोर जम्नोत्री जेथून उगम पावते तो बर्फाचा डोंगर व उजव्या बाजूला खोल दीड दोनशें फुटांवर यमुना नदीचा प्रवाह! त्यांत तो दोन माणसें जेमतेम जाण्यापुरता रस्ता! एकंदरींत तो देखावा पाहिला म्हणजे हिमालय खरोखरींच नगाधिराज आहे, हें पटत होतें.

आम्ही जसेंजसें चढूं लागलों, तसतसा गार वारा अधिक वाहूं लागला. रस्ता अगदींच अरुंद आहे. एका बाजूला पर्वतप्राय उंच उंच कडा आहे, तर दुसऱ्या बाजूला खोल खोल यमुनामाई वहात आहे. मधून मधून बर्फ पडलेलें आहे. हिमालयाचीं उंच उंच शिखरें दिसत आहेत. दुसरा माणूस समोरून आल्यास त्याला वाट देण्याकरितां आम्हाला ठिकठिकाणीं थांबावें लागत होतें. आणि उतरण लागली म्हणजे एखाद्या धोंड्यावरून पाय निसरूं नये म्हणून आम्हांला सावकाश चालावें लागे. दोन्ही बाजूंना देवदारूंचीं उंच उंच झाडें लागलीं होतीं आणि त्यांतून ते भयंकर डोंगर दिसत होते. मी होतां होईल तों फोटो घेत सपाट्यानें चाललों होतों. ठिकठिकाणीं ती. सौ. आई येईपर्यन्त थांबून त्यांना दुर्बिणींतून सृष्टिसौन्दर्य दाखवीत होतों व पुन्हां पुढें चाललों होतों.

९१०० फुटांवर यमुना नदी ओलांडल्यावर मी ती. सौ. आईना मागें टाकून पुन्हां सपाट्यानें चढण्यास सुरवात केली. एकेकाला मागें टाकत टाकत व बॅरोमेट्रिक रीडिंग्ज् घेतां घेतां ९९०० फुटांपर्यन्त आलों. इतक्यांत वरील

ढगांतून पाऊस पडण्यास सुरवात झाली. हवेंत गारवा फार भयंकर होता. मी कमल छत्री टेकीत टेकीत चालत होती म्हणून तिच्याकडून छत्री काढून घेतली होती. त्या छत्रीचा आयत्या वेळीं उपयोग झाला. नव्याण्णवशें फुटांपर्यन्त प्रथम पावसाऐवजीं पावसाच्या थेंबाच्या आकाराच्या गाराच पडत होत्या. इतक्यांत उजव्या बाजूच्या व्हॅलीमधून धुकें सपाट्यानें वर आलें आणि जोराच्या पावसाला सुरवात झाली. काठी मध्यंतरीं मी हातांत घेतली होती. परंतु पावसाचीं चिन्हें दिसायला लागल्याबरोबर ती पुन्हां दंडींत टाकून दिली. बॅरोमिटर १०००० फुटांवर येऊन त्यापुढें ५०–६० दाखवीत होतें. गार पाऊस हातावर व पायांवर आदळत होता, त्यामुळें हात व पाय इतके गारठले होते कीं, आतां छत्री बहुतेक पडते असें मला वाटत होतें. बरें, छत्री मिटवायची सोय नव्हती; कारण आमच्या गळ्यांतील यंत्रें भिजण्याचा संभव होता. सर्वत्र दाट धुकें पसरलें होतें. त्यामुळें आपल्याला जायचें कितपत आणि चढ किती, उतार किती याची कल्पना मुळींच येत नव्हती. हातानें छत्री धरली होती व पाय चालत होते– त्यांत सेन्सेशन असें कांहींच नव्हतें. आम्ही एक दोनदा दंडीवाल्यांना अजून चट्टी किती लांब आहे, हें विचारण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांनीं मैल, अर्धा मैल असें सांगून आम्हांला ' कासराभर दिवसा ' पैकींच भुलविण्याचा प्रयत्न चालविला होता, असें मला वाटतें. पुष्कळ वेळां ते उत्तर देत कीं, " नजदीक है ! बिलकूल नजदीक है ! ' आणि आमचे पाय अनेक चढ व उतार तुडवीतच होते. पुष्कळसा रस्ता अशा तऱ्हेनें ओलांडल्यावर आम्हांला ती धर्मशाळा दृष्टीस पडली.


आज बाकी पावसानें पुष्कळ गंमत उडविली. सर्वांचे हातपाय गारठलेच होते, पण एक बाई म्हणे गारठ्यानें बेशुद्ध पडली. फार लांब कशाला, आमची कमल पावसानें भिजून थंडीनें इतकी कुडकुडूं लागली कीं, ती पुढें चालूंच शकेना ! शेवटीं डॉक्टरना पाठविलें. त्यांनीं तिला औषध देऊन आणलें. ती. सौ. आईच्या आजीबाईपैकीं एक आजीबाई जी रस्ता चुकली, तें कांहीं विचारूं नका. ती थंडीनें कुडकुडतच पडली होती. ह्या सर्वांना ती. सौ. आईनीं दंडीनें-दंडी कसली

म्हणा, रस्ता इतका अरुंद व इतक्या खड्या चढ उतरणीचा होता कीं त्या दंडी जाणेंच अशक्य होतें ! त्या धर्मशाळेंत शेकोटी करून सर्व जण शेकींत होते व त्यामुळें सर्व धर्मशाळा धुरानें भरून गेली होती. त्यामुळें खोल बाहेर पडणेंदेखील अशक्य होतें.


यमुनेच्या प्रवाहाजवळ ऊन पाण्याचे झरे आहेत. त्यांत प्रथम ती. आईनीं, नंतर ती. बाबांनीं आंघोळ केली. इतक्यांत आकाशांतील अभ्रें दूर व उन्हें पडलीं. आज चतुर्थी असल्यानें आम्हांला उपास होता. आम्ही २ वाजतां फराळ करून घेतला. बाकीच्यांचें जेवण आमचा फराळ होईतों झालें होतें, परंतु ते ५–५॥ च्या सुमारासच जेवायला बसले. कारण पुष्कळ आंघोळी व्हायच्या होत्या. मीदेखील आज उष्ण कुंडांत स्नान केलें व जम्नोत्रीचें उगम-स्थान पाहून आलों.

ह्या उष्ण पाण्यांत कोळशाचें प्रमाण फार मोठ्या प्रमाणावर आहे. व पांढरा कपडा दोन मिनिटें जर आंत असला तर तो दोन मिनिटांत काळसर कोळशाच्या मानानें गंधकाचें प्रमाण फार कमी आहे, त्यामुळें पाण्याला गंध वास येत नाहीं. एका कुंडांतून उष्णोदकाचे बुडबुडे येतात. त्याला यमुनेचा म्हणतात, दुसऱ्याला गंगेचा उगम म्हणतात, तिसरा आंतल्या दगडावर फवारा आ आवाज करतो, त्याला अगस्तिऋषि वेद म्हणत बसले आहेत, असें समजत एकंदरीत गम्मत आहे झालं ! या उगमस्थानाजवळच उकळत्या पाण्याचें एक आहे. त्यात तादूळ टाकले म्हणजे पंधरा वीस मिनिटात त्याचा भात तयार है बटाटे उत्तमपैकीं उकडून निघतात. चपात्या थापून टाकल्या म्हणजे त्या प्रथम बुड व कांहीं वेळानें चांगल्यापैकीं उकडून तयार ( हलक्या ) झाल्या म्हणजे आपोआप येतात. हीही गम्मत मी पाहिली.


**'यादृशी भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी।'** भोळेभाबडे हा एक दैवी चमत्कार आहे, म्हणून मानतात व बाकीचे लोक त्याचा फायदा घेतात. तर माझ्यासारखे लोक हें व्होल्कॅनिक् इरप्शन आहे असें समज आणि असे उष्णोदकाचे झरे पुष्कळ ठिकाणीं आहेत, असें ऐकतों. पण वरील डों




चित्र सं. १३
शिघोटीच्या पहाडावरील तीन मेंढ्या. ( पृ. सं. ५८ )



चित्र सं. १४
शिघोटीकडे जातांना एका चीडच्या झाडाचा देखावा ( पृ. सं. ५८ )



चित्र सं. १५
शिंघोटीचा पहाड उतरल्याबरोबर दिसणारा गंगेचा देखावा ( पृ. सं. ६० )



चित्र सं. १६.
गंगणानीकडे येतांना दिसलेलें ओढ्याचें पाणी. ( पृ. सं. ७२ )

वरून बर्फ वितळून एका बाजूनें जात आहे व तेथून २०–२५ पावलांच्या अंतरावर हें उष्णोदकाचें कुण्ड आहे. त्याचा फायदा हिंदु लोकांनीं तें देवस्थान कल्पून करून घेतला आहे, हें मात्र कौतुक करण्यासारखें आहे. या वेळींच सूर्य ढगाबाहेर आला असल्यानें फारच मौज दिसत होती. एका बाजूला यमुनेचा (हो, मी यमुनेचा खरा उगम त्या हिमपर्वतावरच धरतों, तीच खरी यमुना व तोच खरा उगम. नाहीं तर आमच्या इकडे जुन्या महाबळेश्वरास पांच नद्यांचा उगम झाला आहे. पांचही नद्यांचें पाणी एकाच गायमुखांतून पडतें व पुन्हां तें जें गुप्त होतें, तें वेण्णा दिसते वेण्णा वॉटरफॉल्‌जवळ; सावित्री क्वचित्‌ दिसते, सावित्री फॉलजवळ आणि कृष्णा दिसते एकदम वाईजवळ. येथें यमुनेचा उगम एखाद्या नास्तिक माणसालादेखील पटण्यासारखा आहे. बर्फाचें पाणी होत आहे व तें ओघळ रूपानें वहात आहे व तोच ओघळ आपल्या डाव्या बाजूनें जात आहे, हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट दिसत होतें. तोच खरा यमुनेचा उगम, तीच खरी यमुना, वाकीची सगळी ही भटांचीं व पंड्यांचीं कौतुकें व कल्पना!) गार पाण्याचा प्रवाह वाहतो आहे, दुसऱ्या बाजूला उष्ण कुंडांतून वाफा निघून त्या वर जात आहेत व समोर दोनशें तीनशें फूट उंचीवरून घासून पुढें पांढऱ्या स्वच्छ बर्फावर सूर्यकिरणें पडल्यानें, ते जणू हिऱ्याप्रमाणें चकाकत आहेत! तें दृश्य पाहून मनाचें अगदीं समाधान होतें; आणि एखादा कवि अगर चित्रकार हें दृश्य पाहून आतांपर्यन्तच्या ७४ मैलांत झालेलीं दुःखें खास विसरून जातील.

आंघोळ वगैरे आटोपून जों आलों, तों बाकीचे लोक जेवायला बसले होते! मी फौन्टनपेनबद्दल अगदीं निराश होऊन त्याऐवजीं इतःपर पेन्सिलीनेंच डायरी लिहिण्याचा विचार केला आणि त्याप्रमाणें चार पांच शब्द जे ४२ पानावर अधोरेखित आहेत, तेवढेच लिहून मी उठलों आणि ती. बाबांचें अंग वगैरे रगडून करपे यास होल्डॉल घालायला सांगितला आणि मी जों झोपायला जाणार, तोंच फौन्टनपेन दारांत पडलेलें दिसलें. (त्यावरून मी डायरी कसकशी लिहीत असें, हीही कल्पना येईल.)

(एकंदरींत माझ्या फौन्टनपेननें जम्नोत्रीचा प्रवास होल्डॉलमधून केला हं! माझी त्याबद्दल कांहीं हरकत नाहीं. पण आतां या होल्डॉलमधील प्रवासामुळें फौन्टनला

फारसा धक्का लागला नसला म्हणजे झालें.) पण त्यामुळें मी किती मनांतल्या मनांत धन्यवाद दिले आणि त्याच वेळीं विचार आला कीं, कमलनें सांगितलें, ' फौन्टनपेन सांपडेल ' म्हणून, तें खरें झालें. आतां पुण्याला गेल्यावर तिला कांहीं-तरी बक्षिस दिलें पाहिजे. पण फौन्टनपेन सांपडल्यामुळें मला कशी आनंदानें झोप आली.

आज चतुर्थी असल्यानें मध्यंतरीं १० वाजतां उठून जेवण झालें आणि मग पुन्हां झोंप आली.

## हनुमानचट्टी.

ता. १५-५-१९४१

आज चांगला साडेचार वाजतां उठलों. त्यामुळें नमस्कार न घालतांच निघालों. ते नमस्कार येथें येऊन संध्याकाळीं घातले. कारण सकाळीं येथें येईतों-पर्यन्त अवकाश कीं जेवायची तयारी होते. आजपासून जम्नोत्रीहून परतीचा प्रवास सुरू झाला. आतां पुन्हां हनुमानचट्टी, परवा गंगाणी, नंतर मात्र निराळ्या रस्त्यानें जायचें आहे. अर्थात् आतां यापुढें गंगाणीपर्यन्त तरी बॅरोमिटरचें काम बंद ठेवायला कांहींच हरकत नाहीं. आज जम्नोत्रीवर मात्र एकदां बॅरोमिटर पाहिलें. तरी तें १०००० च्या वर दर्शवीत होतें. आम्हीं १०००० च्या वर निदान शंभर फूटतरी होतों. शिवाय सकाळीं सुमारें दोन-तीनशें फूट चढलों. म्हणजे आम्हीं जास्तींत जास्त उंची अदमासें साडे दहा हजार फुटांपर्यन्त चढलों असूं.

आज सकाळीं आकाश अगदीं स्वच्छ असल्यानें ज्या दऱ्या काल धुक्या-मुळें पहावयास सांपडल्या नाहींत, त्या पहायला सांपडल्या. ज्या ठिकाणीं बर्फ पडलें होतें, तेथें एकही झाड दिसत नव्हतें. तर त्याखालीं देवदारूचीं उंच उंच झाडे दृष्टीस पडत होतीं. आज निघतांना मुद्दाम हातमोज्याचा उपयोग करायचाच म्हणून हातमोजे घातले होते आणि संवयीप्रमाणें उतरणीवरून मी सावकाश सावकाश उतरत होतों.

सुमारें निम्मा डोंगर उतरल्यावर एकाएकीं पावसाला सुरवात झाली आणि

गळ्यांतील तीं तीन लोढणीं पावसानें भिजूं नयेत, म्हणून एका हातानें छत्री धरली. पण थोड्या वेळांत पाऊस थांबला व गारवा पडला. नऊ दहा वाजायच्या सुमारास हाताला फारच गारवा वाटूं लागला. पाहतों तों टेम्परेचर अठ्ठेचाळीसपर्यन्त उतरलें होतें आणि सगळ्या जम्नोत्रीच्या डोंगरावर व काल ज्या डोंगरावर बर्फाचा मागमूस दिसत होता, त्या शिखरांवरदेखील बर्फ पडलें होतें. कमल येथें आल्यावर मला कळलें कीं, तेथें सर्व झाडें बर्फामुळें पांढरीं स्वच्छ झालीं होतीं. एक वेळ मला वाटलें कीं, आपण उशीरां आलों असतों तर त्या झाडांचा फोटो काढतां आला असता. तर एकदां वाटलें कीं, त्या थंडींत सापडलों नाहीं, हें बरें झालें. कारण हे लोक बर्फ पडायला लागल्यावर पुन्हां तेथील धर्मशाळेंत शिरले व बर्फ पडणें संपल्यानंतर तेथून निघाले व त्यामुळें त्यांना मुळींदेखील पाऊस लागला नाहीं. ती. सौ. आईना भीति वाटत होती कीं, ही मंडळी बर्फांत सांपडली कीं काय म्हणून. पण ही भीति सर्वस्वी निराधार ठरली. ही मंडळी जम्नोत्रीहून बाहेर पडली, इतक्यांत बर्फवृष्टीला सुरवात झाली. म्हणून ती पुन्हां धर्मशाळेंत आली व मग बर्फवृष्टि संपल्यावरच बाहेर पडली आणि नंतर त्यांना पाऊसदेखील लागला नाहीं.

कमल सागत होती कीं, सगळ्या झाडांवर बर्फ पडलें असल्यानें तीं पांढरीं स्वच्छ दिसत होतीं. म्हटल्यास we have lost the chance of seeing the trees white. म्हटल्यास आम्ही थंडी पडायच्या आंत खालीं आल्यानें थंडीचा त्रास झाला नाहीं. ज्याप्रमाणें वाचकास फायदा अगर तोटा झाला आहे असें वाटत असेल, तसें त्यानें ठरवावें. काल पाऊस व ऊन पाण्याच्या आंघोळी व शिवाय वर पोंचेपर्यन्त जवळ जवळ दोन वाजले असल्यानें प्रवचन झालें नाहीं, त्याचप्रमाणें आज पार्टीच्या दोन तुकड्या झाल्या असल्यानें प्रवचन झालें नाहीं. उद्यां मात्र ठीक प्रवचन होईल, असें वाटतें.

## जमुनाचट्टी

ता. १६-५-१९४१

आज नेहमींप्रमाणें लवकर हनुमानचट्टीवरून निघून आम्हीं सावकाश

सावकाश येथें आलों. खरें म्हणाल तर आतां परतीचा प्रवास सुरू झाला आहे. तेव्हां सहजच एखाद्याला वाटेल कीं मी फोटो घेणें बंद केलें असेल म्हणून, पण छट्, मी नाहीं नाहीं म्हणतां म्हणतां चार सहा फोटो घेतले. आम्ही परतीच्या प्रवासाच्या वेळीं अत्युच्च शिखरें मागें टाकून खालीं खालीं उतरत होतों, हें खरें, पण समोर दिसणाऱ्या टेकडीवर सूर्यप्रकाशामुळें असा शेड आणि लाईट पडलेला असतो कीं फोटो घेतल्याशिवाय राहवतच नाहीं आणि त्याच फोटोंत कदाचित् हिमालयाच्या कड्यांची कल्पना येईल असें वाटतें शिवाय जाण्याच्या प्रवासाचे वेळेस आम्हीं ठिकाणाला जवळ जवळ दुपारीं येऊन पोंचत असूं, तर परतीच्या प्रवासाचे वेळेस सकाळींच तो सीन आम्ही पहात असूं. त्यामुळें शेड अँड लाईटमध्यें फारच फरक असतो, त्यामुळें वाटतें फोटो काढावेतच म्हणून.

आज येत असतां प्रो. विनोदांचे बरोबर आलेले परांजपे यांच्याबरोबर गप्पा मारीत आलों आणि हें पहा, विषयामागून विषय सुचायला लागले म्हणजे वाटेल तितक्या गोष्टी गप्पांना सांपडतात.

सायंकाळीं नानासाहेब चाफेकरांचें प्रवचन झालें व नंतर प्रो. विनोद यांनीं अर्धा पाऊण तास प्रवचन दिलें. एकंदरींत आजचीं दोनही प्रवचनें मोठीं गमतीदार झालीं. नानासाहेबांनीं कांहीं गोष्टी सांगितल्या, त्या विनोदांनीं खोडून काढल्या. नानासाहेबांचें म्हणणें गणपती, देवी, महादेव वगैरे देवांची पूजा करणारीं माणसें अनार्य होतीं; तीं शंकराचार्यांनीं आपल्यामध्यें ओढून घेऊन एक करून टाकलीं. तर विनोदांचें म्हणणें गणपति रुद्र वगैरे देवता वेदांतसुद्धां सांपडतात. कांहीं कां असेना, तो विशेष महत्त्वाचा मुद्दा नाहीं. त्यांनीं जी एक गोष्ट सांगितली ती मात्र मला पूर्णपणें पटली कीं एखादा धर्म आपल्या धर्मांत ओढून आणायचा असल्यास त्यांचा देव आपल्या देवघरांत आणून ठेवावा. किती योग्य गोष्ट- कॉंग्रेसनें ही गोष्ट कां करूं नये ? त्याला सर्व बाजूंनीं विरोध होईल, हे खरें आहे आणि आपल्या मायबाप सरकारनें एक गोष्ट स्पष्ट करून ठेवली आहे कीं ' तुमच्या धार्मिक गोष्टींत आपण बिलकूल ढवळाढवळ करणार

नाहीं.' याचा अर्थ असा कीं जर एखाद्यानें मुसलमान समाजांतील मशीद आपल्या देवघरांत आणण्याचा प्रयत्न केला तर त्याला जे कोणी विरोध करतील त्यांची बाजू सरकार पूर्णपणें उचलून धरेल; कारण पुष्कळसे लोक त्यामुळें 'धर्म बुडाला' म्हणून ओरड करतीलच करतील! आधीं ही कल्पना कितीही सुधारक हिंदू असला तरी ती त्याला पटणार नाहीं आणि एखाद्याला पटली तरी 'जो वर चढेल त्याला खालीं पाडलेंच पाहिजे' या हिंदूंच्या आजकालच्या नियमाप्रमाणें ती कधींही मूर्त स्वरूपास येणार नाहीं.

प्रो. विनोदांनीं हिंदू या शब्दाची केलेली व्याख्या तर अप्रतीम आहे. ते म्हणतात कीं, 'जो एकच ग्रंथाचा दुरभिमान धरीत नाहीं, जो शास्त्रांतील वचनापेक्षांही अधिक कांहीं करूं शकतो तो हिंदू.' किती योग्य कल्पना! पण ही व्याख्या शंकराचार्यांनंतर बहुतेक लोप पावली असली पाहिजे; कारण पूर्वींच्या लोकांनीं जर दुरभिमान धरला नसता तर इतके हजारो कोट्यावधि लोक बाटलेच नसते!

## गंगाणी

ता. १७-५-१९४१

तर इकडे गंमत पहा! बाबासाहेब देशपांडे अजुनी शेंडी शेंडी म्हणून ओरडतात व दुरभिमान धरतात! काल विनोद म्हणाले कीं, 'ख्रिश्चन हा धर्म आहे, कारण ख्रिश्चन बायबलाबाहेर जायचा नाहीं. कोठल्याही ख्रिश्चनाची बायबल मान्य नाहीं, असें म्हणण्याची प्राज्ञा नाहीं. हीच गोष्ट मुसलमानांच्या कुराणा-बाबतही आहे. पण हिंदूंना पहा, शास्त्रानें सांगितलें आहे कीं, अमूक अमूक मर्यादा ही ओलांडतां आली तर तो श्रेष्ठतम पुरुष मानावा. याकारणानें एखाद्या ख्रिश्चनानें आपल्या बायबलाबद्दल अभिमान सोडला तर तो तत्काळ हिंदूच होतो, त्याचप्रमाणें एखाद्या मुसलमानानें आपल्या कुराणाबद्दलचा दुरभिमान सोडला तर तोही हिंदूच होतो.' पहा ही हिंदुधर्माची विस्तृत व्याख्या! म्हणजे कोणीही मनुष्य आजकालच्या दिवसांतदेखील हिंदुधर्म सोडून बाहेर

जाणें अशक्य आहे, unless he prefers the Christianism to Hinduism by learning the various books. याविरुद्ध बाबासाहेबांचा शेंडीबद्दल वृथाभिमान पहा ! गोष्ट खरी आहे कीं हजारों लाखों कोट्यावधि माणसांनीं आपली शेंडी व जानवें राखण्यासाठीं प्राणार्पण केलें पण एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, जसजसा अधिकाधिक काळ जात जातो, तसतसें आपण 'पुढच्यांना ठेंच मागचा शाहणा' या म्हणीप्रमाणें अधिक अधिक शाहणे होत जातों; आणि याच अर्थाची Child is the father of man ही इंग्लिशमध्यें म्हण आहे.

प्राचीन काळीं शेंडी व जानवें ह्यांबद्दल वृथाभिमान धरून हिंदूंनीं किती नुकसान करून घेतलें, हें आपल्याला माहीत आहे. पण त्याच वेळीं प्रो. विनोदांनीं हिंदूची व्याख्या केली, ती जर सर्वांना मुखोद्गत असती तर? तर हिंदूंचा छळही झाला नसता व मुसलमानांचें राज्यही टिकलें नसतें. आतां आम्ही शाहणे झालों आहोंत. हिंदुधर्माची व्याप्त व्याख्या आम्हाला उमजायला लागली आहे, कोठल्याही मुसलमानाच्या घरीं जाऊन पाणी प्यालों तरी आम्ही हिंदू ते हिंदूच. आम्ही स्नान–संध्या केली नाहीं, अगर अभक्ष्य-भक्षण केलें, तरी आम्ही ब्राम्हण ते ब्राम्हणच, इतपत आमची मजल गेली आहे. मग ह्या परिस्थितींत शेंडी, शेंडी म्हणून वृथाभिमान कां धरावा? वेळ बदलली आहे, काळ बदलत आहे, त्याप्रमाणें आपणही बदलत गेलेंच पाहिजे. खरें म्हणाल तर अति प्राचीन काळची चातुर्वर्ण्य-व्यवस्था अत्यंत उत्तम- जात ही जन्मानें न ठरवितां त्याच्या त्याच्या व्यवसायावरूनच ठरवावी ! आणि हीच स्थिति पुढें हळूहळू उत्पन्न होणार आहे. आज कांहीं लोक आपणांस ब्राम्हण समजतात. कारण त्यांचे वाडवडील संध्यादि कर्मे करीत होते. पण आणखी तीन पिढ्यांनीं ते ब्राह्मण आहेत, असा त्यांना आधार तरी काढून दाखवावा लागेल, अगर ही वर्ण-व्यवस्था बदलून जाऊन भगवन्तांनीं सांगितल्याप्रमाणें 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्म–विभागशः' अशी परिस्थिति प्राप्त होईल. मग कोणी सांगावें कीं, मुसलमान व ख्रिश्चन या जातीच राहतील कीं प्रो. विनोदांच्या व्याख्यानाप्रमाणें ते हिंदूच होतील ?

आजदेखील मागील प्रोग्रामप्रमाणें आम्ही गंगाणीला फार लवकर येऊन पोहोंचलों. कारण अंतर ७ मैल व रस्ता सोपा आणि आजदेखील कांहीं विशेष वाटले तेवढेच फोटो घेतले.

## " अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा, हिमालयो नाम नगाधिराजः "

ही ओळ मी प्रथम प्रथम डायरीच्या प्रत्येक पानावर लिहिली पण पुढें कंटाळा आला, त्या ओळीचा मी आज थोडाबहुत अर्थ लावणार आहे म्हणा. अगर त्याबद्दल सांगणार आहे म्हणा आणि पुढेंही जर याच ओळींत अधिक गर्भितार्थ निघेल, असें मला वाटलें तर पुन्हां एकदां अर्थ सांगेन.

आधीं हिमालय हा नगाधिराज आहे, याबद्दल कोणाचेंही दुमत असणेंच संभवनीय नाहीं. कारण कोठल्याही पर्वताच्या शिखरापेक्षां या पर्वताचें शिखर उंच आहे. जगांतील अत्युच्च पठार, हिमालयाचेंच आहे. जगांतील सर्व तऱ्हेच्या हवा व थंडी हिमालयावर आहेत, त्यामुळें जगांतील सर्व तऱ्हेचीं झाडें हिमालयाच्या निरनिराळ्या उतरणीवर येऊं शकतात. अमेरिकेंतल्या एखाद्या पर्वताची लांबी हिमालयापेक्षां अधिक असूं शकेल. परंतु हिमालयाची लांबीही फार आहे, रुंदीही पुष्कळ आहे, आणि उंचीही अत्युच्च आहे. तेव्हां हिमालय हा नगाधिराज आहे, याबद्दल कोणाचेंही दुमत होणार नाहीं.

हिंदुस्थानापुरताच विचार केला तर पहा ना, आमचा सह्याद्रि. हजार फूट उंचीचे डोंगर म्हणजे बोटांवर मोजण्याइतके असायचे, तर येथें डोंगर हजार फूट आहे म्हणजे कांहींच नाहीं. सिलक्यारा ते गंगाणीपर्यन्त पहा कीं ३५०० फूट डोंगर चढलों. ही कल्पनाही सह्याद्रीकडील माणसास यायची नाहीं आणि पुढेंही आपण उंच्या पहा म्हणजे टेकडीची सर्वसाधारण उंची किती असते, याची पुरेपूर कल्पना येईल. ज्याप्रमाणें इकडे डोंगर उंच, त्याप्रमाणें दऱ्याही भयंकर, त्याप्रमाणें झाडेंही उंचच उंच व निरनिराळ्या तऱ्हेचीं मी येथें एकच झाड नमूद करून ठेवतों. त्याला विंचवाचें झाड अगर ' बिच्छूक पेड ' म्हणतात. या झाडाच्या पानाला हात लावीपर्यन्त अवकाश कीं जो भा

झाडाला लागला असेल त्या भागांत विंचू डसल्यासारख्या वेदना होतात आणि तेंही अगदीं शक्य आहे. ( मी तो प्रयोग अजून करून पाहिला नाहीं. पण सर्वच लोक असें सांगतात, त्याअर्थी त्यावर विश्वास ठेवायला बिलकूल हरकत नाहीं. ) कारण त्या सर्व झाडांवर बारीक कुसळांसारखे अनंत कांटे असतात. त्यांच्या फांद्यांनाच अशीं कुसळें असतात, असें नव्हे तर त्यांच्या पानांच्या शिरांवर मागून व पुढून असंख्य कुसळें असतात. त्याप्रमाणें त्यांच्या पानाच्या कडानादेखील कुसळें असतात. असल्या कुसळांनीं भरलेल्या झाडाला व पानाला हात लागला असतां त्यामुळें कुसळें टोंचून वेदना झाल्यास त्यांत विशेष काय ?


कमल बहुतेक बदरीनाथ, नारायणाला येणार नाहीं असें वाटतें. कारण ती. सौ. आई कमलबद्दल जबाबदारी घेण्यास मुळींच तयार नाहींत. आणि सरळच आहे. तिनें जम्नोत्रीला कुडकुडून गारठून त्यांना चांगली भीति दाखविली. तेव्हां त्यांचें म्हणणें असें कीं, ती जर येणार असली तर तिनें मी आपल्या स्वतःच्या जबाबदारीवर जात आहें, असें लिहून द्यावें, म्हणजे मावशी कांहीं बोलणार नाहीं. कारण बदरीकेदारला थंडी बरीच असते म्हणे ! आणि पाऊस सुरू झाला म्हणजे तर थंडी विचारूं नका. आणि असली थंडी जर कमलला बाधली तर त्याची जबाबदारी कोणी घ्यायची ? हल्लीं आमच्याबरोबर डॉक्टर आहेत, म्हणून सर्व ठीक आहे. पण बदरीकेदार, नारायणाला डॉक्टर नाहीत आणि एकदम तिच्या पोटांत दुखायला लागलें तर पुढें काय करायचें ? पण कदाचित् ती. सौ. आईनीं तिला दंडी करून दिली तर ती येऊंही शकेल. पाहूं पुढें काय काय होतें तें.

आतां उद्यापासून निरनिराळे मुक्काम सुरू होणार. उद्यांपासून पुन्हां बॅरोमेट्रिक रीडिंग्ज् घ्यायला सुरवात केली पाहिजे.

प्रवासांत असतांना प्रत्येकाची सोय घरच्याप्रमाणें होणें अशक्य असतें, हें प्रत्येकानें लक्षांत ठेवलें पाहिजे, प्रत्येकानें आपली गैरसोय झाली तरी चालेल, पण दुसऱ्याला होईल तों सुख देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. म्हणजे प्रवास सुखाचा होतो.



[चित्र सं. १७] गंगणानीकडे जातांना एका कड्यावरून उतरणारें पाणी (पृ. सं. ७२)




[चित्र सं. १ : ] गंगेवरील उंच कडे संपल्यावर दिसणारा बर्फाचा पहाड (पृ. सं. ७८)



चित्र सं. १९

सुकीवरून दिसणारा बर्फाचा पहाड ( पृ. सं. ८० )



चित्र सं. २०

हर्सिलकडे जातांजातां आम्हाला गंगेचें अति विस्तीर्ण पात्र दिसलें (पृ. सं. ८१)

त्याचप्रमाणें उद्यां दादा, त्याची बायको, त्यांचा नातू व आणखी एक बाई ह्या थेट मसूरीस जाणार आहेत. कारण दादांची प्रकृति उंच ठिकाणीं गेल्यावर एकदम खराब होते. ( मला वाटतें त्यांना दम्याचा विकार असावा. ) जम्नोत्रीस गेलों असतां त्यांना सारखा श्वास लागत असे. तेव्हां त्यांनीं आपला शहाणपणा करून आपल्या परतीच्या प्रवासास जम्नोत्रीपासून सुरवात केली. डॉक्टर श्रीखंडे व शास्त्रीबुवादेखील जाण्याचा बेत करीत होते. मी त्यांना पुष्कळ सांगून पाहिलें. परंतु त्यांचें म्हणणे आपलें एक कीं, 'आम्ही हिमालय पर्वत पाहिला. त्याचीं बर्फाच्छादित शिखरें पाहिलीं, मोठमोठे कडे पाहिले, खोल खोल दऱ्याही पाहिल्या. गंगोत्रीस ह्यापेक्षां अधिक काय असणार? बर्फ पाहण्याची हौस तर आमची फिटून गेली. बरें, शास्त्रीबुवांना एक दिवस दिल्ली, एक दिवस आग्रा, मथुरा, ग्वाल्हेर वगैरे स्थानें पहायचीं आहेत, व होईल तितक्या लवकर म्हणजे पांच जूनच्या सुमारासच कोल्हापूरला जायचें आहे. तेव्हां आम्ही आपले दादा पारध्यांच्या बरोबरच परत जातों.' पण आज बाबासाहेब देशपांडे यांनीं प्रवचनांत त्यांना असें झाडलें आहे कीं, शेवटीं त्यांनीं परत जाण्याचा बेत रहित केला. आमचें म्हणणें शेवटचेंच कीं, There will be so many trips and trips together, but it will not be possible to have such a good company always: बाबासाहेब देशपांडे, नानासाहेब चापेकर, श्री. विनोद, नानासाहेब आठवले, काळे वगैरे वगैरे.

## शिदोटी

ता. १८-५-१९४१

रात्रीं पलंगावर झोपूनसुद्धां भयंकर पिसवा चावल्या. एकंदरींत गंगाणीला पिसवा फारच दिसतात. शेवटीं त्रासून त्रासून मी ३ तीन वाजतां उठलों आणि आज पहाटेच नमस्कार घालून टाकले. आज खालीलप्रमाणें उंच्या मोजल्या– गंगाणी ४१९०, तेथून गंगोत्रीस एक व जम्नोत्रीस वाट फुटते तो टप्पा ४४८०, ५०७०, ५११०, ५४३०, ६११०, ६७८०, ७३१०, ७५५०, ६८५०, शिदोटी ४८८०.

आज गंगाणीहून जी चढाला सुरवात झाली, तो ५११० फुटांपर्यन्त हळूहळू पण सारखा चढ होता. पण ६११० नंतर जी खडया चढास सुरवात झाली, ती कांहीं विचारूं नका. मी सपाट्यानें ६७८० गाठले. चढ मला अगदीं मनापासून आवडला. परंतु जोरानें चढ चढल्याकारणानें घामानें सदरा भिजला, त्यावरील कोट भिजला व शेवटीं वरील रेनकोटदेखील भिजला. पाऊस पडत होता म्हणून रेनकोट घातला नसून, पाऊस पडेल या भीतीनें रेनकोट घातला होता.

आज ती. बाबा म्हणाले कीं, 'पंडितजी हिमालयांत हवा फार स्वच्छ असल्याकारणानें दूरचा डोंगर जवळ दिसतो, असें म्हणतात हें साफ खोटें आहे.' पण मी त्यांना सांगितलें कीं, हिमालयांत हिवाळ्यांत हवा फार स्वच्छ असते. कारण आम्ही हरिद्वारहून जेव्हा बर्फाचीं शिखरें पाहिलीं होतीं, त्या वेळीं तीं शिखरें किती जवळ दिसत होतीं म्हणून सांगूं ! शिवाय आणखी एक कारण आहे. आजच पहा ना, ६७८० वरील टप्प्यावरून ज्या टोकावरून आम्हाला जायचें होतें, तें टोंक आम्हाला स्पष्ट दिसत होतें. मी तेथें थोडें थांबतों तोंच गोलिवडेकर मास्तर आले. तेव्हां मी सहज त्यांना विचारलें कीं, 'वरील टोंक अजून किती उंच असेल' म्हणून. तर त्यांनीं सहज उत्तर दिलें कीं असेल २०० फूट अधिक. पण आम्ही ७५५० फुटापर्यन्त चढलों, असें मी मागें सांगितलेंच आहे. म्हणजे आम्ही टप्प्यापासून सुमारें ८०० फूट वर चढलों.

आम्हाला महाराष्ट्रीय लोकांची सह्याद्रीचीं टोकें पाहून पाहून दृष्टीच आकुंचित झालेली असते; पुष्कळसे वर आल्यानंतर वर आणखी एखादी टेकडी दिसली तर त्याला आपण शें दोनशें फुटांपेक्षां अधिक वर कधींच चढवीत नाहीं. आणि त्याच दृष्टीनें आपण येथेंही पाहतों. त्यामुळें एखादी टेकडी जरी आठशें–हजार फूट असली तरी आपण २–३ शें फूटच तिला समजतों; म्हणजेच टेकडी आहे त्या अन्तरापेक्षां जवळ आहे, असें आपण गृहीत धरून चालतों. हीच गोष्ट आकाश अतिशय स्वच्छ असतां अधिकच प्रमाणांत नाहीं का भासायची ? म्हणजेच दूर असलेला डोंगर जवळच आहे असें नाहीं का भासायचें ? तेव्हां पंडितजी म्हणतात, तें अगदींच खोटें आहे, असें म्हणण्यास मी बिलकूल तयार नाहीं.

जम्नोत्रीच्या प्रवासाचे वेळीं फक्त एकच बर्फाच्छादित डोंगर व त्यावरून यमुनेचा उगम स्पष्ट दिसला. पण मला जरी वाटलें कीं ती टेकडी चार पांचशें फुटांपेक्षां अधिक नसावी म्हणून; तरी ती हजार फुटांपेक्षां कमी नसावी, अशी माझी खात्री आहे. माझी इच्छा होती कीं, ती टेकडी चढून जावें म्हणून. पण आमचें बॅरोमिटर १०००० लाच बंद पडलें होतें, हें एक व दुसरें सबंध दुपारभर पाऊस पडत होता म्हणून मी ती कल्पना सोडून दिली.

आणि ७५५० पासून जी खडी उतरण आहे, ती थेट शिदोटीपर्यन्त. आम्ही हिमालयाचा कडाच उतरत होतों. त्यामुळें नागमोडी नागमोडी व घाटासारखीं एका-खालीं एक वळणें होतीं. म्हणजे जितक्या चढीनें चढलों, त्यापेक्षांही ही उतरण भयंकर होती, त्यांत शंका नाहीं.

आज पण हिमालयाचें सौन्दर्य कांहीं और व जम्नोत्रीच्या रस्त्यापेक्षां अगदीं निराळें होतें. जम्नोत्रीकडे पहावें तों तेथें सगळीं उंच उंच व काडयांचीं, चिडांचीं झाडें, अगदीं शंकूच्या आकाराचीं देवदाराचीं झाडें, तर इकडे गर्द अंधकार पडावा असें निबिड अरण्य ! आजचा सगळा रस्ताच मुळीं अरण्यांतून होता आणि या अरण्यामुळें सर्व पर्वतच्या पर्वत हिरवागार दिसत होता. मग त्या हिरव्या रंगांत निरनिराळे हिरवे होते ते निराळे. ही झाडी इतकी दाट होती कीं, त्यापुढें महाबळे-श्वराची झाडी अगदींच फिक्की. त्यामुळें आज रस्त्यानें जातांना आम्ही एखाद्या अरण्यां तून पाऊल–रस्त्यानें जात आहोंत, असें वाटत होतें. ( येथील रस्ते चार पांच फुटांपेक्षां अधिक रुंद नसल्यानें आपल्याकडील लोकांना हा पाऊल-रस्ता वाटणें अधिक साहजिक आहे. ) त्या रस्त्यानें जातांना मला सारखें महाबळेश्वराला ती. सौ. आईनीं दाट झाडींतून पाऊल–रस्त्यानें जाऊं नकोस म्हणून सांगितल्याची आठवण होत असे. अर्थात् या दाट झाडीमुळें आजूबाजूच्या खोल दऱ्या अगर पर्वतांवरील ओघळ मुळींच दिसत नव्हते; उतरणीच्या बाजूला मात्र इतकी दाट झाडी मुळींच नव्हती.

आज दुपारीं बाबांचें ' फिजिकल कल्चर ' वर व्याख्यान झालें व प्रो. विनोदांचें प्रवचन झालें. प्रो. विनोदांनीं एकच मुद्दा मांडला कीं, " प्राणो मृत्युः " ही गोष्ट खरी असेल, मरणाचे वेळीं शांति असावी, हेंही खरें आहे. पण त्या मरणामुळें आजूबाजूच्या

मृतांवर प्रेम करणाऱ्यांनींदेखील शोक करूं नये, हें पटत नाहीं. कारण हें फक्त ज्यानें आध्यात्मिक उन्नति करून घेतली असेल, त्यालाच शक्य आहे आणि कोणीही तत्त्वज्ञ असें म्हणणार नाहीं कीं, शंभरांपैकीं शंभर लोकांनीं आत्मोन्नति करून घ्यावी व तत्त्वज्ञ व्हावें. अर्थात् शोक करूं नये, हें तत्त्वज्ञान ठीक आहे. परंतु व्यावहारिक नाहीं आणि मला आठवतें कीं, प्रो. विनोद म्हणाले, 'आपण रडत जन्माला येतों व आजूबाजूच्या माणसांना हंसवितों; उलट मरणाच्या वेळीं आपण हंसत मरावें व आजूबाजूच्या लोकांना रडवावें.' आणि हेंच तत्त्वज्ञान फार चांगलें व रावापासून रंकापर्यन्त अनुकरणीय आहे, असें मला वाटतें.

हो ! परवांच्या डायरींत एक महत्वाची गोष्ट लिहायला विसरलों. मी सांगितलें होतें कीं, हनुमानचट्टीजवळ दोन नद्यांचा संगम आहे म्हणून आणि हनुमानचट्टी एका नदीच्या कांठावर आहे म्हणून. तर हनुमानचट्टीवरून निघतांना मी त्याबद्दल तपास केला, तेव्हां मला कळलें कीं, त्या नदीचें नांव हनुमान नदी व तिच्या कांठावर ही चट्टी म्हणून हीं हनुमानचट्टी. हनुमान नदी चट्टीपासून सुमारें फर्लांगावर यमुना नदीला जाऊन मिळते आणि तें गार पाण्याचें स्नान हनुमान नदींतीलच.

## उत्तर-काशी

**ता. १९-५-१९४१**

आज जो शिदोटीपासून उतार सुरू झाला, तो थेट गंगानदीच्या कांठीं येई-पर्यन्त. आज खालीलप्रमाणें उंच्या मोजल्या—शिदोटी ४९००, ४६००, ३५४०, (येथून सुमारें चाळीस फूट खोलीवरून गंगानदी वाहते.) ३७४० उत्तर काशी, ३७१० म्हणजे सुमारें पांच सहा मैल नुसती सपाटीच आहे चढ—उतार जवळ जवळ नाहींच. आता पहा आम्ही ७५५० फुटांपासून जे उतरलों, ते थेट ३५४० फुटांपर्यन्त उतरलों; म्हणजेच डोंगराची उंची सुमारें चार हजार फूट होती. पण डोंगर मात्र ४००० फूट उंच असेल, असें वाटत नाहीं.

आज सारखा उतार असल्यानें मी जवळ जवळ शेवटींच आलों. कारण माझा सपाटा चढावर ! मी आपला उतारावर सावकाशच चालतों बुवा !

आज येतां येतां कांहीं थोडेबहुत फोटो घेतले. कांहीं विशेष डोंगर वगैरे नाहीं, मग फोटो घ्यायचा कशाला ?

कालच प्रवचनाचे वेळीं ठरलें होतें कीं, आज उत्तरकाशीला बाजार वगैरे करायचा असल्यानें प्रवचन बंद !

विश्वेश्वराचें देऊळ व अकरा रुद्रांचें देऊळ हीं दोन देवळें येथें महत्त्वाचीं आहेत. विश्वेश्वराचें देऊळ अगदीं निराळ्या पद्धतीचें आहे व अकरा रुद्रांच्या देवळाची रचना अगदीं निराळी आहे. विश्वेश्वराचें देवळांत काशीच्या विश्वेश्वराच्या देवळाप्रमाणें तीर्थ घेण्याची जागा नाहीं. परंतु आम्ही प्रदक्षिणा करण्याचा प्रयत्न केला असतां ' मोरी ओलांडूं नका, ' म्हणून तेथील पुजाऱ्यांनीं हटकलें. अकरा रुद्रांच्या देवळांतील अकरा लिंगें निरनिराळ्या रंगांच्या दगडांचीं आहेत. वाटेल तेवढे निरनिराळ्या रंगांचे दगड येथें सांपडतात. मी वाटेनें येत असतां मला किती तरी रंगांच्या छटा असणारे दगड दिसले. जणूं संगमरवरी दगडांची खाणच आहे. असे पांढरे दगड व त्यांवर निरनिराळ्या आकृतींच्या छटा पण हीं लिंगें मात्र पांढऱ्या दगडांचीं मुळींच नाहींत. या देवळावर सोनेरी कळस आहे. त्यांत त्रिशूल, गदा, वगैरेंच्या (शिखरावर) आकृति आहेत. अकरा लिंगांच्या पाठीमागें पार्वतीचें देऊळ आहे, पण पुढें सिंह असल्यानें तें बहुधा लक्ष्मीचें देऊळ असावें. महादेवाच्या इतर सर्व देवळांप्रमाणें याही देवळांत कोट-टोपी घालून बेलाशक आंत जातां येतें.

आणि नानासाहेब चापेकरांनीं आपल्या प्रवचनांत सांगितलेंच आहे कीं, महादेव हा रानटी लोकांचा देव आहे म्हणून. आणि शंकराचें स्वरूप-वर्णन व त्याची हिमालयासारख्या दाट जंगल असलेल्या पर्वतावर राहण्याची पद्धत पाहिली म्हणजे हें अगदीं बरोबर पटतें; पण मी आणखीही पुढें जातों व असें म्हणतों कीं, शंकर हा हिमालयांतील रानटी जातींचा राजा होता. ज्याप्रमाणें आपल्याकडे आडनांव कायम तेंच असतें, त्याप्रमाणें शंकर हेंदेखील आडनांवाप्रमाणें अगर हुद्द्याप्रमाणें असावें आणि शंकराचार्यांनीं अगर दुसऱ्या कोणीतरी हा देव हिंदुधर्मात ओढून घेऊन किंवा वेदांतील रुद्रदेवता व ही शंकर देवता एकच

आहे, असें भासवून सर्व रानटी लोकांना हिंदू करून टाकलें. ( आणि संस्कृत नाटकांत राजाला देव म्हणून संबोधतात, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ) मी फक्त शंकर हाच हुद्दा असावा असें म्हणत नाहीं, तर विश्वामित्र, वसिष्ठ वगैरे सर्व हुद्देच असावेत, असें माझें म्हणणें आहे आणि हे लोक आपापलें ज्ञान आपल्या मुलांना, किंवा शिष्यांना देऊन त्यांना पूर्वपरंपरागत हुद्दा देत असत. आणि यामुळेंच हे ऋषिलोक एक हजार अगर दहा हजार वर्षें तप म्हणजे इतक्या वर्षांचें ज्ञान प्राप्त करून घेऊन मोठे होत असत. जितक्या वर्षांचा अनुभव अधिक तितका ऋषि मोठा !

ज्याप्रमाणें काशीला उत्तरवाहिनी गंगा आहे, ( असें बाबा सांगत होते ), त्याप्रमाणें येथेंही गंगा उत्तरवाहिनी आहे. ( असें म्हणतात आणि अशी कल्पना आहे; कारण उत्तर-काशीकडे येतांना मी आमच्याकडे येत असलेली गंगा पाहिली. पण त्यावेळीं दिशा कोणती आहे, तें पाहिलें नव्हतें आणि अजूनही मी पाहिलें नाहीं. उद्यां अर्थात् पहाटेस निघावयाचें असल्यानें पाहणेंही शक्य नाहीं.

इतक्या दिवसांत आजची धर्मशाळा उत्तम आणि राजशाही होती. मोठ-मोठया खोल्या, दोन्ही बाजूंना सपाटून गच्ची आणि शौचकूपदेखील होते. आजपर्यन्त पुणें सोडल्यापासून इतके चांगले शौचकूप आज पाहिले. हरिद्वारला घाणेरडे शौचकूप होते. बाकीच्या ठिकाणीं दगडधोंडे आणि नदीचा कांठच होता. तेहरींदेखील ! कारण आम्ही देवळांतच उतरलों होतों. पण शौचकुपांना कड्या-कोयंडे कोणच्या दृष्टीनें लावायचे असतात आणि त्याचा हेतु काय, हें त्यांना माहीत असावें, असें बिलकूल दिसत नाहीं.

आज बाजारांत गेल्यावर गोळ्या मोठया छान मिळाल्या आणि काळे भाऊ चापेकर यांना तशा मिळाल्या नाहींत आणि शिवाय महाग पडल्या, म्हणून ते अगदीं माझा हेवा करीत असतील. हे पहा- it is a chance, and one must have a luck to take it

# मणेरी

**ता. २०-५-१९४१**

आजचा आठ नऊ मैल रस्ता अगदीं सपाट, त्यांत चढउतार बिलकूल नाहींत. त्यामुळें चढतांना जी एक गम्मत वाटते, ती वाटली नाहीं व म्हणून मी आज सावकाश आणि रमतगमत आलों. आजचें बॅरोमेट्रिग रीडिंग्ज् उत्तरकाशी ३८००,४०७०, ४०००, ४१८०, मणेरी ४३००.


आज आम्ही सारखे नदीकांठानें येत होतों व संबंध रस्ताभर सारखा पाऊस पडत होता. त्यामुळें पुष्कळ वेळां डोंगरापुढें अगदीं चित्रणीय धुकें येऊन-देखील फोटो काढावासें वाटलें नाहीं. आज बाबांनीं छत्री असूं दे म्हणून सांगितलें आणि खरोखरींच पावसाळी पाऊस सुरू झल्याप्रमाणें सारखा पाऊस पडत होता. आम्ही प्रवास सुरूं केल्यापासून पावसानें अगदीं ठेका धरलाय बुवा! दररोज संध्याकाळीं गडगडतें व पाऊस पडतोच पडतो. आमची संध्याकाळीं पाऊस पडायला कांहींच हरकत नाहीं. कारण अजून आमचा संध्याकाळचा प्रवास सुरूच झाला नाहीं. परंतु आजच्यासारखा किंवा जम्नोत्रीस जातांना अगर तेथून परत येतांना सकाळीं पाऊस पडून जें पीडलें, तें मात्र बिलकूल पसंत नाहीं. पण पाऊस पडल्यामुळे येथील रहिवाशांचा फारच फायदा झाला म्हणतात. तीन वर्षांत म्हणे येथें वेळेवर पाऊस नाहीं, आणि आतां पाऊस पडतो, तो बाबांच्या पायाचा चांगला गुण असेंच हे लोक समजतात.

**अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा। हिमालयो नाम नगाधिराजः।**


अजुनि आपल्याला पहिल्या ओळीचा अर्थ लावावयाचाच आहे. आपण देवतात्मा शब्दाचा अर्थ पाहूं. देव हा शब्द 'दिव्' म्हणजे प्रकाशणें ह्या शब्दापासून झाला आहे. अर्थात् जो प्रकाशतो, आपल्या कीर्तीनें, आपल्या गुणांनीं जो प्रकाशत असतो, तो देव. याप्रमाणें सूर्याचे किरण एखाद्या पर्वतावर अगर गिरिशिखरावर पडले म्हणजे तो प्रकाशतो म्हणून तो देव. सह्याद्रि सूर्या-मुळें प्रकाशित होत असेल, तसाच चन्द्रप्रकाशानेंही प्रकाशित होत असेल; पण या हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरांवर जी एक चकाकी व चमक दृष्टोत्पत्तीस

येते, ती हिंदुस्थानांतील इतर पर्वतांवर दृष्टोत्पत्तीस येणेंच शक्य नाहीं. जगाच्या पाठिवर हिमाच्छादित शिखरें व प्रदेश पुष्कळ आहेत. त्यांतून अनेक नद्या वाहतात, पण गंगेसारखी लोकोपयोगी नदी जगांत नाहींच नाहीं. गंगायमुनादि नद्यांचें हा उगमस्थान असल्यानें हा पुन्हां चमकतो. आपल्या हिंदू लोकांनीं हिमालयांत ज्या ज्या ठिकाणीं वैशिष्ट्य दिसलें, ज्या ज्या ठिकाणीं अप्रतिम सृष्टिसौंदर्य पाहिलें, त्या त्या ठिकाणीं देव स्थापन करून देवळें बांधलीं आणि सर्वसामान्य माणसास सृष्टिसौन्दर्य पाहण्यास बोलावलें; पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, शेकडा नव्वद अगर अधिक माणसें फक्त देवभक्तीसाठीं जातात ! त्यांना सृष्टिसौन्दर्य म्हणजे काय व तें कशाशीं खातात, याची कल्पनाही नाहीं ! आतां कालची उत्तरकाशी ध्याना. तेथें उत्तरवाहिनी गंगा दिसली कीं लागलींच त्यांनीं तें देवस्थान कल्पून टाकलें ! जम्नोत्रीस उष्णोदक व यमुनेच्या उगमाचें गार पाणी एकदम पाहिलें कीं, लागलींच त्या ठिकाणीं देव स्थापन झाला. ( लक्षांत ठेवा, यापुढें ज्या ज्या वेळीं कांहीं दैदीप्यमान मला दिसेल. त्या त्या वेळीं मी वाचकांना देवतात्म्याची आठवण देईन. ज्या ज्या वेळीं उच्च व भव्य दिसेल, त्या त्या वेळीं नगाधिराजाची आठवण देईन. ) आणि अखेरीस किंवा आर्धींमधीं योग्य वेळेस हा सर्व प्रकाशमानाचा आत्मा कां समजला गेला, हेंही पाहूं आणि मग युरोपांत अगर अमेरिकेंत अगर उत्तर ध्रुवाकडे असलें सौन्दर्य दृष्टोत्पत्तीस येणें शक्य आहे काय, हेंही पाहूं.

आज येतांयेतां एका डोंगरमाथ्यावर बर्फ पडलेला आम्हांला दिसला. पण तो बर्फ डोक्यावरही नव्हता अगर कड्याकड्यावरही नव्हता; तर तो जवळ जवळ असलेल्या दऱ्यांतून पडलेला होता. एखाद्या काळ्या पडलेल्या घराच्या पत्र्यावर पारा ओतावा, त्याप्रमाणें तें दिसत होतें किंवा त्या म्हाताऱ्या पर्वतानें आपले थोडे थोडे असलेले पांढरे केस एखाद्या काळ्या जाकिटावर सोडलेले आहेत, असें वाटत होतें; किंवा एखाद्या म्हाताऱ्या बाईनें आपले पांढरे स्वच्छ केस विंचरून वाळविण्यासाठीं एका काळ्या रंगाच्या दगडावर सोडले आहेत, असें दिसत होतें ! एकंदरींत ती मजा कांहीं और दिसली, यांत शंका नाहीं.




[ चित्र सं. २१ ] गंगोत्रीस जातांना दिसणारीं देवदाराचीं झाडें व बर्फाचे पहाड (पृ. सं. ८२)



चित्र सं. २२
गोमुखाचा बर्फाचा पहाड ( पृ. सं. ८२ )



चित्र सं. २३
गंगोत्रीस जातांना दिसणारी झाडी व बर्फाचे पहाड. ( पृ. सं. ८२ )



चित्र सं. २४
गंगोत्रीस जातांना दिसणारा बर्फाचा डोंगर ( पृ. सं. ८२ )

पण पाऊस पडत होता, त्याऐवजीं लक्ख सूर्यप्रकाश पडला असता तर? तर त्या बटा सोन्याच्या दिसल्या असत्या! पण ज्या गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्या नाहींत, त्यांच्या कल्पना करण्यांत काय विशेष? पुन्हां केव्हां तरी चान्स येईल!

आज कोणीही प्रवचनास तयार नव्हतें; म्हणून बाबांनींच फिजिकल कल्चरवर प्रवचन दिलें आणि आज मंगळवार असल्यानें जेवणें लौकर होतीं, म्हणून बाबा अर्ध्या पाऊण तासापेक्षां अधिक बोलले नाहींत. पण संध्याकाळीं प्रोफेसर विनोदांच्या बरोबर आत्म्यावर गप्पा मारीत बसले होते. अर्थात् मनुष्याच्या देहांतील आत्मा, लिंग-देह वगैरे पुष्कळ गोष्टी निघाल्या होत्या. त्याचाच उत्तरार्ध म्हणजे भुतेंखेतेंही निघालीं होतीं. प्रो. विनोदांच्या मतें शेंकडा नव्याण्णव गोष्टी जरी खोट्या असल्या तरी शंभराव्या ठिकाणीं मात्र भूत हें असतेंच आणि ती एक योनि आहे. पण मला अजूनही खरें वाटत नाहीं. मी भुतांवर केव्हा विश्वास ठेवीन कीं जेव्हां माझ्या मेस्मेरिझम्च्या थिअरींत तें भूत बसणार नाहीं तेव्हां आणि माझी मेस्मेरिझम्ची थिअरी "**मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः।**" याच्यावर आधारलेली आहे. कोणीही मला एक तरी उदाहरण सांगावें कीं, तें माझ्या वरील थिअरींत बसणार नाहीं आणि मग मी भुतें आहेत, भुतांची एक निराळी योनि आहे, हें कबूल करीन.

काय गम्मत आहे पहा! आम्ही हरिद्वारपासून पाहतोंय्, पण आम्ही गंगानदी एकदांही ओलांडली नाहीं. हरिद्वारपासून गंगानदी जी उजव्या बाजूला आहे, ती अजूनही उजव्या बाजूलाच आहे. मला वाटतें, ज्यांनीं हा रस्ता आंखून ठेवला असेल, त्यांनीं यात्रेत तरी माणसानें गंगेसारखी पवित्र नदी ओलांडूं नये म्हणून, सारखा एकाच बाजूनें रस्ता काढून ठेवला असावा आणि थेट गंगोत्री-पर्यन्त जर हा रस्ता असाच गंगेच्या बाजूने गेला, तर माझ्या म्हणण्याला पुष्टीच होईल.

## भटवाडी

**ता. २१-५-१९४१**

आजदेखील येथें येईपर्यन्त आम्ही सारखे गंगेच्या कांठानें चालत होतो

आणि म्हणून चढउतार मुळींच नव्हते. गंगा उजव्या बाजूनें खळखळ वहात होती व तिला उजव्या बाजूला ठेऊन आम्ही चालत होतों आणि गंगा सारखी उजव्या बाजूला आहे, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. म्हणजे रस्ता करणाऱ्याची इच्छा सर्वत्र गंगेला उजवी ठेवावी, अशी दिसते. परंतु जोंपर्यन्त आम्ही गंगोत्रीस पोहोंचलों नाहीं, तोंपर्यंत ह्या केवळ कविकल्पनाच आहेत.

आज उंच्या फार कमी मोजल्या– मणेरी ४३८०, ४७८०, ४९१०, भटवाडी ५०५०, बस्स. कारण रस्ता अगदीं सारखा साधारण चढाचा असल्याकारणानें फारशा उंच्या मोजाव्यात, असें वाटलें नाहीं. गंमत काय होते, चढायच्या वेळेस उंच्या फार मोजल्या जातात, पण उताराच्या वेळीं अगर सपाट रस्त्यावर उंच्या इतक्या मोजल्या जात नाहींत; कारण आहे त्याला. चढायच्या वेळीं डोंगर समोर दिसत असतात, त्यांची अवर्णनीय शोभा दिसत असते, त्यामुळें वारंवार फोटो घ्यावेसे वाटतात आणि त्या वेळीं उंचीही मोजून ठेवावीशी वाटते किंवा आपणांला इतका घाम आला आहे, चढलों आहोंत तरी किती, म्हणून उंची घ्यावीशी वाटते, किंवा चढतां चढतां एकदम थोडीशी उतरण येते त्या वेळीं वाटतें कीं, आपण अगदीं उच्च स्थानावर तर नाहीं ना आलों ? घेऊन ठेवा कीं उंची, आणि म्हणून उंच्या घेतल्या जातात. उलट खडा उतार आला म्हणजे दृष्टि खालीं असते, एकच व्हॅली डोळ्यासमोर असते, उतरायचें किती याची नक्की कल्पना आलेली असते, म्हणून फोटोही कमी घेतले जातात व उंच्या मोजण्याचे प्रसंगही कमी येतात. ज्या ज्या वेळेला मी उंच्या मोजल्या, त्या वाचकांनीं जर नीट काळजीपूर्वक पाहिल्या तर त्यांना रस्त्याचे चढ–उतार हेसुद्धां लक्षांत येतील.

आज येतांना परांजप्यांबरोबर गप्पा मारीत आलों. आज माझा आवडता विषय ॲस्ट्रॉनॉमी यावर मी खूपच बोललों. त्यांनीं विचारलें, ' तारे पडतात म्हणजे काय ?' तर मी त्यांना सोलर सिस्टीम्वर सुमारें दोन अडीच तास चालत्तां चालतां व्याख्यान दिलें आणि त्यामुळें किती अंतर तोडलें गेलें, मध्यंतरीं एखादा फोटो-काढणीय देखावा गेला कीं काय, वगैरे कांहींएक लक्षांत आलें नाहीं. मोठ्याच

गमतींत एकंदर प्रवास झाला. आतां उद्यां जर असाच चान्स आला तर उद्यां स्टेलर सिस्टीमच्या गमती सांगूं.

हो, हो ! माझी डायरी म्हणजे बरीच सर्क्युलेट् होऊं लागली आहे. आणि बडे बडे लोकही वाचायला लागले आहेत. माझी कांहीं हरकत नाहीं म्हणा, पण ज्या कोणालाही वाचायची असेल त्यानें एवढेंच लक्षांत ठेवावें कीं, ही डायरी आहे. माझ्या इच्छेस जें वाटेल तें मी कोणाचीही भीडभाड न धरतां बेलाशक लिहिलें आहे आणि हें कांहीं लिखाण नव्हे. ही एक स्वतःच्या मनाची करमणूक आणि जें कोणी माझ्याबरोबर येऊं शकले नाहींत, i. e. those who know much of me, त्यांच्या करमणुकीसाठीं हें लिहिलें आहे. तेव्हां ज्या कोणाला ही वाचायची असेल, त्यांनीं ती माझ्या मनांत आलेल्या कल्पना म्हणून वाचावी. मी कांहीं बडा लेखक नाहीं कीं बडा वादविवादक नाहीं प्रत्येक मुद्दा बरोबर कळून घेऊन लिहायला ! आपली थोडीशी गंमत एवढेंच.

ह्या गंगानदीकडे पाहिलें म्हणजे मला वारंवार 'उथळ पाण्याला खळखळाट फार,' ह्या म्हणीची आठवण होते. कारण हरिद्वारपुढें कोठेंही पहा, गंगा आपला खळखळाट करून दगड-धोंड्यांतून वहात असते. मला मोठें आश्चर्य वाटतें कीं, ही गंगानदी इतकीं वर्षें खळखळाट करीत जोरांत वहात असतां एवढे मोठमोठे खडक ह्यामध्यें शिल्लक राहिले कसे ? कारण हिमालयाचा खडक तर अगदींच ठिसूळ. पण मग एकदम लक्षांत येतें कीं, हिमालय जर ठिसूळ तर दरवर्षी वरून धोंडे कशावरून गडगडत येत नसतील ? आणि थोड्या विचारांतीं हीच कल्पना जास्त सयुक्तिक दिसते. विचार करा कीं, नाहीं तर नदी इतकी उथळ असण्याचें कारण काय ? नदी उथळ आहे; कारण वारंवार बारंवार हिमालयावरून खालीं धोंडे येतात व जी कांहीं पाण्याच्या फोर्समुळें खोली झाली असेल, ती जागा भरून काढतात व शिवाय जागा आडवतात. आजच पहा ना, नदीच्या मुखाकडे पुष्कळ ठिकाणीं पात्र हरिद्वारच्या पात्रापेक्षांही रुंद दिसलें.

परवा कमलनें मला विचारलेंदेखील कीं, ' आपण मुखाकडे चाललों

*

आहों ना ? मग इथें पात्र इतकें रुंद कां दिसतें ? ' इतकें कांहीं कांहीं ठिकाणीं पात्र रुंद आहे आणि मागें रुंद व पुढें अरुंद व शिवाय मोठमोठे धोंडे पडून खोली कमी. ह्याच कारणानें गंगा इतक्या विलक्षण वेगानें वहात असावी, असें मला वाटतें. आज सकाळीं थोडे थोडे ढग दिसत होते. परंतु आम्ही पुढें आल्यावर आकाश स्वच्छ स्वच्छ होत जाऊन शेवटीं ऊन पडलें. तेव्हां तत्काळ मी चारपांच फोटो निरनिराळ्या ठिकाणचे घेऊन टाकले. आज दुपारीं मात्र गडगडून टिपींटिपी पावसाला सुरवात झाली. ज्याप्रमाणें काल येतांना आम्हाला थोडेसें बर्फ दिसलें, त्याप्रमाणें आजही येतां येतां एका उंच डोंगराच्या मागें पर्वत-शिखरांवर बर्फ पडलेलें आम्ही पाहिलें.

काल मणेरीला मी एक पाणचक्की पाहिली. एका जोरांत वाहणाऱ्या प्रवाहावर ती चाललेली होती. खालीं जवळजवळ तुळईइतकें जाड लाकूड दोन फूट लांब क्रॉसवाइझ् टाकून ती पाणचक्की तयार केली असावी. ( कारण खालील चक्की इतकी जोरांत फिरत होती कीं, त्याची नुसती जाडी दिसत होती पण ती उभी फिरते कीं आडवी फिरते, हें कळणेंदेखील अशक्य होतें. इतका तेथें अंधार होता आणि पाण्याचा फोर्सदेखील उभाही होता आणि आडवाही होता; कारण ती चक्की एका बगरेंतच बसविली होती. त्या पाणचक्कीच्या जोरावर वर एक जातें सारखे फिरत होतें.

उत्तरकाशीला येतांना व पुढेंही मी एक दोन दोऱ्यांचे पूल पाहिले. हा पूल एकच माणूस कसाबसा जाईल असा असून त्याला खालीं दोरखंड, तो अडकवायलाही दोरखंड व वरच्या बाजूलाही दोरखंड असतात. त्यामुळें पूल एकसारखा झोंके घेत असतो व म्हणून माणसाला खालीं दोरखंडावर पाय घसरूं नये म्हणून फार जपून चालावें लागतें. मी एक मनुष्य त्या पुलावरून जातांना पाहिला. किती काळजीपूर्वक पावलें टाकीत होता तो ! पण आज त्याच्याहीपेक्षां विलक्षण पूल बघितला. अर्थात् त्याला पूल म्हणणेंदेखील धाष्ट्यांचें आहे. एका कडेवरून दुसऱ्या कडेला एक जाडशी तार बांधली होती; आणि त्यावर एक हुक होता. त्या हुकला करंडी बांधायची आणि त्यांत प्रवाशानें

बसायचें व मग एका माणसानें ती करंडी एका टोकाकडून दुसऱ्या टोकाला ओढून घ्यायची! आहे कीं नाहीं गंमत ?

आज सकाळीं आंघोळीला नदीवर गेलों होतों, त्या वेळीं काय गम्मत दिसली म्हणून सांगूं ? मला पुष्कळ वेळ बघूनदेखील त्या देखाव्याचा कंटाळा आला नाहीं. आणि असें म्हणतात कीं, ' समुद्राच्या लाटा आपटतांना पहात असतां कधींही कंटाळा येत नाहीं. ' त्याप्रमाणें येथेंही एका मागोमाग एक लाटा येत होत्या आणि त्या प्रवाहांत असा कांहींएक दगड सांपडला होता म्हणून सांगूं कीं त्या धोंड्यानें पाण्याचा खळखळाट न होतां पाणी दगडावरून इतक्या झिरमिरीत तऱ्हेनें खालीं पडत होतें कीं गंगेचें पांढरें पाणीदेखील काळ्या पाण्यासारखें पारदर्शक आहे, असें वाटत होतें, तर त्याच्याच दुसऱ्या बाजूनें पाणी एकदम एका खड्ड्यांत शिरून वर उफाळत होतें. या दोहोंचें कॉम्बिनेशन मिळून देखावा फारच सुरेख दिसत होता. तें त्या धोंड्यावरून पाण्याचें पडणें आणि इतक्यांत एखादी बारीकशी लाट आल्यानें त्या धोंड्यावरील कांहीं पाणी थोडें हलून पांढरट होणें आणि ती लाट निघून जाऊन जों त्या दगडावरून पातळ पाणी पडतें, तोंच दुसरी लाट येणें, हें दृश्य मला फारच आल्हाददायक दिसलें.

एकंदरींत बाबासाहेबांनीं मी त्यांच्यावर केलेली टीका वाचली म्हणायची. ते दुपारीं म्हणत होते कीं, त्यांनीं शेंडीबद्दल जें सांगितलें तें पूर्वसंस्कृतीचा अभिमान ठेवावा, या दृष्टीनें सांगितलें; आणि मीही त्यांना हें मला पटलें आहे म्हणून सांगितले. पण मी लिहिलेल्या गोष्टीबद्दल फार वाद घालावा, हें मला बिलकूल पसंत नाहीं. ज्याप्रमाणे त्यांनीं त्यांचें मत सांगितलें, त्याप्रमाणें माझें मत मी लिहून ठेवलें, यांत चूक काय झाली ?

आज संध्याकाळीं प्रवचन झालें नाहींच; पण बाबा इतर लोकांबरोबर एका खोलींत गप्पाच मारीत बसले होते. तीच आज संध्याकाळची करमणूक. त्याच्या आधीं शास्त्रीबुवा व नानासाहेब हिंदू-संस्कृतीबद्दल ब्राम्हण म्हणजे कोणाला म्हणावें, त्यांच्या श्रुति, स्मृति म्हणजे काय व त्यांतील वचनें कोण कोण पाळतात, वगैरे गोष्टींवर वादविवाद घालीत बसले होते. तेंही मोठें

करमणुकीचें होतें. ह्या युद्धांत कोट्यावधि माणसें मृत्युमुखीं पडल्यावर शूद्रांच्या स्त्रिया मुसलमान होऊं नयेत, म्हणून काय करावें, यावर नानासाहेबांनीं एक युक्ति सांगितली कीं, ब्राम्हणांनीं चार चार बायका कराव्यात व त्या शूद्रांतील कराव्यात. युक्ति बिनतोड आहे, यांत शंकाच नाहीं. पण ' प्रथम मांजराच्या गळ्यांत घांट कोणी बांधावी, ' हा प्रश्न आहे. नानासाहेब पुष्कळ म्हणतात कीं, ब्रम्हवेत्त्याची योग्यता फार मोठी असते आणि तो कालपरिस्थितीस योग्य असेल तें सांगतो व बाकीचे लोक तें ऐकतात. मला बाकीच्या गोष्टी जरी पटल्या तरी बाकीचे लोक तें ऐकतात, हें मला मुळींच पटणार नाहीं; कारण आजची परिस्थिति अशी आहे कीं, प्रत्येकाचा स्वतंत्र पक्ष आहे, कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं. एवढे मोठे शंकराचार्य पण त्यांनादेखील मूर्ख म्हणणारे लोक हिंदुस्थानांत आहेत. फार काय, एखाद्यानें एखादा चांगला उद्योग काढला तर त्याला होईल तितकें खालीं कसें ओढावें, हा प्रयत्न करणारीं माणसें आहेत ! मग कोण विचारतो ब्रम्हावित् आहे कीं आणखी कोणी आहे ? त्याला एकच गोष्ट पाहिजे आणि ती म्हणजे जबरदस्त दंडुकेशाही, किंवा हिटलरशाही. पण जाऊं द्या त्या गोष्टी.

आज दोन दिवस झाले, आम्ही चांगले मोठे जवळ जवळ वीत दीड वीत लांब चपटे व काळेभोर असे सरडे पहात आलों आहों. ( चपटे म्हणजे आपल्या कडील सरडाचे पुढील पाय उंच असतात तर ह्या सरडाचे पाय पसरट असतात. त्यामुळें लांब व रुंद सरड असूनदेखील ते बसकट दिसतात. )

## गंगणानी

ता. २२-५-१९४१

आणि आज तर मी तीन सरडे एकदम पाहिले. बाकी इकडचे सरडे भारी धीट हं ! आम्ही सरळ काठी आपटत रस्त्यावरून गेलों, तरी ते फारसे हलले नाहींत. जम्नोत्रीला मला एकही सरडा सबंध रस्त्यानें दिसला नाहीं. पण इकडच्या बाजूला मात्र त्यांचा चांगलाच सुळसुळाट दिसत आहे. आज मी


पुढीलप्रमाणें उंच्या मोजल्या– भटवाडी ५१७०, ५४१०, ५६१०, ६०००, ५६१०, ५८३०, ६०१०, गंगणानी ६१४० वरील उंचीवरून एक चढ व एक उतरण होती, हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. पण चढही अगदीं खडा नव्हता, उतारही फारसा नव्हता. ग्रॅज्युअल चढ व उतरण होती.

दुसऱ्या ५६१० फुटांवर आम्ही गंगानदीवरचा पूल ओलांडला. तेव्हां लागलींच मी काल लिहिलेलें खरें आहे कीं काय, हें पाहण्यासाठीं दुसरा एकादा पडका रस्ता आहे कीं काय, हें बारीक दृष्टीनें पहात होतों. मी थोडा वेळ तपास केला, पण पुढें कंटाळलों आणि गंगेला उजवी ठेवणेचा प्रयत्न केला, म्हणून मी जें लिहिलें तें खोटें असेल, असें वाटूं लागलें. पण गंगणानीजवळ येतांना खरो-खरीच पलीकडील कांठाला एक पाऊल–रस्ता मला दिसला, पूर्वी तोच रस्ता असावा, पण तो जुना झाल्यानें मोडून गेला असेल. आणखीही कैक गंमती मी पलीकडील तीरावर पाहिल्या. एकदोन ठिकाणीं वरून कडाच्या कडा ढासळला होता आणि एवढ्याचमुळें तो रस्ता पडून गेला असावा व त्यामुळें गंगा ओलांडावी लागली असेल. पुलावरून गंगा ओलांडल्याबरोबर आम्हाला खडे खडक दिसले. त्यावेळीं वाटलें कीं, ह्यामधून रस्ता काढणें अशक्य आहे. पण गंगणानीजवळ आल्यावर ज्या वेळीं दुसरा पाऊल–रस्ता दिसला, त्या वेळीं रस्ता कदाचित् डोंगरावरून नेला असावा, असें वाटलें. बरें, गंगणानी गांवसुद्धां दुसऱ्या बाजूलाच आहे. ह्यावरून असें वाटतें कीं, गंगेला डावीकडे टाकून काढलेला रस्ता नवा असावा.

आणि हा नवा रस्तादेखील खडक फोडूनच तयार केला आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं खडक डाव्या बाजूला जवज जवळ जमिनीला टेकायला आले आहेत. आणखी दोन फूट जर आंतून रस्ता केला असता तर बोगदाच तयार झाला असता, इतका खडक पोखरला आहे. बरें, रस्ताही कांहीं चांगला नाहीं. गंगा ओलांडल्यापासून रस्त्यावर जे भयंकर धोंडे आहेत, ते कांहीं विचारूं नका. केत्येक ठिकाणीं ढासळलेल्या कड्यांवरूनच आपण जात आहोंत, असें वाटतें. रस्त्यावर नीट बघून काळजीपूर्वक पाऊल टाकणें भाग होतें. ह्या रस्त्यावर मात्र

जम्नोत्रीच्या रस्त्याची आठवण झाली. आज येतां येतां दोन देखावे फारच सुंदर दिसले. एक ओव्याचा होता. त्या ओव्याचें पाणी इतक्या सुंदर तऱ्हेनें वहात होतें कीं, मी तेथें उभा राहून मुद्दाम दोन मिनिटें घालविलीं. एका धोंड्या-वरून खळ्किनी पाणी खालीं पडून तें दुसऱ्या धोंड्यावरून झिरमिरीत होऊन खालीं पडत होतें आणि त्यांत लाटामागून लाटा येत होत्या. दुसऱ्या धोंड्यावरून पाणी जों पातळ होते, तोंच दुसरी लाट येऊन पुन्हां त्या धोंड्यावरून पांढऱ्या रेघा उत्पन्न करून ती स्वतःस हळुवार रीतीनें खालीं सोडीत होती. फारच उत्कृष्ट देखावा !! आणि दुसरा देखावा तर कांहीं औरच होता. एका उतरत्या कड्यावरून पाणी खालीं येत होतें. पण तो दगड इतका खडबडीत होता कीं,त्या पाण्यावर बुडबुडे तयार होऊन उतरणारा ओघ दुधासारखा पांढराफेक दिसत होता ! मला प्रथम शंका आली कीं, ह्या ओघळाचें पाणीच पांढरें असावें. पण तें खालीं आलें म्हणजे डबक्यांत पारदर्शकच दिसत होतें. त्यामुळें हे सर्व बुडबुडे असावेत, अशी मी कल्पना केली. हें दृश्यही मोठें चमत्कारिक दिसत होतें.


उत्तर-काशीजवळ उतरल्यापासून आतांपर्यन्त मी गंगेचा खळ्खळ् आवाज सारखा ऐकत आलों आहें. पण आज पूल ओलांडून थोडें पुढें गेल्या-बरोबर नदीची खोली वाढली होती आणि सारखा खळ्खळ् आवाज करणारी गंगा सूंऽऽ आवाज करीत वाहूं लागली. तें संथ पाणी पाहिल्याबरोबर मला मुंबईस येत असतांना लागणाऱ्या silent zone ची आठवण झाली. (मुंबईस येतांना दोन चार मैल आगगाडीचा खडखडाट मुळींच ऐकूं येईनासा होतो. त्या ठिकाणीं रेल्वे कंपनीनें निराळ्या तऱ्हेच्या रचनेचे रूळ घालून आगगाडी एकदम silent बनविली आहे. त्या silent zone शीं मी त्या वेळीं तुलना केली. हा silent zone सुमारें दीड फर्लांग होता. लागलींच पुन्हां गंगानदी-च्या खळखळाटास सुरवात झाली. तेहरीपासून इतक्या शांत प्रवाहानें वाहणारी गंगा मी आज पाहिली. असे silent zones पुढें ठिकठिकाणीं आहेत. अशा तऱ्हेनें नदीची शोभा पहात व आवाज काळजीपूर्वक ऐकत आणि निरनिराळे ओघळ काय काय गंमती दाखवितात तें पहात, त्या दगडादगडांच्या रस्त्या-



चित्र सं. २५
भागीरथी व जान्हवी या दोन नद्यांचा संगम. ( पृ. सं. ८३ )



चित्र सं. २६
गंगोत्री येथील गंगेचें देवालय ( पृ. सं. ८५ )



चित्र सं. २७
गंगोत्री येथील महादेवाचे देवळांतील शिवपार्वतीची मूर्ति. ( पृ. सं. ८५ )



चित्र सं. २८
हर्सिलहून दिसणारा बर्फाचा पहाड. ( पृ. सं. ९३ )

वरून मोठ्या काळजीपूर्वक ती चढत व उतरत होतों.

अगदीं गंगणानीजवळ सुमारें फर्लांग अंतरावर ऊन पाण्याचें एक कुंड आहे आणि त्या कुंडांत म्हणे बऱ्याच लोकांनीं स्नान केलें व ते फजीत पावले. कारण अंग पुसायच्या वेळीं कुंडाजवळ असलेल्या मोठ्या माशा त्यांना सपाटून डसल्या. कांहींच्या मतें त्या पाण्यांत असें एक द्रव्य आहे कीं, तें माशांना फार आवडतें आणि as soon as you come out of the pond, they try to eat that substance.

त्याच कुंडाच्या खालीं तें पाणी सुमारें दहा फूट उंचीवरून रस्त्याजवळ पडते. त्या ठिकाणीं बारक्या माशाचा थवाचा थवा आहे. आतां परत जातांना मी तें उष्ण कुंड मुद्दाम पाहणार आहें, त्या पाण्याची constituents काय असावीं, ते पाहणार आहें. आज मला पाहायला वेळ झाला नाहीं म्हणा, अगर मी कंटाळा केला म्हणा !

काल झालेल्या दोन महत्त्वाच्या गोष्टी सांगायचें विसरलों. एक म्हणजे माझ्या वॉटर-बॉटलमधील भांडें गंगेच्या ओघांत वाहून गेलें. झाली काय गंमत, मी बाबांच्यासाठीं पाणी आणायला गेलों व वॉटर-बॉटलही घेऊन गेलों. तांब्या धुतला, माझें भांडें धुतलें व एका खडकावर ठेवलें. तथून जों थोडासा वारा आला, तों तें गुरकन् खालीं ओघांत पडलें व पाहतां पाहतां बुडून गेलें. कांहीं इलाज नव्हता. मी आतां त्याच्यावर सावकाशीनें एक शोकगीत रचणार आहें. त्याची एक महत्त्वाची ओळही करून ठेवली आहे. ' गंगामाई ! सांगे, कोठें गेलें असेल तें भांडें ' हो, नाहीं तर आतांच जर वेळ घालविला तर डायरी लिहायचा माझा महत्त्वाचा वेळ फुकट जाईल !

दुसरी गोष्ट- काल संध्याकाळच्या जेवणाची. काल आमचें राहण्याचें ठिकाण व स्वयंपाक घर ह्यांत अंतर बरेंचसें होतें आणि एक चढणही होती. तेव्हां बाबांचें गप्पा मारणें झाल्यावर त्यांनीं सांगितलें कीं, स्वयंपाकघरांतच जेवा म्हणून. शेवटीं आम्ही स्वयंपाकघरावर असलेल्या जिन्याजवळील गच्चीवर बसलों. अहाहा ! काय गंमत सांगावी ? दोन बाजूला दोन माणसें शक्य तितकी कमी

जागा आडवूनदेखील, समोर वीतभर ताटल्या मावणें शक्य नव्हतें, मग वाढप्यानें पाऊल ठेवण्याची काय बाब! तेव्हां वाढायला लागलें कीं, सर्वांनीं आपल्या ताटल्या उचलायच्या व बाजूला करून वाढणाऱ्याला वाट द्यायची. माझी रवानगी तर अशा एका ठिकाणीं होती कीं, तेथें मीच अगदीं जेमतेम बसलों होतों. गंमत होती जेवणाची ती एक! 'यळकोट यळकोट' म्हणायचें काय तें राहिलें होतें. असो. आपण पुन्हां आजच्या महत्त्वाच्या गोष्टीकडे वळूं.

आज गंगणानीकडे येतांनाही थोडेंसें बर्फ दिसलें. जणू सृष्टिदेवीनें पर्वत-शिखरावर थोडे येथें, थोडें तेथें, असे मोतीच विखुरले आहेत! अशा बारक्या-बारक्या ठिपक्याप्रमाणें बर्फाचे ठिपके दिसत होते. किंवा कांहीं थोडा पारा जमिनीवर सांडला म्हणजे जसे ठिकठिकाणीं पाऱ्याचे गोळे दिसतात, तसा बर्फ पर्वतशिखरांवर विखुरला होता, किंवा सृष्टिदेवतेनें आपल्या बाळांच्या डोळ्यांना आल्हाद व्हावा व त्यांनीं मोठ्या हौसेने त्याचें टिप्पण करावें म्हणून मूठभर लाह्याच जणू तिनें फेंकल्या होत्या! काल तिनें लाह्या बऱ्याच आणलेल्या होत्या, तर आज मूठभर तरी आणल्या असतील कीं नाहीं कोण जाणे!

आज संध्याकाळीं प्यायला पाणी आणणेसाठीं नदीवर गेलों असतां बहुत मजा दिसली. मला आज फारच आश्चर्य वाटलें. गंगेच्या काठाला एवढा माशांचा थवाचा थवा मी आजच आंघोळीचे वेळीं पाहिला. पाय बुचकळून काढला कीं, पासरीभर माशा पायावर बसायच्या. पाणी आणायला आम्ही दुसऱ्याच ठिकाणीं गेलों होतों. पण तेथेंदेखील भरपूर माशा होत्या. आंघोळीच्या ठिकाणीं पासरीभर असल्यास येथें मापटेंभर होत्या एवढाच फरक! जेथें आम्ही पाणी आणायला गेलों होतों, तेथें नदींत एक दगड जणू लक्ष्मीपुढें बसलेल्या वाघाच्या आकाराप्रमाणें दिसत होता आणि काठावरील एका दगडाला तर माणूस सहज आंत जाईल, एवढें मोठें भोंक पडलें होतें. त्यांतून कमल आंत गेलीदेखील. आणि किती निरनिराळ्या रंगाचे धोंडे! मी तेथून कांहीं विशिष्ट आकारांचे व रंगांचे निदान पांच सात तरी धोंडे आणले. Wonderful हं!

इतके दिवस मेंढ्या थोड्याथोड्या दिसत होत्या व आमचा रस्ता आडवून

त्रास देत होत्या. पण आज तर एकामागून एक थवेच्या थवे त्या खडकाळ रस्त्यांत आम्ही असतांना येत होते आणि त्या अरुंद रस्त्यांत मला क्षणाक्षणाला मेंढी जाईपर्यंत थांबावें लागत होतें. असं पीडलंय् त्या रानमेंढ्यांनीं कीं, ' न भूतो न भविष्यति ! ' होय, एक महत्त्वाची गोष्ट सांगायला विसरलों. आपल्या इकडे मेंढ्याना हाकलायच्या वेळीं ' तिर्र् ' असा शब्द करतात, तर येथील मेंढपाळ ' श्वा ! श्वा ! ' असा उच्चार करीत होते.

आज उष्ण कुंडावर स्नान करायचें ह्या बेतानें मंडळींनीं प्रवचन बुडवायचा बेत आणला होता. परंतु शेवटीं साडेपांच वाजल्यानंतर बाबासाहेबांचें अर्धा पाऊण तास प्रवचन झालें. त्यांनीं सर्पगणस्थानापासून अफगाणिस्थान कसें बनलें व अर्व म्हणजे घोडा ह्यापासून अरबस्थान कसें बनलें, हें स्पष्ट करून सागितलें. माझी त्या कल्पनांना कांहींच हरकत नाहीं. परंतु उद्यां "आमच्या अफ् शब्दापासून तुमचा सर्प शब्द झाला आहे व अरबस्थानांतील घोडे म्हणूनच तुमचा अर्व शब्द झाला आहे." असें जर एखादा मुसलमान म्हणायला लागला तर त्यावर तुमचें काय उत्तर आहे ?

गोष्ट कबूल आहे कीं, हिंदू संस्कृति ही फार प्राचीन आहे, संस्कृत-भाषा ही फार प्राचीन भाषा आहे वगैरे !! पण माझें म्हणणें असें आहे कीं, तरीदेखील एखादा शब्द वेदापेक्षांही प्राचीन नसेल कशावरून ? प्राचीन हिंदूंना एक अत्यंत चांगली खोड होती. ज्याप्रमाणें लोकांचे देव त्यांनीं आत्मसात् करून टाकले, त्याप्रमाणें दुसऱ्या धर्माच्या भाषेचे शब्ददेखील त्यांनीं आपल्या भाषेत घातले !! त्याशिवाय का संस्कृत भाषेंत एकएका शब्दाला अनेक शब्द उत्पन्न झाले आहेत ? आपण पाण्याला दुसऱ्या कोठल्या शब्दानें संबोधतों, अगर दुसरी कोठलीही भाषा दुसऱ्या कोठल्या एखाद्या शब्दानें संबोधते ? पण संस्कृतमध्यें पहा, सबंध अमरकोशांत हजारों शब्द असे आहेत कीं, प्रत्येकाला दोनदोनच नव्हे तर तीन तीन, चार चार, दहा दहा प्रतिशब्द आहेत. कारण इतरांच्या भाषेंतील सर्व महत्त्वाचे शब्द व क्रियापदें त्यांनीं संस्कृतमध्यें घालून तीं नानातऱ्हेनें चालवून दाखविलीं व ' तुमच्या आमच्या भाषेंतसुद्धां फरक नाहीं '

असें इतर पंथीयांना भासवून त्यांना आर्यांत ओढून घेतलें.पण पुढें ही पद्धत सुटली. तशी संस्कृत हळूहळू विसरत जाऊन आतां ती फक्त पुस्तकांत राहिली.

आणि एवढ्याच दृष्टीनें माझें स्पष्ट मत असें आहे कीं, जे लोक 'मराठीचें शुद्धीकरण केलें पाहिजे' म्हणून ओरडतात, ते मराठीचा उलट घात करीत आहेत. तुम्ही फार झालें तर असें करा कीं, शुद्ध मराठीचे जे शब्द असतील ते प्रति-शब्द म्हणून डिक्शनरींत देऊन तो मराठी आहे, हें स्पष्ट दर्शवा व आपल्या पुस्तकांत जरुरींपुरता उपयोग करा! उगीच 'मराठी भ्रष्ट झाली आहे, भ्रष्ट झाली आहे,' असे ओरडण्यांत काय तात्पर्य?

## हर्सिल

ता. २३-५-१९४१

काल बाबांनीं सांगितलें होतें कीं, गंगणानीहून निघतांना प्रत्येकानें आपल्या बरोबर दोन तीन दशम्या घ्यायच्या, झुणका चटणी घ्यायची व ९ मैलांवर सुक्यास जाऊन खायच्या व नंतर सहा मैल चालून हर्सिल येथें येऊन मुक्काम करायचा. याप्रमाणें आज सुक्यास जेवण करून आम्ही दुपारीं येथें येऊन पोंचलों.

आज बहिर्दिशेला गेलों असतां ३॥ वाजायच्या सुमारास गंगणानीस, ज्य व्हॅलीमध्यें गंगा वाहते, तिकडे पिवळा फिकट प्रकाश पडलेला दृष्टीस पडला. त्याबरोबर मी एकदम आश्चर्यचकित झालों आणि विचार करूं लागलों कीं, हा पिवळा प्रकाश गंगानदींत कोणत्या कारणानें पडला असावा? मग कल्पना आली कीं, कदाचित् येथील पाण्यांत व हवेंत फॉस्फरस् किंवा सोडियम् किंवा पोटॅशियम् असावा आणि तो हवेमुळें किंवा पाण्यामुळें थोडा ज्वलन होऊन त्यामुळें हा प्रकाश पडला असावा आणि जसजसा काल सकाळच्या लहान व थोर माशांचा आणि जवळील उष्ण प्रवाहांचा मी विचार करूं लागलों तसतसें मला तें अधिकच खरें वाटूं लागलें. मग मी विचार केला कीं असें जर असेल तर ज्या ठिकाणाहून उष्ण पाण्याचा धबधबा पडतो आहे, तेथें प्रकाश अधिक असला पाहिजे आणि खरो-खरीच प्रकाश धबधब्याच्या बाजूला अधिक तेजस्वी होता आणि चट्टीच्या बाजूला

कमी कमी होत गेला होता !! पण त्या प्रकाशाचा डोंगरावर मागमूसही लागत नव्हता. ह्या प्रकाशाचें मी कितीतरी वेळां आश्चर्य करीत होतों आणि शेवटीं एकदां वाटलें कीं हा कदाचित् तिकडून येणाऱ्या प्रवाशांच्या हातांतील कंदिलां-चा प्रकाश पाण्यावर रिफ्लेक्ट् होऊन आल्यामुळें हा कदाचित पिवळसरपणा आला असेल. पण वेळ चारचा असल्यानें पहाट व्हायला लागली व तो पिवळा प्रकाश नाहींसा झाला. आणि थोड्याच वेळांत पुलाकडून तीन प्रवासी हातांत कंदील घेऊन येतांना मला दिसले !

आज लवकर उठल्यामुळें माझें लवकर आटोपलें व बाबांच्या मागून सुमारें २०-२५ मिनिटांनीं म्हणजे पांच वाजायच्या सुमारास मी बाहेर पडलों व अगदीं बेत करून सपाट्यानें चालायला लागलों. अर्थात् आजही ज्या ज्या ठिकाणीं उतरणीवर धोंडे असतील, त्या ठिकाणीं मी माझा वेग थोडा कमी करीत असें. मी गंगेवरील पूल ओलांडला, इतक्यांत परांजपे येतांना दिसले. मी त्यांना विचारलें. कीं, 'प्रो. विनोदांना सोडून तुम्ही आज इतक्या लौकर कसे निघालांत ?' तर त्यांनीं मला उत्तर दिलें कीं, 'माझी व विनोदांची पैज लागली आहे कीं, मी नऊचे आंत सुकीला जाऊन पोंचायचें.' मी म्हटलें कीं, 'चला, माझ्याबरोबर म्हणजे आपण नऊचे आंत सहज पोंचूं.'

तोबा ! तोबा ! काय आजचे ते भयंकर कडे ! हजार हजार दीड दीड हजार फूट उंचीचा करोल कडा आम्ही पूल ओलांडल्यापासून आमच्या डाव्या बाजूला होता. पुढें जातां जातां तर त्या हिमालयाचे कडे असे एकामागून एक, अधिकाधिक उंच व अधिकाधिक खडे दिसायला लागले कीं हजार फूट जणू उंचीची भिंतच ! त्या दुसऱ्या काठावर असलेल्या भयंकर कड्याकडे पाहिलें कीं, मी तर दोन पावलें मागें सरकायचा. इतके सरळ, इतके खडे, इतके भीतिप्रद होते ते कडे. आम्ही थोडे पुढें गेलों तों आम्हांला अगदीं नवीन बांधकामाचा लोखंडी पूल लागला. इतक्या दिवसांत ही साहेबी आर्ट जणू रेल्वेचाच पूल, असा हा पूल आम्ही प्रथमच पाहिला. परांजपे म्हणाले कीं, 'कदाचित् दोन्ही बाजूंना दोरखंड आवळायला भरपूर जागा न मिळाल्यामुळें हा असल्या तऱ्हेचा

पूल बांधला असावा.'

आम्ही जों पुढें निघालों तों उजव्या बाजूला नि डाव्या बाजूला भयंकर कडेच कडे आम्हाला दिसूं लागले आणि त्या दोन कड्यांच्या वांकड्यातिकड्या व्हॅलीमधून गंगानदी खळ्खळ् आवाज करीत वहात होती. आम्ही जसजसे पुढें जायला निघालों, तसतसा त्या कड्याचा भीषणपणा अधिकच दृगोचर व्हायला लागला. त्या खळखळण्यानें आमचे कान बधिर होत होते व त्या कड्यामुळें आमचे डोळे दिपून जात होते ! असल्या तऱ्हेचा भयंकर कडा ! अहो, तेथें पाऊल ठेवण्यापुरतीदेखील वरपासून खालपर्यन्त जागा नाहीं कीं एवढादेखील स्लोप नाहीं, एकदम भिंतच्या भिंत दोन्ही बाजूंना आणि त्यांतून गंगेला उजवी-कडे टाकून आम्ही चाललों होतों, त्या दोन बाजूंना दोन भयंकर कडे सारखे दिसत होते व पुढें अगदीं मोकळे. हिमालयांत डोंगर चढूं लागल्यापासून आज-पर्यन्त मी दोन उतरत्या खबदाणींतसुद्धां मोकळी जागा पाहिली नव्हती. कोठेंही जा, एकापेक्षां एक उंच डोंगर चारीही बाजूला असायचेच आणि त्या डोंगराची व्हॅली संपल्यावर पुढें काय कडा दिसणार आहे कीं डोंगर नसलेलें सपाट मैदानच्या मैदान दिसणार आहे, याची आम्हाला बिलकुल कल्पना नव्हती. आम्ही जसजसें पुढें जात होतों, तसतसें त्या डोंगरामधील कोन फाकत चालला होता आणि त्यापुढें एकही बर्फाच्छादित अगर साधा डोंगर दिसत नव्हता. शेवटीं शेवटीं तर आम्ही, कडयातूनच वाट काढलेली होती, अशा ठिकाणीं आलों. एक माणूस जाण्याचा रस्ता. वर वरीलपैकीं कडा व खालीं पन्नास शंभर फूट तसल्याच कडयाखालीं गंगा वाहते आहे. असल्या भयंकर जागेवरून कडया-कडे पाहणें म्हणजे मरण ओढणेंच होतें ! मीदेखील तो नाद सोडून दिला.

आम्ही जरी सपाट्यानें निघालों होतों तरी वारंवार कडा पाहण्यासाठीं थांबत असल्यानें मागें टाकलेली मंडळी आम्हाला गांठून सारखी पुढें जात होती. अखेरीस वरील कडा संपल्याबरोबर बर्फाचे डोंगर लागले म्हणून मी फोटो घ्यायला लागलों व तेव्हांच फिल्म संपली म्हणून दुसरी भरण्यासाठीं खालीं बसलो. तेवढ्यांत माझेबरोबर आलेले परांजपे तर पुढें गेलेच गेले, पण पाठी-

मागची अनेक मंडळी माझ्यापुढें गेली. मी तेथें फोटो घेतले आणि पुढें गेलों तों गंगेच्या काठाला रेती दिसली. म्हणून त्या ठिकाणीं रंगीबेरंगी खडे आहेत काय, हें पहायला व तेथून एक फोटो काढायला गेलों. इतक्या वेळांत माझ्याबरोबरची मंडळीं जवळ जवळ अर्धा पाऊण तास पुढें गेली.

आम्हीं तो लोखंडी पूल ओलांडायच्या आधींपासूनच आम्हाला त्या दोन बाजूच्या दोन डोंगरांच्या कडांपलीकडील सर्व जागा मोकळी आहे, असें वाटायला लागलें होतें. येथें कोठेंही जा, चारी बाजूंला डोक्यावर डोंगर नाहींत असें कधींही झालें नाहीं. आम्ही जम्नोत्रीला जरी साडेदहा हजार फुटांपर्यन्त चढलों होतों, तरीदेखील चारही बाजूंना आमच्या ठिकाणापेक्षां उंच डोंगर दिसत होते; म्हणजेच कोणाही शाहण्या माणसानें आपल्या इकडच्या सारखीं उंचावर गेल्यावर खालील चारही बाजूचे देखावे दृष्टीस पडतील, अशी मुळींच कल्पना करूं नये. कारण कोठेंही जा, दोन हजार फुटांवर असा, ७००० फुटांवर जा अगर १०००० फुटांपर्यन्त चढा, चारही बाजूंना उंच उंच डोंगर नाहींत असे कधीं झालंय् ? छट्. आणि म्हणून त्या दोन डोंगरांच्या मध्यें असलेल्या कपारींत एखादा बर्फाचा डोंगर दिसला नाहीं म्हणून आम्हाला राहून राहून आश्चर्य वाटत होतें आणि आम्हाला आम्ही पुढें काय एकदम कडा आहे कीं दुसरें कांहीं आहे, हें पहायला नक्की जाऊं असें खात्रीपूर्वक वाटत होतें. परंतु तो कड्यांचा डोंगर संपल्याबरोबर पुढील दोन्ही डोंगर तसेंच ठेऊन आम्ही गंगामाईबरोबरच डाव्या बाजूला वळलों.

आज मी खालीलप्रमाणें उंच्या मोजल्या—गंगणानी ६२२०, ६३८०, ६९९०, ७२१०. तेथून सुमारें पन्नास ते शंभर फूट खालीं उतरून गंगानदी. तसे सुमारें शंभर फुटांवर चढल्यावर मला दंडीवाल्यानें सांगितलें, " यह छोटा रास्ता है " ते थेट ८१९०, सुकी ८१००, ८५६०, ८७९०, ८१७०, ८०१०, हर्सिल ८२००.


कडा संपल्यापासून आम्ही गंगेच्या काठावरून कांहीं वेळेस अगदीं गंगेच्या ओघावरून तर कांहीं वेळेस शें-दीडशें फूट उंचीवरून जात होतों. डाव्या

बाजूला थोडा थोडा कडा होता. उजव्या बाजूला शंभर फूट खालीं गंगानदी होती. इतक्यांत गंगा त्या वरील कड्यांमधून वाहते आहे, असा भास व्हायला लागला. खालच्या गंगेच्या खळखळाटाचा वरील कड्यांत प्रतिध्वनि होत होता आणि त्यामुळें माझ्या डाव्या बाजूनें धीर-गंभीर आवाज करीत नदी चालली आहे, असा भास होत होता. हळूहळू चढतां चढतां मी बराच वेळ तो आवाज ऐकत होतों.

गंगेच्या ओघाजवळ आल्यावर एकदम चढाई लागली. मी गर्दी करून जोरांत चालायला लागलों. व पुढें एक दंडी होती तिच्या मागून गेलों आणि मग वर सांगितल्याप्रमाणें दंडीवाल्यानें मला शॉर्ट कट् दाखविला. मी तेथून जो सपाटा मारला तो थेट ८१९० पर्यंत. कारण तेथें तो शॉर्ट कट् येऊन मिळतो. आणि एका झाडाखालीं बसून मागील मंडळी येईपर्यन्त विसावा घ्यावा, असा बेत केला. चांगलीं दहा पंधरा मिनिटें विसावा घेतला. पण कोणाचाच पत्ता नव्हता. इतक्यांत दोन तीन गोसावी खालून आले. त्यांना विचारलें, सुकी किधर है ?' तर त्यांनीं उत्तर दिलें, ' ऊपर है ' म्हणून मी आणखी थोडा वेळ थांबलों. त्यांनीं दुर्बिण मागून घेऊन बर्फाचे डोंगर बघितले आणि जातां जातां खालीं कांहीं मंडळी आली आहेत वगैरे म्हणाले. वस्तुस्थिति अशी होती कीं, सुकी गांव वर होतें; पण चट्टी खालीं होती. तेव्हां थोडासा विचार करून मी थोडा खालीं उतरलों, तों नानासाहेब चापेकर दंडींतून उतरतांना मला दिसले. तें घर मी वर चढत असतांना बघितलें होतें. पण मला तेथेंच जायचें आहे, ही कल्पनादेखील नव्हती.

आम्ही तेथें झुणका-भाकर खाल्ली, वरील ओघळावरून धरून तोटीसारख्या नळीनें कुंडांत सोडलेल्या नळाचे पाणी प्यालों व मग जेवण खूप झालें असल्यानें सावकाश सावकाश काळ्यांच्याबरोबर चालूं लागलों.

आम्ही highest point ओलांडला तोंच Oh wonderful, wonderful !! सगळ्या जगाच्या उलटी तऱ्हा आमच्या दृष्टीस पडली. तेथून नदीचें पात्र मुखाकडे रुंदावत गेलेले आमच्या दृष्टीस पडलें. म्हटलें, तरीच



चित्र सं. २९
गंगोत्रीहून परततांना आम्हीं धरालीला थांबलों.
धरालीचें देऊळ (पृ. सं. ९२)



चित्र सं. ३०
भटवाडीजवळ अगदीं जमिनीपर्यंत वाकलेलें एक झाड. ( पृ. सं. ९५ )



चित्र सं. ३१
भटवाडी चट्टींतील मुक्काम ( पृ. सं. ९५ )

नदीचें पाणी इतक्या जोरानें वाहते. उलट्या दिशेकडे पाव अर्धा मैलापर्यन्त हें पात्र पुढें-पुढें आकुंचित झालें आहे आणि शिवाय पुढें पात्र उथळ आहे तें आहेच. मग पाण्याचा जोर वाढेल, यांत काय आश्चर्य ? पांढरी रेती असलेलें एवढें रुंद पात्र पाहून आम्हाला खरोखरीच आश्चर्य वाटलें. जेवण झालें असल्यानें वारंवार तहान लागत होती. एका ओघळाजवळ मी थोडें पाणीही प्यालों.

हर्सिलला येतां-येतां आम्हाला वनगाई दिसल्या. एक बेटी पळून गेली. पण दुसरी मात्र बरोबर कॅमेऱ्याच्या तडाख्यांत सांपडली.

हर्सिलला बंगला जुन्या पद्धतीचा, लाकडी फळ्या टाकून तयार केलेला आहे!

## गंगोत्री

ता. २४-५-१९४१

आम्ही काल हर्सिलमध्यें शिरतां-शिरतांच बरीचशीं coniferous trees पाहिलीं. परंतु आजतर आमचा रस्ता शंक्वाकृति झाडाच्या अरण्यातूनच होता. अर्थात् हें देवदारूंचेंच अरण्य आहे आणि आपल्याला भूगोलावरून माहीत आहे कीं, ही coniferous forests होतात, ह्याचें कारण ह्या भागांत बर्फ पडतें. wonderful! wonderful!! आज बर्फाच्या पर्वतामागें सूर्योदय होतांना दिसला. तो देखावा खरोखरीच अलौकिक होता. त्या पर्वताच्या मागून काळेभोर किरण वर आकाशांत येत होते. असे काळे किरण काय कारणानें पर्वताच्या मागून येत असतील, याची कल्पना अजूनीही बरोबर मला आली नाहीं. परंतु मला वाटतें कीं, सूर्य-किरण बर्फावर पडून ते परावर्तित होत असतील आणि ते परावर्तित झालेले किरण ज्या आकाशांत तेजस्वी सूर्य उगवला आहे, त्याच्या तेजामुळें त्या परावृत्त किरणांपेक्षां अधिक तेजस्वी असल्याकारणानें the rays looked black due to the brighter background. ही आपली एक कल्पना आहे. खरें खोटें हिमालयच जाणे.

आजही कालच्यासारखेंच ठरलें होतें कीं, भैरवघाटीस फराळ करावयाचा व गंगोत्रीस मुक्कामाला जायचें. त्याप्रमाणें आज आम्ही थोडे उशिरां निघालों. भैरवघाटीस १०-१०॥ च्या सुमारास येऊन पोहोंचलो व तेथून १२-१२॥ वाजतां

निघून सावकास पांच साडेपांच वाजेपर्यन्त येथें येऊन पोहोंचलों.

भैरवघाटीचा खडा चढ यायच्या आधीं गंगा व जान्हवी ह्या दोन नद्यांचा संगम आहे आणि म्हणून गंगेला जान्हवी म्हटलें आहे. खरें म्हणाल तर त्या ठिकाणीं गंगेचें पात्र आहे लहान आणि जान्हवीचें पात्र आहे मोठें. परंतु जान्हवीच्या पाण्याचा हिरवा गार रंग कोठेंच लुप्त होतो, पण गंगेच्या रेतियुक्त गढूळ पाण्याचा रंग मात्र कायम राहतो. जेव्हां प्रथम तो संगम माझ्या दृष्टीस पडला, तेव्हा मला त्या दृश्याचे अनेक फोटो घ्यावेसें वाटलें. त्या गोड आणि रमणीय दृश्यांत एकच विचार मनांत येत होता की, ही हिरवट पण स्वच्छ पाण्यानें वाहणारी गंगा कीं त्या गढूळ पाण्यानें वहात येणारी गंगा? इतक्यात मला बाबानीं 'विष्णुपादरजःकणपतिता' म्हणून गंगेला संबोधिलेलें लक्षांत आलें आणि त्याचप्रमाणें वाल्मिकि गंगाष्टकात सांगितलेला 'मुरारि-चरणच्युतम्' हें एक आणि 'शैलप्रचारि गिरिराज-गुहा-विदारि। झंकारकारि हरिपाद-रजोऽपहारि' हा दुसरा चरण लक्षांत आला आणि म्हणून पांढरे रजःकण ज्यांत आहेत, तीच गंगा असें मी ठरविलें. त्याच वेळेस जवळ एक आमचा कंडीवाला होता, त्यानें ही जान्हवी नदी म्हणून सांगितलें.

जान्हवी नदी ओलांडायलादेखील पूर्वी वर्णन केल्याप्रमाणें एक नवीन रंगीत लोखंडी पूल आहे. त्याच्याच अलीकडे पूर्वीच्या जुन्या मोडलेल्या लाकडी पुलाचीं लांकडें माझ्या दृष्टीस पडलीं. आम्ही तो लोखंडी पूल ओलांडला. इतक्यात त्या कंडीवाल्यानें दोन्ही डोंगराच्या माथ्यावरील दोन दोरखंड दाखवून सांगितलें कीं तोच प्राचीन पूल. प्रवाश्यास एका करंडींत बसवायचें आणि ती एका दोरास बांधायची व दुसऱ्यानें दुसऱ्या बाजूस ओढत ओढत ती करंडी पलीकडील टोकाला पोंचवायची आणि बाबा सांगत असत कीं, पूर्वी प्रवासी या दोरापर्यंतच येऊन तेथूनच गंगोत्रीस नमस्कार करून परत जात असत. शेंकडा पांच किंवा दहा प्रवासी ह्या करंडीचा प्रवास करण्यास धजत असत. त्या करंडीची कल्पनाच मुळीं मला भीतिप्रद वाटते. खालीं जान्हवी २०–२५ फुटां-वरून वहात आहे व वर सुमारें दोन तीनशें फूट उंचीवर ते दोरखंड दिसतें, म्हणजे करंडींत बसणाऱ्या माणसास खालीं दोनतीनशें फुटांवर वाहणारी जान्हवी दिसायची आणि शिवाय त्या करंडीस ओढतां-ओढतां भयंकर झोके बसायचे, दोरी तुटण्याची भीति

होती ती निराळीच. वरील कल्पनाच मुळीं भीतिप्रद वाटते.

आज मी खालीलप्रमाणें उंच्या मोजल्या-हर्सिल ८२००;८५८०;८६२०;गंगोत्री-वरील पूल (अर्थात् हर्सिलजवळ एकदां गंगा ओलांडली होतीच) ८५१०; ८५९०; ८६७०; सतत असणाऱ्या चढाच्या शेवटच्या टोकापर्यंत ८७००; ८७६०; ८८१०; जान्हवीवरील पूल ८८१०; भैरवघाटी ९२१०; ९४५०; ९४२०;९५९०;९६१०; ९७००; ९८००; ९९००; ९७८०; ९८५०; १००००; १००००; गंगोत्री १००००;( गंगोत्रीवरील ८५१० वरील पूल ओलांडल्यावर मी खरें म्हणाल तर माझ्या बारक्या डायरींत टिपून ठेवलें होतें कीं चढणीस सुरवात म्हणून व ८५९० आल्यावर लिहिलें होतें कीं, पहिला टप्पा आणि ८६७० वर दुसरा टप्पा, पण गंगेच्या पुलापासून जान्हवीच्या पुलापर्यन्त सारखे चढउतार आहेत व पुष्कळ ठिकाणीं सपाट रस्ते आहेत. जम्नोत्रीप्रमाणें सारखा खडा चढ मुळीं येथें नाहींच; मग पहिला टप्पा आणि दुसरा टप्पा असें लिहिण्यात काय विशेष आहे ? ) पण जान्हवीवरील पूल ओलाडल्यावर मात्र भैरवघाटीपर्यंत चागलाच खडा चढ आहे आणि माझ्या रीडिंग्जवरून भैरवघाटीनंतर गंगोत्रीपर्यंत अगदीं साधारण चढउतार आहे, हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

जान्हवी व गंगेचा संगम पाहण्यांत मी इतका गुंग होऊन गेलों होतों कीं, आसपास जन्हुराजानें फोडलेला खडक अगर भगीरथ राजानें फोडलेला पर्वत अगर तेथून दिसणारे बर्फाचे पर्वत अगर वनश्री काहींएक लक्षात आलें नाहीं. तें जान्हवीचें निळसर स्वच्छ पाणी गंगेच्या पाण्यांत कसकसें मिळतें, हें पाहण्यात मी अगदीं गुंग होऊन गेलों होतों ! समोरून गंगेचें गढूळ पाणी येत होतें व जान्हवीचें हिरवें पाणी त्या पाण्याला जोरानें बाजूला सारून पुढें जात होतें, पण तें हळूहळू वाहणारें पांढरें पाणीच ( जान्हवीच्या मानानें हळू हळू हं ! ) त्या पाण्याला आत्मसात् करून टाकीत होतें ! जान्हवीचें हिरवें पाणी आत्मसात् करताना गंगेचें पाणी हिरवें होत असे व नंतर एका हिरव्या लाटेमागून दुसरी पांढरी लाट, पुन्हां हिरवी लाट... असें होत होत एका मोठ्या दगडाच्या अलीकडे एखाद्या समुद्रावर खूप गजबजलेलीं बेटें असावीत, तसें तुरळक तुरळक जान्हवीचें पाणी त्या गंगेच्या पाण्यांत दिसत असे आणि तो दगड ( त्या दगडामुळें सुमारें ५० फूट पाण्याचा प्रवाह दृष्टीस पडत नसे. ) सोडतांना

अगदीं आरडाओरडा करून गंगेच्या पाण्यांतच आत्मसमर्पण करीत असे. गंगेचा खळखळाट व जान्हवीचा घो घो शब्द हे आवाज कानाला सारखे उल्हासयुक्त आनंद देत होते. खरोखरीच हें जान्हवीचें व गंगेचें रागीट प्रेमार्पण वर्णन करण्यास मी असमर्थ आहें. जान्हवीवरील संगीत पूल ( संगीत म्हणजे आधुनिक काळच्या रेल्वे-ब्रिज्सारखा) ओलांडल्यावर जी एकदम खडी चढण लागली, ती थेट भैरवघाटीपर्यंत. मला तर तो चढ फार आवडला.

भैरवघाटीस फराळ करून मी बारा साडे बारा वाजतां गंगोत्रीस निघालों, ते आस्ते आस्ते साडेचार पांचला गंगोत्रीस येऊन पोहोंचलों. भैरवघाटीस फराळ केल्यानंतर मोठी गंमत झाली. भैरवघाटीस पाण्याची सोय म्हणून लांबून नळ आणला आहे. अर्थात् नळ उघडाच आहे, हें पाहून मी असा विचार केला कीं मध्यंतरी गोसावी वगैरे लोक हातपाय धुतात, तर पाण्याचा जो मूळ उगम असेल तेथेंच जाऊन पाणी भरून घ्यावें. ( आहे काय गंमत, पाणी नारळाच्या किंवा दुसऱ्या कसल्यातरी उघड्या नळांतून वरून डोंगरावरून आणून एका हौदांत सोडलें आहे आणि त्या हौदास एक तोटी ठेवली आहे. खरें म्हणाल तर टाकींतील पाणी घेणेंच योग्य, परंतु त्या उघड्या नळांतील पाण्यांत इतर लोक हात बुचकळतात, हें पाहून मला तर त्या टाकींतील पाणी घेण्याची कांहीं इच्छा होईना. ) म्हणून मी वर जो निघालों ते थेट ९४५० फुटांपर्यंत चढलों. ( बॅरोमेट्रिक रीडिंग् निघायच्या वेळीं घेतलें. ) तरी पुढें नळ आहेच. बरें, इतका वेळ चढ होता, पुढें उतार लागला, तेव्हां अधिक लांब जाण्याचा प्रयत्न सोडून देऊन मी तेथेंच तांबे भरून घेतले. इतक्यांत पटवारी खालून येतांना दिसला. त्यानें पाणी आणखी मैलभर लांबीहून आणलें आहे म्हणन सांगितलें, तेव्हां मला मोठेंच आश्चर्य वाटलें आणि तो उतार उतरून पुढें नळ कोठपर्यंत नेला आहे, हें पुढील चढ चढून पाहण्याची बुद्धि झाली नाहीं, म्हणून स्वतःलाच धन्य समजून घेतलें.

हो, आज सरड्याबद्दल एक और गंमत बघितली बुवा ! ह्या सरड्यांचे पाय निळ्या रंगाचे आहेत व शेंपूटदेखिल निम्में निळें आहे. बाकी सर्व भाग ब्राऊन् आहे. आश्चर्य वाटलें बुवा आपल्याला तरी !

भैरवघाटी सोडल्यापासून जी सुंदर डोंगरांच्या सीनसीनरीस सुरवात झाली, ती

कांहीं विचारूं नका. एका डोंगरापासून पार नुसता सुळकाचा सुळकाच वर आला होता आणि तें शिखर बर्फानें अगदीं ओतप्रोत भरून गेलें होतें. मला कोणी सांगितलें कीं, जेथून गंगेचा उगम होतो, तें गोमुख शिखर तें हेंच. तर इतक्यांत दुसऱ्यानें दुसऱ्या एका शिखराकडे बोट दाखवून ह्या टोकाच्या पायथ्यापासून गंगा उगम पावते, म्हणून सांगितलें. एकंदरींत गंमत आहे झालं !

येथेंदेखील मी पूर्वी सांगितल्याप्रमाणें चारही बाजूंनीं हजार हजार दीड दीड हजार फूट उंचीचे डोंगर आहेत. याचा अर्थ असा आहे कीं, कोठेंही जा, एखाद्या खोलग्यांतच आपण आलों आहों असे माणसास वाटलें पाहिजे. येथें आल्याबरोबर गंगामाईच्या देवळाचें दर्शन घेतले, नंतर आमच्या धर्मशाळेतून उत्तम उत्तम देखावे काय दिसतात ते पाहिले. डाव्या बाजूला बर्फाच्छादित उत्तुंग केदाराचें किंवा गोमुखाचें शिखर दिसत होतें आणि उजव्या बाजूला गंगामाईच्या मंदिराचा सोन्याचा कळस सायंकाळच्या उन्हानें चम्चम् चमकत होता. समोर गंगामाई खळखळ आवाज करीत चालली होती. खरोखरीच तें दृश्य मोठें रमणीय होतें.

## गंगोत्री

**ता. २५-५-१९४१**

आम्हीं जेव्हां मध्यें टप्पा घेऊन पुढचा मुक्काम गांठण्यास सुरवात केली, त्याच-वेळीं असें ठरलें होतें कीं, गंगोत्रीस एका दिवसाची पूर्ण विश्रांति घ्यायची. त्यामुळें आज सावकाश पांच साडेपांचला उठलों व आस्ते आस्ते सर्व आटोपलें. मग पुढील सर्व प्रवासाचे टप्पे ठरविण्यासाठीं गोळिवडेकर मास्तरांना गाठलें आणि तेथून परत येईपर्यंत बाबा व आई आपापलीं स्नानें आटोपून परत येत होतीं. अर्थात् बाबांनीं मला 'गंगेचें स्नान झालें का ?' म्हणून विचारलें. मी 'नाहीं' म्हणून सांगितल्यावर ते थोडेसे रागावले.

जेवण झाल्यावर आई एका साधूला भेटण्यास निघाल्या. त्यांच्याबरोबर मलाही चलण्यास सागितलें, म्हणून मी महादेवाचा फोटो घेऊन त्यांच्याबरोबर निघालों. ( ह्या हिमालयांत साधु पुष्कळ आहेत. उत्तर-काशीला कांहीं आहेत, हर्सिलला आहेत आणि

येथेंही आहेत. बाबा हर्सिलपासून सुमारें तीन मैलांवर रहात असलेल्या साधूला भेट-ण्यास गेले होते. साधु चांगला आहे, असें बाबांचें मत आहे. ) मी महादेवाचा एक फोटो घेऊन आईच्याबरोबर कॅमेरा घेऊन निघालो. ( महादेव व पार्वती बैलावर बसले असून महादेवाच्या मागील बाजूस पार्वती आहे. )

खरें म्हणाल तर त्या साधूचा आश्रम गंगामाईच्या देवळाच्या अगदीं समोर आहे. फक्त मधें गंगानदी आहे. त्या नदीवर एक लाकडी पूलदेखील आहे; परंतु तो लांकडी पूल ओलांडायला इतका अवघड आहे की, येथील बैरागीदेखील तो चार पायांनीं ओलांडतात. दुसरा पूल जो आहे, तो सुमारें अर्धा मैल दूर आहे. त्या पुला-वरून आम्हाला मागच्या पंड्यांनीं दोन कुंडें दाखविलीं. गौरी-कुंड व नारायण-कुंड. मोठी गम्मत आहे बुवा तेथील ! फारच हृदयंगम आहे. ज्या भोंकांतून गंगा खालीं उडी घेते, त्याच्याखालीं खोली वरीच असल्यानें पडणारें पाणी उकळी फुटल्याप्रमाणें उफाळून वर येतें आणि त्याला गौरी-कुंड असें नाव आहे. हें गौरीकुंड पुलाच्या अगदी बरोबर खालीं असल्यानें देखावा फारच भीतिप्रद दिसतो, असें बाबासाहेब म्हणतात. श्रीशंकरानें भगीरथाच्या प्रार्थनेवरून आपल्या डोक्यावर गंगा घेतली आणि ती शंकरा-ची पिंड खोल असल्यानें पाणी उफाळून वर येतें.

बाबासाहेब सांगत होते की, 'नदीला पाणी जेव्हां कमी असतें, त्या वेळीं खालील पिंड दिसूं शकते.' परंतु पाणी कमी केव्हां असतें, हें कांहीं त्यांनी सांगितलें नाहीं. उन्हाळ्यांत बर्फ वितळतो म्हणून पाणी जास्त असतें; पावसाळ्यांत पाऊस जास्त पडतो म्हणून पाणी जास्त असतें आणि हिवाळ्यांत तर वर कोणी जाऊंच शकत नाहीं. मग कशावरून हें म्हणणें खरें धरायचें ?

गोष्ट अशी आहे कीं, भगीरथानें शंकराची प्रार्थना केली, म्हणून शंकरानें नदीचा सर्व भार आपल्या केशकलापावर घेतला. परंतु गंगा गर्वानें खाली आली, म्हणून शंकरानें सर्व गंगा आपल्या केसांत गुप्त केली. भगीरथ राजानें काय काय खटपटी केल्या असतील, ह्याबद्दल मी पुढें केव्हां तरी लिहीन. पण एवढी गोष्ट खरी कीं, त्यांनीं नदीचा ओघ बदलण्यासाठीं शंकराची मदत घेतली. पण ह्या ठिकाणीं एकदम ती एखाद्या भोंकांत लुप्त होऊं लागली. बाबा म्हणत होते कीं, हिमालयांत

कित्येक ओघळ असे आहेत कीं, ते येता-येतां हिमालयाच्या पोटांतच लुप्त होतात आणि मग ते उन्हाळ्यांच्या रूपानें ठिकठिकाणीं बाहेर पडतात. त्याप्रमाणें हीदेखील गुप्त झाली असेल. नाही कोणी म्हणावें ? मी तर म्हणतों कीं, त्या गौरीकुंडांतच लुप्त होऊं लागली, तेव्हां भगीरथानें पुन्हा श्रीशंकराची मदत घेऊन मोठ्या युक्तीप्रयुक्तीनें तें भोंक बंद केलें व नंतर भागीरथी पुढें वाहूं लागली.

त्याचप्रमाणें इकडे जन्हूनेंही दुसरी एक नदी फोडून काढली. तो प्रचण्ड ओघ पाहून भगीरथानें तो आपण फोडलेल्या नदीस मिळविण्याबद्दल जन्हूची प्रार्थना केली आणि जन्हूनेही भगीरथाची प्रचण्ड खटपट, त्यानें इतकीं वर्षे झटून आंखून काढलेला मार्ग आणि त्यामुळें सुपीक होणारा प्रचण्ड प्रदेश पाहून भगीरथास अनुमति दिली आणि म्हणून गंगेस भागीरथी व जान्हवी अशीं दोन्ही नांवें लाभलीं.

ज्या ठिकाणीं गंगानदी ओलांडायचा पूल आहे, तेथें जवळच गंगेला दुसरी एक नदी येऊन मिळते, तिला शंकरगंगा म्हणतात. शंकरगंगेचें पाणी-देखील गंगेच्या पाण्यापेक्षा पुष्कळच स्वच्छ आहे. ह्यावरूनदेखील शंकरांनीं भगीरथाच्या प्रार्थनेवरून नदी खोदून काढायला मदत केली असावीसे वाटते. खरें म्हणाल तर जम्नोत्री जसें यमुनेचें उगमस्थान आहे, तसे गंगोत्री हें कांहीं गंगेचें उगमस्थान नव्हे. इतर ठिकाणीं ज्याप्रमाणें गंगा वाहते, त्याप्रमाणेंच येथें वाहते. फरक एवढाच कीं, येथें ती दहा हजार फूट उंच प्रदेशांतून वाहते. गोमुख हें गंगेचें उगमस्थान. तें येथून १८ मैलांवर असून त्याची उंची १४००० फुटांपर्यन्त आहे. तेथे जायला रस्ता आहे, परंतु तेथे जाऊन यायला तीन दिवस लागतात. काल आई म्हणत होत्या कीं, ' इतक्या दूर आल्यासारखा तूं गोमुख बघून ये ' म्हणून. आणि मी त्याप्रमाणें बाबांची परवानगीदेखील विचारली होती. पण माझ्याबरोबर यायला कोणीच तयार होईना आणि प्रो. विनोद म्हणाले कीं, ' त्याऐवजीं आपण वसुधारेला जाऊं. कारण वसुधारेची उंचीदेखील चौदा हजार फूट आहेच. ' तेव्हां तो बेत रद्द झाला. पण जर यदा-कदाचित् गोमुखाला गेलों असतों तर पूर्वीं गंगेचा ओघ कसा असावा व

भगीरथ राजानें तो कसा बदलला, हें कदाचित् लक्षांत आलें असतें.

येथेंदेखील जम्नोत्रीप्रमाणेंच चारही बाजूंना उंच उंच डोंगर आहेत. नव्हे आपण येथें खळग्यांत आहोंत, असेंच वाटायला लागतें, इतके उंच डोंगर आहेत आणि बर्फाच्छादित शिखरें सोडून व अगदीं भयंकर कडे सोडून सर्व डोंगरावर देवदारूचीं झाडे दिसत आहेत. ( असें ऐकतों कीं, नारायण-बद्रीकेदारा-वर एकही झाड नाहीं. खरें खोटें प्रत्यक्ष पाहूं. )

मी फोटो काढण्यासाठीं कॅमेरा आणला होता आणि त्यात एक फिल्म शिल्लक होती, हेंही खरें. परंतु महादेवाच्या फोटोचे वेळेस जें time exposure लाऊन ठेवले होतें, तें तसेंच राहिल्यानें तो फोटो फुकट गेला. म्हणून साधूच्या दर्शनाहून आल्यानंतर ( आपल्याला जप-तपापैकीं कांहींएक कळत नाहीं, तर विनाकारण त्याबद्दल लिहा कशाला ? ) मी प्रवचन बुडवून पुन्हा कॅमेरा घेऊन फोटो घेतले.


बाकी काय वाटेल तें म्हणा, दहा हजार फुटांवर हवा बरीच विरळ वाटते. कारण नमस्कार घालतांना सकाळीं थोडासा दम लागला, असा भास झाला व त्या पुलावरून रस्त्यावर जायचें म्हणजे खडा चढ आहे, तो चढतांनाही खालील-प्रमाणें सहज चढतां येत नसावा, असें वाटतें. पण यापेक्षां अधिक गम्मत पवालीच्या घाटांत किंवा वसुधारेला नक्की पहायला मिळेल.

ज्याप्रमाणें काल सकाळीं हर्सिलहून निघतांना सूर्योदयाची गम्मत पाहिली, त्याप्रमाणें येथेंही तीच गम्मत पाहिली. सूर्योदयाचे काळे किरण एखाद्या गोल पंख्यावर असणाऱ्या जाड शिरांप्रमाणें दिसत होते. मी त्याचाही एक फोटो घेतला.

आज संध्याकाळीं खरें म्हणाल तर गंगामाईची आरती पाहण्याची मला इच्छा होती. परंतु खाण्याच्या नादांत आणि कंटाळ्यामुळें तें राहून गेलें. पण आरतीनंतर चालत असलेला " राधे श्याम श्याम श्याम " हा गजर मात्र आरती झाल्यानंतर सुमारें घटका दीड घटका ऐकूं आला. येथें आरतीस सायंकाळीं सात वाजता सुरवात होते.



चित्र सं. ३२
भटवाडी येथें आम्हीं केदार-नारायणास निघण्याआधीं घेतलेला आमचा ग्रूप फोटो ( पृ. सं. ९५ )



चित्र सं. ३३
बेलकच्या डोंगरावर दिसणारें सृष्टिसौंदर्य ( पृ. सं. १०३ )



चित्र सं. ३४
बुढाकेदार येथील महादेवाचें मंदिर ( पृ. सं. १०६ )



चित्र सं. ३५
पवालीचे घाटांतील देखावा ( पृ. सं. ११३ )

आज संध्याकाळीं, डाव्या बाजूच्या हिमशिखराची शोभा अवर्णनीय होती. त्या उत्तुंग शिखरावरून धुकें नुकतेंच वर जात होतें. अशा वेळीं सायंकाळचे सोनेरी किरण त्यावर पडल्यानें खालील पांढरा बर्फ व वरील पांढरे ढग ह्यांचा एकच सोनेरी रंग झाला होता. सूर्य जसजसा खालीं जाऊं लागला, तसतसा सोनेरी रंगांतील तांबूसपणा अधिक अधिकच होत जाऊन शेवटीं सर्वांचा रंग भगवा झाला. त्यांतच ढग मध्यंतरीं फाटल्यानें शिखराचा तेवढाच भाग पांढरा स्वच्छ दिसत होता, तर त्यावरील कडें, त्यावर बर्फ कधींच टिकत नसल्यामुळें काळपट दिसत होतें. ह्या तिन्ही रंगाचें खरें म्हणाल तर a harmonious blending झालें होते. मी फोटो काढण्याऐवजीं बराच वेळ तो सीन पहात होतों आणि मग फोटोची आठवण झाली, which was not too late.

## हर्सिल.

ता. २६–५–१९४१

आज आई-बाबांची यात्रा संपली, त्यांचा परतीचा प्रवास सुरू झाला. आणि मला बदरीकेदार, नारायणाचा वेध लागला. लागलींच मी माझा एकटाच रस्त्यानें जात असतां मनांतल्या मनांत म्हणायचा पवित्रा बदलला. इतके दिवस मी म्हणत होतो–'**गंगा गये गंगामाता, जम्ना गये जम्नामाता!**' अगदीं जम्नोत्रीचा प्रवास सुरू झाल्यापासून मी हें म्हणत असे. अर्थात् मी तें मनांतल्या मनांत घोकत असल्यानें इतर कोणालाही तें कळणे अशक्य होते. शिवाय इतर यात्रेकरू 'जय जम्नामैयाकी जय' किंवा 'जय गंगामैयाकी जय' किंवा 'जय गंगोत्री माय' वगैरे पुष्कळ वेळेला म्हणतात. And I responded them. मी हल्ली नवीन काय म्हणत असे, तें नारायण– केदार झाल्यावरच पाहूं.

आज सूर्योदय झाल्याबरोबर बर्फाच्या डोंगरावर काय गंमत दिसली म्हणून सांगूं! सूर्याचे सोनेरी किरण पर्वताच्या एका बाजूला पडल्यानें तो भाग तप्त सुवर्णाप्रमाणें दैदीप्यमान दिसे. And as the sun rose, the gold was gradually transformed into silver.

मला मोठें आश्चर्य वाटतें या सृष्टि-देवतेचें हं! सगळ्या जगाची इच्छा कीं,

आपल्याजवळ सोनें असावें म्हणून. एखाद्याला जर चांदीचें भांडें सोन्याचें करण्याची किमया सांपडली तर तो आपलीं सर्व चांदीचीं भांडीं सोन्याचीं करील व तीं पुजून ठेवील. पण सृष्टिदेवीची ही सोन्याची चांदी करण्याची किमया पहा. सगळें जग ती किमया अगदीं दूर दूर करील आणि असल्या किमयेचा दुरून संपर्ग-देखील होऊं नये म्हणून काळजी घेईल. तर सृष्टिदेवी दर प्रातःकाळीं दर हिम-शिखरावर ह्या किमयेची लयलूट करीत असते! ती तप्त सुवर्णमय रेषा डोंगराच्या एका बाजूला दिसत होती. त्या तप्त सुवर्णमय रेषेचा सृष्टिदेवतेनें वायुरूप हातोड्यानें हळूहळू ठोकून ठोकून चांदीचा पत्रा निर्माण केला आणि मग त्या चांदीवर सूर्य आपलें तेज टाकून तो तापवूं लागला; पण पर्वतानें त्या तेजाचें दही तयार करून आपल्या डोक्यावर ओतून घेतलें व आपण शांत झाला!

हा देखावा पाहून मला फार आल्हाद वाटला. मी पुढें निघालों. जाता जातां सहज वसंताला विचारलें कीं, ' फिल्म्स् किती घेतल्या ? ' त्यानें ऑटोक्रोम् आकरा व ब्लॅक अॅन्ड व्हाईट १४ म्हणून सांगितलें. त्या मानानें माझ्या फिल्म्स् फार कमी झाल्यासारखे वाटतें तेव्हां मी आतां माझ्या सपाट्यानें संपविणार आहें. म्हणून गंगोत्रीहून भैरवघाटीपर्यन्त काल भरलेली फिल्म् संपवून टाकली.

मी पुष्कळ विचारान्तीं असेंच ठरविलें आहे कीं, प्राचीन काळचा रस्ता गंगोत्रीस जातांना गंगेस नेहमीं उजव्या बाजूस टाकून होता; कारण दर खेपेस मधून मधून डाव्या बाजूला पॅरलल् असा उजवा रस्ता असतोच. हर्सिलला येतांना लागलेल्या खडकांच्या वेळीं रस्ता बहुशः उजव्या हातानेच आहे. तेव्हां त्याबद्दल पंचाईत नाहीं. तेव्हां पूर्वीची रस्त्याची योजना गंगेस उजवी घालावी अशी होती. पण ही रेल्वे वगैरे आल्यापासून कोणतीही नदी ओलांडणें याला कांहीं महत्त्वच राहिलें नाहीं. तेव्हां आतां मोपा पडेल तसा व डाव्या हातानेंही रस्ता घेतला आहे.

आमची कल्पना होती कीं, बाबा भैरवघाटीस थांबून सर्वांचीं जेवणें झाल्या-वर मग पुढे निघणार आहेत अशी. परंतु आम्ही तेथें पोचायच्या आंत बाबा निघालेसुद्धां होते. मी दुसरें फिल्म् तेवढें घातलें व मीही निघालो. मला वाटत

होतें कीं, आईनीं जान्हवी व गंगा यांच्या संगमावर बसायचें ठरविले आहे, तेव्हां आपण तेथेंच जाऊं. पण बाबा व आई तेथेही थांबले नव्हते, ते मध्ये गंगेच्या पुलावर थाबले होते. भैरवघाटीस येतांना मोठी गम्मत पाहिली बुवा! मोठेच गमतीदार दगड. लांबून अगदीं बरोबर घरें असावीत व खालीं गाईचा गोठा असून वर सगळें दगडी बांधकाम केलें असावे, असें वाटत होते. मी जातांना तर इतका फसलो होतों कीं, दुर्बिणीनेदेखील तीं घरेंच असावीत, असा मला भास होत होता. आणि जवळ श्री. काळे होते, त्यांचेंही मत तसेंच पडलें होतें. तीं घरें नाहींत, हें समजायला एकच कारण आहे व तें म्हणजे ते सर्व धोंडे उतारावर आहेत आणि उतारावर घर कोणी बहुधा बांधीत नाहीं.

भैरवघाटीहून निघताना मुद्दाम म्हणून उंची मोजली, ८५०० भरली ( meaning thereby there is a great depression in the weather, whence rains will come naturally ) आणि घाटाच्या खालीं ती ८१०० भरली भैरवघाटीपर्यन्त श्री. पराजपे माझ्याबरोबर होते. पण मी भैरवघाटीस फिल्म् भरूं लागल्यावर ते पुढे गेले.

मी पुनश्च गंगेचा आणि जान्हवीचा संगम पहात जवळ जवळ वीस पंचवीस मिनिटें उभा राहिलों. खरोखरीच तो जान्हवीचा जोर मोठा विलक्षण आहे तिचें खडकांना धक्के देऊन, स्वतःच्या ठिकऱ्या उडविणेंही मोठें कौतुकास्पद आहे. मला वाटतें, महात्माजींना जर येथे आणून उभे केलें तर ते म्हणतील, “पहा, अहिंसेच्या योगानें हिंसा हाच ज्याचा धर्म अशाला कसें एकदम अहिंसामय करून टाकतां येतें, त्याचें प्रत्यक्ष उदाहरण हा संगम मानवप्राण्याला देत आहे. प्रथम जरी हिंसेचा जय झाल्यासारखें वाटले, तरी अंतिम जय अहिंसेचाच आहे, हें हा संगम उत्कृष्ट तऱ्हेने दर्शवीत आहे.” मी त्या देखाव्याचे किती तरी फोटो घेतले, तरी मनाचें समाधान झालें नाहीं. पुष्कळ वेळ मी तो एकाग्रतेनें पहात उभा होतों, परंतु तेथून हलावेंसें वाटलें नाहीं. पण एकेक जण मला मागें टाकून पुढें जाऊं लागला म्हणून मला हलावेंच लागलें. त्या जान्हवीच्या पाण्यावर नजर ठरत नव्हती. जणू ती आपल्या बहिणीला भेटायला मोठ्या

उत्सुकतेनें निघाली आहे आणि आपली बहीण दिसल्याबरोबर गाढ आलिंगन देऊन हळूहळू आत्मसमर्पण करीत आहे. एका मोठया धोंड्याच्या पाठीमागे गंगेचें व जान्हवीचें पाणी एक होत आहे. डाव्या बाजूला गंगा म्हणते कीं, ' तूं माझ्या-प्रमाणें वाहिलें पाहिजेस. " तर जान्हवी म्हणते, " तूं माझ्याप्रमाणें वाहिलें पाहिजेस " आणि त्या धोंड्यापर्यन्त त्या जणू मोठमोठयानें भांडत येत आहेत आणि जर एक जण नमलें नाहीं तर ' आम्ही कांहीं ठिकाणीं पांढऱ्या पाण्यानें व दुसऱ्या ठिकाणीं हिरव्या पाण्याने वाहूं ' असे दर्शवीत आहेत आणि त्या धोंड्याच्या पाठीमागें तर भांडणाला भयंकर रंग चढलेला दिसत होता! पण धोंड्याच्या पलीकडे वाहतांना गंगेनें जान्हवीला आपल्या मताप्रमाणें बनविलेलें दिसत होते आणि एवढ्या मोठमोठयानें भांडणाऱ्या त्या बहिणी एका क्षणांत कशा एक होऊं शकतात, हें इतरांना दिसूं नये म्हणूनच कीं काय, तो धोंडारूपी पडदा ठेवला आहे! कांहींशा समंजस अशा जान्हवीचें पाणी मात्र, आधींच गंगेशीं संगनमत करून ' भांडणाऱ्याच्या रस्त्यानें जाच कशाला ? ' असा विचार करून हळूच दुसऱ्या बाजूने निसटून त्या धोंड्यापलीकडे बहिणी एक झाल्यावर त्याच्यात मजेनें जाऊन मिसळतें.

बाबा व आई जंगलचट्टीला जेथें गंगेवर पूल आहे, त्या ठिकाणीं बसले होते. त्यांना जाऊन मी गाठलें. तेथून आईबाबांच्या मागोमाग, बाबांनीं वर्णन केलेल्या धराली येथील साधूकडे गेलों. साधु गंगेंत एका पायावर उभा राहून जप करीत होता. आम्ही तेथें सुमारें दीड दोन तास थांबलों होतों. तेवढ्यांत बऱ्याच लोकांनीं जेवणखाण वगैरे उरकून घेतले.

त्यांत असें झालें, मी माझ्याबरोबर कांहींएक खायचें आणलें नव्हतें. कसें आणणार ? आधींच मी आठवणीचा खंदक आणि त्यांत गळयांत कॅमेरा, barometer व दुर्बिण! आचाऱ्यांनी माझ्या चपात्या कमलबरोबर दिल्या, पण कमलने त्या आपल्या कंडींत ठेवल्या व ती घोड्यावरून पुढे आली आणि मग तिनें माझ्या खाण्याचें आणलें नाहीं, म्हणून बाबा रागें भरले.

तेथून गंगोत्रीस जातांना, परांजप्यांनीं येथें शाली फार चांगल्या मिळतात,

म्हणून सांगितलें होतें आणि त्याच वेळीं परत येथें आल्यावर एक शाल विकत घ्यायचीच म्हणून मी ठरविलें होतें. त्याप्रमाणें संध्याकाळीं तपास करून १४ रुपयांत अगदीं मऊ अशी पश्मिनाची शाल विकत घेतली. मी विचार करीत होतों, बाराला घ्यावी म्हणून, पण तो चौदाच्या खालीं उतरेना. म्हणून मग घरीं आल्यावर बाबांनीं सांगितल्यावरून त्याला बोलाऊन आणून शाल घेतली. बाकी शालीची ऊब छानदारच आहे हं!

## गंगणानी.

ता. २७-५-१९४१.

आजदेखील मागील खेपेप्रमाणेच सुकी येथे फराळ करून येथें यायचें ठरलें होतें. त्याप्रमाणें सुकी येथें झुणका-भात तयार होता. माझा तर मंगळवारच होता. त्याचें असें झालें. काल म्हणे पुष्कळांनीं तो गार झुणका भाकर व फोडणीचा भात खाल्ला नाहीं. तेव्हां अन्न इतकें जास्त करून घेऊन तें टाकून देण्यापेक्षां पहाटे एका आचाऱ्यानें जाऊन सुकीला झुणका-भात करण्याचें ठरलें होतें, त्याप्रमाणें व्यवस्था झाली होती.

जेवण झाल्यावर माझी टिकीटिकी चाल पुन्हां सुरू झाली. मी असें पहात होतों कीं, माझ्या थिअरीला उपयोगी असे कांहीं दृष्टीस पडतें कीं काय? माझी पूर्वीची कल्पना अशी होती कीं, शंकर हा अरण्याचा राजा असून तें एक वंशपरंपरागत गादीचें नांव असावें. हा हिमालयपर्वतांत राहणाऱ्या सर्व रानटी लोकांचा राजा होता. हे सर्व लोक अत्यंत मोठे एंजीनियर असून त्यांची मदत भगीरथ राजानें घेतली. प्रथम शंकरापर्यन्त त्याची वर्दी जाईपर्यन्त थोडा त्रास सहन करावा लागला. परंतु शंकरांना सर्व प्लॅनिंग सांगितल्यावर व काय काय फायदे होतील हें सांगितल्यावर, शंकरानें त्याच्या जोडीला आपले एंजीनियर्स दिले, तेव्हां त्यानें सर्व पर्वत फोडून गंगानदी काढली. माझी अशी कल्पना आहे कीं, दोन्ही बाजूला जे हजार हजार फूट उंचीचे कडे दृष्टीस पडतात, तो पूर्वी एकच डोंगर असावा आणि भगीरथानें तो सर्व फोडून काढला असावा.

आणि अशी आख्यायिका आहे कीं, गंगा जी निघाली ती जन्हुराजाच्या मांडींत गुप्त झाली. आम्ही येतां येतां गंगेचा ओघ एकदम काटकोन करून वळलेला आहे व ज्या ठिकाणीं गंगा वळली आहे, त्या ठिकाणीं डोंगर आजूबाजूच्या डोंगरासारखा अगदीं खडकाळ नसून त्यावर गर्द झाडी आहे. त्या अर्थी भागीरथी जी निघाली ती थेट समोरील दरीमधून जाऊन भलत्याच प्रदेशांत मिळत असली पाहिजे. आणि ( तो प्रदेश जन्हुराजाचा असावा. ) तेव्हां भगीरथानें जन्हूची विनवणी केली आणि ती सबंध दरी भरून घेतली. मी असें पहात होतों कीं त्या दोन डोंगरामधून एखादा प्रवाह जर वहात नसला तर माझ्या म्हणण्याला चांगलीच पुष्टि आहे. पण त्या डोंगरावरून एक बारीकसा ओघळ वहात आहे. पण इतक्या वर्षांनी वर बर्फाचा डोंगर असतांना व जन्हूनें डोंगरच्या डोंगर उभा केला असताना त्यातून प्रवाह येणें अशक्य आहे, असे कोणीही म्हणणार नाहीं. मी तर असेंच म्हणणार कीं, जन्हूनें डोंगर उभा करून प्रवाहास अडथळा केला व प्रवाहाचा ओघ बदलविला; पण इतक्या वर्षात येथे खणलेली माती असल्यामुळें रानच्या रान उगवलें आहे. बाकी भगीरथानें हजार दीड हजार फूट उंचीचा पर्वत जवळ जवळ अर्धा मैल फोडून काढला म्हणून जर कल्पना केली, तर भगीरथ प्रयत्नाचें आश्चर्य वाटण्याजोगेंच आहे !

ह्या सरड्यांची बाकी गम्मत आहे हं ! एका सरडयाचे पाय गडद जांभळे होते, तर दुसऱ्याचें तोंड निळें होतें, तर तिसऱ्याचे तोंड पिवळें होतें व बाकीचे तपकिरी रंगाचे होते. रस्त्यावर जर इतके सरडे दिसतात, तर रानांत किती जाती असतील, ह्याची कल्पनाच केली पाहिजे. मला वाटतें, हे सरडे रानांतील निरनिराळ्या वनस्पति खात असतील व त्यामुळें ह्याचे असे निरनिराळे रंग होत असतील. काहीं वनस्पति अशा असतील कीं, त्या खाल्ल्या म्हणजे नुसते पायच निळे अगर जांभळे व्हावेत. कांहीं वनस्पति अशा असतील कीं, त्या खाल्ल्या म्हणजे नुसतें तोंड निळे अगर पिवळें व्हावें. हो, नाहीं कोणी म्हणावें ? नगाधिराज आहे हा ! त्यावर काय असेल व काय नसेल, हे फक्त हिमालयच जाणे !

आज संध्याकाळीं येथें आल्यानंतर मी स्नान वगैरे केलें व मंगळवार असल्यानें जेवण लवकर झालें. आज सुकीपासून गंगेपर्यन्त उतरतों किती, हें बॅरोमिटरनें पाहण्याची इच्छा असून तें विसरलों. कारण परवा जातांना जेथून बरोबर चढ सुरू होतो अगर better जेथून बरोबर शॉर्ट कट् सुरू होतो, तेथें बॅरोमिटर पहावयाचे विसरलों होतों.

## भटवाडी

ता. २८-५-१९४१

आज प्रवास सारा नऊच मैलांचा होता, तरी मी लौकर निघाल्यामुळें आणि फोटो फार कमी घेतल्यामुळे येथे फार लौकर येऊन पोहोंचलों. आज फारच गडबडीचा दिवस आहे. उद्यां आम्ही कांहीं जण नारायण-बद्रिकेदारला जाणार व कांहीं बाबांच्याबरोबर जाणार. बुलढाण्याहून आणखी दोन पार्टीज् होणार आहेत म्हणे. त्यामुळें आमचे निराळे कुली ठरविणें, आमचे म्हणजे प्रो. विनोदांचे दंडीवाले रजिस्टर करणे, वगैरे बऱ्याच गोष्टी आज झाल्या. शिवाय बरोबर एक वाटाड्या पाहिजे होता, तोही वीस रुपयांस ठरवून टाकला.

प्रो. विनोदांची मात्र मोठी गम्मत झाली बुवा! त्यांच्या दंडीवाल्यांपैकीं दोन दंडीवाले तापानें आजारी पडले. ते आधीं रडतकुथतच गंगोत्रीस आले होते. तेव्हां ते कांहीं ह्या पवालीच्या घाटांतून येण्यास बिलकूल तयार नाहींत. म्हणून प्रो. विनोदांना दुसरे दंडीवाले पाहणें प्राप्त आहे. आणि येथें आधीं दंडी मिळत नाहीं व एखादी मिळाली तर त्याबद्दल पैसे जास्त मागतात. सरळच आहे. कोठलाही कुली अगर दंडीवाला अगर नोकर ठरवितांना त्या मालकाची गरज, कुलींची गरज ह्यावरच पैसे ठरले जात असतात. येथे दंड्या कमी आणि एखादी मिळालीच तर मालकाचें नशीब, असें समजण्याची बारी. मग दंडीवाल्यानें कां अडवूं नये बरें? आज दुपारीं दोन वाजल्यापासून रात्रीं नऊ वाजेपर्यन्त विनोदांची व परांजप्यांची खटपट चालू आहे, पण अजून कशालाच पत्ता नाहीं. कांहीं म्हणतात, अशी दंडी येणार आहे, तर उद्या सकाळपर्यन्त वाट पहा, वगैरे.

पण एकूण मथितार्थ एकच. विनोदाचें येणें न येणें दंडीवर अवलंबून आहे
आणि त्यांतच एक मोठी गम्मत झाली.

विनोद आपल्या दंडीबरोबर कमलचीही दंडी ठरविण्याची खटपट करू लागले होते आणि त्याचे कुली बाबांना, बाबाचे दंडीवाले व पंडितरावांचे जांवई आबासाहेब ह्याची दंडी व त्यांची दंडी व आबासाहेबाचे दंडीवाले आपल्या दंडीला किंवा अशाच कांहींतरी भानगडी विनोद सर्व दुपारभर करीत होते आणि हा सगळा गोंधळ चालू असतांना आईनीं कमलला बाबांची आज्ञा सांगितल्यामुळें त्या गोंधळांत अधिकच गोंधळ उडाला. बरें, इतका वेळ मी माझे कुली ठरविणें, गोलिवडेकर मास्तरांच्याकडून चिठ्या ( हो ! बाबा काळी कमळीवाल्यांच्या चिठ्या त्यांच्या धर्मशाळेंत दाखविल्यास तेथील रखवालदार आपली उत्तम व्यवस्था लाऊन देतो म्हणे ! देखेंगे, देहली तो बहुत नजदीक है ! ) घेणें वगैरे बऱ्याच भानगडी करीत बसलों होतों आणि इकडे विनोद कमल वगैरेंची सावकाश गडबड चालली होती. त्यांतील कमल तर गारठलीच. प्रो. विनोदांचे तर उद्यां ठरणार. ते पुढें काय करायचें व ही भानगड कशी मिटवायची, या काळजींत होते. पण मी त्यांना 'कांहींएक काळजी न करतां उद्यां होईल तें होईल, आज बेफिकीर झोपा,' म्हणून सांगितलें,

आज खरें म्हणाल तर बाबांचें आहारावर प्रवचन होतें. परंतु त्यावेळीं पुष्कळ लोक झोंपले असल्यानें व हा सगळा सावळा गोंधळ चालू आहे, हें दिसत असल्यानें व्याख्यान रद्द झालें. पण संध्याकाळीं गप्पा मारण्यासाठीं मात्र ते दुसऱ्या खोलींत गेले.

## फल्यालू.

ता. २९-५-१९४१

बाबांचें म्हणणें असें होतें कीं, मी त्यांच्याबरोबर चार वाजतां निघून मल्लाचट्टीपर्यन्त जावें व मग त्यांना नमस्कार करून त्यांनीं व आम्ही निरनिराळ्या रस्त्यानें जावें. मी आणखी पंधरा एक मिनिटें गडबड केली असती, तर ते



चित्र सं. ३६

वाटेंतील देवळांत एका हातांत तरवार व दुसऱ्या हातांत गदा असलेली मारुतीची मूर्ति (पृ. सं. ११७)



चित्र सं. ३७
पवालींतील अत्युच्च बिंदूवरील देखावा [ पृ. सं. ११९ ]



चित्र सं. ३८
केदारनाथाच्या पहाडाचा दुरून देखावा [ पृ. सं. ११८ ]

जमलेंही असतें. पण मीच विचार केला कीं, प्रो. विनोदांच्या गडबडी व भानगडी अजूनही संपल्या नाहींत, तर मी तरी गडबड करण्यांत काय विशेष आहे? आणि म्हणून मी भटवाडींतच नमस्कार घालतां घालतां आईचा व बाबांचा आशीर्वाद घेतला व मोकळा झालों.

काय त्या प्रो. विनोदांच्या भानगडी ! तोबा तोबा ! साडे चार वाजल्यापासून विनोदांच्या दंडीसाठीं मी जो रस्त्यावर उभा होतों, तों थेट साडे सात वाजेपर्यन्त आणि शेवटीं इतके करून दंडी ठरली नाहीं ती नाहींच आणि उलट विनोदांनींदेखील तेहरीला जावें व तेथून नारायण, बदरीकेदार करावें, असें ठरूं लागलें. एक दंडीवाला होता तयार; पण तो एकशेऐंशी रुपयांच्या खालीं एक छदामही उतरेना ! बरें, आबासाहेबांची दंडी विनोदांनीं करावी, असें काल ठरलें होतें, पण ते दंडीवाले आपल्या गांवीं गेले ते साडेसहा वाजल्याशिवाय आलेच नाहींत आणि जे आले, तेही दोघे जणच आले आणि नंतर सुमारें अर्ध्या तासानें दुसरे दोघे जण आले आणि ते आल्यानंतर विनोदांची स्वारी दाखविल्यावर ते म्हणाले, ' ए सवारी हम नहीं ले सकेंगे.' मग विनोदांनीं पैसे जास्त देतों म्हणून सांगितलें; पण त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. त्यांना आबासाहेबांनीं बाईमाणसाची म्हणजे कमलची स्वारी आहे, म्हणून सांगितलें होते. त्यामुळें ते म्हणायला लागले कीं, "ते कमलला तरी नेतील, नाहींतर दुसऱ्या कुणाला नेणार नाहींत." विनोदांनीं त्यांना पुष्कळच सांगून पाहिलें कीं, 'त्यांनीं दंडी सोडून दिली आहे, बाकीचे पैसे ते स्वतः देण्यास तयार आहेत' वगैरे. पण छट्. आबासाहेबांनीं कांहीं पैसे दिले होते व बाकीचे द्यायचे होते, म्हणून ते त्यांच्याबरोबरच जाणार म्हणून म्हणूं लागले.

बरें, आबासाहेबांना 'थांबा थाबा,' म्हणून सांगत असतां ते गेले निघून आणि त्यामुळें जी कांहीं बजबजपुरी नि गोंधळ होऊन राहिला होता, तें कांहीं विचारूं नका. बरें, पंडितरावांच्या पंड्यालाही अगदी घाई झाली होती. तो सारखा 'चलो चलो'चा मंत्र जपत होता. इतक्यांत पंड्या मोकळी दंडी घेऊन पुढें निघून गेला आणि म्हणून अखेरीस प्रो. विनोदांनीं तेहरीला जावें, असेंच

ठरलें आणि आम्ही तेथून सुटलों. मीसुद्धां मोठया पंचाइतींत पडलों; कारण मी कुलींना बेलकला जाण्यास केव्हांच सांगितलें होतें आणि ते सहा वाजतांच पुढें गेले होते आणि परांजपे मलादेखील उत्तरकाशीला चला म्हणून म्हणूं लागले.

पण एकदम काय नशीब उघडलें कुणास ठाऊक. मल्लाचट्टीस जेथून बदरीनाथ, नारायणाला गेलों, तेथें आम्हाला दोन दंडी घेणारे दिसले. त्यांनीं दंडी घ्यायचें कबूल केलें. त्यासाठीं ते आठ वीस मागत होते. पण त्यांना सात वीसला ठरविलेंदेखील आणि इतक्यांत त्यांच्या दंडीवाल्यांपैकीं एक आला आणि सात वीसांपेक्षां कांहीं जास्त मागा म्हणून कान फुंकू लागला आणि काय आश्चर्य ! जे एकशें चाळीसला तयार होते ते एकदम कुरकुर करूं लागले आणि पुन्हां कटकट सुरू झाली. पण अखेरीस गोलिवडेकर मास्तरांनीं कांहींतरी बोलून दंडी ठरविली व ते निघून गेले. आम्ही झालाचट्टीस स्थानस्थ झालों. तेथेंदेखील दंडीवाल्यांची कटकट सुरू होतीच. आपले कपडे आणण्यासाठीं जायला त्यांनीं परवानगी मागितली. पण त्यांत कटकट करीत उशीर करूं लागले. तेव्हां मी कमलला सांगितलें कीं, ' आतां सव्वा नऊ तर झाले आहेत, तेव्हां आतां येथें भात-पिठलं तयार करा, आणि मग तुम्ही खुशाल पुढें चला. ' परांजपे व कमळ ' नको नको ' म्हणत होते. परंतु मी शेवटीं परशुरामाला भात-पिठलें करायला सांगितलें आणि मीच परशुरामला भटवाडीस माझ्याबरोबर चलायला सांगितलें, त्याचा असा उपयोग झाला.

जेवण वगैरे झाल्यावर बारा वाजतां विनोदांनीं मला सांगितलें, ' तुम्ही पुढें जा, मी मागोमाग येतोंच. ' म्हणून पंडयाला घेऊन पुढे निघालों, ( त्याचीसुद्धां फार मोठी गम्मत झाली. काल मी गोलिवडेकर मास्तरांना सांगितलें होतें त्याप्रमाणें त्यांनीं वीस रुपये व जेवणखाण याला मिळून एक वाटाडया माझ्या व आईच्यादेखत ठरविला होता. परंतु रात्रीं गोलिवडेकर मास्तर मला सांगायला लागले कीं, ' तो ठरविलेला माणूस येऊं शकत नाहीं. त्याला म्हणे आईचें पत्र आलें कीं, ती आजारी आहे म्हणून. ' सगळी पैशाबद्दल लुच्चेगिरी. तेव्हां आज सकाळीं एखादा पंडा तरी किंवा दुसरा एखादा माणूस पहायचें ठरविलें. त्या-

प्रमाणें आज माणूस कांहीं मिळाला नाहीं. परंतु बुढा-केदारचा पंडा पांच रुपयास ठरविला आणि त्यानें बुढा-केदारला एक वाटाड्या द्यावा असें ठरलें. म्हणून तो पंडा माझेबरोबरच येत होता.) तो परशुरामसाठीं मध्यें मध्यें थांबत थांबत मी चढाईला जोमानें चढत चढत येथें येऊन पोहोंचलों.

आज खालीलप्रमाणें उंच्या मोजल्या– भटवाडी ५३२०, मल्लाचट्टी (येथें आम्ही गंगानदी ओलांडली) ५०५०, ४८९०, ५०१०, ५१४०, ५१२० पासून जी कठीण चढाई ती थेट ५७५०, ५८१०, ६०४०, ६४९०, फल्यालू चट्टी ६६८०. मी येथे कठीण चढाई म्हणून जें म्हटलें आहे, त्याचा अर्थ एवढाच कीं, चढण किंचित् स्लोप् आहे, आणि त्यांत पुष्कळ ठिकाणीं पायऱ्या–पायऱ्या-सारखे दगड घातले आहेत. आणि वाचकांना माहीतच आहे कीं, एखादी खडी चढण चढण्यापेक्षां पायऱ्या चढण्यानें थोडा अधिक त्रास होतो.

गंगा नदी ओलांडल्याबरोबर आम्ही मोठ्या रस्त्यावरून पाऊल-रस्त्याला लागल्यासारखें आम्हाला वाटलें. उजव्या बाजूला गंगानदी व डाव्या बाजूला थोडी थोडी झाडी ५१२० फुटांपर्यन्त. पण नंतर आम्हाला बरीच गर्द झाडी लागली. ५१४० पासून पुढे गंगानदी दिसेनाशी झाली. जणू गंगामातेस निरोप देतांना बहुत दुःख होत असल्यानें फार वेळ लागेल या दृष्टीनें रस्ता करणाराने गंगेच्या कांठा-कांठानेंच रस्ता काढला आहे. मी सपाट्यानें चढून फोटो काढीत काढीत चालत होतो. सौराकीगाडला मला पंड्यानें विचारलें, (सौराकीगाड ५८१०) कीं 'शॉर्ट कट्‌ने जायचें का?' मी 'जरूर' म्हणून सांगितलें. पण परशुरामासाठीं आम्ही दहा पंधरा मिनिटें थांबलों. हो, नाहीं तर चुकायचा. नंतर शॉर्ट कट्‌नें व जवळ जवळ रानांतून जे थेट आलों, ते फल्यालूला येऊन थांबलों आणि तेथेंच माझे दोन कुली व विनोदांचा एक कुली थांबला होता. म्हणून विनोद येईपर्यन्त तेथेंच थांबण्याचें ठरविलें आणि पंड्याला छुण्णा-चट्टीस जागा करून ठेवण्यासाठीं पुढे पाठविलें.

मी जो थांबलों, तो विनोदांची वाट पाहून पाहून कंटाळा येईतोंपर्यन्त थांबलों. जसें साडे सहा वाजायला येऊं लागले (मी येथें साडे तीनच्या सुमा-

रास येऊन पोहोचलों ) तसतशी मला शंका येऊं लागली कीं, विनोदांचे दंडीवाले आलेच नाहींत कीं काय? कीं विनोदांना पैशाबद्दल पुन्हां दंडीवाल्यानें आडविलें? कीं आणखी कांहीं भानगडी झाल्या कुणास ठाऊक! मी बराच वेळ विनोदांची वाट पहात चट्टीखालील चढणीवर उभा होतों आणि झाडी तरी इतकी गर्द कीं वाट काय, पण कांहींच दिसणें शक्य नव्हतें. कोठें कोठें थोडी थोडी झाडी विरळ होती म्हणा, पण त्यानें इतर डोंगर दिसत होते, वाट दिसतच नव्हती. Ah! what a voluminous mountain of ice! डोंगर अगदीं पांढरा फेक दिसत होता आणि असें वाटत होतें कीं, या डोंगरावर एखादें वीस पंचवीस मैल लांबीरुंदीचें पठार तर नसेल? अर्थात् त्यांतही खडकाळ म्हणजे कड्यावर बर्फ नसल्यानें ब्राऊन भाग दिसत होताच. गंगोत्री-जम्नोत्रीकडे जे बर्फाचे डोंगर पाहिले, त्यांचीं नुसतीं उत्तुंग शिखरें दिसत होतीं. पण इथें व्हॉल्यूम्स ऑफ् ऑईस् दिसत होते.

अखेरीस मी चांगला शंभर फूट खालीं उतरून विनोदांची दंडी दिसते काय पाहण्यासाठीं आलों. ( आणि येथून ज्याप्रमाणें थोडासा रस्ता दिसला, त्याप्रमाणें वर वर्णन केलेला ice mountain दिसला आणि म्हणूनच मी वर जाऊन संध्याकाळ पडली असतांदेखील त्याचा एक फोटो घेतला. ) पण छट्, विनोदांच्या दंडीचा पत्ता नव्हता. मला मोठी पंचाईत पडली कीं करायचें काय? त्यांच्या कुलींचें काय करायचें? मी पंडा पुढें पाठविला आहे, त्याचें काय आणि आतां पुढें जाणें कितपत शक्य आहे? पण जेव्हां साडे सहा वाजून गेले, तेव्हां मी नक्कीच ठरविलें कीं, आज मुक्काम येथेंच.

अखेरीस सात वाजण्याचे सुमारास विनोदांची दंडी आली आणि माझा जीव एव्हरेस्टवरून समुद्रांत पडला! त्यांचे दंडीवालेच मुळीं अडीच वाजल्यानंतर आले आणि मग ते निघाले आणि त्यांत त्यांचे दंडीवाले कांही एकदम बळकट नाहींत. म्हणून कांहीं चालत व थोडेंबहुत दंडींत बसतच विनोदांना यावें लागलें.

## झालाचट्टी

ता. ३०-५-१९४१

आज कांहीं बाबांची गडबड नव्हती लवकर जागें व्हायला; तेव्हां चांगलें

उजाडल्यावर म्हणजे साडे चार वाजतां मी जागा झालों आणि मग एकदम गडबड सुरू केली, पलंग आवरला (आईनें इकडे पिसवा फार आहेत व माझ्यावर पिसवांचें फार प्रेम आहे म्हणून माझ्याबरोबर पलंग दिला आहे; पण बंकट तरी किती हुषार! त्यानें पलंगाचा ताणच दिला नाहीं! तेव्हां आपलें झोळींत झोपल्यासारखें वाटतें झालें), होल्डॉल बॅग आवरली आणि गडबड करूनदेखील आम्ही साडे पांचनंतर बाहेर पडलों! त्यांतील अर्धा तास विनोदांच्या चहालाच लागला!

आज खालीलप्रमाणें उंच्या मोजल्या– फल्याळू ६८०१, ७३७०, ७६५०, छुण्णाचट्टी ७४९०, ठीक चढण ८२१०, थोडासा सपाट रस्ता ८२२०, साधारण चढ ८५००, थोडी सपाटी ८५३०, थोडा चढउतार ८५२०, ठीक चढण ९२३०, चढण ९४८०, बेलक ९७००, ९६९०, ८८१०, पंगराणा ७४००, ७६२०, ७७८०, झालाचट्टी ५९००.

छान! आज काय सुंदर झाडी लागली म्हणून सांगूं! रस्ता अगदीं पायवाट आणि अगदीं गर्द झाडी! ह्या झाडीपुढें सिंगोटीस लागलेली झाडीदेखील फिकी! दुपारीं बारा वाजतांदेखील उन्हें पडणें अशक्य! बरें, डाव्या बाजूला डोंगर तरी इतका उंच कीं दऱ्यांमध्यें सदा सर्वकाळ गडद अन्धकारच असणार, ह्यांत बिलकूल शंका नाहीं. प्रो. विनोद सांगत होते कीं, 'कालिदासानें वर्णन केलें आहे कीं, या हिमालयीन दऱ्यांमध्यें अशा जागा आहेत कीं, तेथें कधींही सूर्यप्रकाश येत नाहीं.' सरळच आहे! उंच उंच पर्वत आहेत आणि हिमालय उत्तरेकडे असल्यानें कधींही सूर्य डोक्यावर येणें शक्य नाहीं आणि आजची झाडी आम्ही प्रत्यक्ष बघितली, त्यावरून वाटतें कीं, कालिदास म्हणतो तेंच खरें.

नेहमींच्या सवयीप्रमाणें ठीक चढणविरून मी झपाट्यानें चढत चढत बेलकपर्यन्त आलों. छुण्णाचट्टीपर्यन्त मी प्रो. विनोदांच्या बरोबर होतों; पण पुढें ९४८० पर्यन्त मी झपाटा मारला व तेथें प्रो. विनोदांच्यासाठीं वाट पहात बसलों. बराच वेळ वाट पाहिली. पुढें एक उंच उंच झाडांची रांग होती. त्यामुळें पुढील

सीनसीनरी दिसणें अशक्य होतें. म्हणून मी थोडा खालीं गेलों, तोंच थोडी मोकळीक दिसली आणि तेथून थोडे बर्फाचे डोंगर दिसूं लागले.

काल ज्या वेळीं फल्यालूला आलों, त्या वेळीं कुली तक्रार करूं लागले कीं, त्यांच्याजवळ बोजा फार होतो, म्हणजे दीड मणापेक्षांही अधिक होतो आणि त्यांनीं सांगितलें कीं, पवालीची चढण याहीपेक्षां अधिक कठीण आहे. गुत्तूपर्यन्त एखादा कुली अधिक केल्यास ते झपाट्यानें येऊं शकतील आणि दंडीवाले तर तक्रारखोर होतेच. दंडींत त्यांना एखादी छत्री घातली तरी तें खपेना. तेव्हां काल एखादा कुली अगर कंडीवाल्याबद्दल खटपटदेखील केली; पण तें शक्य झालें नाहीं. म्हणून मी आमच्या ठिकाणास येईपर्यन्त मध्यें मोकळी कंडी दिसली तर गुत्तूपर्यन्त अर्धा ते एक मण बोजास काय घेईल, हें विचारीतदेखील होतों. त्यांनीं बारा सांगितले म्हणजे मी सहा सांगायचे आणि मग ते निघून यायचे. मध्यें विनोदांसाठीं थांबलों असतांदेखील मला दोन कंडीवाले दिसले आणि शेवटीं एक कंडी सात रुपयास ठरली. कुली व प्रो. विनोद आल्यानंतर मी लागलींच प्रत्येक कुलीजवळील थोडाथोडा बोजा त्या कंडीवाल्यास दिला.

मी सीनसीनरी पहायला थोडा खालीं आल्यावर मी त्या कंडीवाल्यास विचारलें कीं, तो डोंगर कोणता, तर त्यानें सांगितलें कीं, ‘ जम्नोत्रीचा आणि त्याच्याचबरोबर उजव्या हाताचा दुसरा डोंगर गंगोत्रीचा. ’ मला फारच आश्चर्य वाटलें. काय गंमत पहा. जम्नोत्रीपासून गंगोत्रीपर्यन्त रांगच्या रांग बर्फमय दिसत होती. Oh ! what a volume ! what a length ! and what a height !

आम्हाला जो गंगोत्रीजम्नोत्रीचा डोंगर दिसला, तो बर्फाचा पहिला डोंगर दिसला. येथें बर्फाचा डोंगर आणि त्यावर बर्फाचीं शिखरें दिसूं लागलीं. सगळेंच पांढरें स्वच्छ आणि आकाश अधिक स्वच्छ होऊं लागल्यावर तर त्या उंच उंच बर्फाच्या शिखरांमागें आणखी बर्फाचे पहाड उंच उंच दिसूं लागले. ते बर्फाचे उंच उंच पहाड. त्यांचीं तीं चकाकणारीं शिखरें. भयंकर खोल दऱ्या

आणि तें गर्द अरण्य, ह्या गोष्टींचा एकसमयावच्छेदेंकरून विचार केल्यास वाटतें बा हिमालया, खरोखरीच तूं नगाधिराज आहेस! ज्यांच्या उंचीच्या कल्पनाही यायच्या नाहींत, अशा बर्फाच्या उत्तुंग शिखरांमागें डोंगराची रांग व पहाड असावेत, ह्यापेक्षां जगांतील आश्चर्य तें काय असेल? मी तत्काळ परत जाऊन प्रथम कॅमेरा आणला व एकेका सीनचे २–२ फोटो घेतले. कारण इतक्या दूर दूर असूनदेखील गंगोत्री–जम्नोत्रींची सर्वच्या सर्व रांग एका फोटोंत येणेंच शक्य नव्हतें. जवळील कंडीवाला सांगत होता कीं, 'हीं जीं पांच धामें आहेत, तीं फुलांच्या पांच पाकळयांप्रमाणें आहेत.' हो आणखीन् त्यानें एक मोठी गमतीदार गोष्ट सांगितली. पूर्वी म्हणे गंगोत्री, जम्नोत्री, नारायण, बदरीकेदार व तुंगनाथ, ह्यांचा एकच पुजारी होता. पण एका पुजाऱ्यानें म्हणे कांहीं पाप केलें, म्हणून देव रागावला आणि ह्या पांची धामांचा सरळ रस्ता होता तो अवघड करून टाकला! आणि म्हणून आपल्याला ह्यांना जायला असें वाकडें न् तिकडें जावें लागतें.


प्रो. विनोद आल्यानंतर मी त्यांनाही हे पर्वत दुर्बिणींतून दाखविले. तेथे थोडा फराळ केला. पण त्यांच्या दंडीवाल्यांनीं मात्र त्यांना फार पीडलें. शेवटीं त्यांना बहुतेक चढ चालतच यावें लागलें, म्हणून ते माझ्या मागून २॥ तासांनीं म्हणजे साडे आकरा वाजतां तरी येऊन पोहोंचले आणि शिवाय ते दंडीवाले म्हणूं लागले कीं, 'आम्ही बेलकला जेवण करणार. कारण आम्हाला फार भूक लागली आहे.' आम्ही ठरविलें होतें कीं, पंगराण्याला जाऊन जेवण करावयाचें व तेथून मुक्कामाला झाला अगर जमल्यास बुढाकेदारलादेखील जायचें. पण हे दंडीवाले म्हणूं लागले, 'बस, आपण आज पंगराण्यालाच मुक्काम करणारच!' अशी सारखी कुरकूर चालली होती. अखेरीस विनोद मला म्हणाले कीं, 'तुम्ही पंगराण्याला चला, आम्ही मागून येतों.' ते बेलकला थांबले. त्यांच्या दंडीवाल्यांनीं स्वयंपाकास सुरवात केली. मी पुढें निघून आलों. कुलीही पुढेंच आले.

ज्याप्रमाणें ही चढाई खडी आहे, त्याप्रमाणें ८८१० पासून उतरणही

आहे. पण आम्ही मोठे खुषींत आलों. चिकट माती असल्यानें पाय घसरण्याची कांहींच भीति नव्हती. पंगराण्याला येऊन मी स्नानाला जाऊन येईपर्यन्त प्रो. विनोद आलेच होते. तेथें नमस्कार घालण्याची इच्छा होती; परंतु जेवणाची तयारी झाली असल्यानें तो बेत रहित केला.


स्नानाला जातांना एका पंजाबी साधूनें मला गांठलें आणि माझ्याबरोबर कांहीं हिंदी व कांहीं संस्कृतमध्यें त्यानें गप्पा मारण्यास सुरवात केली. तो म्हणे पंजाबमध्यें संस्कृत शिकला आणि येथें तो यात्रेचे ३-४ महिनेही असतो. तो पंजाबी लोकांसाठीं बांधलेल्या धर्मशाळेंत राहून जे कोणी गरीब साधु येतात, त्यांना तांदूळ वगैरे देतो, वगैरे वगैरे. पण मी परत येतांना त्याला सुनावलें कीं, ‘ काय हे भीक मागणारे लोक ! कोठेंही जा, कांहींएक न करतां जेवढें अधिकांत अधिक मिळेल, तेवढें यांना पाहिजे आहे.’ त्याला गंगोत्री-जम्नोत्रींस पैसा मागणाऱ्या पोरीचीही गोष्ट सुनावली व शिवाय लेक्चर दिलें कीं, ‘ हिंदुस्थान जो दुबळा झाला आहे, तो ह्या भिकेच्या पद्धतीमुळें व युरोपियन देश जे भरभराटीस आले आहेत, त्याचें कारण तेथें भीक मागायला बंदी आहे,’ वगैरे वगैरे. ह्याचा परिणाम एकच झाला कीं, आम्ही पंगराण्याहून झाल्याला निघालों असतां तो विनोदांच्या मागोमाग आला म्हणून विनोदांनीं त्याला दोन आणे देऊं केले असतां ते त्यानें घेतले नाहींत !

आम्ही जेवण केल्यानंतर झाल्याला जायचें ठरविलें, तर विनोदांचे दंडीवाले ‘आम्ही मुळींच येणार नाहीं, आमचा खांदा फुटतो, आमचा गळा कापायचा बेत आहे,’ वगैरे काढून भांडूं लागले. पण विनोदांनीं शेवटीं पायींच जाण्याचें ठरविल्यानें ते नुसतेच तणतणत बसले. यामुळें आम्हांला निघायला, मात्र चांगलाच उशीर झाला आणि पहिली चढण चढत असतांनाच पुष्कळशीं गुरें आल्यानें तर मैलभर जायला तास लागला आणि सहा वाजून गेले. प्रो. विनोद अगदीं सावकाश चालतात. त्यांच्या पायाला जखम झालेली आहेना ? यामुळें झालें एवढेंच कीं, झाल्याला जाण्यापूर्वीं अंधार पडला व रस्त्यावरून दिवा लाऊन चालावें लागलें आणि तेथें आमच्या पार्टीपैकीं आईच्या तिन्ही आजीबाई होत्या. त्यांतलि




चित्र. सं. ३९

केदारनाथास जातांना लागणारा एक बारकासा धबधबा [ पृ. सं. ११९ ]




चि. सं. ४०

चोरघाटी तलाव व त्यावरील बाजूचा बर्फ [ पृ. सं. १२७ ]



चित्र सं. ४१

केदारेश्वराहून दिसणारे उंच उंच बर्फाचे पहाड. [ पृ. सं.१२३ ]



चित्र सं. ४२

केदारेश्वराचें देऊळ [ पृ. सं. १२३ ]

एकीला म्हणे ताप आला. तेव्हां त्या तिघीही येथेंच राहिल्या आहेत. पंडितराव गेले बुढा-केदारला !

पण आज नमस्काराची मोठी गम्मत बुवा ! मी एक नमस्कार जरा जोरानें उभा राहून घालण्याचा प्रयत्न केला, तर वरील छप्पर थाडकिनी डोक्याल लागलें आणि शिवाय त्या छप्पराखालीं भरपूर धूर भरलेला होता. माणसानें उभें राहण्याचा अवकाश कीं, डोळ्यांतून घळ्घळ् पाणी यायला लागलेंच. म्हणजे एखाद्याला गंगा-यमुनेचा संगम येथेंच आहे, असेंदेखील वाटायचें ! अर्थात् त्या धुरांतून दिसलें आणि खालीं बसलें तरच डोळ्यांना थोडेंसें बरें वाटायचें. तेव्हां मी आपले होईल तितके नमस्कार उभें न राहतांच घातले.

## भैरवचट्टी

ता. ३१-५-१९४१

आज कालच्यापेक्षां लौकर निघालों; कारण विनोद लौकर जागे झाले आणि त्यांनीं आम्हाला उठविलें. तेथूनही आम्ही खालीं उतरत होतों. आज मी पुढील उंच्या मोजल्या– झाला ५८७०, बुढा-केदार ४६१०, ५२००, ५५३०, ५७१०, ६०००, ६१२०, ६०३०, तोलाचट्टी ६९८०, भैरवचट्टी ७८१०.

आज झालापासून बहुतेक बुढा-केदारपर्यन्त मी प्रोफेसर विनोदांच्या बरोबर गप्पा मारीतच आलों. काल व आज त्यांच्याबरोबर कुठें रामायण, कुठें ह्या डायरींत लिहिलेले विषय, वादविवाद ह्यांच्यावर निरनिराळ्या दृष्टीनें आम्ही बोलत होतों. अर्थात् ह्यामुळें वेळ किती गंमतीदार आणि झपाट्यानें जातों म्हणून सांगूं !

काल विनोदांच्या दंडीवाल्यांपैकी एकास थोडा ताप आला आणि तो आज सकाळीं बराच चढला होता. तेव्हां तो दंडी सोडून निघून गेला. अर्थात् विनोदांनीं त्याचे सर्व पैसे भागविले. झाल्याला चौथा दंडीवाला कोणी मिळेना, म्हणून त्यांनीं लोहार जातींपैकीं एक दंडीवाला घेतला. अर्थात् येथेंही ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अशा चार जाती आहेत आणि अजून सुधारणा फारशी झाली नसल्यानें येथील

जातिभेद अगदीं कडक आहे आणि येथील ब्राम्हण दंडीवाल्यांना शूद्र दंडीवाल्यानें आणलेलें पाणी किंवा एखादा दंडीवाला शूद्र असतांना दंडींत असलेलें अन्न अगर पाणी बिलकूल चालत नाहीं. इतके भेद येथें अगदीं तीव्र आहेत आणि त्या दंडीवाल्यांनीं विनोदांनादेखील आपल्या दंडींत कांहीं घेऊं दिलें नाहीं आणि ह्याच विषयावर आज आम्ही गप्पा मारीत होतों. " **चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः** " ह्या भगवंताच्या वाक्यावर आमचा सर्व जोर होता आणि आम्ही चूक काय व पाहिजे काय, ह्याबद्दल बोलत होतों. कालदेखील आम्ही असेच गप्पा मारीत आलों. पण कालचा विषय होता रामायण.

बुढा-केदारला येईतोंपर्यन्त अवकाश कीं, आमचा पंड्या तयार होताच. हो, तो मला सागत होता कीं, ' बुढा-केदारला निदान तीन रात्री तरी घालविल्या पाहिजेत.' पण मी त्याला स्पष्ट सांगितलें कीं, ' एक रात्र घालविली तर नशीब समज !' आणि खरोखरीच स्नान, देवदर्शन व जेवण करून आम्ही निघालोंच. अंघोळीस जातांना प्रो. विनोद मला सांगत होते कीं, ' हा केदार बदरीकेदारपेक्षां जुना आहे. नव्हे सत्ययुगांतील आहे, म्हणून यास बुढा-केदार म्हणतात. ' नंतर त्यांनाच शंका आली कीं हा कदाचित् ' बुद्ध-केदार ' असेल आणि बुद्ध-केदारपासून ' बुढा केदार ' होणें हें अगदीं साहजिक आहे आणि खरोखरींच त्या बुढा-केदारवरील कोरलेल्या आकरा मूर्ती पाहिल्या म्हणजे बरोबर वेरूळ येथील चित्रांच्या पोझिशन्सची आठवण होते. यावरून त्याचें नांव ' बुद्ध-केदार'च असावें. बुद्ध-केदारच्या मूर्तीवर शंकर-पार्वती, नंदी, पाच पाण्डव, द्रौपदी, गणपति व महादेवाचें लिंग अशा आकरा मूर्ति कोरलेल्या आहेत. ( अर्थात् शंकराची व गणपतीची मूर्ति या स्पष्ट दिसतात; पण पांच पाण्डव आहेत, असे पुजारी म्हणतो, म्हणूनच खरें मानायचें. कांहीं का असेना, त्या पिंडीवर आकरा मूर्ति आहेत ! ) पिंड जवळ जवळ माउलिंगाच्या पिंडीएवढी आकारानें मोठी आहे आणि महादेवाच्या पुष्कळ देवळांप्रमाणें ह्याला शाळुंका नाहींच. मी आंघोळीहून आल्यावर शंकराला पंचामृत-स्नान घातलें व पूजा केली. ह्या ठिकाणीं नाथ-सांप्रदायी कानफाट्यांची पूजा आहे. केवढीं मोठीं भोकें आहेत त्यांच्या कानांना ! एखादी वाळकी सुपारी सहज इकडून-तिकडे जाईल !

बुढा-केदारला बालगंगा व धर्मगंगा अशा दोन नद्यांचा संगम आहे आणि मी आंघोळीला जातांना माझ्या लक्षांत आलें कीं, झालापासून आपण ज्या नदीच्या कांठाकांठानें आलों तीच धर्मगंगा. या दोन नद्यांचा संगम गांवापासून सुमारें दोन फर्लांग अंतरावर आहे.

बाकी कहर आहे ह्या भीक मागणाऱ्यांचे पुढें व त्यांच्या तऱ्हांबद्दल! आणि जर थोडें दिलें तर त्यापासून समाधान बिलकूल होत नाहीं. पहा ना! पंड्याला ठरल्याप्रमाणें (खरें म्हणाल तर असें ठरलें होते कीं, त्यानें जर वाटाड्या दिला तर त्यास पांच रुपये द्यायचे, नाहीं तर चारच द्यायचे आणि त्यानें आणलेला वाटाड्या शेवटीं ठरला नाहींच. तरीदेखील) आम्ही त्याला पांच रुपये दिले. तर लागलींच तो जेवणाबद्दलचे पैसे मागूं लागला. महादेवाला मी व प्रो. विनोदांनीं मिळून एक रुपया ठेवला, तरीदेखील पुजाऱ्याचें समाधान झालें नाहीं. त्यांना बक्षीस आणखी कांहीं पाहिजे होतें. कारण काय तर आम्ही जे पैसे ठेवतों ते सर्व देवाच्या बँकेंत जातात. शिवाय 'अमक्या इथें पाणी पाहिजे आहे, त्यासाठीं पैसे द्या, आम्हाला भूक लागली, त्यासाठीं पैसे द्या.' असे नानातऱ्हेचे भिक्षेकरी तेथें आले होते. आम्ही त्या सर्वांना वाटाण्याच्या अक्षता लावल्या, ही गोष्ट निराळी! (आणि इतके लोक कां आले होते, हें माहीत आहे का? मी तेथें येणार आहें हें त्यांना पुष्कळ आधीं कळलें होतें and they try to take away as much as they can, from a person whom they know beforehand !

कोण म्हणतो काठीचा उपयोग होत नाहीं? हो, मी गंगोत्री-जम्नोत्रीच्या रस्त्याला तीन चार वेळां वसंत चिताऱ्याला विचारलें होतें कीं, त्यानें काठी कां घेतली नाहीं म्हणून आणि त्यावर त्याचें ठराविक उत्तर असे कीं, काठीच्या उपयोगापेक्षां अडचणच अधिक होते आणि तिचें एक ओझेंच होतें. पण मी त्याला एकदां पाऊस पडत असतांना तोलाचट्टीपासून भैरवचट्टीपर्यन्त जरूर काठीशिवाय न पडतां जाऊन दाखवावें, असें सांगितलें. अहो काय ती केवळ चिक्कण माती! पाय अगदीं सटासट् निसटत होते. मीसुद्धां चांगला सपाटून आपटलों.

तुम्ही म्हणाल कीं, ' नाचायला येईना...... ' वगैरे. पण येथें खरोखरीच अंगण नुसतें वांकडेंच नव्हतें, पण त्यांत चांगले सपाटून खाचखळगे होते. आणि कंडी-दंडीवाल्यांसकट सगळे सारखे सटासट् निसटत होते.

हो ! प्रो. विनोदांच्या दंडीवाल्यांची फार गंमत झाली. बुढा-केदारला रडतखडत येऊन ठेपले, तेव्हां मी प्रो. विनोदाच्या सारखा पाठीमागें लागलो कीं, ' काय वाटेल तें करा; परंतु तुम्ही हे दंडीवाले घेऊं नका. ' कारण त्यांच्या हिशोबाप्रमाणें आम्ही शुक्रवारीं केदारला पोहोंचणार आणि मग आम्ही देव-दर्शन करणार, म्हणजे आम्ही वीस जूनला परत जाण्याऐवजीं वीस जुलईला परत जाण्याचा रंग मला दिसूं लागला आणि शिवाय वर किरकिर आणि प्रो. विनोदांची होईल तो चालावें ही इच्छा. वर पैशाचा मोहही सुटत नव्हता. मी प्रो. विनोदांना सुचविलें कीं, ' ह्या रडक्या दंडीवाल्यापेक्षां तुम्ही दोन कंड्या करा. तें तुम्हाला सोपें जाईल. ' पण कंडीवाला म्हणायला लागला सहा वीस तेव्हा तेंही पटेना आणि ते दंडीवाले तर सारखे सांगूं लागले कीं, ' येथें कांहीं दुसरी दंडी मिळत नाहीं. आम्हीच येतो. ' अखेरीस प्रो. विनोदांना दंडीपेक्षां पायानें जाणें अधिकच श्रेयस्कर वाटूं लागलें आणि ते मला म्हणालेदेखील-' दुसरी दंडी मिळाली नाहीं, तर मी तुमच्याबरोबर पायींच येणार. ' पण प्रो. विनोदांनीं पंड्याला सांगून ठेवलें होतें आम्ही ज्याच्या चट्टींत उतरलों होतों, त्याच्या पंड्याला सांगून ठेवलें होतें आणि दुसऱ्या दंडीबद्दल सारखी खटपट चालली होती. अखेरीस त्या दुकानदाराच्या मदतीनें त्यानीं एक दंडी ठरविली. अर्थात् पैशाबद्दल वादविवाद नेहमींप्रमाणेंच झाले. शेवटीं १३६ रुपयांना दंडी ठरली. आणखी कांहीं देवस्थानला बक्षिसी द्यावी, वगैरे वगैरे.

या खेपेचे दंडीवाले लोहार जातीचे आहेत आणि गम्मत ही की, आम्हांला त्यांच्याबद्दल कांहींही वाटत नाहीं. पण ते कधींही दंडींत खाण्याचें अगर पिण्याचें ठेऊं देत नाहींत कीं त्याना खाण्यापिण्याचें कधीं आणून देत नाहींत. ज्याप्रमाणें खुलें केलेल्या देवळांतदेखील जायला अस्पृश्य लोक कुरकुर करतात, ( म्हणजे त्यांची त्यांनाच भीति वाटते कीं आपल्या पूर्वजानें कधींही जी

गोष्ट केली नाहीं, ती आपण केली तर देव आपल्याला शाप देईल ! ) त्याप्रमाणें हे लोक आमच्या राहण्याच्या खोलींत अगर चट्टींत पाऊलदेखील ठेवीत नाहींत. म्हणजे खरोखरीच पुष्कळ लोकांना दुसऱ्यांची उंचावर ठेवण्याची इच्छा असतांनादेखील आपली पायरी सोडण्याची तयारी नसते. कारण '**मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः।**' पण हे दंडीवाले फारच बळकट आहेत, आणि त्यांची कुरकूर कधींही नाहीं. नव्हे, प्रो. विनोद आपणहून चालायला लागले, तर ते आपणहून त्यांच्यापुढें दंडी नेऊन ठेवतात. कारण a lower caste !! आणि generally a lower caste tries to satisfy the upper one by labouring itself as much as it can !

बाकी ह्या पिवळ्या चिकण मातीचें मोठें आश्चर्य आहे हं ! अगदीं हळकुंडा-सारखी पिवळी जर्द माती ! आणि पाऊस पडल्यानंतर इतकी चिकट आणि टणक होते कीं तीवर काठीचें टोकदेखील रुतून बसणें शक्य नाहीं. मी माझी काठीं कुंदनसिंगाजवळ दिली होती आणि म्हणून मी अगदी सटकिनी आपटलो. ( मागें सांगितलेंच आहे कीं, आईनीं 'एक वाटाड्या घेऊन जा' म्हणून सांगितलें होतें म्हणून; आणि तेवढ्यासाठीं मी त्याला सोळा रुपये आणि जेवण ठरवून वाटाडया म्हणून घेतलें. खरी गोष्ट अशी कीं, हाच तो विनोदांचा किरकिऱ्या दंडीवाला. ह्यानेंच मल्लाचट्टीस येऊन आपल्या इतर तीन साथीदारांचे कान फुंकले. पण काय नशीब असतें एकेकाचें पहा ! विनोदांनीं 'ह्यालाच वाटाडया घ्या,' म्हणून सांगितलें आणि कारण काय तर म्हणे त्याच्या दुसऱ्या लग्नाची बायको आजारी पडली, त्यामुळें त्यांत त्याला दोन तीनशें रुपये कर्ज झालें ! ह्याची पहिली बायको म्हणे फार श्रीमंत होती. पण दुसऱ्या बायकोनें मात्र त्याला दंडी-वाहकाचें काम करायला लावलें आणि म्हणून प्रो. विनोदांनीं त्यालाच घ्यावें म्हणून सांगितलें. ( अच्छा, 'ईश्वरेच्छा बलीयसी !' ) तेव्हां प्रथम वर जाऊन मी कुंदनकडून काठी घेतली. बाकी त्या पिवळ्या मातीनें मात्र मला वाटूं लागलें कीं, बा हिमालया ! खरा नगाधिराज आहेस बुवा तूं. केव्हां, कसा, कोठें, पाऊस पाडून

कसल्या मातीवरून कोणाला पाडशील, याचा कांहीं नेम नाहीं !

## रायपूरचट्टी.

ता. १-६-१९४१

आज पुढील उंच्या मोजल्या-भैरवचट्टी ७७९०, ८०८०, ८०६०, ७४९०, ७५२०, ६५३०, ५३१०, ५२३०, ५१२०, धुत्तूचट्टी ५१७० ( सुमारें ७० फूट खालीं बेलंग नदी ), चढणीस सुरवात ५४९०, रायपूरचट्टी ६३५० ?

हो, हें आमचें प्रश्नचिन्ह तुम्हाला दुसऱ्यांदा दृष्टीस पडत आहे ! पण मी तरी काय करूं ? मी त्या वेळी बॅरोमिटर पहायचेंच विसरलों ! पण दुसरे दिवशीं असलेली उंची आणि प्रथम दिवशीं आणि दुसरे दिवशीं उंचीमध्यें असलेला सरासरी फरक ह्यावरून मी माझ्या कल्पनेप्रमाणें उंची मांडली आहे ! एवढ्याच-साठीं कीं चढण कितपत आहे ते चटदिशी लक्षांत यावें !

खरें म्हणाल तर माझी इच्छा गोमांडला जावें अशी होती. परंतु कुलींनीं ठरविलें कीं, रायपूरचट्टीलाच जायचें, तर मी पुढें जाऊन काय करणार ? मी गोमाण्डला जावें, असें म्हणत होतों. ह्याचे कारण एकच, उदईक पवालीला मुक्काम करावा, अशी माझी बिलकूल इच्छा नाहीं. पण कुली म्हणत कीं, ' मुक्काम पवालीसच करावा. कारण चढाई फार आहे. '

आज मी व प्रो. विनोद विचार करीत बसलों होतों कीं, what should be done to quicken the pace of the कूलीs ? तेव्हां असें ठरविलें आहे कीं, त्यांनीं जर बुधवारपर्यन्त म्हणजे बुधवारीं बारा वाजेपर्यन्त केदारला पोहोंचविलें तर we should give them meals at both the times and should pay 8 annas when we go to केदार.

पाहूं काय काय होतें तें ! आणि कुली व दंडीवाले, ह्या दोघांनींही झपाटा मारण्याचें कबूल केलें आहे ! तरीदेखील उद्यांचा मुक्काम बहुतेक पवालीस पडणार.

बेलंग नदीचें पाणी बरोबर गंगेच्या पाण्यासारखें गढूळ आहे आणि त्या पाण्याचा खळखळाटही पुष्कळ होत आहे. प्रो. विनोदांना ' ही गंगा तर नव्हे

ना ? ' अशी शंकादेखील आली. ह्या नदीला ओघळदेखलि पुष्कळ मिळतात व त्यांतील कैक ओघळांचें पाणी पिवळेंजर्द आहे; कारण पिवळ्या मातींतून येणारे ओघळ ना ?

आज मोठी गम्मत झाली ! ६५३० फुटांपर्यन्त उतरून आल्यावर प्रो. विनोद चालूं लागले आणि गप्पा मारतां मारतां आम्ही चट्दिशी शॉर्ट कट्‌ला आलों. तेव्हां ६५३० पासून ५३१० पर्यन्त सगळा डोंगर विनोदांना पायीं उतरावा लागला. अगदीं सुंदर खडी उतरण आहे. बाकी आम्ही किती डोंगर चढलों व उतरलों, हें मोठें लक्षांत ठेवण्यासारखें आहे हं ! गंगणानीपासून बेलक-पर्यन्त चढून बुढा-केदारपर्यन्त उतरलेला पहिला डोंगर, तेथून ८०८० पर्यन्त चढून धुत्तूपर्यन्त उतरलेला आणि पिवळ्या मातीचा दुसरा डोंगर आणि पवाली-पर्यन्त चढाईचा आणि तेथून उताराचा हा तिसरा डोंगर. बरें, डोंगरांची उंची तरी थोडीथोडकी आहे का ? ५ हजार, ७ हजार, असें हजारांनीं बोलायचें. डोंगर चढून उतरावे लागत आहेत, म्हणून म्हणतो, ' बा हिमालया ! धन्य तुझी, खरा नगाधिराज आहेस बुवा ! अरे, नुसती एक दरी चढून उतरायची म्हटलें तरी चार पांच हजारांपेक्षां कमी नाहीं. ' त्या यमुना-व्हॅलीमधून गंगा-व्हॅलीमध्यें अगर गंगा-व्हॅलीमधून यमुना-व्हॅलीमध्यें उतरायचें म्हणजे चार पांच हजार फुटांचे डोंगर ओलांडावे लागत आहेत, हें वाचकांनीं गंगाणीहून उत्तरकाशीस जातांना व धरासूहून उत्तरकाशीस जातांना व धरासूहून गंगाणीस जातांनाच्या उंच्या बघून ताडून पहावेत !

आज सकाळीं पांचच्या सुमारास सपाटून पाऊस पडत होता आणि म्हणून आम्ही पाऊस केव्हां थांबतो, हें पहात बसलों होतों. परंतु साडे सहा सात वाजले तरीसुद्धां जेव्हां पाऊस थांबण्याचीं चिन्हें दिसेनात, तेव्हां आठ साडे आठ वाजेपर्यन्त भैरवचट्टींत भोजन उरकून मगच पुढील मुक्कामाला जावें, असें ठरलें आणि आठ साडे आठ वाजेपर्यन्त खरोखरीच पाऊस उघडला व आम्ही धुंदुरमास करून ( अर्थात् खिचडी केली नव्हती, पण भाकऱ्या केल्या होत्या ) आम्ही बाहेर पडलों आणि आस्ते आस्ते चढून उतरून तीन चारच्या

सुमारास येथें येऊन पोहोचलों. आम्हाला वाटत होतें कीं पाऊस यायचा नाहीं म्हणून, परंतु आम्ही शॉर्ट कट् घेतलेली उतरण उतरत असतां थोडाबहुत पाऊस आलाच. बस्स् ! अर्थात् ह्या शॉर्ट कट्नें प्रत्येक पाऊल बहुतेक बघून टाकावें लागत असल्यानें मी व विनोद यांच्या गप्पा बराच वेळ बंद होत्या आणि त्यांत पाऊस. नशीब आमचें कीं रस्त्यावर पिवळी माती नव्हती. हो, दंडी-वाल्यांचा रस्ता शॉर्ट कट्पेक्षां दोन तीन मैलांनीं अधिक लांब आहे म्हणे.

आज येथें आल्याबरोबर पहिली गोष्ट केली कीं, नमस्कार घातले. विचार केला कीं, परशुराम वगैरे यायच्या आंत नमस्कार घालून टाकावेत. हो, नाहीं तर नमस्काराच्या वेळीं आम्हाला पुन्हां नेहमींप्रमाणें धुराचा खुराक मिळायचा !


## पवाली

ता. २-६-१९४१

खरोखरीच गंगणानी सोडल्यापासून जें आम्हाला दाट अरण्य लागले आहे, तें अगदीं येथें आलें तरी अजूनही दाटच आहे आणि अशीच दाट झाडी त्रिजुगी नारायणापर्यन्त आहे, असें मी आज वाचलें. खरोखरीच एखादा हिरवागार गालिचा पसरावा, अशी सर्व डोंगरावर झाडी आहे. मध्यंतरीं जेवढे कडे मोकळे असतील तेवढेच. आमचा रस्ता, काल दिसत असलेलें पिवळे पाणी, सर्व कांहीं दाट अरण्यांतीलच भानगडी आहेत !

आज पुढीलप्रमाणें उंच्या मोजल्या– रायपूरचट्टी ६४१०, पहिला टप्प ६५१०, दुसरा टप्पा ६६५०, तिसरा टप्पा ६९००, चवथा टप्पा ७१००, पांचवा टप्पा ७२२०, सहावा टप्पा ७४९०, सातवा टप्पा ७९९०, गौमांडा आठवा टप्पा ८४८०, नववा टप्पा ८६१०, दहावा टप्पा ८७९०, आकरावा टप्पा ९३००, बारावा टप्पा ९७९०, ९८७०, ९८१०, ९९२०, दुकन्दा ९९९०, १०००० ?, ११२००, पवाली १०७००.


अर्थात् येथें टप्पा ह्याचा अर्थ एवढाच कीं, एक पांच दहा पावलें सपाट रस्ता, बस्स ! नाहीं तर धुत्तूपासून थेट पवालीपर्यन्त सारखा चढच चढ आहे आणि



चित्र सं. ४३
मंदाकिनीचा डोंगरामधून पडत असलेला प्रवाह [ पृ. सं. १२६ ]



चित्र सं. ४४
गुप्तकाशीस जातांनाचा एक रम्य देखावा [ पृ. सं. १३२ ]



चित्र. सं. ४५

गुप्त-काशी येथील अर्धनारीनटेश्वराची मूर्ति [ पृ. सं. १३२ ]



चित्र. सं. ४६

तुंगनाथाचे डोंगरावरील एक देखावा [ पृ. सं. १३८ ]

गोमाडा सोडल्यावर तर मी असा झपाटा मारला कीं ९७९० पर्यन्त येऊन मगच विश्रांतीसाठीं उभा राहिलों. १०००० फुटानंतर आमचें बॅरोमिटर बंद होतें. परंतु सुमारें शंभर दोनशें फुटांपर्यन्त तें अधिक दाखऊं शकतें. म्हणून दुफन्दा-पासून चढतां चढतां एके ठिकाणीं मी उंची मोजली, ती १०१०० भरली. माझी कल्पना होती कीं, झीरो पॉइंटच्या ठिकाणीं जर दोन हजार आणून ठेवले तर रीडिंग पुढेंदेखील वाढेल ! आणि त्यानंतर ४१०० सांपडले म्हणून माझ्या कल्पने-प्रमाणें १०१०० मांडून ठेवले. पण खरें खोटें कोण पाहणार ? मी आणखी वर गेल्यानंतर जेव्हां ४१०० च राहिले, तेव्हां मी तो नाद सोडून दिला व पुन्हां बॅरोमिटर झीरो पॉइंटवर· आणून ठेवलें. कांहीं उंच्या मी येथें आल्यावर एका गृहस्थानें नकाशावरून सांगितल्या आणि उद्यां तर आम्हाला १२५०० फुटांपेक्षां अधिक उंचीवरून जायचें आहे म्हणे !

कहर आहे बाकी हं ! मी रायपूरचट्टी सोडून दोन तीन टप्पे आलों व मला उत्तमपैकीं बर्फाचे डोंगर दिसूं लागले. म्हणून मी फोटो काढूं लागलों, तों सारखें चुटचुट मला चावूं लागलें. पाहतों तों एक तऱ्हेचे बारीक किडे उडून पायांवर चढले होते. त्यांना 'धूल' किडे म्हणतात आणि म्हणूनच मला वाटतें, पवालीची चढण अवघड समजली जाते. आधींच चढण अवघड, त्यामुळें म्हातारे, बायका-माणसे ठिकठिकाणीं बसण्याचा प्रयत्न करीत असतील, आणि ते बसले न बसले कीं, चुटचुट हे धूल किडे चावत असतील खरोखर एक क्षणभरही उभें राह-ण्याची सोय नव्हती ! तरी त्यांतल्यात्यात पाय झाडीत झाडीत मी फोटो काढले. दोन दिवस पाऊस येऊं लागला म्हणून आज मी मुद्दामच लांडी विजार घातली होती, तर हे धूल किडे चावूं लागले. अखेरीस गोमाड्यास थांबलों असतां मी माझी गरम लांब विजार काढून घेतली. इतके दिवसांत आज प्रथम मोजे घातले व पुढें निघालों. ( आणि मी बरोबर मोज्याचे तीन जोड आणले आहेत बरं कां. पण कधी वापरतच नाहीं. कारण जरुरीच नाहीं. ) मी ज्या डोंगराचे फोटो काढले, त्याला मस्तालचा डोंगर म्हणतात.

११२०० फुटांवर आल्यावर पवाली दिसूं लागली. परंतु सरळ रस्त्यानें

जाणेंच शक्य नव्हतें. आमच्या गुरुजींनीं सांगितलें आहे कीं, 'प्रथम अरण्यांतून पाऊल-रस्त्यानें जाऊं नकोस.' पण येथें तर सगळाच पाऊल-रस्ता आहे आणि दुसरी गोष्ट अशी कीं, 'रस्ता असतांना उगीच गवतांतून जाऊं नकोस!' पण येथें गवतावरून जाण्याखेरीज दुसरें गत्यंतरच नाहीं. कारण त्या पिवळ्या मातीवर पाय दिला कीं, माणूस एकदम पवालीच गांठायचा! अगदीं जीव मुठींत धरून उतरत उतरत आम्ही पवाली गांठली.

मी दुफन्दापर्यन्त येऊन प्रो. विनोदांसाठीं थांबलों मात्र कीं, सपाट्यानें जें धुकें येऊं लागलें तें विचारूं नका! आणि धुकें आलें कीं येथें पाऊस ठरलेलाच! तेव्हां आम्ही पवालीत येऊन पोहोंचलों तरी पाऊस चालूच होता. कुली यायला अवकाश होता. दोन वाजायची वेळ होती. म्हणून कुकर यायची वाट न पाहताच स्वयंपाक करण्यास मी परशुरामला सांगितलें.

येथे आम्हाला तेहरी संस्थानचे फॉरेस्ट इन्स्पेक्टर भेटले. ते आणि प्रो. विनोद हे बऱ्याच गप्पा मारीत बसले होते. तेहरी संस्थानचे उत्पन्न म्हणे वीस पंचवीस लाखाचें आहे आणि त्यातील निम्में ह्या फॉरेस्ट खात्यात खर्च होतें. तेव्हा प्रो. विनोदानीं विचारलें कीं, 'असें असून गंगानदीच्या काठीं इतकें अरण्य असतानादेखील अजून एखादी पेपर मिल कशी निघाली नाहीं?' तर त्यानें उत्तर दिलें कीं, 'त्यासाठीं ऋषीकेशला पेपर मिल कशी व केवढी काढावी ह्याबद्दल प्लॅन चालू आहे.'

त्याला येऊन म्हणे दोन तीन वर्षेंच झालीं, आणि तत्पूर्वी तो ब्रिटिश इंडियात हिमालयातील फॉरेस्टसंबंधीच नोकर होता. त्यामुळें त्यानें बहुतेक सर्व हिमालय, ज्या भागांत फॉरेस्ट होणें शक्य आहे, तो सर्व भाग पालथा घातला आहे. प्रो. विनोदानीं त्याला विचारलें, 'हिमालय हा समुद्रातून उत्पन्न झाला आहे, ह्याची कितपत शक्यता आहे?' तर त्यानें येथे तीन तऱ्हेचे धोंडे सापडतात, त्यातील ठिसूळ धोंड्यावरून असें अनुमान निघतें; दुसरा म्हणे आपला काळा धोंडा व तिसरा अभ्रक असलेला धोंडा; यावरून कांहीं नक्की अनुमान निघत नाहीं, म्हणून सांगितलें. (बर्फात कैक वेळेला माशांचे सापळे सापडलेले माझ्या ऐकिवात आहे; परंतु ते सापळे

पूर्वीच्या एखाद्या सरोवरांतील कशावरून नसावेत ? हें मला कळत नाहीं. कारण पृथ्वीच्या पाठीवर खाऱ्या पाण्याचीं सरोवरें उंचीवर नाहींत असें नाहीं ! ) शिवाय पुष्कळ पुष्कळ गोष्टी त्यानें सांगितल्या आणि त्यांतील महत्वाचे मुद्द प्रो. विनोदांनीं टिपूनदेखील घेतले आहेत. त्याचीं तीं वर्णनें- त्यांना म्हणे दऱ्याखोऱ्यांतून प्रवास करायचा म्हणजे अगदीं लहान पाऊल वाटेनें प्रवास करावा लागतो आणि तेथें चट्टया वगैरे नसल्यानें बरोबर तंबू व खाण्याचें सर्व सामान घेऊन जावें लागतें, हिमालयांतील झाडें, त्यांचीं तीं वर्णनें वगैरे ऐकलीं म्हणजे वाटतें कीं खरोखरीच बा हिमालया, तूं नगाधिराज आहेस ! आणि हो, त्याच्याबरोबर कोणीएक सेक्रेटरी सारखा फिरत असतो आणि त्यानें हिमालयांतील झाडावर निबंध लिहिला आहे. आणि तो म्हणे इतका उत्कृष्ट आहे कीं, तो कोठल्याही फॉरिन् युनिव्हर्सिटीला पाठविला तर त्याला सहज पीएच्. डी. होतां येईल. कारण बॉम्बे युनिव्हर्सिटींतील लोक मुळीं काळजीपूर्वक तपासत नाहींत, कारण फक्त पैशाकडे दृष्टि आणि ह्यावर मी व प्रो. विनोद पुष्कळ वादविवाद करीत होतों. Indian people look after money. They want to get much with doing least work.

इतकी सपाटून ओळख झाल्यावर विनोदांनींही त्यांना एक तत्त्वज्ञानाचा डोस पाजला. सकाळचें जेवणच तीन साडे तीन वाजता झाल्यानें अर्थातच संध्याकाळच्या जेवणास काट मारला गेला. पण संध्याकाळीं त्या रावसाहेबानें ( त्या इन्स्पेक्टर किंवा सबंध रानावरील मुख्याचें नाव ) पेढे दिले. आठ वाजता फार झोप आल्यानें थोड झोपलों. पण नऊ वाजता आपोआप जाग आली. तेव्हा नमस्कार घालून टाकले.

## त्रिजुगी नारायण

**ता. ३–६–१९४१**

आज जों पवालींतून बाहेर पडलों, तों वाहवा रे वाहवा ! तिन्ही बाजूला बर्फाची रांगच्या रांग दिसूं लागली आणि त्यावर सूर्यप्रकाशानें चमकणारे बर्फाचे पर्वत तळपूं लागले ! आणि तो देखावा पाहिल्याबरोबर वाटले कीं, बा हिमालया,

धन्य तुझी ! खरा खरा देवतात्मा तूंच आहेच ! तें सौन्दर्य पाहून मन अगदीं थक्क होऊन गेलें ! तेथून प्रथम केदारचा पर्वत दिसत होता, आणि इतर बर्फाचे पर्वत दिसत होते ! केदारपर्वताच्या मागें म्हणे नारायणाचा पर्वत आहे ! मागील बाजूस मात्र आम्ही काल उतरलेला ५०० फुटांचा डोंगर असल्यानें कांहींएक दिसत नव्हतें; पण आज आपण दुसऱ्याच एका रांगेच्या कडेकडेनें जाणार आहोंत, हें लक्षांत आल्यावर एक आशा उत्पन्न झाली. पण आम्ही डोंगर चढतों तोंच जें सपाटून धुकें आलें, तें मग्गूपर्यन्त जाईतों धुकें व पाऊसच होता. त्यामुळें बारा ते तेरा हजार फुटांवरून तीन चार मैल चालूनदेखील डोळ्याचें कांहींएक समाधान झालें नाहीं. फक्त वर खालीं, आजूबाजूला दाट धुकें असतांना कसें वाटतें, एवढेंच कळलें ! पण माझ्या कल्पनेप्रमाणें हा अनुभव महाबळेश्वरलादेखील आला असता. प्रो. विनोदांनीं कितीही जरी त्या धुक्याची स्तुति केली, तरी मी हेंच म्हणणार कीं, त्यांना ज्या गृहस्थानें पवालीच्या पहाडांतून धुकें असतांना तुम्ही गेला तर फार बरें होईल म्हणून सांगितलें, तो गृहस्थ भित्रा असावा ! आणि मी हें प्रोफेसरसाहेबांना तीन चार वेळातरी सुनावलें असेल.

ज्या प्रचंड पहाडाच्या माथ्यावरून आम्ही गेलों, त्याला किंकोलीचा पहाड म्हणतात. आम्ही त्या पहाडाच्या मध्यावरून खालीं उतरायला सुरवात करायला, आणि पाऊस पडायला एकदम सुरवात झाली; आणि कसला भयंकर खडा उतार आहे तो ! आणि शिवाय त्यांतून माती आहे निसरडी ! म्हणजे जो उतार उतरायला एखाद्याला पंधरा मिनिटें लागायचीं, तोच उतार उतरायला मला तास दीड तास लागला. इतकें सावकाश मी तो उतार उतरत होतों आणि असले निसरडे उतार एकाच ठिकाणीं नाहींत ! असे निदान तीन चार तरी उतार आहेत. खरोखरीच वसंतानें पावसांतून जरूर एकदा पवालीहून त्रिजुगी नारायणाला जावें, म्हणजे कळेल त्याला काठीचा उपयोग !

खरें म्हणाल तर माझी अशी इच्छा होती कीं, आज संध्याकाळपर्यन्त गौरीकुंडाला जावें म्हणून ! पण ह्या पावसानें असा कांहीं गोंधळ उडविला म्हणून सांगावें, कीं बस्स ! आणि त्यांत पुष्कळ ठिकाणीं पिवळी चिक्कण माती म्हणजे प्रत्येक पावला-

पावलाला ! पाऊल बरोबर बसलें कीं नाही, हें पहावें लागत होतें आणि त्यांत तो तेहरी संस्थानचा रस्ता ! वाहवारे वाहवा ! आम्ही मग्गूचट्टीला आल्यावर तर सुटलों एकदां असेंच वाटलें. ( कारण पहिली उतरण म्हणजे पावसांत निसरड्यावरून कडा उतरण्यासारखें होतें. इतके जीव मुठींत धरून आम्ही चालत होतों. तरी मी एकदां पडलों व प्रो विनोदही घसरले. पण त्रिजुगी नारायणास आल्यावर मात्र एक सुटकेचा सुस्कारा टाकला आणि मग्गूपासून पुढेंदेखील मी चांगला दोन तीन वेळां निसरलों. एवढेंच कीं मग्गूपर्यन्त येईपर्यन्तची जी पहिली उतरण होती, तिच्या खालीं कडाच होता, तर मग्गूपासून पुढें दोन्ही बाजूला दाट झाडी होती.

खरेंच, काल एक मारुतीची मूर्ति पाहिल्याचें सागायचें राहिलें बुवा. आपल्या इकडे मारुतीच्या उजव्या हातात पर्वत असतो, तर या मारुतीच्या हातांत तलवार होती. मोस्ट वंडरफुल ! या मारुतीच्या एका हातांत गदा व दुसऱ्या हातांत उगारलेली तलवार. असली मूर्ति मी मागें कधीं ऐकली नव्हती, मग पाहण्याची गोष्टच राहो ! मी येन केन प्रकारेण त्या मूर्तीचे फोटो घेतले. जें कांहीं येईल तें येईल. मूर्ति ल्हानशीच पण बरीच ओबडधोबड होती.

आज उंच्या कांहीं फारशा नाहींतच. किकोळीचा पहाड तर १२५०० फुटां-पेक्षा अधिक आहे, म्हणून काल कळलें होतें मग्गूचट्टीची उंची १०००० फुटांपेक्षां अधिकच आहे. आणि त्रिजुगी नारायणाची तेवढी उंची मोजली, ती ७५४० भरली. मग्गूचट्टीपासूनदेखील त्रिजुगी नारायणापर्यन्त घसरडी उतरण आणि पाऊस असल्यानें आज प्रो. विनोदांना बहुतेक सर्व रस्ता चालावाच लागला आणि त्रिजुगी नारायण दिसूं लागल्यापासून तर दोन तीन फर्लांग लांबीचा पिवळ्या मातीचा रस्ता लागला आणि मग मात्र सगळा रस्ता सोडून अगदीं डोंगराळ गवतावरून व झाडी बाजूला करून उतरावें लागलें. खरोखरीच या पिवळ्या चिक्कण मातीची मला भीतीच बसली आहे !

आज त्रिजुगी नारायणाला आल्यावर, बाबांच्या सांगण्याप्रमाणें कुंडांत स्नान न करतां वर बादलींत पिण्याचें पाणी आणून स्नान केलें आणि मग आरतीच्या वेळीं देवदर्शन केले. नारायणाची देवाची मूर्ति पांच धातूंची केलेली असून त्या मूर्तीवर

जय विजय आहेत आणि पार्वती व लक्ष्मीच्या दोन निरनिराळ्या मूर्ती आहेत. बाकी इकडे मुख्य देवांच्या आसपास बरेचसे इतर देव असण्याचें खूळ मात्र फार !

# केदारनाथ

**ता. ४-६-१९४१**

येथेंदेखील पहाना, मुख्य देवाला जातांना रस्त्यावर तर अनेक लहानलहान मंदिरें आहेतच. पण देवाच्या आसपास जे दगड आहेत, त्यांच्यापुढेंदेखील एकएक पुजारी पैसे ताटलींत ठेऊन 'पैसा टाका' म्हणायला तयारच असतो ! ही गोष्ट येथेंच आहे, असें नव्हे, तर काशीला गेलों होतों, पंढरपूरला गेलों होतों, तेथेंही असाच देवांचा सुळसुळाट आहे !

येथें येतांना एक सोडून तीन नगारेवाले लागले 'तुम्हारी यात्रा सफल हो !' म्हणून सांगायला. माझें अगदीं स्पष्ट मत आहे कीं, हे असले नगारेवाले व ठिकठिकाणीं रस्त्यांत व आजूबाजूला हीं शेंदूर फासून देवळें उत्पन्न केलीं आहेत, त्या सर्व फुकट पैसा मिळविण्याच्या युक्त्या आहेत आणि आमच्याकडील भाविक लोक यांना पैसे देतात म्हणून यांचें सदासर्वकाळ चालत असतें.

आज मी पुढील उंच्या मोजल्या— त्रिजुगी नारायण ७५८०, ७३२०; केदारनाथास जाण्याचा रस्ता फुटतो ६५९०: मंदाकिनीजवळील ओढ्यावरील पूल ५९२०, ६१९०, ६६१०: गौरीकुण्ड ६७६०, ७३९०, ७९६०, ८११०, ८६९०, ९०००, रामवाडा ९२००, ९७६०, ९८८०, १००००: केदारनाथ ११७००.

आजचा हा ब्रिटिश मुलखांतील रस्ता कसा सुंदर व रुंद आहे म्हणून सांगूं ? म्हणजे जर गंगोत्री–जम्नोत्रीचा रस्ता आपल्या खेडेगांवांतील रस्ता मानला, तर हा मुंबईतील डामरी रस्ता समजला पाहिजे आणि पवालींतील रस्ता पाऊल-वाट समजली पाहिजे. ह्या रस्त्यानें एक अगदीं लहान मोटार सहज जाऊं शकेल, इतका मोठा व खांचखळगेरहित हा रस्ता आहे. ह्याखेरीज येथें जातां जातां मैलाचे व फर्लांगाचे दगड आहेत. ठिकठिकाणीं दूध तर मिळतेंच, पण रात्रीं झोपण्यास योग्य अशा दोन

तीन मैलांच्या आंत चट्ट्या आहेत. नाहीं तर गंगोत्री-जम्नोत्रीच्या रस्त्यावर वाटेंत आठ दहा मैलांवर एखादी चट्टी असायची आणि त्याच्याच आसपास दूध मिळायचें ! आणि पवालीकडे तर काय, मध्यंतरीं दूध मिळणेंदेखील शक्य नाहीं.

त्रिजुगी नारायणापासून पूल ओलांडेपर्यन्त किती तरी सुंदर सुंदर बर्फाचे डोंगर दिसले ! पण हल्लीं कितीही उंच उंच पहाडांचें अगर बर्फाच्या पर्वतांचें कांहीं वाटेनासेंच झालें आहे. कारण सारखे बर्फाचे डोंगर पाहतोंच आहें. नाहीं तर सिलक्याराहून पुढें पहाड चढल्यावर कोठें बर्फ दिसतें का, हें किती लक्षपूर्वक पहात होतों ! त्या वेळेस बर्फ ह्या टेकडीवरून दिसतंय् का ? ही टेकडी चढली म्हणजे दिसणें शक्य होईल का ? असे विचार सारखे मनांत येत असत. पण आतां बर्फाच्या डोंगरांबद्दल कांहींएक वाटत नाहीं; कारण " **अतिपरिचयादवज्ञा !** "

जरी रस्ता मोठा रुंद असला तरी त्यावरून सायकल चालविणें मात्र शक्य नाहीं. कारण उतार आणि चढ इतके खडे आहेत कीं, उताराला सायकलीचे ब्रेक प्रत्येक खेपेला नवीन घालावे लागायचे व चढाला सायकल हातांत ठेऊनच चढावें लागायचें. आता पुलापासून केदारापर्यन्तचेंच उदाहरण घ्याना. बहुतेक चढ अगदीं खडा आहे आणि त्यांतील रामवाड्यापासून केदारपर्यन्तचा चढ तर चांगलाच खडा आहे. मध्यंतरीं मी उंच्या मोजल्या, त्या टप्पा आला म्हणून नसून, १०००० फूट कोठें होण्याची शक्यता आहे, हें पाहण्यासाठींच: शिवाय वर गेल्यानंतर सुमारें मैलभर रस्ता असा कांहीं चिखलानें भरलेला आहे म्हणून सांगूं कीं बस्स ! सबंध रस्त्यात पाऊल ठेवण्याचेंदेखील एखाद्या प्रवाशाचें अगर यात्रेकरूचें धारिष्ट होणार नाहीं. श्रीरामाच्या शब्दांत सांगायचें म्हणजे तो चिखल पायाला अगदीं सांज्यासारखा लागत होता. सगळा रस्ताभर सांजाच पसरला होता म्हणाना ! आम्ही रस्ता सोडून गवतावरूनच जात होतों; कारण सांजा खायला जरी चांगला असला तरी चालायला वाईटच !


**आज अगदीं लवकर उठल्यामुळें आम्ही गौरीकुंडास लवकर जाऊन पोहोंचलों आणि विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुलाजवळ इतके दिवसांत अगदी ताज्या दुधावरची भरपूर साय खायला मिळाली. परशुरामला मी कालपासू**

सांगून ठेवलें होतें कीं, 'साय जर कोठें मिळाली तर बघ!' आईनीं मला नारायण-बदरीकेदारच्या रस्त्याला खूप साय मिळते, म्हणून सांगितलेंच होतें. म्हणून आज परशुरामानें साय पाहून ठेवली होती आणि दुधावरील इतकी सायदेखील मी आज प्रथमच खाल्ली. फार मजा आला!

गौरीकुंडास एक तप्त कुण्ड आहे. पण त्याचें पाणी फारच कढत बुवा. मी अंघोळ करण्यासाठीं आत गेलों तो नुसता हात पाय धुऊन व डोक्यावर अर्धा तांब्या पाणी घेऊन बाहेर पडलों. वरून झिमझिम् पाऊस पडतच होता.

आम्ही कुलींच्या दृष्टीनें असें ठरविलें कीं, गौरीकुंडाच्या धर्मशाळेंत आपल्याला जें विशेष जरूर नाहीं तें सामान ठेवावें आणि त्याप्रमाणें खरोखरी आम्ही आमच्यांतील निम्म्याहून अधिक सामान तेथेंच ठेवलें आणि खोलीला कुलूप घातलें. ( पण एक गुप्त गोष्ट सांगतों, बाहेर फोडूं नका हो! त्या कडींतून आमचें बारीक कुलूप सहज निसटत होतें. पण ही गोष्ट फक्त मला व परशु-रामालाच माहीत आहे.) आम्ही फक्त कुकर व आमचें होल्डाल बरोबर घेतलें होतें. बरोबर आईनीं खाण्यासाठीं व स्वयंपाकासाठीं दिलेल्या सामानाची पेटी-देखील आम्ही गौरीकुंडासच ठेवली. कुकर भरून घेतला होता आणि उद्यां दुपारीं पुनश्च गौरीकुंड अगर त्याहूनही पुढें जाण्याचें नक्की ठरविलें आहे. मग काय पंचाईत? माझा असा बेत आहे कीं, उद्या झट्दिशी देवपूजा आटोपून मंदाकिनीच्या उगमाहून बारा एक वाजेपर्यन्त परत यावें आणि थेट रामपूरपर्यन्त जावें. पाहूं काय होते तें.


गौरीकुंडास बरेंचसें सामान ठेऊन आम्ही आंघोळी वगैरे होईपर्यन्त कुलींना जेवण करण्याची परवानगी दिली होती. कारण कुली नऊच्या सुमारास गौरीकुंडास पोंचले व आम्ही जेवण तेथेंच तयार करतों, म्हणून म्हणूं लागले. त्यांचें जेवण होईपर्यन्त अकरा साडे आकरा वाजले व मग आम्ही निघालों. त्यात निम्म्याहून अधिक रस्ता गेल्यावर पुन्हां थोडा पाऊस पडूं लागला. मिळून आम्ही चार साडे चार वाजतां येथें येऊन पोहोंचलो आणि येथें आल्यावर जों पाहतों तों सर्व कपडे, रेनकोट व आंतील कोट पावसानें आणि सदरा व वरील




चित्र सं. ४७
गोपेश्वराचे देवळाबाहेरील मूर्ति [ पृ. सं. १४१ ]



चित्र सं. ४८
पाताळगंगेच्या रस्त्याचा देखावा [ पृ. सं. १४४ ]



चित्र सं. ४९
जोशीमठ येथील लक्ष्मीनारायणाची मूर्ति [ पृ. सं. १४६ ]



चित्र सं. ५०
बद्रीनारायणाचे रस्त्यामधील एक फुलझाड [ पृ. सं. १४७ ]

कोट, घामाने भिजून चिब झाले होते. म्हणून येथें आल्याबरोबर सदरा कोट काढून मी उघडा बसलों. पण तेथील पंड्यांना मला थंडी बाधेल म्हणून काळजी वाटूं लागली व म्हणून मी 'नको नको' म्हणत असतानादेखील त्यांनीं तेथें एक रग आणून ठेवला आणि मग मात्र उघडें बसायचें कारणच नाहीं म्हणून तो रग घेण्यापेक्षां नमस्कार घातलेले बरे, असें वाटून मी नमस्कारास सुरवात केली आणि नमस्कार संपेपर्यन्त आमचे सर्व कुली आलेदेखील

सात साडे सात वाजतां आम्हाला पंड्यांनीं केदाराच्या आरतीस नेलें, आणि आम्ही देवळांत जाऊन उभे राहीतोपर्यन्त अवकाश कीं, लागलींच तेथील पुजाऱ्यानें आमचें मोठे आनंदानें स्वागत करून आम्हाला अगदीं देवळांत म्हणजे गाभाऱ्यांत उभें केले.

आणि आरतीचा तो सुश्राव्य घंटानाद ! गंभीर आवाजात आरती सुरू झाल्यावर माझ्या मनांत आपोआप केदाराबद्दल उच्च भावना निर्माण झाली आणि त्या देवत्वांतच मी पुष्कळ वेळ गुंगलों होतों ! ती आरती पाहिल्यावर मला एक तऱ्हेचें उच्च समाधान वाटले आणि त्या स्थानात काहीतरी देवत्व असावें, अशी कल्पनादेखील आली. परंतु इतर लोकांना मात्र देवदर्शन व्हायचा अवकाश कीं, 'चलो, चलो' चा मंत्र सारखा पाठीमागे लागला होता. म्हणजे इतक्या दूर पायांनीं वाकत थकत बायाबापड्यांनीं यायचें, पण प्रथम दर्शनाचें समाधान-सुद्धां त्यांना मिळत नाहीं ! पण एक मात्र सांगतात कीं, " उद्या देवाला पुष्कळ भेटा, आज गर्दी आहे, लौकर चला " म्हणजेच त्यांना देवत्वाच्या भावनाच फार कमी आहेत. एवढेंच नव्हे, तर देवाची आरती करतांनासुद्धा यांचा आरडा-ओरडा चालूच असतो.

## केदारनाथ.

ता. ५-६-१९४१

एवढेंच काय, पण देवदर्शन करतांनादेखील हे लोक पैशाकडे लक्ष ठेऊन असतात आणि देवाला प्रदक्षिणा घालीत असतांना एकाने पैसा ठेवला नाहीं

म्हणून मारामारी करीत असलेला ब्राम्हण मी पाहिला! हें पाहिलें म्हणजे मला या पुजाऱ्याचा मोठा राग येतो आणि हें अगदीं खरें कीं, nearer the church, further from the God. या देवतेला उच्च मानायचें, तेथें पवित्र भावना ठेवाव्यात म्हणून सांगायचें, पण पैसा दिला नाहीं म्हणजे देवासमक्ष देवापासून एक पावलावरदेखील नाहीं, इतक्या जवळ भांडायचें, हें ब्राम्हणत्व हल्लीं शिल्लक राहिलें आहे! मला तर असें वाटूं लागले आहे कीं, ह्या मोठ्या मोठ्या देवांचें देवत्व जर शिल्लक ठेवायचे असेल तर हे ब्राम्हण लोक किंवा पंडे हांकलून दिले पाहिजेत. असल्या तऱ्हेची पैशासाठीं भांडणें करून त्यांना तरी काय समाधान मिळत असेल? व यात्रेकरूंना तरी काय स्वास्थ्य मिळत असेल? आणि हे पंडे म्हणजे तरी काय? पैशानें देवत्व विकत देण्याचा प्रयत्न करणारे लोक! माझ्यासारखा माणूस गेला म्हणजे त्यांना पैसे मिळतात हे माहीत. मग आमची व्यवस्था काय विचारावी? देवाला आरती नि पंचामृत-स्नान आणि शिवाय थोडा वेळ रहदारी बंद. अगदीं पोलिसी व्यवस्था आणि तेंदेखील खरेंच आहे. पैसे देणाऱ्या लोकांसाठीं जर ह्यांनीं खास व्यवस्था केली नाहीं आणि पैसे न देणाऱ्या गर्दीतच यांनाही सोडलें तर यांची डिग्निटी कशी राहणार? आणि मग त्यानीं पैसे तरी अधिक कां खर्चावे? पण माझें म्हणणें एवढेंच कीं, देवदर्शनास येणाऱ्या-बरोबर जर पैशासाठीं हे लोक भांडायला लागले व महादेवाच्या पिंडीला प्रद-क्षिणादेखील न घालूं देऊं लागले, तर यांना काय म्हणावें!

काल संध्याकाळीं येथें आल्याबरोबर पंड्या लोकांनीं आम्हाला गाठले व माझ्यासाठीं एक, प्रोफेसरसाहेबांसाठीं एक अशीं दोन नमक-चमकें ठरवून घेतलीं. (प्रत्येक नमक-चमकास साडेपाच रुपये पडले!) शिवाय एक एक रुपयाचे पूजासाहित्य व महादेवाला तुपाची पूजा बांधण्यासाठींही कांहीं पैसे घेतले. पण मला एक निराळीच कल्पना सुचली आणि मला रुपयाचा मधही महादेवाला घालावा असें वाटूं लागलें, म्हणून एक रुपयाचा मधही मागविला.

सकाळीं उठल्याबरोबर पाहतों तो आकाश अगदीं स्वच्छ होतें. लागलीच मी माझा कॅमेरा घेतला व फोटोसाठीं बाहेर पडलों आणि मनाचें समाधान

होईतोंपर्यन्त फोटो घेतले !

वाहवा रे वाहवा ! काय त्या बर्फाच्या उत्तुंग सुळक्यांची गम्मत दिसली म्हणून सांगूं ? मंदाकिनी उगम पावते, तो माती-दगडाचा ठिसूळ डोंगर ! त्यावर एक बर्फाच्या पर्वतांची रांग आणि त्यांच्या मागून डोकावून जणूं खालील बर्फाच्या रांगेचीदेखील अवहेलनाच करीत आहे, अशा तऱ्हेची उत्तुंग शिखरे आणि पुढें महादेवाचें मंदिर ! खरोखर त्या वेळीं मनाला इतका आनंद झाला कीं, त्याच वेळी ' मी धन्य धन्य आहें, ' असे मला वाटलें व हिमालय हा देवतात्माच आहे, हें मनापासून पटले मी महादेवाच्या देवळाचे पुढून फोटो घेतले, मागून फोटो घेतले आणि मला असें वाटूं लागलें कीं, असे स्वच्छ आकाश असतांना जाऊन मंदाकिनीच्या उगमाचा फोटो काढावा आणि त्या मानाने मी देवळापासून बराच लांब गेलों आणि एक दोन मंदाकिनींचे फोटो घेतले. इतक्यांत the mist began to overflow the valley rapidly! आणि हळूहळू मागील डोंगरदेखील दिसेनासे झाले. मी तेथेंच तोंड वगैरे धुऊन मागें फिरायला लागलों, तों धुकें थोडेंथोडें पातळ होऊं लागले. तेव्हा मी परत नदी ओलांडण्याचा प्रयत्न करणार होतों; पण विचार केला कीं, आता पुन्हां उगीच उशीर होईल हे एक; आणि प्रो. विनोद काल म्हणत होते कीं, तेही बरोबर येणार आहेत; म्हणून विचार केला व मी वर जाईपर्यन्त पुन्हां धुकें आलें तर काय घ्या ! म्हणून मी तो नाद सोडून दिला आणि परत फिरलों.

परत आल्यावर प्रो. विनोद म्हणूं लागले कीं, ' देऊळ उघडायला आठ साडे आठ वाजतात. तेव्हां आपण मंदाकिनीचा उगम प्रथम पाहून येऊं. नि मग अंघोळ करून पूजा करायला जाऊं. ' मी लागलींच कोट घालून कॅमेरा घेऊन तयार झालों. इतक्यांत पंडा म्हणाला कीं, ' तुम्हाला मंदाकिनीहून परत यायला तीन चार तास लागतील आणि महादेवाचें मंदिर तर एक वाजल्यानंतर बंद होते. तेव्हां तुम्ही आपले मागाहूनच तिकडे जा. ' शिवाय वाटाड्या बरोबर नव्हता. तो देण्यास त्यांना अधिकाधिकच उशीर होण्याचीं चिन्हे दिसूं लागलीं. तेव्हां आम्ही प्रथम देवदर्शन करण्याचेंच ठरविलें.

मंदाकिनीचें पाणी गंगोत्रीवरील गंगेच्या पाण्याइतकेंच गार आहे आणि त्या पाण्यांत स्नान करतांना गंगेच्या पाण्यांत स्नान करण्याइतकाच ब्रम्हानंद झाला ! स्नानानंतर सदरा, स्वेटर, कोट वगैरे घालून तसेच महादेवाच्या दर्शनास व पूजेस गेलों. कारण इतक्या थंडांत उघड्यानें पूजा करणे कदापि शक्य नाहीं आणि इकडे महादेवाला कपडे घालूनच स्नानादि घालण्याची पद्धत आहे. प्रथम गणेशपूजन, नंतर नमक-चमकाचा संकल्प करून आम्ही महादेवाच्या पूजेसाठीं गाभाऱ्यांत गेलों. तेथें पंचामृत-स्नान, आरती वगैरे करून नंतर महादेवाला डोक्यावर व एका बाजूला आम्ही आणलेलें तूप चोळलें.

येथें अशी पद्धत आहे कीं, महादेवाची पूजा झाल्यावर त्याला गाढ आलिंगन द्यावयाचें आणि त्याला आलिंगन दिलें म्हणजे स्वर्गानंद होऊन यात्रेला येतांना झालेल्या सर्व श्रमांचें परिमार्जन होते आणि तेथील पंडा सांगतो कीं, ' महादेवाला मिठी मारून आपली इच्छा काय असेल ती सांगा. ' मला प्रथम त्या तूप लावलेल्या बाजूला मिठी मारावेंसेंच वाटेना ! पण शिरस्त्या-प्रमाणें तशीच मिठी मारली आणि एक गंमत लक्षात ठेवण्यासारखी असते. **' यादृशी भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी । '** त्या वेळेस कपडे खराब होतील, हा विचार मनात आल्याबरोबर, मिठी मारल्यानंतर होणाऱ्या ब्रम्हानंदाची व संवेदनांची गंमत गेली ! पण प्रो. विनोदांनीं दुसरीच एक गंमत केली. त्यांनीं त्या तुपाच्या बाजूला टॉवेल टाकून मग मिठी मारली ! तरीदेखील मी ती भावना बाजूला सारून महादेवाला कडकडून मिठी मारली. पण त्या वेळीं मन अगदीं स्वच्छ असल्यानें देवाला कांहीं मागावें, अशीदेखील कल्पना आली नाहीं ! मग काय असेल तें असो.

बाबांनीं म्हणे ' हिंदुस्थानला स्वराज्य असावें ' असें मागणें मागितलें होतें. जरी संवेदना झाल्या नाहींत, अगर ब्रम्हानंद झाला नाहीं, तरी मिठी मारतांना आनंद होतो व मन अगदीं मोकळें, स्वच्छ व विकाररहित होतें, यात कांहींएक शंका नाहीं मिठी मारून झाल्यानंतर मी कितीं तरी वेळ देवावर डोकें टेकून बसलों होतों. परंतु त्या पैशासाठीं भांडणाऱ्या आणि अल्पसंतुष्ट

ब्राम्हणांनीं जेव्हां अधिक देण्याबद्दल माझ्याबरोबर बडबड व इतरांशीं भांडण सुरू केलें, तेव्हां देवळांतील देवत्व नाहींसेंच होत आहे, असें मला वाटूं लागलें. '**मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः।**' अशा तऱ्हेनें देवत्व नाहींसें करणारा राग जर देवळांत वावरूं लागला तर मन मोक्षाप्रत जाण्याऐवजीं बांधलेंच जाणार, यांत शंका नाहीं आणि एकाचेंच देवत्व नाहींसें होतें असें नाहीं तर अप्रत्यक्ष मनाचा सांधा सर्वांचा एकच असल्यानें प्रत्येकाला देवत्व नाहींसें होत असल्याचा भास झालाच पाहिजे.

सगळें देवदर्शन झाल्यानंतर मला पुन्हां मधाची आठवण झाली व अखेरीस एका पंड्याला मी मध आणण्याकरितां पाठविलाच. तो म्हणत होता 'पांच रुपये शेर, इतका महाग कशाला ?' 'पण काय वाटेल तो कां असेना ? एक रुपयाचा आणच' म्हणून मी सांगितलें व त्याला पाठविला. आणि तो परत येईपर्यन्तच्या अवधींत मला हे लोक कसे धक्काबुक्की करतात व कसे भांडतात हें दिसलें. मी मध सगळा देवाच्या डोक्याला लावला व मग कल्पना सुचली कीं, हाच मध पुन्हां वाटींत लेपटून घेऊन घरीं प्रसाद म्हणून घेऊन गेलों तर काय बहार होईल ? आणि ही कल्पना आल्याबरोबर मी देवाच्या अंगावरील मध पुन्हां वाटींत भरला आणि प्रसाद म्हणून घरीं घेऊन आलों व प्रो. विनोदांनीं त्यांच्याजवळ 'पार्कर क्विंक'ची रिकामी बाटली होती तींत तो भरला. बाहेर आल्यावर त्या मधाच्या प्रसादाबद्दलचें मला माझेंच कौतुक वाटलें. हो, तो कांहीं खराब व्हायचा नाहीं आणि शिवाय नाविन्यपूर्ण गोड.

पूजा वगैरे करून बाहेर आल्यावर मग सटरफटर देवांचे पुजारी मागें लागले. पण खुषीनें ठेवलेल्या पैशावर संतुष्टता एकाचीही झाली नाहीं, हें त्यांतील वैशिष्टय आहे. कशाला उगीच त्याबद्दल अधिक लिहा ! एवढेंच म्हणतों कीं ब्राम्हण जेव्हांपासून असंतुष्ट राहूं लागले, तेव्हापासून हिंदुस्थानला भिकेचे डोहाळे लागले !

देवदर्शन होईपर्यन्त साडे दहा वाजून गेले आणि परत येईपर्यन्त परशुरामाची वर्दी आली कीं, 'जेवायची तयारी आहे.' तेव्हां मंदाकिनीच्या

उगमास जेवण करूनच जाण्याचें ठरविलें. कारण जेवायला पांच दहा मिनिटांचा अवकाश होता. तर उगमास जाऊन परत येण्यास तीन चार तास लागतील, असें पंड्यांचें मत होतें. मला वाटत होतें कीं, दोन मैल जायला व दोन मैल यायला तीन चार तास लागण्याचें काय कारण बुवा ? बारा वाजतां निघालों म्हणजे दोन तीन वाजेपर्यन्त सहज परत येऊं आणि मग निदान गौरी-कुंडापर्यन्त अगर त्याहूनही पुढें आपल्याला सहज जातां येईल. पण खरोखरींच आम्ही परत येईपर्यन्त पांच वाजून गेले.

खरोखर वर जायला रस्ता असा नाहींच. माझी कल्पना होती कीं, मंदाकिनीच्या उगमास जायचें म्हणजे महादेवाच्या देवळाच्या पाठीमागच्या बाजूनें नदी पार करून वरील डोंगर चढायचा. पण आमच्या वाटाड्यानें आम्हाला अगदीं विरुद्ध दिशेला नेऊन प्रथम पूल ओलांडायला लावलें आणि सकाळीं अगदीं उलट दिशेने जाऊन चढण्याचा प्रयत्न करणाऱ्या मला खरो-खरीच फार आश्चर्य वाटलें. आम्ही एका डोंगराच्या कडेकडेनें गवतावर पाय देऊन आस्ते आस्ते चालत होतों. आम्ही त्या वाटाड्याला विनाकारण लांबून आणल्याबद्दल खूप दोष दिला. पण तो म्हणाला कीं, पंड्यानें त्याला तसें सांगितलें होतें. तेव्हा आम्ही पंड्यालाही दोष दिला. इतका ताप झाला आम्हाला त्या रस्त्यानें की, सारखे त्या वाटाड्यास विचारीत होतो कीं, 'हा गवताळ रस्ता सोडून आम्ही केव्हां एकदां वर जाणार.'

आम्ही दोन चार ओघळ ओलांडले व शेवटीं वाटाड्यानें सांगितलें कीं त्या वरच्या दगडाजवळ तलाव आहे, त्यांतूनच मंदाकिनीचा उगम आहे. हा वेळ-पर्यन्त हलूहलू सारखा पाऊस पडत होता व बरेचसे धुके सगळीकडे पडलें होतें. त्यामुळे कितपत फोटो काढतां येतील, ह्याबद्दल मला शंकाच होती. पण काय तलाव आहे तो तरी पहावा, म्हणून आम्ही जात होतों आई जेव्हा पूर्वी येथें आल्या होत्या, त्यावेळीं पाऊस पडत असतांनादेखील त्या ह्या तलावाला जाऊन आल्या होत्या. त्यावरून माझी अशी कल्पना झाली होती कीं, मंदाकिनी उगम पावणाऱ्या ह्या तलावाला काहीं तरी रस्ता असा असेलच. पण

ती कल्पना अगदीं चुकीची ठरली आणि आईनीं सांगितलें व बाबांनीं फोटो घेण्यास सांगितलें, म्हणून मी तिकडे निघालों.

दगडांतून धोंड्यांतून, गवतांतून कांठी टेकीत व तोल संभाळीत संभाळीत व प्रो. विनोद दमत म्हणून बसत बसत, मी माझ्या शिरस्त्याप्रमाणें नेहमीं उभा रहात रहात, आम्ही त्या धुक्यांत वर टोकाला जाऊन पोहोंचलों आणि मग आम्हाला तो तलाव अंधूक अंधूक दिसूं लागला. धुकें इतकें दाट होतें कीं, फक्त जवळील पाणी दिसत होतें आणि डाव्या बाजूला एक बर्फाचा थर पसरला होता, तोही दिसत होता. प्रो विनोद त्याच्यावर जाऊन उभे राहिले व मी त्याचा बर्फावर उभे राहिलेले व हातांतही बर्फ घेतलेले, असा फोटो काढला. इतक्या दाट धुक्यात फोटो वरून घेणें अशक्य होतें, म्हणून आम्ही खालीं उतरून अगदीं तलावाजवळ गेलों आणि मग दडपून देतों ऐसाजे म्हणुन फोटो काढले अर्थात् ह्या सर्व फोटोच्या वेळीं थोडा थोडा पाऊसही पडत होता. म्हणून त्या वाटाड्याला छत्री धरून उभा केला होता. तो वाटाड्या सांगत होता कीं, 'बहुत बडा तलाव है' म्हणून आणि आम्हाला पलीकडलि कड अगर डोंगर धुक्यानें दिसत नसल्यानें ते खरें वाटत होतें आणि मग मला कल्पना आली कीं, मंदाकिनीचा उगम अगदीं उलट बाजूला एखादी दरी असेल तेथून झाला असेल.

आम्ही जवळ जवळ पांच दहा मिनिटें थांबलो, पण धुकें कमी व्हायचीं चिन्हें दिसेनात म्हणून पुन्हा तलावावरून वर चढून खालीं उतरायला सुरवात केली. आम्ही दोन तीनशें पावलें उतरलों असूं नसूं, इतक्यांत त्या धुक्यामध्यें मला पोकळी दिसली व कदाचित् धुके निघून जाणें शक्य आहे, असें मला वाटूं लागलें. आणि म्हणून विनोदांना विचारून मी पुन्हां वर चढून आलों. तों सर्व तलाव अगदीं स्पष्ट दिसत होता. तलाव चारी बाजूंनीं बंद असून तेथें मला अशी एकही उघडी जागा दिसली नाहीं कीं, त्या ठिकाणाहून मंदाकिनी वहात असेल, अशी शंका येईल ! समोरच्या बाजूला एक मोठा बर्फाचा खडक असून त्यांतून पाणी सारखें ठिपकत होतें. मी पुष्कळ इकडे तिकडे हिंडून पाहिलें. पण

मंदाकिनी त्यांतून निघत असेल अशी कल्पनादेखील येईना. त्या तलावाचें पाणी हिरवेंगार आहे. त्यांत अशी एकही मूव्हमेन्ट नाहीं कीं त्यामुळें असें वाटावें कीं त्या तलावांतील पाणी बाहेर जात असेल. त्या उघडिपींत अगदीं मनाचें समाधान होईपर्यन्त फोटो घेतले. तलाव सर्व बाजूंनीं बंद आहे, अशी खात्री करून घेतली व परत प्रो. विनोद बसले होते, तेथें आलों. फोटो काढायच्या वेळींदेखील थोडा थोडा पाऊस पडतच होता. पण मी खांद्यावर छत्री उघडी ठेऊन पावसापासून संरक्षण केलें व फोटो काढले आणि विनोदांना सांगितलें कीं, असें असें आकाश अगदीं स्वच्छ होतें आणि त्या तलावांतून मंदाकिनीचा उगम असणें अशक्य आहे. तें त्यांना पटलें नाहीं. ते म्हणाले, ‘इकडे असेल, तिकडे असेल, पलिकडे असेल.’ पण शेवटीं आम्हीं तिघेही जण उतरलेला डोंगर पुन्हां चढून वर आलों व त्यांनीं जेव्हां प्रत्यक्षच पाहिलें कीं, तलावाची लांबी एकदीड फर्लांगच आहे आणि रुंदी दोनशे फुटांदेक्षां अधिक नाहीं व तो चारही बाजूंनीं बंद आहे, तेव्हां माझें म्हणणें त्यांना पटलें आणि म्हणून त्यांनीं वाटाड्याला तसा प्रश्न केला. तर तो वाटाड्या म्हणूं लागला कीं, नदी डोंगराच्या खालून वाहते! येथें एकेक कल्पना मोठ्या ओर असतात बुवा आणि एवढेंच नव्हे तर त्या डोंगराच्या खालून संथ-पणानें वाहून डोंगरावरून मग उडी मारते असेंही तो सांगूं लागला. पण आमची दोघांचीही खात्री झाली कीं, तो सांगतो ती गोष्ट नव्याण्णव टक्के अशक्य कोटींतील आहे! नव्हे, मला एक दोन वेळां शंकादेखील आली कीं, दिसतो तो मंदाकिनीचा प्रवाह तलावाच्या उंचीपेक्षां अधिक उंचीवर आहे म्हणून, आणि खालीं आल्यावर आम्हीं पंड्याजवळ तपास केला तेव्हां माझेंच म्हणणें खरें ठरलें आणि त्यांनीं सांगितले कीं, ‘त्या तलावांतूनच मंदाकिनी उगम पावते, अशी त्या लोकांची कल्पना असते.’

आम्ही त्या चोरघाटीच्या तलावास (ह्या तलावास चोरघाटीचा तलाव म्हणतात) येत असतां सारखे त्या वाटाड्यास विचारीत होतों कीं, येनकेन प्रकारेण जर येथें यायला रस्ता नाहींच, तर त्या समोरच्या डोंगरावरून आम्हाला कां नेलें नाहींस? एवढेंच नव्हे तर तिकडे जात असतां आम्ही असेंही ठरवून

टाकलें कीं उतरतांना नदीच्या कडेकडेनें उतरायचें. तो सांगत होता कीं, त्या डोंगरावरून आपोआप मोठमोठे धोंडे निसटून पडतात आणि खरोखरीच आम्हीं उतरत असतां दहा पंधरा मोठमोठे धोंडे त्या टेकडीच्या डोक्यावरून गडगडतांना आम्ही पाहिले आणि दुसरी एक गोष्ट. जर आम्ही मंदाकिनीच्या कांठाकांठानें गेलों असतों तर हा तलाव येणेंच शक्य नव्हतें. तरी पण उतरतांना आम्हीं नदीच्या अगदीं कांठाकांठानें उतरलों आणि काय गंमत सांगावी महाराज, मजाच मजा! आम्ही त्या ठिसूळ मातीच्या कड्यावरून उतरत होतों. पुढें काठी टेकायची, ती पक्की रोवायची आणि मग पाऊल उचलायचें. रस्ता तर नव्हताच. आमच्या डाव्या हाताला दोन तीन फुटांवर पाण्याचा प्रवाह वहात होता.

पण या नदीच्या कांठावरून जाण्याच्या गमतीपेक्षां आम्हांला प्रत्यक्ष मंदाकिनी नदी व शिवाय तिला मिळणारे दोनतीन मोठमोठे ओघळ ओलांडायचे होते. बरें! त्या ओघळांचा जोर तरी काय कमी होता? कांहीं ठिकाणीं जोर विशेष होता (जेथें धोंडे विशेष होते तेथें), तर दुसऱ्या ठिकाणीं खोली अधिक होती (ज्या ठिकाणीं धोंड्यावरून पाणी जोरात आदळत होतें तेथें); तर कांहीं ठिकाणीं दोघांनींही संगनमत केले होते (ज्या ठिकाणीं दोन्ही बाजूंना दोन मोठमोठे धोंडे होते तेथें.) आणि असल्या सपाट्यांतून आम्हीं तीन ओघळ ओलांडून आलों. अर्थात् माझी विजार व विनोदाचे धोतर पार भिजून चिंब झालें होतें, पण ते पूर्वींच पावसानें भिजले असल्यानें त्याबद्दल वाईट वाटण्याचें कांहींच कारण नव्हतें. मी मात्र फारच सावकाश उतरत होतों बुवा! माझ्या पायांतील वहाणा त्या वाटाड्याकडे दिल्या असल्यानें पायाला थोडेथोडे खडे बोचत होते. बरें, वहाणा घालाव्यात तर पाय घसरायची भीति होती. तेव्हां 'स्लो बट् शुअर' असा चालत होतों; आणि त्यामुळेंच आम्हाला परत येईपर्यंत पांच सव्वापांच वाजले, आणि मग पुढें जाण्यापेक्षां येथेच मुक्काम करावा, असें ठरविलें; कारण विचार केला कीं, इतक्या उशिरां निघून फार झालें तर रामवाड्यापर्यंतच (तीन मैल) जाणें शक्य आहे व त्यापेक्षा देवाच्याच घरीं कां न रहा?

आजही कालच्याप्रमाणेंच देवाच्या आरतीसाठीं गेलों होतों; पण वेळ बराच असल्यानें पंडयाकडून शिव-कवच मागून घेऊन तें तीन वेळां वाचून झालें. पण आज आरतीला कालच्याइतकें देवत्व उत्पन्न झालें नाहीं. कारण आज ' हटो, हटो ' व ' चलो चलो 'चा आवाज कालच्यापेक्षां मोठ्यानें होत होता व आरती म्हणत होते तेही एका स्वरांत म्हणत नव्हते. आरतीच्या वेळीं प्रथम एक वातीची, नंतर तीन वातींची, नंतर पांच व नंतर बारा वातींची आरती असते. त्याच्यावर एक मूर्ती आहे, त्याला सेवेकरी म्हणतात. नंतर नंदीच्या मूर्तीला असलेल्या आठ नऊ वाती लावून तो ओवाळतात व शेवटीं राखेमध्यें पांच ठिकाणीं कापूर लाऊन तो देवाच्या डाव्या बाजूस प्रथम व पुन्हां परत येऊन उजव्या बाजूनें दुसऱ्यांदा ओवाळतात. ही कापराची आरती लावण्याआधीं देवाला प्रथम पितळेचा आरशाएवढा तुकडा दाखवतात व नंतर चामरें ढाळतात. या प्रत्येक कृत्याच्या मध्यें पुजारी आपलीं बोटें पाण्यांत ओलीं करून नंतर दुसरी आरती वगैरे घेत असतो. पुजाऱ्याचा पोषाक कानटोपी, कोट वगैरेंच असतो. नंतर हीच कापराची व पहिल्या दोन आरत्या घेऊन पुजारी बाहेर जातो व त्यांनीं नंदी, गणपती व दुसऱ्या डोंगरावर भैरव आहे, त्याला ओवाळतो. मला तो पंडया म्हणत होता कीं, ' उद्यां सकाळीं भैरवाचें दर्शन घेऊन मग जा. ' म्हणून, पण मी त्याला साफ सांगितलें कीं, ' आज सांगितलें असतेंस तर वेळांत वेळ काढून गेलों असतों. आतां उद्यां पांच वाजतां निघण्याखेरीज येथें दुसरा कांहींएक उद्योग करायचा नाहीं. '

## फाटाचट्टी.

ता. ६-६-१९४१

आज मी पुढील उंच्या मोजल्या- मंदाकिनीचा पूल ६०२०, तेथून एक बारीकशी टेकडी ओलांडली ६११०, केदारनाथास जाण्यास लागणारा नारायणाच्या बाजूचा रस्ता ५९९०, ६१३०, रामापूरचट्टी ६०१०, फाटाचट्टी ५८२०.

आज ठरल्याप्रमाणें लवकर निघालों, ते प्रथम ठेवलेलें सामान घेण्यासाठीं म्हणून गौरीकुंडास आलों. येतांना आकाश अगदीं स्वच्छ असल्यानें दुसऱ्या डोंगरावरचे सर्व धबधबे अगदीं स्पष्ट दिसत होते. मला जातांना त्यांतील कांहींचे फोटो घ्यावेसें वाटलें. परंतु पाहूं लागलों तों एकापुढें एक निरनिराळ्या तऱ्हेचे धबधबे दिसूं लागले. बाकी इकडील धबधब्यांची शोभा अवर्णनीय आहे हं! प्रत्येक ठिकाणीं हिमालय आपलीं निरनिराळीं सौंदर्यस्थानें दाखवीत असतो! मग त्याला 'देवतात्मा' म्हटलें आहे, त्यांत काय विशेष आहे? एकदां तर आम्हाला वरून पाणी ठिबकत होतें त्याच्या खालून जावें लागलें. मला मोठें आश्चर्य वाटतें आहे कीं, ह्या ब्राम्हणांनीं आणि पंडयांनीं ह्याला अजुनी देवस्थानचें स्वरूप कसें दिलें नाहीं? फार कांहीं नाहीं, 'टाका पैसा' हा मंत्र जपायला कांहींच हरकत नाहीं! पण मला वाटतें, हा मोठा रस्ता केल्यावर मग वरील खडकांतून पाणी ठिबकायला सुरवात झाली असेल आणि इतक्या थोडया काळांत ती त्यांना कल्पना आली नसेल. मी जातांना तर तेथें छत्री उघडली होती; पण येतांना विचार केला कोणी करावी ती ती छत्री उघण्याची कटकट!

आज येतांना मधल्या एका दुकानांत मलई घेतली. ती मला आवडेच ना! आणि खरोखरीच ती वाळवून घट्ट केलेली दुधावरची साय एकदोन वेळां खाल्ल्यावर खाऊं नयेसेंच वाटूं लागलें. मी तर घेतलेल्या साईपैकीं निम्मीच खाल्ली व बाकीची रेनकोटाच्या खिशांत ठेवून ती गौरीकुंडास विनोदांच्या जवळ दिली. आम्हीं ज्यावेळीं गौरीकुंडास आलों, त्या वेळीं त्या काळी कमळीवाले बुवाच्या धर्मशाळेचा रखवालदार म्हणाला कीं, 'काल मी तुमची बराच वेळ वाट पाहिली' म्हणून. कारण आम्ही त्यांच्या एका खोलींत उतरलेलें सामान ठेऊन व कपडे वाळत टाकून काल सायंकाळपर्यन्त नक्की येऊं म्हणून त्यास सांगितलें होतें. तेथें सामान वगैरे आवरून आम्हीं थेट रामापूरचट्टीला येऊन थांबलों. आमच्या प्रोग्रामप्रमाणें आज व्युंगचट्टीला जायचें नक्की ठरविलें होतें. पण येतां येतां रात्र पडूं लागल्यानें आम्हीं तो बेत बदलला व फाटाचट्टींतच मुक्काम करावयाचें ठरविलें आणि शिवाय थोडा थोडा पाऊसही पडायला सुरवात

झाली होती.

## देहेडा.

ता. ७-६-१९४१

फाटाचट्टी ५८२०. थोडीशी चढण व नंतर जी एकदम खडी उतरण ती व्युंगचट्टीपर्यन्त ४७४०, ४९१०, ५११०, मंदाकिनीवरील पूल ३९७०, उखीमठ ४८१०, ५०२०, ५२००, ५६१०, ५६८०, ५५८०, ५२८०, देहेडा ५७३०, मध्यंतरीं गुप्तकाशी लागली, तिची उंची मोजायचें विसरलों; पण ती उंची ५११० च्या आसपास असावी.

आज आम्हीं गुप्तकाशीस आल्यावर स्नान केलें. तेथें दोन मुखे आहेत. एकांतून म्हणे गंगा पडते, ( त्याला गाईचें पितळेचें तोंड बसविलें आहे ) व दुसऱ्यांतून म्हणे यमुना पडते ( त्याला सिंहाचें तोंड आहे. ) बाबांनीं सांगितल्याप्रमाणें ते कुंड व येथें महादेवाच्या देवळाजवळ अर्धनारीनटेश्वराचें देऊळ आहे, त्यांचे फोटो घेतले. पाहूं कसे येतात ते ! येतांना प्रंदमेश्वराचा बर्फाचा पहाड दिसला.

आम्हीं केदारला अकरा रुपयांचें कमल वाहिलें होतें; त्याचे पैसे आज येथें द्यायचे होते. कारण तेथें जे पंडे आहेत, ते एका मुख्य पंड्याचे हस्तक आहेत आणि बाबा जेव्हां केदारला जायला निघाले, तेव्हां त्यांना भेटायला जातांना ह्यांचा पाय मोडला, म्हणून हे हस्तक ह्यांच्याऐवजीं काम करीत असतात, म्हणून केदारलाच तेथील पंड्यांनी आम्हांला सांगितलें होतें कीं, 'हे कमळाचे अकरा रुपये तुम्ही गुप्तकाशीलाच द्या.' ( केदाराला १३१; ५१; ११ रुपयांचीं अशीं ३ तऱ्हेचीं कमळें वाहतां येतात आणि तें काम श्रावणांत केलें जातें आणि नंतर त्याचा प्रसाद आम्हाला पाठविला जातो अर्थात् तो प्रसाद अजून आलेला नाही ! )

खरें म्हणाल तर ५११० जे मी मोजले ते नालाचट्टीलाच मोजले. नालाचट्टीपासून एक रस्ता गुप्त काशीला जातो व दुसरा उखीमठाला जातो. अर्थात् गुप्तकाशीहून मूळ रस्त्याला म्हणजे उखीमठाच्या रस्त्याला परत यायला नालाला

यावें लागत नाहीं, तर गुप्तकाशीहून एकदम डोंगर उतरविणारा एक पाऊल-रस्ता आहे. म्हणून आम्ही कुलींना थेट उखीमठाला जायला सांगून गुप्त-काशीला गेलों. कारण आज उखीमठासच जेवण्याचें ठरलें होतें. आज कितीतरी दिवसांनीं मी उतरून घेतल्याप्रमाणें प्रोग्राम झाला. जेवण उखीमठाला व मुक्का-मास देहेडा असें मी उतरून घेतलें होतें. कालचा मुक्काम व्युंगचट्टीऐवजीं जरी फाटाचट्टीला झाला, तरीदेखील आज प्रोग्राम सक्सेसफुल झाला. गंगोत्रीहून निघण्याचे वेळेस मी व गोलिवडेकरांनीं प्लॅन तयार केला होता, हें वाचकांना माही-तच आहे. त्यांत व्युंगचट्टीहून निघून उखीमठास जेवण व देहेडास मुक्काम असें ठरविलें होतें. पण आज आम्ही तीन मैल लांबून म्हणजे फाटाहून निघून येथें आलों. कारण त्यांची कल्पना अशी होती कीं, गुप्तकाशी व्युंगहून सहा मैल आहे; परंतु ती फाटाचट्टीहून सहा मैल आहे. कांहीं कां असेना, आज आम्ही व्यवस्थित येथें आलों.

आज आम्ही उखीमठास जेवण ठेवलें. कारण आम्ही सर्व टपाल उखी-मठास मागविलें होतें. आज चित्रा, नवयुग वगैरे साप्ताहिकें व कांहीं वर्तमानपत्रें मिळालीं, त्यामुळें बहुत मजा झाली. उखीमठास जेवण करून मग मी देवदर्शनास गेलों. मी आज परशुरामाच्या आळसाबद्दल त्याला चांगलेंच रागें भरल्यामुळें आम्ही गुप्तकाशीस येईतोंपर्यन्त तो स्नान आटोपून उखीमठास आला व त्यामुळें स्वयंपाक फार लवकर झाला. आणखी एक ठराव करून टाकला आहे मी कीं दुपारीं नुसती चपाती व दुधसाखर खायची व संध्याकाळीं कुकर शिजवायचा; त्यामुळें कुकरासाठीं कुलींची अगर (पेटीची किल्ली माझ्याजवळ असल्यानें) माझी मुळींच वाट पाहण्याची जरुरी नाहीं. आम्ही भटवाडीहून निघतांना आईनीं एका लाकडी पेटींत लाडू, चिवडा, कडबोळी, भाकरीचें पीठ, चपातीचें पीठ वगैरे वगैरे बऱ्याच भानगडी व शिवाय कुकरही दिला होता आणि त्यामुळेंच मला दुसरा कुली करावा लागला, हें वाचकांच्या लक्षांत असेलच. तरी बरें, मला चपाती सोसत नाहीं, म्हणून आईनीं सर्व प्रवासांत माझ्यासाठीं भाकरीचें पीठ घेतलें होतें. परंतु हल्लींच्या चालण्याच्या सपाट्यात सगळें कांहीं पचून

जाऊं लागलें आहे. शिवाय परशुराम चपाती भरपूर दूध घालून, तूप लाऊन खुसखुशीत करतो. त्यामुळें चपातीच चालली आहे, झालं.

कोठल्याही देवळांत जा, तेथें चिलींपिलीं लहान देवळें असायचींच. आंत मुख्य देवाची गादी असायची, बसायची जागा असायची, आणखीसुद्धां बऱ्याच भानगडी असायच्या. कशाला ? तर ' टाका पैसा. ' मला हें बिलकूल आवडत नाहीं आणि ह्यामुळें मी येथें असलेल्या महादेवाच्या गादीच्या दर्शनालादेखील गेलों नाहीं. मुख्य महादेव पाहिला. बाकी महादेवाची पूजा पाहून मात्र आनंद वाटला. तो सोन्याचा मुकुट, तें सोन्याचें छत ! फारच गम्मत. मला फार फार इच्छा झाली होती कीं महादेवाचादेखील एक फोटो घ्यावा म्हणून. पण मग तो बेत रद्दच केला. नंतर ज्या कारणानें उखीमठ नांव पडलें, तो देव पहायला गेलों. त्या देवळांत पांच महादेवाचीं लिंगें आहेत. त्यांना नमस्कार वगैरे करून मी तडक येथें येण्यास चालूं लागलों. बाकी मी ती गादी पहायला गेलों नाहीं, तें एकपरी फारच बरेंच झालें. तेथील लोक म्हणे मला पानसुपारी करणार होते, असें प्रो. विनोद सांगत होते. काय जिकीर आहे पहा ! विनाकारण पान-सुपारी देऊन उगीचच्या उगीच नसत्या उठाठेवी करावयाची लोकांना खोडच असते ! मला नाहीं हे बिलकूल आवडत. कांहीं नाहीं, मग सांगायचें, ' अशी आमची संस्था आहे. तिला मदत करा. ' आणि ' अशीं अशीं आम्ही कामें करतों म्हणून आम्हाला पैसे द्या. ' बस्स आणि ते म्हणे मला सांगणार होते बाबांना सांगायला कीं, बाबांनीं त्यांना एक प्राध्यापकाच्या पगाराची सोय करतों म्हणून सांगितलें होतें, त्याची आठवण करून द्यायला. त्यांनीं म्हणे दोन तीनदां पत्रें लिहिलीं, त्यांचीं उत्तरेंच आलीं नाहींत. पण मी म्हणतों, आमचा पैसा काय आम्हांला फार झाला आहे, प्रत्येकाला मदत करायला ? तेवढ्या पगाराचा एखादा शिक्षक औंध संस्थानांत ठेवला तर औंध संस्थानचा तरी फायदा होईल ! यांचें काय जातें सारखें असें टुमणें लावायला ? बोलूनचालून भीक मागणारे लोक हे ! देवाच्या नांवानें म्हणा ! पण एकूण गोळाबेरीज एकच. मला वाटतें ह्यांना असें वाटतें कीं, आमच्या राज्यांत झाडाला पैसे लागतात !

आणि झाडाला लागले तरी ते ओरबडायला आमच्या इकडे पुष्कळ लोक आहेत, निकामेही आहेत. ह्यांचीच जरुरी आहे असें नाहीं !

दोन दिवस झाले, मी व प्रो. विनोद एका मोठ्या वादाच्या प्रश्नावर भांडत आहोंत. मी म्हणतों कीं, Nature is all superior; तर प्रो. विनोद म्हणतात कीं, nature is there because of our conscience, hence conscience is superior. कारण त्यांनीं उदाहरण सांगितलें कीं, एका धोंड्यास दुसरा धोंडा आहे का ? तर नाहीं. आपल्याला ते दोन धोंडे आहेत; यांचें कारण there is our conscience or say spirit to distinguish them. मी त्यांना असें पटवून देण्याचा प्रयत्न करीत होतों कीं, सूर्यापासून जर पृथ्वी उत्पन्न झाली, नंतर पृथ्वी थंड होत होत जर तिवर प्राणी उत्पन्न झाला आणि मग जर त्याला conscience आली, मग जर त्याला आत्मा झाला तर conscience superior आहे असें म्हणतां येईल कसें ? पण त्यांचें म्हणणें असें कीं nature is no nature unless it is known by our conscience. त्यांनींही पुष्कळ उदाहरणें दिलीं आणि म्हणूनच म्हणे भगवंतांनीं हा आत्मा सर्वव्यापी असून 'नायं हन्ति न हन्यते' असें लिहिलें आहे. मींही उदाहरणें दिलीं. त्यामुळें आमचा दोन दिवस प्रवास मोटा झटकन् आणि सुखकर झाला आणि ह्याच कारणानें मला प्रथम लिहिणें भाग पडलें कीं, फाटाचट्टीहून थोडीशी चढण चढून मग एकदम उतार वगैरे.

आज येथें आल्याबरोबर कळलें कीं, आमच्या कंडीवाल्याच्या तळपायांत पू होऊन तो सुजला आहे आणि त्यामुळें त्याला चालतां येत नाहीं. आमच्या कंडीवाल्याच्या फार मोठ्या भानगडी झाल्या. त्याला मग्गूपर्यन्त आल्यानंतर आम्ही त्याला त्याचे पैसे दिले; पण कुली लोक कुरकूर करूं लागले. शिवाय पाऊस पडत होता. म्हणून आम्ही त्याला पुन्हां गौरीकुंडापर्यन्त ठरविलें आणि हो ना करतां करतां आम्ही त्याला मोठ्या कष्टानें तीन रुपयांवरून दोन रुपयांवर गौरीकुंडास आणलें. तेथें सामान ठेवायचेंच असल्यानें आम्हाला त्याची बिलकूल जरुरी नव्हती; त्यामुळें आम्ही त्याला तसें सांगितलें. पण त्या वेळेस त्याला

पैशाची जरुरी होती, त्यामुळें तो गौरीकुंडाहून केदार करून नंतर नारायणा-पर्यन्त यायला तयार झाला. तो म्हणाला कीं, त्याला देवदर्शन करण्याची इच्छा आहे म्हणून व मीही विचार केला कीं आपले कुलीही आतां थोडे भरभर चालूं शकतील, म्हणून तो येथपर्यन्त आला. आज पायांत पू झाल्यानें पुढें चालवत नाहीं म्हणतो आहे. पाहूं पुढें काय काय होतें तें.

## जंगलचट्टी.


ता. ८-६-१९४१

आणि पुढें काय होतंय् धोंडे ! आज सकाळीं तर त्यानें आपणाला चालतां येणें शक्य नाहीं, असे साफ सांगितलें ! ( आम्ही त्याला ३॥ रुपये दिले. ) आज सकाळीं ज्या एकएक भानगडी झाल्या, त्या कांहीं विचारायची सोय नाहीं. म्हणजे साडे चार वाजतां निघण्याची तयारी करून आम्हाला निघायला सात वाजले तो कंडीवाला गळाल्याबरोबर ! झालें काय तर आम्ही काल असा बेत केला होता कीं, देहेड्याहून लवकर पहाटे निघून तुंगनाथास जावें व तेथें उगीच शिजवायची कट्कट् करण्यापेक्षां देहेड्याहूनच जेवणाचें कुकरमध्यें तयार करून तुंगनाथावर जाऊन जेवावे व लागलींच परत फिरून आमच्या प्रोग्रामप्रमाणें मंडलचट्टीस येऊन रहावें. पण ही कंडीवाल्याची भानगड उपस्थित झाल्यावर मला पुढें काय करावें, ही मोठी पंचाईत पडली.

ही गोष्ट अगदीं खरी कीं, भटवाडीहून बेलकपर्यन्त येईतो आमचें सगळें सामान तिघांनींच घेतलें होतें. तरी त्या वेळीं कुकर भरलेला नव्हता, त्यामुळें मला फारच पंचाईत पडली. आम्ही एक दोन कंडीवाल्यांना विचारून पाहिलें, तर ते मुळीं नारायणापर्यन्त येईनातच. आणि आम्हीं मण्डलपर्यन्त विचारलें तर तीन रुपये न् पांच रुपये सांगूं लागले. त्यामुळे खरोखरीच मोठा भयंकर गोंधळ उडून गेला. आणि शेवटी त्या तिघां जणांनीं सामान घ्यावें, असें ठरलें व सातच्या सुमारास आम्ही देहेडाहून निघालों. तेवढ्यांतल्या तेवढ्यांत प्रो. विनोदांनीं येथें एक आश्चर्यकारक गोष्ट उरकून घेतली. सांगूं नका हो कोणाला ! आम्ही येथें एक




चित्र सं. ५१
बद्रिनारायणाचे रस्त्यामधील एक सुंदर देखावा [ पृ. सं. १४७ ]



चित्र सं. ५२
पांडुकेश्वर येथील पांडवांचीं देवळें [ पृ. सं. १४७ ]



चित्र सं. ५३
बद्रिनारायण गांवाचा दुरून देखावा [ पृ. सं. १४७ ]



चित्र सं. ५४
बद्रिनारायण येथून दिसणारा नीलकंठ पर्वताचा प्रचंड पहाड [पृ. सं. १४८]

शंभराची नोट मोडली. खरोखरीच एखाद्या चट्टींत दहा रुपयांची नोट मोडली म्हणून सांगितलें तर तेंदेखील खरें वाटणें शक्य नाहीं. पण येथें मात्र शंभराची नोट मोडली बुवा! मी इतका वेळ स्वस्थ बसून होतों. (स्वस्थ बसून म्हणजे मधूनमधून डायरी लिहीत.)

आज पुढीलप्रमाणें उंच्या मोजल्या- देहेडा ५७८०, ६१००, ५९९०, ६३६०; पोथीवासा ६९७०, दोगडवीठा ८१८०; बन्याकुंड ८७००, ८८८०; चोपता ९०८०, ९८४०; तुंगनाथ १२००० (तेथील एका सद्गृहस्थानें सागितल्यावरून), मुलकण ९८००, नंतर सुमारें शंभर फूट वर चढून तेथून जी थेट उतरण ती जंगलचट्टी ८५००.

पोथीवास्याहून चोपतापर्यन्त अगदीं उत्तम खडी चढण आहे. ते दंडीवाले म्हणत होते, 'आपण बन्याकुंडाला थांबूं' म्हणून. पण मी असा विचार केला कीं, चोपत्याहून जर तुंगनाथास वाट फुटते तर चोपत्यासच जाऊन बसावें. शिवाय हें जेव्हां पाहिलें कीं, प्रत्येक कुलीजवळ भरपूर ओझें आहे, तेव्हां इतकें ओझें घेऊन तुंगनाथाची कठीण चढण चढणें कुलीला अशक्य आहे, असें मला वाटूं लागलें व म्हणून मी चोपत्यासच जेवण करावें व मग तुंगनाथास जाऊन तेथून मंडलचट्टीपर्यन्त जावें, असा बेत केला व म्हणून आम्ही कुलींची वाट पहात बसलों. बन्याकुंडाहून तुंगनाथास एक लोचट पंड्या आमच्या मागें लागला. आम्ही त्याला तीन वेळां 'आम्हाला तुझी जरुरी नाहीं, आम्ही तुला कांहींएक देणार नाहीं,' असें सांगून हाकलून देण्याचा प्रयत्न केला. पण छट्, त्यानें प्रो. विनोदाच्या कंडीपाठोपाठ चालून त्यांचा अगदीं पिच्छा पुरविला. नव्हे, चोपत्यास आल्यावरदेखील विनाकारण तोंड मधेंमधें घालूं लागला. तेव्हां मी त्याला चागला हिंदींत खडसला आणि मग तो थोडासा मला भिऊन वागूं लागला. शेवटीं तो तुंगनाथापर्यन्त आला आणि विनोदांनीं त्याला सव्वा रुपयाचा रुद्र करण्यास सांगितलें. पण समाधानवृत्ति असली तर तो पंडा कसला? तो विनोदांच्या मागें माझ्याकडून बक्षिस देवविण्याबद्दल तसदी देऊं लागला. कारण माझी त्यानें चांगलीच धास्ती घेतली होती; पण विनोदांनीं मी पुन्हां रागवेन

म्हणून सांगितल्यावर तो निघून गेला.

आम्ही चोपत्यास आल्यापासून जो थोडा थोडा पाऊस सुरू झाला व जें एकदम धुकें झालें, तें कांहीं विचारूं नका. तेव्हांच मला वाटूं लागलें कीं, आतां तुंगनाथावरून सुंदर सुंदर देखावे दिसतात कीं नाहीं कोण जाणे! तरीदेखील छत्री घेऊन आम्ही तुंगनाथ हळूहळू चढून वर आलों. दोन दिवसांपूर्वीपासून प्रो. विनोदांचें तुंगनाथास पायीं चढावयाचें म्हणून ठरलें होतें. ते म्हणत होते कीं, 'दंडी मार्गे असावी कीं काय?' पण मी त्यांना सांगितलें कीं, 'आपल्याला वसुधारेला जायचें आहे, तर तुम्ही पायीं येणेंच बरें!'

दंडीवाल्यांचें फक्त बदरीकेदार, नारायणाचें ठरलें होतें. तुंगनाथास त्यांना न्यायचें तर it was required to give them more money; पण बाबूसाहेब प्रो. विनोदांनीं पायींच जातों म्हटल्यावर त्यांना थोडेंसें वाईट वाटूं लागलें. तेव्हां मी चोपत्यास येतां येतां त्यांना सांगितलें कीं प्रो. साहेबांना चाललेंच पाहिजे; कारण त्यांना वसुधारेला यायचें आहे, वगैरे वगैरे. आणि मग ते थोडेसे खुषींत आले. वर येईपर्यन्त पांच पन्नास फुटांपेक्षां अधिक पलीकडचें कांहींएक दिसत नव्हतें. तेव्हां फोटो घेण्याचा मुळीं प्रश्नच उत्पन्न होत नव्हता. दुसऱ्या दरींतून सारखें वर येत असलेलें धुकें जेव्हां मला दिसूं लागलें तेव्हां मी फोटोबद्दल जवळ जवळ निराश झालों. म्हणजे तुंगनाथाच्या मंदिराचादेखील फोटो काढणें अशक्य आहे, असें मला वाटूं लागलें.

## तुंगनाथ.

आणि खरोखरीच वर आल्यावर तुंगनाथाच्या मंदिरावर धुकें होतेंच. पण तें धुकें एकदम विरळ होत होत, तुंगनाथाचें मंदिर स्पष्ट दिसूं लागलें. त्याच्याच आधीं माझ्या कॅमेऱ्याची फिल्म संपली होती. पण तसेंच पावसांत उभें राहून दुसरी फिल्म भरली व फोटो घेतला. देवळाजवळ गेल्यावर धुकें आणखी पातळ झालें. पण गंगोत्री, जम्नोत्री, बदरीनाथ, नारायण दिसणें केवळ अशक्य होतें. पाऊस थोडा थोडा सारखा पडतच होता. परंतु धुकें थोडें पळून गेलें होतें.

मग देवळाचे एक दोन फोटो घेतले व जेवढे सांपडणें शक्य होतें, त्याचेही फोटो घेतले.

प्रो. विनोद म्हणत होते कीं, जवळ बर्फाचे ओघळ दिसत होते, त्या डोंगराचाही एक फोटो घ्या म्हणून. परंतु अशा पुष्कळ ओघळांचा पूर्वी फोटो घेतला असल्यानें तशी इच्छा झाली नाहीं. " **अतिपरिचयादवज्ञा** " म्हणतात ती ह्याला. इतक्या दिवसांत आज आजूबाजूचे डोंगर पाहून वाटत होतें कीं, आपण उच्च स्थानावर आहोंत, बाकीचे डोंगर खूप खूप खालीं आहेत. कारण धुक्यामुळें अति लांबचे ह्याहीपेक्षां अधिक उंच असलेले पहाड दिसत नव्हते. मला बाबांनीं सांगितलें होतें कीं, चारी बाजूंनीं बर्फाची रांगच्या रांग दृष्टीस पडते, त्याचे फोटो घे म्हणून. पण धुक्यामुळें हा बेत बिलकूल सिद्धीस गेला नाहीं.

तुंगनाथास देवदर्शन होईपर्यन्त पुन्हां पावसास सुरवात झाली आणि गार झोंबणारा वारा वाहूं लागला. तेथें अधिक काल थांबण्याचीही सोय नव्हती. कारण आमच्याबरोबर कांहींएक सामान नव्हतें हें एक व कुलींना आम्ही पुढें पुढें जा म्हणून सांगितलें होतें. तेव्हां आम्हाला पावसांतून निघावें लागलें आणि मग त्या तुंगनाथाचें सौन्दर्य आम्हास थोडें थोडें दिसूं लागलें.

उतरत असतांना पाऊस जरी पडत होता, तरी धुकें निवळलें होतें. त्यामुळें आम्हाला हिमालयाच्या एका पाठोपाठ एक अशा डोंगरांच्या रांगा दिसूं लागल्या. जरी शेवटची बर्फाची रांग दिसली नाहीं, तरी मी सात आठ रांगा मोजल्या आणि आपण ह्या सर्व रांगांपेक्षां अधिक उंचीवरून त्यांना पहात आहोंत, ही कल्पना सारखी होत होती ( we were looking down upon the ranges due to the height of Tungnath.) आम्ही तुंगनाथाहून उतरून जों मुलकण्यास आलों, तों आम्हाला प्रो. विनोदांच्या दंडीवाल्यांनीं सांगितलें कीं, कुली पुढच्या चट्टीत गेले आहेत. मी म्हटलें ' बरं झालं, तेवढेच तीन मैल उद्यांचे कमी झाले. ' आम्हाला तुंगनाथाहून उतरे-तोंपर्यन्त गप्पा मारतां मारतां बराच उशीर झाला होता. परंतु आतां इलाज नव्हता. आम्ही पुढें निघालों तों हळू हळू पाऊसही पडत होता व अंधारही

पडत होता.

Wonderful, wonderful !! काय सुंदर धबधबा आम्हाला जातां जातां लागला म्हणून सांगूं! It was leaping over a precipice down in great grand depths! त्या पाण्याच्या पडण्यामुळें दरींतून धीर-गंभीर आवाज येत होता. थोडा वेळ तो धबधबा पाहिल्यावर मला कल्पना आली कीं, हे पक्षीच एकामागून एक कड्याखालीं पडत आहेत. असे ते तुषार अँग्युलर दिसत होते. तो प्रचंड प्रवाह नीट पाहण्यासदेखील भरपूर वेळ नव्हता. कारण ठिकाणाला जाईपर्यन्त चांगलाच अंधार होणार, ही नक्की खात्री होती तरीदेखील इतर गढूळ पाण्याप्रमाणेंच येथेंदेखील प्रथम तांबूस दिसत असलेला पक्षी was transforming gradually into a white bird.

आम्हाला येथें पोंचायला चांगलाच अंधार झाला. पण आज पौर्णिमा असल्यानें ढगांतून व त्या उंच उंच झाडींतून थोडा थोडा प्रकाश येत होता आणि खरें म्हणाल तर आज भरपूर चन्द्रप्रकाश असणार, असा विचार करूनच मी कुलींना बेधडक पुढें जायला सांगितलें होतें. पांगरवासा म्हणजे खरोखरी जंगल-चट्टी आहे आणि तेथें उतरतांना आम्हाला दोन तीन पिवळया मातीचे उतार अंधेरांतून उतरावे लागले आणि माझी अशी नक्की खात्री आहे कीं, आतां कांहीं वाचकांना त्या पिवळ्या मातीची नवीन ओळख करून द्यायची जरुरी नाहीं. मी त्या पिवळ्या मातीवरून दोन वेळां सपाटून घसरून पडलों; तरी विनोदांच्या दंडीवाल्यानें हात धरला होता! एकंदरींत ह्या पिवळ्या मातीवरून घसरण्यांतदेखील फार मजा आला.

हो, आणखी एक गम्मत! आम्ही चट्टींत आल्यावर पाहतों तों आमच्या पायाला जळवा लागल्या होत्या. माझ्या पायाला चार पांच, विनोदांच्या पायाला दोन तीन, परशुरामाच्या पायाला बऱ्याचशा, नव्हे परशुरामाच्या पायाचें तर त्यांनीं चांगलेंच रक्त काढलें होतें. तें रक्त पाहून मी तीन वेळा माझा पाय तपासून घेतला.

# चमोली.

ता. ९-६-१९४१

आज पुढील उंच्या मोजल्या- जंगलचट्टी ८५१०, ७०६०, मंडलचट्टी ५३९०, ५०२०, पूल ४३९०, गोपेश्वर ५०००, चमोली ३५२०.

आज खरें म्हणाल तर आणखी चार सहा मैल जाण्याचा इरादा होता. परंतु हे कुली आहेत ना! ते तक्रार करूं लागले कीं, 'वजन फार आहे. तर कांहीं थोडें सामान येथें ठेवा व मग पुढें चला.' मी त्यांना पुष्कळ सांगून पाहिलें कीं, 'परत चमोलीला यायला सात आठ दिवस लागतील, तर येथें सामान ठेवणें कसें शक्य होईल?' पण ते कुरकूर करूं लागले. तेव्हां मात्र मी खूपच रागावलों. मला त्यांच्यावर स्पष्ट रागावून काय करायचें आहे म्हणा; पण मी रागावलों आहे, एवढें मात्र त्यांना कळलें. त्याची मोठी गम्मत झाली. मी इंग्लिशमध्यें प्रो. विनोदांना त्यांच्या तक्रारीबद्दल रागावून टीका केली. म्हटलं, 'ह्या लोकानीं सगळे सामान बेलकपर्यन्त बिन्‌तक्रार आणलें आणि आम्ही त्यांना थोडें सुख व्हावें म्हणून प्रयत्न करूं लागलों तर तत्काळ हे आमच्या डोक्यावर बसले.' अखेरीस आम्ही सामान तर रागारागानें कमी केलेंच, पण शिवाय एक छोकरा पांच रुपये व जेवण द्याला ठरवून घेतला. त्यांना चांगलेंच झोंबावें म्हणून त्यांनीं मी रागावलेलें पाहिले. रागांत सामान कमी केलेले पाहिलें, तेव्हां मात्र ते चांगलेच चरकले आणि त्या छोकऱ्याला घेतल्यावर तर ते उत्तमपैकीं मऊ आले. अर्थात् मी कांहीं त्या छोकऱ्याला सामान फारसें दिलें नाहीं. परंतु ह्यांची खोड मोडली, यांत कांहींच शंका नाहीं.

आम्ही गोपेश्वरास आल्यानंतर दंडीवाले म्हणत होते, तेथेंच थांबावें म्हणून. पण पुढे दोन तीनच मैल असल्यानें आम्ही येथेंच येऊन राहिलों. गोपेश्वराला एक महादेवाचा मोठा त्रिशूल आहे. बाजूला उत्तमपैकीं मूर्तीही आहेत. तेथें गेल्यावर तेथल्या पुजाऱ्याने सांगितलें, 'येथें केदारखंड संपला.' पांच केदार आहेत म्हणे, त्यांतील हा एक.

तरी आम्ही साडे आकरा बाराच्या सुमारास येथें येऊन पोहोंचलों व परशुरामास स्वयंपाक करण्यास सांगितलें. पण ह्या परशुरामाची मात्र धन्य आहे हं! हा गृहस्थ स्वयंपाक करण्यास साडेतीन तास लावतो. तरी भाजी आणायला, पाणी आणायला कुंदन, करपे, त्याची बायको अशीं तीन माणसें आहेत. असो. खरोखरीच आज जेवण होईपर्यन्त तीन वाजले आणि नंतर ही कुलींची भानगड. ह्यामुळें दोन मैलदेखील पुढें जाणें झालें नाहीं.

आज अस्मादिकांची प्रकृति चांगलीच गरम झाली असल्यामुळें संध्याकाळीं जेवण बंद म्हणून सांगितलें होतें आणि त्यानंतर रात्रीं झोपेंतून उठून नमस्कारही कसेबसेच घातले.

## गुलाबकोटी.

ता. १०-६-१९४१

पण कालचा सूड आज घ्यायचाच जणू अशी मी प्रतिज्ञाच केली होती. त्यामुळें आज चांगलाच झपाटा मारला आणि त्या छोकऱ्याच्या दाबामुळें कुलीलोकही बिन्तक्रार झपाट्यानें आले आणि ह्यामुळें कुली तक्रार करणार नाहींत, ही माझी खात्री आहे.

आज पुढील उंच्या मोजल्या– चमोली ३४४०, ३६७०, पूल ३६२०, ३८९०, पूल ३६८०, ३८२०, अलकनंदा पूल (हिला काळी गंगाही म्हणतात.) ३७१०, ४३९०, पिप्पलकोटी ४५००, ४६२०, ४७२०, ४८१०, गरुडगंगा पूल ४७५०, ५१००, ५२६०, पाताळगंगा पूल ४८००, ५०५०, गुलाबकोटी ५३५०.

आज जो झपाटा मारला ते थेट पिप्पलकोटीला येऊन थांबलों आणि आज कुलीदेखील चांगल्याच झपाट्यानें आले. ते येथे म्हणूं लागले कीं, 'पिप्पलकोटीलाच जेवण करावें.' पण मी त्यांना स्पष्ट सांगितलें, 'बस्' येथून चार मैल गरुडगंगेला जायचें, मगच जेवण करावयाचें.' कारण मी विचार केला कीं परशुराम येथें स्वयंपाकाला वेळ लावणारच लावणार आणि

शिवाय आमचा गरुडगंगेंत स्नान करतांना वेळच्या वेळ जाणार.


गरुडगंगेंत म्हणे जरूर स्नान करावें आणि स्नान करतांना डोकें बुचकळून ! एक धोंडा उचलावा आणि असला धोंडा जवळ असला म्हणजे म्हणे साप, विंचू जवळ येऊं शकत नाहीं. मीसुद्धां एक धोंडा उचलला. पण आज स्नान करायला गंमत आली बुवा. मला तर असें झालें होतें कीं, केव्हां एकदां स्नान करतों आहे ! काल चमोलीला येतां येतां जो भयंकर घाम आला, त्यामुळें अंग अगदीं चिकट होऊन गेलें होतें. इतकें कीं, रात्रीं उठून नमस्कार झाल्यानंतर मला अगदीं स्नान करण्याची भयंकर इच्छा उत्पन्न झाली होती. परंतु मी तसाच पुन्हां झोपलों. शिवाय आजही उन्हाच्या तिरपीमुळें सपाटून घाम आला होता. त्यामुळें केव्हां एकदां पाण्यांत बुचकळी मारतों, असें होऊन गेलें होतें· आणि खरोखरीच स्नानाचें महत्त्व काय, त्याची बरोबर कल्पना आज आली. आपण दररोज सकाळीं उठून स्नान करीत असतों, त्यामुळें स्नानाचें महत्त्व आपणाला कळत नाहीं. पण आज दोन तीन दिवस सपाटून घाम येऊनदेखील स्नान करायला मिळालें नव्हते, तेव्हां आज मात्र स्नानापासून होणारा ब्रम्हानंद प्राप्त झाला. कसें स्वच्छ स्वच्छ व मोकळें मोकळें वाटलें !

आज माझा मंगळवारच असल्यानें मला जेवायचें नव्हतें आणि प्रो. विनोदांनीं फक्त भाताचें पातेलेंच ठेवायला सांगितलें होतें. त्यामुळें आमची मनसोक्त आंघोळ झाल्यानंतर लवकरच सुमारें अर्ध्या पाऊन तासांत परशुरामाचा स्वयंपाक तयार झाला आणि जेवण झाल्याबरोबर आम्हाला पावसाचीं चिन्हें दिसूं लागलीं. म्हणून आम्हाला कुलीनें सांगितलें कीं, 'पुढें पाताळगंगेपर्यन्त रस्ता मोठा धोक्याचा आहे. आणि पाऊस पडूं लागला म्हणजे वरून मोठेमोठे धोंडे निसटतात तेव्हां पावसाच्या आधीं पाताळगंगेला पोहोंचणें अवश्य आहे.'

गरुडगंगेपासून पाताळगंगेपर्यन्त जो डोंगर लागतो, तो राखेचा डोंगर आहे. मी प्रत्यक्ष हातांत माती घेऊन पाहिली. त्यांत मुळीं वाळूचा बारीकदेखील कण नाहीं. मोठी गंमत वाटली बुवा त्या मातीची ! कुंदन सांगत होता कीं, 'फार प्राचीन काळीं ह्या ठिकाणीं फार मोठें अरण्य होतें आणि एकदा volcanic

irruption मुळें तें सर्व जळून खाक झालें आणि त्याचा पर्वतप्राय राखेचा ढीगच्या ढीग पडला.' खरें-खोटें हें प्रत्यक्ष chemical analysis केल्याखेरीज मुळींच कळणार नाहीं. पण प्रत्यक्ष हाताला मात्र माती अगदीं भुसभुशीत लागते.


गरुड-गंगा सोडल्यावर त्या राखेच्या पर्वताबद्दल कुंदन मला माहिती सांगत होता. गरुडगंगेपासून सुमारें अर्धा पाऊण मैल गेल्यावर मला ह्या राखेचे ओघळच्या ओघळ दिसले. पण ते पाहिल्यावर पावसांत ते ओलांडून जाणें शक्यच नाहीं, असें कांहीं मला वाटले नाहीं. पण कुंदन म्हणाला कीं, ' खरी राख अजून पुढेंच येणार आहे. ' मागील वर्षी म्हणे इतका भयंकर पाऊस पडला कीं ह्या राखेच्या डोंगरांतून काढलेली सडक अजिबात वाहून गेली. त्यामुळें दळणवळण अजिबात बंद झालें. मी त्याला विचारलें कीं, ' इकडून जर धान्यच तिकडे गेलें नाहीं तर तेथील चट्टयांच्या मालकांनीं वगैरे केलें तरी काय ? ' तर त्यानें सांगितले कीं, ' त्याच्याजवळ थोडेंबहुत धान्य शिल्लक होतें, त्यावर त्यांनीं भागवून नेले. आणि पाऊस पडत असतां त्या राखेंतून भिल्ल लोकांनीं मोठें धाडस करून इकडून तिकडे सामानाची ने-आण केली ' आणि खरोखरीच तो पुढील राखेचा डोंगर आणि त्यांतील ती मैलभर राखेंतील वाट व त्या राखेंतील नुसतेच लटकत राहणारे अजस्र धोंडे फारच विलक्षण आहेत आणि असले मोठमोठे धोंडे पावसात वरून डोळयादेखत निसटत असतात. इकडची बातमी तिकडे पोहोंचविण्याकरितां भिल्ल लोकांनीं तो डोंगर रस्त्याशिवाय ओलांडला हें ऐकल्याबरोबर कोणालाही ह्या भिल्लांच्या धाडसाबद्दल आश्चर्य वाटेल. आणि दोन वर्षांपूर्वी बाबा गेले होते, त्यावेळीं म्हणे रस्ता अगदीं तात्पुरता कसाबसा चांगला करून घेतला होता. तरीदेखील गोलिवडेकर मास्तर म्हणे थोडक्यांत निभावले, नाहीं तर वरून निसटलेला धोंडा टाळक्यातच पडायचा. असला हा धोक्याचा रस्ता टाळण्यासाठीं व तेथील लोकांना पावसाळयांतदेखील थोडेंसें दळणवळण असावें म्हणून डोंगरावरून नुक्ताच दुसरा रस्ता काढला आहे आणि त्या रस्यानें, कुंदन म्हणत होता कीं, 'गरुडगंगेहून पातळगंगा आठरा मैल आहे.' तर




वत्र सं. ५५ ) बद्रिनारायणाहून दिसणारें नारायण पर्वताचें अत्युच्च टोक उंची सुमार २६००० फूट [ पृ. सं. १४९ ]



( चित्र सं. ५६ ) वसुधारेस जातांना माणागांव येथें एक भूतानी बाई पश्मिनाची शाल विणीत आहे. [ पृ. सं. १५१ ]



चित्र सं. ५७
माणागांव येथून दिसणारें सुमारें २४००० फूट उंचीचे प्रचंड पहाड [पृ.सं.१५३



चित्र सं. ५८
वसुधारेवरील बर्फाचे प्रचंड पहाड [पृ. सं. १५४]

दुसरे म्हणतात कीं, जाऊन-येऊन आठरा मैल आहे. म्हणजे चार मैलांऐवजीं नऊ मैल चालावें लागतें. हा जो पुनश्च राखेच्या डोंगरांतून रस्ता काढला आहे, त्याला तयार करून दोन तीन महिनेदेखील झालेले नाहींत. मी कुंदनला विचारलें कीं, 'हा रस्ता दुरुस्त करतांना जीं माणसें लावलीं, त्यांना सरकारला बरीच मजुरी द्यावी लागली असेल ?' हो, इतक्या danger zone मधून रस्ता काढायचा म्हणजे मजुरी अधिक पडणार, अशी माझी कल्पना होती. पण कुंदननें जेव्हां मला सांगितलें कीं, 'असल्या चट्टया–चट्टयांतील रस्ता–दुरुस्तीबद्दल सरकार एक पैदेखील देत नाहीं' म्हणून, तेव्हां मला फार आश्चर्य वाटलें. सरकार नुसते त्या गांवच्या मुख्य अम्मलदारांना आज्ञा करतें कीं, 'आतां यात्रेचे दिवस आले आहेत, रस्ता दुरुस्त करून घ्यावा' आणि अम्मलदार एक पैदेखील गोरगरिबांना न देतां त्यांच्याकडून रस्ता-दुरुस्तीचें काम करून घेतात. ( ही गोष्ट इंग्रजाच्या हद्दींतीलच सांगत आहें, बरें का ? ) तेव्हां मी त्याला विचारलें कीं, 'ह्या डोंगरावरून जो नवीन रस्ता सरकारनें बांधून घेतला, त्याबद्दल तरी सरकारनें मोलमजुरी दिली काय' तर 'ती दिली' म्हणून त्यानें सांगितलें.

मला वाटलें, हिला पाताळगंगा म्हणून हें नांव मुद्दाम म्हणून ठेवलें असावें. ज्याप्रमाणें हर्सिलला गंगेचें पात्र चांगलें सपाटून रुंद आहे, त्याप्रमाणें ह्या ठिकाणींही ह्या नदीचे पात्रही चांगलेंच रुंद आहे. पण हर्सिलची उंची आहे ८२०० तर येथील उंची आहे ४८००. तेव्हां अर्थातच वरील जर गंगा म्हटली तर तेवढेच रुंद पात्र असणाऱ्या ह्या नदीला पाताळगंगा म्हणायला काय हरकत आहे बरें ?

आम्ही पाताळगंगा ओलांडली व ५०५० पर्यन्त जाऊन पोहोंचलों. लागलींच थोडी थोडी पावसाला सुरवात झाली आणि येथें पोंचेपर्यन्त तर चांगला-च पाऊस पडूं लागला. आम्ही पाताळगंगा ओलांडेपर्यन्त बरीच संध्याकाळ झाल्याकारणानें फोटो कांहीं फारसे काढले नाहींत. पण जमल्यास परत येतांना मात्र बरेच फोटो घ्यावेत, असा बेत केला आहे.

## लामबगड

ता. ११-६-१९४१

आज पुढील उंच्या मोजल्या– गुलाबकोटी ५३८०, ५६३०, ५४२०, ५३७०, ५३९०, ५५१०, ५६२०, ५९९०, जोशीमठ ६१००, विष्णुप्रयाग ४९३०, अलकनंदेवरील पूल ५३३०, ५५००, ५६२०, ५७४०, घाटचट्टी ५८१०, तेथून अगदीं सावकाश चढण ते थेट ६९५०, लामबगड ७३००.

आज आम्ही जोशीमठाला नऊ वाजायच्या सुमारास जाऊन पोहोंचलो आणि पाहतों तर तें पोष्ट दहा वाजतां उघडायचें. मग तसेंच देवळांत जाऊन बाबांनीं सांगितलेले गणपती, महादेव व गरुड यांचे फोटो घेतले आणि महादेवाचे तर एक सोडून तीन फोटो घेतले आहेत. निरनिराळ्या एक्स्पोजर आणि डायफ्रॅमचे ! पाहूं कितपत चांगलेवाईट येतात ते. आज टपाल मिळालें आणि करमणुकीला वाचायला मासिकें मिळालीं. परवांच चमेलीहून बाबांना खुशालीची तार केली असल्यानें तारेची वगैरे भानगड नव्हती.

खरोखरीच गंमत आहे हं ! येथें जीं महादेवाचीं आणि गणपतीचीं देवळें आहेत, त्यांची आर्ट कांहीं निराळ्या तऱ्हेची आहे. इट् मस्ट् बी ओल्ड इंडियन आर्ट ! आणि विशेष हें कीं पार्वती महादेवाचे उजव्या अंगास आहे. मी 'हे असें कसे ?' म्हणून प्रोफेसर विनोदांना विचारलें. तर ते म्हणाले कीं, ' ताण्डव नृत्य करीत असतां पार्वती उजव्या बाजूला आली आहे, असें समजून ही मूर्ति घड-विली आहे. '

आज दुपारीं ठरल्याप्रमाणें घाटचट्टीला येऊनच जेवण केलें. परशुराम म्हणाला होता, 'कुली म्हणतात कीं विष्णुप्रयागासच जेवावें.' खरोखरीच कुली विष्णुप्रयागापासून अर्ध्या पाऊण मैल असलेल्या चट्टीवर थांबले होते. पण मी त्यांना सांगितलें कीं, 'तुम्ही खाऊन घ्या.' कारण मी प्रो. विनोदांना म्हणालों कीं 'आपण जर परशुरामाला स्वयंपाक करायला सांगितलें तर पुढें लामबगड्यापर्यन्त जाणें केवळ अशक्य आहे. कारण येथून घाटचट्टी चार मैल आहे व परशुरामाचा

आरामांत स्वयंपाक होईपर्यन्त सहज चार वाजून जातील. आणि शिवाय कुली येथून थेट लामबगड्यापर्यन्त येण्यास कुरकुर करतील. '

काय वाटेल तें म्हणा ! हा छोकरा बरोबर घेतल्यामुळें कुली अगदीं बिनतक्रार मी जितका जाईन तितके दूर येत आहेत. त्यामुळें ते अगदीं लामबगड्यापर्यन्त बिनतक्रार आले. मध्यंतरी पंडुकेश्वर लागला. पंडुकेश्वराला म्हणे ताम्रपट आहेत. पण त्यांच्यावर काय लिहिलें आहे, ह्याचा शोध अजून लागला नाहीं. पण ते परत येतांना पहावेत, असा मी बेत केला आहे. हे ताम्रपट म्हणे पांडवांनीं लिहून ठेवले आहेत.

आज पुढील उंच्या मोजल्या– लामबगड ७४००, हनुमानचट्टी ८५००, अलकनंदेचा पूल ८८१०, ९६७०, ९९००, ९९८०.

## बद्रि-नारायण.

ता. १३–६–१९४१

काल जरी अगदीं ठरविलें होतें कीं, आज पहाटे लौकर उठून वसुधारेला जायचें म्हणून, तरी आज उठायला उशीर केला. मी झालों होतों लवकर जागा. परंतु प्रो. विनोद म्हणाले कीं ' इतक्या लवकर निघून तरी काय करायचें आहे ? ' म्हणून थोडी थोडी झोप घेतली आणि उठल्याबरोबर लागलींच निघायचें ठरवून आम्ही येणाऱ्या लोकांना जागें केलें व म्हटलें, 'चला.' परशुराम म्हणाला, ' खायला काय काय घ्यायचें ? ' पण मी विचार केला कीं, फराळाचें करून घ्यायचें म्हटलें म्हणजे उशीर व्हायचा. म्हणून मी त्याला पेटींतले लाडू, चिवडा व आमच्याबरोबर दोन गडी-माणसें यावयाचीं असल्यानें त्यांना थोडें तरी खावयास असावें म्हणून चार आणे दिले.

आज बहिर्दिशेला खूप दूर चालत चालत विष्णुगंगेच्या कांठाकांठानेंच गेलों होतों आणि तेथेंच विष्णुगंगेच्या पाण्यानें मी तोंड धूत होतों. इतक्यांत Oh ! wonderful !! I had never seen such a marvellous gold in whole of my life ! Pure gold was there on the

mountain !

तापलेलें सोनेंच जणू त्या बदरीनारायणाच्या डोक्यावर पडलें आहे, असा मला भास झाला आणि म्हणूनच माझें लक्ष तिकडें गेलें. जणू पर्वतान्यः आकाराचा सूर्यच पश्चिमेकडे नुकताच उगवला आहे, असा मला भास झाला. मी तोंड धुवायला बसलेला उभा राहिलों आणि तें सोनें थंड कसें होत आहे, तें थोडा वेळ पाहिलें. इतक्यांत मला वाटलें, अर्र् कॅमेरा असता तर आतां फोटो घेतले असते आणि ह्या विचारानें मी झटकन् तोंड धुणें आटोपलें व जवळ जवळ पळतच परत यायला निघालों. तरीदेखील वारंवार मी मागें वळून पहात होतों कीं, how the peak rises over the hillock and that the gold is not cold enough to transform into silver !

मी टेकडीच्या अगदींच जवळ असल्यानें सोन्याचें नुसतें शिखर दिसत होतें. म्हणून अधिकाधिक सुवर्ण दिसावें, अधिकाधिक बर्फाचे पहाड दिसावेत, म्हणून तर मी जास्तीच गडबड करीत होतों आणि मी आमच्या शिबिराला येईपर्यन्त दोन तीन बर्फाच्छादित शिखरें सोन्यानें मढविलेलीं दिसूं लागलीं. मी गडबडीनें कॅमेरा घेतला आणि जो बाहेर येतों तोंच– तों काय ! तों तीं शिखरें धुक्यानें भरून गेलीं होतीं. मी थोडा वेळ थांबून तो ढग दुसरीकडे जातो कीं काय, म्हणून वाट बघितली. पण अधिक वाट बघितल्यास वसुधारेस जायला उशीर होईल, ह्या समजुतीनें मी तो नाद सोडून दिला. विचार केला, असेल नशिबीं तर आपल्याला उद्यां सकाळींही हें दृश्य दिसेल.

परत आल्यावर मला परशुरामाकडून कळलें कीं, प्रो. विनोद दंडींतून पुढें गेले आहेत. खरें म्हणाल तर आमचें असें ठरलें होतें कीं, त्यांनीं पायींच वसुधारेला यावें आणि तेवढयासाठीं तर मी मागें सांगितल्याप्रमाणें ते तुंगनाथास चालत आले होते व ह्यामुळें मला त्यांनीं दंडी नेण्याचें ठरविलें आहे, हें ऐकून फारच आश्चर्य वाटलें. पण ते पुढें गेले, हें समजतांच मी आश्चर्य करीत न बसतां थोडी बिस्किटें खाऊन घेतलीं. परशुराम त्यांतील कांहीं डब्यांत घेणार होता. पण मी थोडासा विनोदांच्या वर रागावलों असल्यानें ( त्यांनीं दंडी केली म्हणून ) मी त्याला तीं डब्यांत घेऊं

नकोस म्हणून सांगितलें. मी थोडींशी बिस्किटें खाऊन वर पाणी प्यालों आणि आमचीं नेहमींचीं तीन लिंगें गळ्यांत अडकवूं लागलों. इतक्यांत विनोद खोलींत आले. तेव्हां परशुराम म्हणाला कीं, “ तुम्ही येथें कसे ? ” म्हणून. त्यांचे दंडीवाले म्हणे कांहींतरी खायला बरोबर असावें म्हणून बाजारांत गेले आणि तेवढ्यांत विनोद इकडे आले. मी खरोखरीच म्हणाल तर बॅरोमिटरचें लोढणें गळ्यांत आडकविणार नव्हतों. १०००० फुटांवर त्याचा कांहींएक उपयोग होत नाहीं, हें मला पक्कें माहीत होतें. आणि आम्ही येथेंच दहा हजार फुटांवर आहोंत व आणखी वरच जाणार होतों. पण असा विचार केला कीं, बाबांचा जिन्नस हा, कोठें गहाळ झाला तर काय घ्या ! बरें, त्याचें वजनही फारसें नाहींच आणि बाकीचीं दोन तर घ्यायचींच होतीं. तेव्हां असेना का ? असा विचार करून मी तें गळ्यांत अडकविलें. हो, भारे घेऊन जाणाऱ्या माणसाच्या भाऱ्यावर जर एखादें फुलपांखरूं बसलें तर त्याला काय कळणार आहे ?

निघतांना एक लंगोट व टॉवेल घ्यायची मात्र मी खबरदारी घेतली. प्रो. विनोद म्हणत होते कीं, ‘तेथें पाणी फार थंड आहे. तर ह्याची कांहीं जरुरी नाहीं. म्हणून. पण मी म्हटलं, ‘हें पहा. दोघे जण आहोंत. त्यांच्यांत आमचें ओझें कांहीं फार नाहीं. पण नसतांना आंघोळ करण्याची इच्छा झाली तर मात्र प्रश्न उत्पन्न होईल. ’

आज बद्रिविशालच्या देवळापासून निघाल्यापासून मी व प्रो. विनोद सपाटून हंसलों बुवा. मी अगदीं सगळं सगळं सांगून त्यांना म्हटलें कीं, ‘ मी तीन ओझीं सदा सर्वकाळ वहात असतों. त्याबद्दल मी तुमच्याकडून पैसे काढणार आहें ’ आणि मग त्यांनीं जी मल्लिनाथीला सुरवात केली, ती कांहीं विचारूं नका. मग त्यांत मला पैसे किती देणें जरुर आहे? हो ! कारण कुली कांहीं वसुधारेला आले नव्हते. आणि इतके कां देणें जरूर आहे, ह्याच्यावर नुसते हशाचे फवारेच्या फवारे चालू झाले होते आणि मी त्यांतच मधून मधून जळण टाकीत होतों. त्यामुळें जवळ जवळ मैलभर आम्ही केव्हां आलों, त्याचा पत्ता लागला नाहीं. पण अखेरीस त्या भयंकर हंसण्या-मुळें विनोदसाहेब थकले व दंडींत बसले.

‘गम्मत आहे बुवा ! बद्रिनाथ शून्य मैल असल्याचा धोंडा देवळापासून सुमा-

दोन तीन फर्लांगांवर आहे. तेथें एक घर नाहीं कीं दार नाहीं, कीं कांहीं नाहीं. मला हा चमत्कार बघून मोठें आश्चर्य वाटलें. मग काय त्यांच्या मनांत येथ-पर्यन्त गांव वाढवावें असें आहे कीं, आमचा नंदी दरवर्षी गहूभर पुढें सरकतो व तो तीळभर मागें येतो, अशापैकीं बदरीनारायणाचें कांहीं असावें असें त्यांना वाटलें कोणास ठाऊक ? त्या धोंड्यापासून १।। मैलावर माणा नांवाचें गांव आहे.

मला कालच प्रोफेसरसाहेब म्हणाले होते कीं, 'आपण जातां जातां व येतां येतां माणा गांवास जाऊन येऊं या. कारण माणा गांवापासून भूतानला जायला रस्ता आहे व तेथून जवळच भूतानची हद्द लागते. तेव्हां तेथें हिंदु चालीरीतींचा व भूतानी चालीरीतींचा मिलाप झाला आहे.' आणि मीही असा विचार केला कीं, येतां येतां जर भूतानमधील कांहीं गमतीदार वस्तु तेथें मिळाल्या तर त्या विकत घेऊन याव्यात. पण फिल्म भरेपर्यन्त आमचा हास्यरसोत्कर्ष चालू असतांना मी कांहीं फोटो घेतले. विनोदबाबू दंडींतून पार पुढें पळाले आणि मी त्यांना गांठीपर्यन्त ते माणा-गावांत देवीचें दर्शन घ्यायला गेले आहेत, म्हणून दंडीवाले सांगूं लागले.

इतका वेळ अलकनंदा उजव्या बाजूस वहात होती. पण माणागांवच्या आधीं आम्ही काल पाहिलेल्या पुलासारख्या पुलावरून गेल्यावर ती ओलांडली. येथें हें विशेष आहे कीं, दोन्ही बाजूंना दोन माणसांपेक्षां अधिक माणसांनीं जाऊं नये अशा पाट्या आहेत. नाहीं तर पाताळगंगेच्या जवळ काय नि आणखी एक दोन ठिकाणीं काय, अर्धवट काम करून ठेवलें आहे. हो, म्हणजे त्यांचें म्हणणें असें दिसतें कीं, देवाला जातांना accident झाला तर त्याला कांहीं हरकत नाहीं. पण घरीं परत जातांना मात्र होऊं नये. येथें दोन्ही बाजूला पाट्या आहेत. कारण हा देवदर्शन झाल्यानंतरचा पूल आहे ना !

प्रो. विनोद माणा-गांवांत गेले म्हणून मीही गेलों. माणा-गांवची उंची १०६०० फूट आहे, असें ते पुस्तकावरून सांगत होते. खेडें अगदीं लहान असून त्यांत सगळे अरुंद अरुंद असे बोळ आहेत. हे बोळ पाहिल्यानंतर पंढरपुरांतील अरुंद बोळांचें वर्णन वाचलें आहे, त्याची मला आठवण झाली. कारण मी पंढरपूरच्या बोळांतून फारसा हिंडलोंच नाहीं ! हिमालयी लोकांच्या स्वच्छतेप्रमाणेंच हें गांवही स्वच्छ आहे. मी एका

बोळांतून दुसऱ्या बोळांत; दुसऱ्या बोळांतून तिसऱ्या बोळांत असें करीत करीत बाहेर पडलों, तों समोरच प्रो. विनोद चालले होते, त्यांना गांठलें. तेथें जवळच दोन भूतानी बायका शाली विणीत होत्या, तें दृष्टीस पडलें म्हणून त्यांचा एक फोटो घेतला.

प्रो. विनोद पुन्हां दंडींत बसल्यावर मी त्यांना म्हणालोंदेखील कीं, 'चाला हो' म्हणून. पण ते म्हणाले कीं, 'मला पुढें चालायचें आहे. तेवढयाकरितां मला एनर्जी राखली पाहिजे. आणि मला आठ दहा मैलांपेक्षां जास्त चालण्याची एनर्जी रहात नाहीं' वगैरे वगैरे. अर्थात् एवढ्यांत मी त्यांनीं दंडी केली ह्याबद्दलदेखील बोलून घेतलें. परंतु ते म्हणाले कीं, 'मग तुम्हालाच त्रास झाला असता. आणि उद्यां मी आजारी पडलों तर काय घ्या,' वगैरे बऱ्याच गप्पा मारल्या; पण आमचा फोटो काढायचा वेळ आला व ते पुढें पळाले !

माणा गांवाजवळच सरस्वती नदी व अलकनंदा नदी यांचा संगम आहे. मला मोठें आश्चर्य वाटलें कीं, येथें जर सरस्वती नदी अलकनंदेस मिळते तर प्रयागास गंगा यमुना सरस्वती यांचा त्रिवेणी संगम होऊं शकतो कसा ? मी प्रो. विनोदांनादेखील याबद्दल विचारलें. तर ते म्हणाले कीं, 'प्रयागच्या तिसऱ्या नदीचें नांव सरस्वती नसून दुसरेंच कांहींतरी आहे' आणि ती म्हणे उलटी वाहते. म्हणजे वरती वाळू आहे व खालून पाणी वहात असतें. मला मात्र मोठें आश्चर्य वाटलें. लोकांना असल्या कवि-कल्पना सुचतात तरी कशा ? प्रयागाजवळ एका हातावर पाणी लागूं शकतें, असें म्हटलें तर ह्यांचें कोठें बिघडतें ? परंतु सरळ सगळ्या गोष्टी सर्व लोकांना पटूं लागल्या तर ते लोक कसले ? आणि पटवून देणारा ब्राम्हण तरी कसला ? 'कोल्होबा तुमचें पोट कशावर ?' तर 'मूर्खांच्या कानावर !'

ही सरस्वती नदी ओलांडायची म्हणजे ह्या टोकापासून त्या कडेपर्यन्त एक मोठीच्या मोठी शिळा आहे. ती म्हणे, पूर्वी स्वरस्वती नदी ओलांडणें शक्य होत नसे, म्हणून भीमानें गदेच्या एका टोल्यासरशी पाडली. पण मला हें मुळींच पटत नाहीं. कारण त्या नदीच्या वरदेखील अशाच शिळा ठिकठिकाणीं पडल्या आहेत आणि त्या शिळेखालून सरस्वती नदी जोरानें वहात असते. त्या नदीच्या वेगामुळें व आंतील

धोंड्यामुळें तुषार सारखे येणाऱ्या जाणाऱ्यांच्या अंगावर उडत असतात आणि सरस्वती नदी मोठ्या रागानें तुफान होऊन नाकांतून सुस्कारे टाकीत जात आहे, असा सारखा भास होत होता ! मला पहिल्याप्रथम कल्पना आली कीं, ही अलकनंदाच असावी म्हणून, आणि प्रो. विनोदांनीं ' ही सरस्वती ' म्हणून सांगितलें. नपेक्षां अलकनंदा ओलांडली असेंच मला वाटलें असतें; आणि खरी गोष्ट अशी आहे कीं, अलकनंदेच्या प्रवाहापेक्षां हिचा प्रवाह किती तरी मोठा आहे ! परंतु नदीला नांव लाभतें तें तिच्या पवित्रपणावर. उदाहरणार्थ, गंगा आणि यमुनेचा संगम झाल्यावर त्या नदीस गंगाच म्हणतात.

आम्ही आणखी वर वर चढायला सुरवात केली. बदरीनारायणापर्यन्त आलेल्या चढासारखाच येथें अगदीं gradual चढ आहे. मधून मधून धुकें नाहींसें झालें म्हणजे आमच्या पाठीमागें जिराफाच्या मानेसारखा बर्फाचा पहाडच्या पहाड दिसत असे.

कांहीं वेळ दंडीत बसल्यानंतर दंडीवाल्यांनीं विनोदबाबूंना सांगितलें की, ' आतां ह्यापुढें दंडी जाणें शक्य नाहीं. ' त्या ठिकाणीं एक लहानशी दरी उतरून चढायची होती. परंतु त्यावरून नुसती मोकळी दंडी नेणें म्हणजेदेखील धोक्याचें होतें. कारण माती ठिसूळ होती व चढ–उतरण खडी होती व शिवाय मधें मधें धोंडे होतें .बरें, तो ओघळ उतरणें म्हणजेदेखील मोठ्या कौशल्यानें दगडांवरून जाणेंच होतें.

Oh ! beautiful !! beautiful !!! काय सुंदर लहान लहान फुलांचे गालिचे आम्हाला रस्त्यानें लागले म्हणून सांगूं ? जमिनीच्या वर दोन बोटांवर सुपारीएवढीं फुलें सर्वत्र पसरलीं होतीं. त्यांतील बहुतेक पिवळ्या गर्द रंगाचीं होती व बरींचशीं जांभळ्या रंगाचीं होतीं. एकेका रंगाच्या फुलांनीं आपापले जणु प्लॉट्सच पाडून घेतले होते ! कांहीं कांहीं ठिकाणीं पिवळ्या-निळ्यांचें गोड मिश्रणही झालें होतें. पण असल्या गोष्टी फार क्वचित्. मला प्रो. गोडीवाल्यांनीं सांगितलें होतें कीं, त्यांनीं ह्या फुलांचे फोटो घेतले आहेत म्हणून. पण जमिनीवर सरपटत असलेल्या इवल्या-इवल्या फुलांचे फोटो त्यांनीं कसे घेतले असतील कोण जाणे ! तरीदेखील काय येईल

तें येईल, म्हणून मीदेखील दोन चार फोटो घेतले.

आतां या प्रो. गाडीवाल्यांची गम्मत सांगतों हं. हे प्रथम आम्हांला गंगोत्रीस बाबाना भेटायला आले असतां भेटले. आणि त्यांनीं मला गोमुखास चलण्याबद्दल थोडासा आग्रह केला. त्या वेळीं गो मुखाला जायचे त्यांचेंदेखील नक्की नव्हतें. पण ते जाऊन आले आणि मग येतां येतां केदारला भेटल्यावर आम्हाला गोमुखाच्या गप्पा मारूं लागले. ( मी त्या खऱ्या-खोट्या कांहीं एक म्हणत नाहीं हो ).

ते म्हणाले कीं, गोमुखाच्या रस्त्यावर वरून धोंडे येतात. आणखी एक गोष्ट त्यांनीं सांगितली कीं, त्यांच्या पाठोपाठ म्हणे एक गोसाव्यांचा तांडा होता. पण कांहीं कारणामुळें त्यांची व त्या गोसाव्याची चुकामूक झाली. त्यांनीं एक वाटाड्या बरोबर घेतला होता. तर त्या गोसाव्याना रात्र अरण्यांत काढावी लागली व ते त्यांच्या मागून दुसरे दिवशीं गोमुखास पोहोंचले. त्याचप्रमाणें त्यांनीं गोमुखाची आणखी एक गम्मत सांगितली कीं, गंगेचें पाणी जितकें अधिक दूर जावें, त्याच्याहीपेक्षां पाठीमागें तिचा उगम असावा असें वाटतें. दुसरा कोणी म्हणे गोमुखाच्या पलीकडेही बारा मैल गेला होता, तोदेखील हेंच सांगत होता कीं, गंगेची धार कोठें निघाली ह्याचा पत्ता आठरा मैल गोमुखापुढें जाऊनदेखील लागला नाहीं. त्या गृहस्थास मी वसुधारेस जाण्यास सांगितलें होतें. आणि so he was thanking me while he was returning.

त्याने पंचवीस पंचवीस मैलांचा सपाटा मारला. बरोबर त्याची बायको व भाऊ. आम्हाला कोठें इतका सपाटा मारणें शक्य आहे ? आमच्याबरोबर साडे नऊ, साडे दहा मण बोजा घेतलेले कुली आहेत. मी सांगितलें म्हणून त्यांनीं तुंगनाथदेखील पाहिला आणि ते ह्या फुलांच्याबद्दल बोलत होते.

आम्ही ती दरी ओलांडली मात्र, तोंच समोरील डोंगरावरचें धुकें थोडें विरळ झालें. Oh ! what a voluminous mountain of snow ! तेथून म्हणे जगप्रसिद्ध तिबेटाच्या पठारास सुरवात होते. असेल बुवा ! कारण त्याच्या बाजू दिसतच नव्हत्या. तिकडच्या बाजूला धुकें होतें. मी तें धुके जाईल म्हणून


वाट पाहिली. तोंच तेंच धुकें त्या डोंगरावर पसरलें. And the voluminous mountain was out of sight. माझ्या कॅमेऱ्यांतील फिल्म संपली असल्यानें व कॅमेरा पुन्हां भरण्यासदेखील सावली तेथें न सापडण्यामुळें एक मोठा धोंडा पाहून त्याच्या खालीं सावलींत बसून दुसरी फिल्म भरेपर्यन्त, दि व्हॉल्यूम, वॉज आँट ऑफ साईट. माझ्या कॅमेऱ्यांतील फिल्म संपली असल्यानें मला फोटो घेतां आला नाहीं तरी वसुधारेजवळ गेल्यावर पुढेंदेखील तिकडचे ढग मोकळे होतात का, हें मी पहात होतों; पण तें फारच थोडक्या प्रमाणांत शक्य झालें. ती दरी ओलांडल्यावर आम्हाला वसुधारा दिसूं लागल्या. पण त्या दरीपासून सुमारें मैलभर जाईपर्यन्त वसुधारा म्हणजे पडतें तेंच पाणी हें मला कळलें नव्हतें आणि तिकडून येणाऱ्या एका गृहस्थानें तें दाखविल्यानंतरदेखील त्याच वसुधारा असाव्या, हें मला पटेना; कारण प्रो. विनोद सांगत होते कीं, 'वसुधारेची उंची १५००० फूट आहे' म्हणून. पण माणा गावांहून हजार दीड हजार फुटापेक्षां अधिक आलों असूं हें मला मुळीं पटेचना. बरें, वसुधारेच्या ठिकाणाची उंची दोन तीनशें फुटांपेक्षां अधिक असेल, हेंही मला पटेना. तेव्हां मी दोन तीन माणसांना वसुधारा ह्याच काय म्हणून प्रश्न केला आणि त्यांनींही त्याच वसुधारा म्हटल्यावर माझा इलाज चालेना !

धन्य धन्य बा हिमालया, धन्य तुझी ! काय तुझ्या वसुधारेचें सौन्दर्य ! असलें सौन्दर्य पाहतांना वर्षानुवर्ष कंटाळा यायचा नाहीं. वरून एकएक धार म्हणजे तीरासारखी पडत होती आणि त्याला जणू अणुकुचीदार टोंकही होतें. जसा एखादा फिरता बाण दिसावा ना, तशी एकएक धार फिरत फिरत येत आहे, असें वाटत होतें. एका पाठीमागें दुसरी, दुसरी पाठीमागं तिसरी, अशा हजारों धारा एकसमयावच्छेदेकरून वरून निसटत होत्या आणि आपला वेग वाढवीत वाढवीत, पृथ्वीमातेकडे धांव घेत होत्या ! पण आपल्या मानवी बाणांपेक्षा हे हिमालयाचे बाण किती किती निराळे ! आपल्या बाणांचा वेग as the time moves on कमी होत असतो, तर हे हिमालयाचे सोडलेले बाण अधिकाधिक जोरानें खालीं येत होते आणि जोरानें येतां येतां



चित्र सं. ५९

वसुधारेसमोर मी व प्रो. विनोद [ पृ. सं. १५८ ]




चित्र सं. ६०

वसुधारेहून दिसणारा दुसऱ्या व्हॅलीमधील अलकनंदा नदीचा उगम [पृ.सं.१५८]



चित्र सं. ६१) ज्या ठिकाणाहून चार व्हॅलीज् फुटतात, तेथून २४००० फूट उंचीच्या पहाडाचा देखावा [ पृ. सं. १५९ ]



चित्र सं. ६२
अलकनंदा नदीचें नागमोडी वळण.

खळ्कन् आवाज करून खालीं खडकांवर फुटत होते. मला पुष्कळ वेळां वाटलें कीं, वरील पर्वत काचेचे तुकडेच खालीं ढकलून देत असावा; आणि खरोखरीच माझी कल्पना अशी आहे कीं, त्या पाण्याच्या ओघाबरोबर वरून बर्फाचे तुकडेही खालीं खालीं पडत असतील. त्यामुळें एवढा मोठा आवाज होत असेल. विशेषतः जेव्हां वारा वाहतो, त्या वेळीं वरील धार खालील खडकाच्या एका बाजूला पडत असे आणि एवढ्या मोठ्यानें आवाज होत असे कीं, जणू एखादी पक्की कांचेची घागरच्या घागर अथवा हंडीच्या हंडी खूप उंचीवरून दगडावर टाकल्याचा भास होत होता.

बा हिमालया! तुझ्या श्रीमंतीचा मला फार हेवा वाटूं लागला आहे. मी पूर्वी एकदां एका श्रीमंत माणसाची गोष्ट ऐकली होती. त्याच्या नोकराच्या हातून म्हणे एकदां एका दुकानांतील हंडी फुटली. म्हणून तो दुकानदार त्या नोकराला वाटेल तें बोलला. त्यामुळें चिडून जाऊन हे श्रीमंत त्या दुकानांत आले आणि तेथील सगळया हंड्या विकत घेऊन त्यांतील एक एक हंडी रस्त्यावर फेकून त्यांचा चुरा करण्याचा सपाटा चालविला. आम्ही ह्या असल्या श्रीमंतीला हंसतों, पण आतां तुझ्या या श्रीमंतीला काय म्हणावें हेंच सुचेना. तूं इतक्या राजरोसपणें बाण फोडण्याचा सपाटा चालू केला असतांना आम्ही हंसण्याऐवजीं दिङ्मूढ होऊन तुझें कौतुकच करतों. तर असल्या तुझ्या विलक्षण श्रीमंतीचा कोणी हेवा करूं नये?

मी फिल्म भरली व इतक्यांत वरील दृश्य आणि कान भरून सोडणारा तो आवाज ऐकूं आला. मी तेथेंच तें दृश्य पहात बसलों, आणि शेवटीं खरोखरीच धोंड्यावर जाऊन बसून, तें दृश्य मनसोक्त पाहिलें आणि उगीच गडबड नको म्हणून कुंदनला सांगितलें, 'तूं जा पुढें.' मी धोंड्यावर बसल्यावर मला वाटूं लागलें कीं, हिमालय दारूकाम करीत असावा. आणि हे बाण येतां येतां खालील दगडावर आपटत असतील आणि त्यांत असलेल्या दारूमुळेंच हे इतक्या मोठमोठ्यानें आवाज करीत असतील. मी अनेक धबधबे पाहिले; पण इतका एखादी शिला-भेद करतांना होणाऱ्या आवाजासारखा कर्कश, पण हृदयंगम

आवाज मी कोठेही ऐकला नाहीं. मला वाटूं लागलें कीं, त्या धारा इतक्या जोरांत पडून खालील धोंड्याचाच मुळीं चुराडा करीत असतील आणि त्यामुळें त्याचा एवढा आवाज होत असेल. पण प्रत्यक्ष पाहिलें तों हे बाण आपलीं टोकें जोरांत दगडावर फेंकीत होते व त्यांचा नाश करण्याचा प्रयत्न करीत होते, पण स्वतःचाच जीव जातो, हें पाहिल्यावर मोठमोठ्यानें आरडाओरड करीत होते. पण खालील खडकांनाहीं तीं टोकें टोंचत नव्हतीं असें नाहीं. त्या गुळगुळीत झालेल्या मृदुल भागावर तीं टोकें घुसूं लागलीं म्हणजे तेही आपला कर्कश आवाज त्यांत मिसळत होते; पण हिमालयाचें आश्चर्य हें कीं, त्या दोन्ही आवाजांचें मिश्रण इतकें हृदयंगम होतें कीं, कानांचें आज पारणें फिटलें, असें मला वाटलें. मी तो देखावा पहात चांगला ५-१० मिनिटें बसलों नि मग विचार आला कीं, आपल्याला धबधब्याजवळ जायचें आहे, आतां उठा !

मी आणखी जवळ आलों तर त्या धबधब्याची आणखीही गम्मत दिसूं लागली. विचार आला कीं पाण्याला जाडी नाहीं, असें हे लोक म्हणतात तरी कसें ? पहा, अगदीं वरपासून पहा, तेथेंदेखील पाण्याच्या काड्या काड्याच दिसताहेत आणि खालीं झाडणीसारख्या त्या पसरत खालीं येत आहेत. पण खराट्यांत काडी एकच असते, here there are icicles together falling in the form of water आणि खालील खडक त्या लांबट धारांचा नुसता धुव्वा उडवीत होता आणि वारा खालील धुव्वा वरील धारांत मिसळून झेपेल तितक्या दूर नेत होता. खालीं जणू बारीक रजःकणांचे लोटच्या लोट उठत होते आणि त्यांतदेखील uneven वाऱ्यामुळें लाटा उत्पन्न होत होत्या, आणि ते रजःकण सारखे हालत होते आणि वारा फारच जोर करूं लागला म्हणजे धारा खालील धोंड्यावर अशा तऱ्हेने पडत कीं एखाद्याला वाटावें कीं हा बेटा वाऱ्यावर रागवून ओरडत आहे ! कारण वाऱ्यानें त्यानें उत्पन्न केलेले अन्न नेलें. It was nothing but a crank noise !

तेथून पुढें वसुधारेचें पाणी ज्या दरींतून जातें, ती ओलांडायची होती.

त्यांत दगडदेखील भरपूर नव्हते कीं बुवा त्यांच्यावरून पायताण न काढतां जावें! मी सरळ बूट हातांत घेऊन पुढें गेलों तर पहिल्या चढणीवर प्रो. विनोद एका धोंडयाला टेंकून बसले होते. तेथें वसुधारेच्या उडालेल्या ठिकऱ्यांतलि कण वारा आमच्या अंगावर मार्जन करीत होता. वसुधारेची नदी ओलांडतांच मी प्रोफेसर विनोदांना सांगितलें कीं, 'आज ह्या गार पाण्यानें आपण खालीं आंघोळ करायची आणि तेवढ्यासाठीं मी टॉवेलदेखील आणला आहे.' पण विनोद म्हणाले, 'पाणी गार आहे. तरीदेखील आपला फराळ झाल्यावर पाहूं. त्या आधीं आपण वर जाऊन येऊं या.'

आम्ही वर गेलों आणि तेथें आम्हाला कळले कीं, ह्या वेळीं वारा Favourable असल्यानें वाऱ्याच्या झोतामुळें पाण्याचे तुषार अंगावर पडत आहेत. तेथें लोक अंगावर तुषार घेऊन स्नान करतात. ओ! खरोखरीच मार्व्हलस्! त्या तुषारांच्या ठिकाणीं गेल्यावर मनाला इतका आनंद झाला, मनाला इतका आल्हाद वाटला कीं, I shall remember that unique shower bath through out my life! अंगावर थोडे थोडे तुषार येत असतां वारा येई आणि त्यामुळें धारा हलल्या जाऊन दगडाच्या अशा एका भागावर पडत कीं एकदम शॉवरचा सट्किनी सपाटा बसत असे आणि त्या वेळीं मनाला इतक्या गुदगुल्या होत कीं, शरिरांतून एखादी संवेदना जात असावी, असें वाटे. अहाहा! काय ते गार तुषार! आणि काय त्यांचें अंगावर पडणें! गार पाऊस थोडा थोडा अंगावर पडत असतां एकच शॉवर थोडी मोठ्यानें आल्यास जे रोमांच अंगावर उभे राहतील त्याचा अनुभव मला तेथें मिळाला. मी व प्रो. विनोद तेथें कपडे काढून मुद्दाम म्हणून गेलों होतों आणि ह्या अनुभवानंदाचा आस्वाद आम्ही जवळ जवळ आठ दहा मिनिटें घेतला. तें बर्फाचें पाणी जरी होतें, तरी ते तुषार अशा कांहीं तऱ्हेनें उडत कीं, नेहमींच गार पाण्यानें आंघोळ करणाऱ्या आम्हां दोघांनाही तेथून हलवेना. असा कांहीं गमतीदार आणि आल्हादकारक आम्हाला शॉवर बाथ मिळत होता! पण विचार केला कीं, हा हा शॉवर बाथ कितीही आल्हादकारक असला तरी अति केल्यास अंगावर आल्या-

खेरीज राहायचा नाहीं. तेव्हां आम्ही मोठया नाखुषीनें धारा सोडून बाहेर आलों. ( अर्थात् ह्या धारांच्या ठिकाणींदेखील संकल्प सांगायला एक जण हजर होताच ! )

ज्या वेळेस गोडीवाला गोमुखाच्या, नंतर तुंगनाथाच्या व मग वसुधारेच्या गप्पा सांगूं लागला, त्यांचें वर्णन करूं लागला, त्या वेळीं मी व प्रो. विनोदांनीं ठरविलें कीं, आपण या गोडीवाल्यापेक्षां वसुधारेला कांहींतरी अधिक पहायचें. वसुधारेच्या उंच पहाडावरून आम्ही आलेली खिंड सोडून इतर तीन खिंडी दिसतात, त्यांतील एका डाव्यां हाताच्या खिंडींत दिसलेल्या उंच पठाराचें वर्णन मागे आलेंच आहे. ह्या चारी खिंडींच्या मध्यें सुमारें दोन मैल व्यासाचें एक पठार आहे. वरील तीन खिंडींपैकीं एकींतून अलकनंदेचा उगम आहे. आम्ही असा बेत केला कीं, हे पठार होईल तितकें अलकनंदेच्या कांठाकांठानें क्रॉस करायचें व कांहीं विशेष दिसतें कीं काय, हें पहायचें. कारण काय तर प्रो. गोडीवाल्यांपेक्षां अधिक कांहीतरी करायचें !

त्याप्रमाणें फराळ झाल्यावर दोन तीन फोटो घेतले व मी व प्रो. विनोद दोघेच तिकडे जायला निघालों. प्रो. विनोदांना साधूंचें दर्शन घ्यायचा मोठा शोक आहे. त्यांना कळलें कीं, वर ज्याप्रमाणें साधु आहेत, त्याप्रमाणें त्या डोंगराच्या खालींही एक आहे. पण मी कांहीं साधूंच्या फारसा फॉर नाहीं, हें त्यांना माहीत असल्यानें मी फिल्म भरीत असतां ते न थांबतां पुढें गेले. आम्ही डोंगर उतरल्यावर पुढेंही जाण्यास आम्हाला एक पाऊल-रस्ता मिळाला व त्यावरून आम्ही पुढें निघालों. पण एक मोठी गंमत झाली कीं, आम्ही दोघेही बरोबर रेन-कोट अगर छत्र्या घ्यायला विसरलों. त्याचे असे झालें कीं फराळ झाल्यावर तें बर्फावरून येणारें वारें वसुधारेच्या तुषारांमुळें चांगलेंच झोंबूं लागलें. त्यामुळें प्रो. विनोदांचे दंडीवाले व आम्ही बरोबर आणलेले गडी सर्व पुढें पळून गेले. त्यांतील आम्ही चमोलीस केलेला छोकरा आमचे रेनकोट, छत्र्या घेऊन केव्हांच पुढें निघून गेला आणि मी व प्रो. विनोद फोटोच्या भानगडींत असल्यानें तें आमच्या लक्षांत मुळींच आलें नाहीं व नंतर प्रो. विनोद साधूला भेटायच्या नादांत गडबडीनें पुढें निघून गेले म्हणून

मी फिल्म गडबडीनें भरीत त्यांच्या पाठोपाठ आलों. त्यामुळें जरी फोटोच्या ठिकाणीं कुंदन होता व त्याच्याजवळ एक छत्री होती, तरीदेखील ती घेण्याची बुद्धि आम्हाला झाली नाहीं. मी तो डोंगर उतरल्यावर प्रो. विनोदांना म्हणालों-देखील कीं, आपण दोघेही छत्री घेतां निघालों आहोत तें कांहीं बरें नाहीं. पण एकदां पुढें जायचेंच म्हटल्यावर पुढें जायचेंच !

पुढेंदेखील मागच्याप्रमाणेच फुलांचे गालिचे आहेत. कांहीं ठिकाणीं फेन्ट ब्लू रंगाचीं व अस्मानी रंगाचीं फुले दृष्टीस पडतात. पण पायवाट असल्यानें आम्ही अलकनंदेच्या कांठाकांठानें चाललों होतों.

" हिमालयो नाम नगाधिराजः " धन्य धन्य तुझी हिमालया ! खरा खरा तूं एक देवतात्मा आहेस, हें मला आज पटलें. अरे काय रे तुझीं हीं उंच शिखरें ! आम्ही तीन्ही खिंडींच्या मध्यावर जाऊन जों मागे पाहतो तों मागील पर्वतावरील धुकें थोडें विरलें होतें आणि कल्पनादेखील करतां यायची नाहीं, इतकीं उंच शिखरें आम्हाला दिसूं लागलीं. एक होतें तंबूच्या आकारासारखें conical व त्याच्याच मागें त्याहीपेक्षां उंच दुसरें दिसलें वशिंडासारखें. तीं शिखरें पाहून मन थक्क होऊन गेलें. चौदा हजार फुटांवर आठ हजार-नऊ हजार फुटांपर्यन्त शिखरें असावींत, ह्यापेक्षां जगांत दुसरें आश्चर्य असेल असें मला वाटत नाही. तें टोंक म्हणजे नुसता काळा कडाच्या कडा होता ! एकदम एखादें गेंड्याचें शिंग असावें, इतका स्लोप होता व पुढें एकदम करोल कड्याखेरीज कांहींही नव्हतें. आणि त्याहीपेक्षां उंच असलेलें वशिंड पाहिल्यावर मला माझी यात्रा सर्व सफल झाल्यासारखें वाटूं लागलें. आजच्या वसुधारेच्या स्नानामुळें चारी धामांचे श्रम परिहार झाले आणि आतांच्या देखाव्यामुळें सारी यात्रा सफल झाल्यासारखें वाटलें. इतका अनुपम आनंद, इतका सोन्याचा दिवस पुन्हां कधींही उगवणार नाहीं, असें मला वाटलें. मी. प्रो. विनोदांना म्हणालोंदेखील, ' we the uniques of the universe ! ' खरोखरी ही हिमालयाची भव्यता पहायला, हें हिमालयाचें सौन्दर्य पाहायला, आपल्याकडील एकही सुशिक्षित येत नाहीं, ह्यासारखें हिंदुस्थानचें दुर्भाग्य नाहीं !

ज्या वसुधारेचें मी मागें वर्णन केलें, त्या धारेजवळील उंच उंच कडे दिसूं लागले असल्यानें त्या धारा अगदींच किरकोळ दिसल्या होत्या. पण ह्या डाव्या हाताच्या काळ्या कड्यापेक्षांही दूरवर समोर दिसणारीं तीं बर्फाच्छादित शिखरें अधिक उंच दिसत होतीं. वसुधारा म्हणे चारशें फुटांवरून पडत आहेत, पण माझी जवळ गेल्यावर कल्पना झाली कीं, त्या धारा निदान हजार फुटांवरून तरी पडत असाव्यात. आणि ह्या दृष्टीनें मी ज्या पुस्तकांत धारा ४०० फुटांवरून पडतात, असें लिहिलें होतें, त्याला दोषदेखील दिला. पण त्या चारीं खिंडीच्या मध्यभागाहून ज्या वेळीं वसुधारा अगदींच किरकोळ दिसूं लागल्या, तेव्हां कदाचित् पुस्तकांतील खरेंही असूं शकेल, असें वाटूं लागलें. हे हिमालयाचे करोल कडे पाहिल्यावर मला वाटूं लागलें आहे कीं, खडया कडयावर चढवणारें जर एखादें यंत्र काढलें, तरच प्रत्येक शिखरावर आपल्याला जातां येईल व भोंवतालचें सृष्टिसौन्दर्य निरीक्षण करतां येईल. एखादें असेंच घोरपडीसारखें दगडांत रुतून बसणारें यंत्र जर निघालें तर त्याला एखादी टोपली टांगून वर जायचें, अर्थात् असलें यंत्र निघालें तरी त्या टोपलींत बसून कडा चढणें म्हणजे एक दिव्य धारिष्टच लागेल यांत शंका नाहीं. पण वाटतें, एखादे वेळेस प्रत्येक कडयावर चढून जावें व पलीकडे काय गम्मत आहे, ती पहावी! आणि मग त्या वसुधारेहून चढून चारशें फूट लिहिणाऱ्या माणसाची फजीती करावी, असा माझा बेत अजूनही आहे.

इतक्यांत पावसाचें गार वारें सुटले. प्रो. विनोद लवकर परत जाऊं या म्हणूं लागले. पण मला त्या तीन बाजूला तीन दिसणाऱ्या खिंडी पाहण्याचें समाधानच होईना! सारखें वाटूं लागलें कीं, आणखी एक दहा पंधरा मिनिटें थांबल्यास डाव्या बाजूच्या खिंडींतून पुन्हां तो उंचच्या उंच पहाड दृष्टीस पडेल व आपल्याला निदान एकतरी उत्तम फोटो काढायला मिळेल. पण छत्र्या नसतांना प्रो. विनोदांनीं पावसाचें नांव काढलें म्हणून आम्हाला तेथून निघून परत जाण्याचा बेत करावा लागला आणि खरोखरीच आम्ही वसुधारेजवळ येईपर्यन्त पाऊस यायला सुरवात झाली. जरी आम्ही एका धोंड्याचा आश्रय

घेतला तरीदेखील आम्ही बरेच भिजलों. आमचा रेनकोट, छत्री वगैरे मिळेपर्यंत तें पुन्हां सर्व सुकून गेलें.

त्याची मोठी गम्मत झाली! आम्ही इतरांना सांगितलें होतें कीं, 'तुम्ही थोडें पुढें जाऊन बसा, आम्ही येतोंच.' पण आम्ही दुसऱ्याच रस्त्यानें डोंगर न चढतां आलों. तेव्हां विनोदांना शंका आली कीं, ते लोक वरच राहिले की काय आणि म्हणूनच आम्ही मोठमोठ्यानें हांका मारल्या. तिकडे परत जावें की नाहीं, ह्याबद्दल 'भवति न भवति' केली आणि शेवटीं दडपून देतों ऐसाजे म्हणून पुढेंच निघून आलों. नशिबानें ते सर्व प्रो. विनोदांच्या दंडीजवळ जाऊन बसले होते.

परत येतांना तीं उंच शिखरें पुन्हां दिसतात काय, हें मी पहात होतों. त्या शिखरांची उंची २५००० फुटांपर्यन्त आहे, असें प्रो. विनोद सांगत होते. पण त्यांतील राहुटीच्या आकाराचें टोंक तवढें दिसलें व फोटो काढून थोडा वेळ झाला नाहीं, तोंच तें ढगांत पुन्हां गडप झालें! पूर्वीच ठरल्याप्रमाणें आम्ही माणा गांवांत कांहीं विशेष वस्तु मिळतात कीं काय, हें पहायला गेलों. पण अशी कांहींएक वस्तु मिळाली नाहीं. तेथें जवळ व्यासांचा आश्रम आहे, तोही पहावयास आम्ही गेलों. व्यासांनीं म्हणे जें महाभारत लिहिलें, त्याचा धोंडा होऊन तेथें सांपडला आहे आणि खरी गोष्ट अशी आहे कीं, त्या धोंड्यावर पोथीचीं पानें असावींत, अशा रेषा आहेत.

आज आरतीला जायला उशीर झाल्यानें फक्त भगवानाचें निर्वाण-दर्शन तेवढें झालें; पण देवळांतून परत येतांना कांहीं फोटो विकत घ्यावे म्हणून जे गेलों, तों फार गम्मत झाली. तेथें एक गृहस्थ आम्हाला गढवाली हिमालयाची माहिती देऊं लागला. (आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, बाबांनीं तीन वर्षां पूर्वी घेतलेले सर्व फोटो त्याच्याजवळ आहेत!) त्यानें आम्ही पाहिलेल्या खिंडीची व रस्त्याची खूप माहिती दिली. कोठल्याशा व्हॅलींत अत्यंत सुंदर सुंदर फुलें उत्पन्न होतात, त्याबद्दलही त्यानें सांगितलें आणि हिमालय हा नगाधिराज आहे, त्यांत कित्येक डोंगर असे आहेत कीं, ते माणसांनीं अजूनही तुडविलेले

नाहींत ! हिमालय हा देवतात्मा आहे, त्यांत कित्येक पर्वतदेखील सूर्यानें पाहिलेले नाहींत ( धुक्यामुळें ) वगैरे वगैरे मनोरंजक गप्पा त्यानें मारल्या आणि त्यामुळें इतका उशीर झाला कीं, नमस्कार होऊन जेवण व्हायला साडे दहा वाजून गेले.

गंमत पहा ह्या हिमालयाची. प्रत्येक ठिकाणीं त्याची गंमत निराळी आहे. गंगोत्रीस जवळून बर्फाचे डोंगर पहायला मिळाले, गंगोत्रीस गंगेची गंमत, केदारास प्रत्येक ओघळींतून पडत असलेल्या छोट्या छोट्या धबधब्यांची गंमत आणि येथें अजब पहाडांची गंमत ! हें सर्व दृश्य एकसमयावच्छेदेंकरून लक्षांत आणलें कीं, महाकवि कालिदासाची ओळ डोळ्यापुढें उभी राहते—

" अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा ।
हिमालयो नाम नगाधिराजः ॥ "

समाप्त